दिवाळी १९६७

# माणूस

संध्याकाळीं बघुनी सगळी कांति ती पश्चिमेला
वाटे सद्य:स्थितिच अपुली मूर्त ती मन्मनाला

तेणें माथें फिरुनी सगळें जें म्हणोनी दिसावें
त्या त्या मध्यें स्वजनकुदशा वाचुनी मी रडावें !

केशवसुत


अचानक बंद
पडणाऱ्या
वीजप्रवाहामुळे
होणारा अंधार...
केंव्हाहि कोठेहि
धोकादायकच!
ऑपरेशन थिएटर्स,
दुकानें, बँका, हॉटेल्स,
इत्यादि ठिकाणी
'स्पॉटलाइट' बसवा
आणि निश्चींत व्हा!
अचानक
होणाऱ्या अंधारांत
तात्काळ प्रकाश
देणारा!
स्पॉटलाइट
आपला इमानी
संरक्षक!
Spotlite
अधिक चौकशीसाठीं भेटा/लिहा:
मे. आनंद ट्रेडर्स,
११८० बुधवार पेठ, पुणें-२.
उत्पादक:
मे. मिनीएचर इलेक्ट्रिकल्स
जयसिंगपूर

• दीपावली शुभचिंतन •



# नजरेतील आनंदाची चमक...

कांहीं विशिष्ट प्रसंगीं भेटवस्तू देऊन स्नेह व्यक्त करणें अगत्याचें असतें; आणि अशा भेटवस्तूंमुळें
आपल्या आवडत्या व्यक्तीला प्रेमाचा प्रत्यय येतो, व तिचे डोळे आनंदानें उजळून जातात हें खरें.
परन्तु, हेहीं विसरतां नये कीं आपलें प्रेम व्यक्त करण्याचा आणखी एक चांगला मार्ग आहे.
प्रिय व्यक्तींच्या नांवानें बँक ऑफ इंडियांत सेव्हिंग्ज बँक खातें उघडून
आपल्या भेटवस्तूला कायम स्वरूप द्या.

दी
बँक ऑफ इंडिया
लि.
टी. डी. कंसारा, जनरल मॅनेजर

RAAS/B/94 A MAR

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : एकवीस ते चोवीस

मूल्य : दोन रुपये

संपादक : श्री. ग. माजगावकर

साहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

## मी संध्यासमयीं....

समस्याच समस्या. गुळासाखरेपासून तो थेट बेळगाव–श्रीनगरपर्यंत. एकीचाही मुळापासून विचार नाही, नेट धरून आचार नाही. त्यामुळे सर्व क्षेत्रात अनागोंदी आणि अंदाधुंदी. कशालाच यश नाही. सगळी दैना. राजकीय क्षेत्रात माघार, आर्थिक क्षेत्रात मंदी, शैक्षणिक क्षेत्रात सावळा गोंधळ. अशा वातावरणात दिवाळी साजरी करायची तरी कशी !

सगळ्या समस्यांचा एका अंकात मुळापासून विचार शक्यच नाही. पण ' बुद्धिवंतांच्या निर्यांती 'ची एक गंभीर समस्या श्री. वि. म. दांडेकर यांनी विस्ताराने येथे मांडली आहे.

हे पश्चिमेचे जबरदस्त आकर्षण व त्यातून उद्‌भवलेली सर्व क्षेत्रातील अनुकरणाची, उसनवारीची भीकमागी वृत्ती कमी झाल्याशिवाय आम्ही खरीखुरी दिवाळी कशी साजरी करू शकणार !

दिवाळखोरांनी खरं म्हणजे दिवाळी साजरी करण्याचा उसना, खोटा आव आणूच नये !

सर्व क्षेत्रांतील ' स्वजनकुदशां ' पाहून पाऊणशे वर्षांपूर्वी केशवसुत खंतावले. ती खंत असल्या दिवाळखोरांच्या दिवाळी आनंदापेक्षा आज अधिक प्रकाशदायी ठरण्याचा संभव आहे. कवीने तेव्हा लिहिले—

**संध्याकाळी बघुनी सगळी कांति ती पश्चिमेला**
**वाटे सद्यःस्थितिच अपुली मूर्त ती मन्मनाला**
**तेणें माथें फिरूनी, सगळे जे म्हणोनी दिसावे**
**त्या त्या मध्यें स्वजनकुदशा वाचुनी मी रडावें !**

—एका भारतीयाचे उद्‌गार, १८८६

दिवस उत्सवाचे, आनंदाचे आहेत हे माहीत असूनही कुठेतरी, कुणीतरी आज अनावरपणे रडले पाहिजे. या अश्रूतूनच कदाचित् उद्याचे मोती पिकतील, मयूरसिंहासने निर्माण होतील, खरा स्वयंप्रभ भारतीय ' माणूस ' जागा होईल.

तरीपण ज्यांना हवी त्यांना ही दिवाळी आनंदाची जावो.

यंदा शताब्दी साजरी झालेल्या केशवसुतांचीच ' दिवाळी ' येथें उद्धृत करायची तर —

**खाणे आणि पिणे, विनोद करणे, गाणेहि वा खेळणे,**
**जैसे ज्यांस रुचेल त्यापरि तुम्ही या उत्सवी वागणे;**
**मी संध्यासमयीं खुशाल गिरणातीरावरी बैसुनी**
**कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी !** ●

— संपादक




**वेस्टर्न इंडिया केमिकल कंपनी.**

**बोरिवली, मुंबई-९२**

वाजवी किंमत व उत्कृष्ट माल हे वैशिष्ट्य

**सर्व ग्राहकांस दीपावली शुभचिंतन**

व्यापारी बंधूंनी माल व कॅलेंडर्स यांच्या संयुक्त बक्षीस योजनेसाठीं लिहावे.



# सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे

पहाटेचा गार वारा सुटलेला असायचा. अंगणातला पारिजातक दरवळत असायचा. गोठ्यात घंटा घुंगरांची रिंगटिंग अधून मधून साद घालीत असायची. अजून सारं अंधारलेलंच असायचं. डोंगराच्या माथ्यावर शुक्राची चांदणी लखाखत असायची. पुरंदर गडाचा घेरा साखरझोपेत असायचा. पण सरकारवाड्यावरच्या नगारखान्यात चौघड्यावर याच वेळी टिपरी पडायची. सनईचे रव लहरू लागायचे. अजून पाखरं जागी झालेली नसायची. न्हाव्याचा छगन सनई फार सुरेल वाजवायचा. नगारखान्याच्या दाराझरोक्यांतून त्याच्या सनईचे नाजूक सूर सांडत असायचे. कुठून तरी कोंबड्याची बांग ऐकू यायची.

गोठा जागा व्हायचा. अंगणात सडा शिंपला जायचा. त्याचे शिपकारे आणि बांगड्यांचे आवाज ऐकू यायचे. गाईंच्या धारा निघत असायच्या. चरवीत धारा वाजायच्या. पाखरांची किलबिल सुरू व्हायची अन् देवघराच्या दिशेकडून वहिनीसाहेबांच्या गोड

ओळी माझ्या साखरझोपेला जाग आणायच्या. मधूनच त्यांच्या पायांतली जोडवी वाजायची. ताकाचा डेरा घुमायला लागायचा. चंदनाच्या धुरासारखे त्यांचे शब्द सरकारवाड्यात तरळत राहायचे.

ऊठ श्यामला श्रीरंगा रे लोचन उघडी जरा
अधीरली रे वसुंधरा तव दर्शन दे श्रीधरा

अन् त्याच वेळी नाकावरून जायचा बाळंतशोप्याचा आणि ओव्यांचा वास. सरकारवाड्यातली बाळंतिणीची खोली सहसा सुनी नसायचीच !

भवानी महालात भास्करबुवांचा रियाज चालू असायचा. तंबोऱ्याच्या तारा झंकारायच्या आणि बुवांची रागदारी साऱ्या सरकारवाड्यात दरवळायची.

उन्हं वर यायची. सरकारवाडा उजळून निघायचा. वाड्याच्या मागे दक्षिणेला दूरवर पुरंदरगडाचा हिरवा निळा पहाड सोनेरी उन्हात खुलायचा. सरकारवाड्याची इमारत फार सुरेख दिसायची. वाड्याच्या सभोवार विशाल अंगण होतं आणि आठ बुरुजांचा कोट होता. उत्तरेला तोंड करून भव्य दिल्ली दरवाजा होता. दरवाजाला अणकुचीदार लोखंडी सुळे होते. दरवाजा नेहमी बंद असायचा. उघडी असायची दिंडी. दरवाजाच्या आत डाव्या हाताला देवडी होती. देवडीवर मुक्काम असायचा खानबाबांचा. दरवाजा ते सांभाळायचे. खानबाबा थकले होते. वाकले होते. पण फार खबरदार होते. देवडीत टांगलेल्या मोठ्या थोरल्या वाटोळ्या तासावर दर तासाला ते टोल देत. नवल असं की, रात्री प्रत्येक तासाला खानबाबा अचूक जागे होत आणि घड्याळात जितके वाजले असतील तितके टोल देत. कधीही टोल चुकायचे नाहीत. कधीही मिनिटभरसुद्धा टोल मागेपुढे पडायचे नाहीत.


देवडीवर एक भला मोठा पितळी पिंजरा होता. त्यात एक गुबगुबीत पोपट होता. पोपटाचं नाव होतं 'पोपटराव !' खानबाबांची आणि पोपटरावांची फार दोस्ती. खानबाबांना वर्दी देण्याचं काम पोपटराव बिनचूक करीत. सकाळी नऊच्या सुमारास वहिनीसाहेब शैलेश्वराच्या दर्शनासाठी निघत. त्या वाड्याच्या अंगणात उतरल्या की, पोपटराव खानबाबांना वर्दी देत,

"खानबाबा खानबाबा, वहिनीसाहेब आल्या !"

लगेच लगबगीने खानबाबा उठत. दरवाजाची कडी अन् अडसर काढीत. सबंध दरवाजा उघडीत आणि मुजरा करीत उभे राहत. वहिनीसाहेब बाहेर पडल्यावर पुन्हा दरवाजा बंद करीत. हा मान फक्त वहिनीसाहेबांचाच. त्या जेव्हा जेव्हा वाड्याबाहेर पडत व परत येत तेव्हा तेव्हा त्यांच्यासाठी दरवाजा पूर्ण उघडला जाई अन् त्याच वेळी वरच्या नगारखान्यात नगारा कडाडे आणि शिंगाची ललकार उठे.

देवडीवर तऱ्हेतऱ्हेची जुनी हत्यारं भिंतीशी लटकावलेली असत. खानबाबा फार हौशी. त्या ढाली बंदुकांना तेल लावून आणि भालेतलवारी घासून पुसून ते लखलखीत ठेवीत.

• दीपावली शुभचिंतन •




# डायमंड

## टॅक्सी मीटर्स

वापरल्याने तुमचा प्रारंभीचा खर्च निम्याने कमी करा.

प्रख्यात **डायमंड** घड्याळाच्या निर्मात्यांनी तयार केलेले टॅक्सी मीटर आयात केलेल्या मीटर पेक्षा निम्म्या किंमतीला मिळत असल्याने तुमच्या प्रारंभीच्या खर्चात तात्काळ निम्म्याने बचत होते.

**या शिवाय डायमंडकडून मिळणारे अन्य फायदे.**

* मीटर विनामूल्य बसविला जातो
* एक वर्षाची हमी दिली जाते
* एक वर्ष दुरुस्ती मोफत करून मिळते.

**डायमंडची खास वैशिष्ट्ये :-**

• डायमंड मीटरचे वजन फक्त ५॥ कि. ग्रॅ. म्हणजे आयात केलेल्या मीटरच्या निम्मे • मजबूत बनावट
• अंगची गिअर बॉक्स असल्यामुळे आटोपशीर
• अॅडॅप्टर, फलेक्झिबल शाफ्ट आणि पावसापासून संरक्षण मिळण्यासाठी वॉटरप्रूफ कव्हर दिले जाते • स्पेअर पार्टस् ताबडतोब मिळतात व आदलाबदलहि करता येते.

**डायमंड क्लॉक मॅन्युफॅक्चरिंग कंपनी प्रा. लिमिटेड**

११८०, बुधवार पेठ, पुणें-२. फोन : ५६१४५

सोल सेलिंग एजण्टस : मे. आनंद ट्रेडर्स ४३८ ३ गोखले रोड, पुणे १६.

PRATIBHA 6510

देवडीत पटईच्या कड्यांना एक सुंदर नक्षीचा मेणा अन् एक पाखील टांगून ठेवलेली होती.

सरकारवाडा म्हणजे एक छोटासा भुईकोट किल्लाच होता. कोटाचा ऐन मध्य साधून सरकारवाडा उभा होता. आज तो अडीचशे वर्षे असाच उभा होता. सायसंगीत चिरेबंदी घडणीच्या आमच्या सरकारवाड्याला एकूण दालनं होती सत्तेचाळीस. ओसऱ्या, ओटचा, माजघरं, धान्याच्या कोठचा, जामदारखाना, देवघर, मुदपाकखाना, खजीना, दफ्तरखाना, फरासखाना, रंगमहाल, भवानीमहाल, शिणगार महाल, दिवाणकचेरी, बाळंतिणीची खोली, जिन्नस कोठी, खाजगीच्या कोठचा, एक की दोन ? अशी सारी दालनं होती. वाड्याची तुळवटं, कडीपाट, खांब आणि कमानी अशा भक्कम होत्या की, निदान आमच्या आजोबांपासून माझ्यापर्यंत वाड्यात कधी दुरुस्ती करायची वेळ आल्याचं कोणाला स्मरत नाही. नाही म्हणायला एकदा मागच्या ओटीवरचा एक खांब भुंग्यांनी पोखरून काढला. तेव्हा तिथं तसाच्या तसा दुसरा खांब वहिनीसाहेबांनी बसवला. तेव्हासुद्धा सुताराच्या पुढं प्रश्न पडला की, या उभ्या इमारतीतला हा नक्षीदार खांब काढून दुसरा खांब बसवायचा कसा ? वरचं तुळवट उचलायचं कसं ? शहरापासून दूर आडबाजूला असलेल्या गावी आधुनिक साधनं आणि इंजिनीयर आणायचे कसे ? तेव्हा वहिनीसाहेबांनी एक युक्ती केली. वाळलेल्या हरबऱ्याने भरलेली पोती एकावर एक रचली व तुळवटाला भिडवली. नंतर त्या हरबऱ्याच्या पोत्यावर पाणी ओतलं. सारा हरबरा भिजवला. दुसऱ्या दिवशी हरबरा भिजून पोती फुगली. टरारून फुगली आणि वरचं ते तुळवट आपोआप वर उचललं गेलं. कुजका खांब काढून तिथं नवा खांब बसवला गेला. बस्स ! एवढीच दुरुस्ती.

सरकारवाड्याचं पुरंदरगडावर फार प्रेम. ज्यांनी सरकारवाडा बांधला त्यांचं तर गडावर अलोट प्रेम असलं पाहिजे. वाड्यातल्या प्रत्येक दालनाला एक तरी खिडकी अशी होती की तिथून गडाचं दर्शन घडावं. अगदी बाळंतिणीच्या खोलीपासून खजिन्याच्या कोठीपर्यंत कोणत्याही दालनातून गड दिसायचाच. देवघराची रचना तर अशी साधली होती की, गडावर केदारेश्वराच्या देवळात घंटा वाजली की देवघरात तिचा मंद पडसाद उमटायचे. शिवरात्रीला केदारेश्वरापुढं झडणाऱ्या चौघड्याचा खणखणाट आमच्या देवघरात उमटायचा.

वाड्यातली सारी दालनं ऐसपैस होती. उंचीपुरी होती. रंगमहाल आणि भवानी महाल तर झोकदार होते. भवानीमहालात गौरीगणपती आणि नवरात्रं बसायची. रंगीबेरंगी हंड्याझुंबरांनी महाल झगमगत असत. भिंतींवर अडीचशे वर्षांपूर्वी काढलेली रंगीत चित्रं अजून तश्शी होती. रंग विटले नव्हते की गिलावा ढासळला नव्हता. देवदेवतांची व पौराणिक प्रसंगांची चित्रं मोठी डौलदार होती. सीता, पार्वती, लक्ष्मी, सरस्वती इत्यादी साऱ्याजणी नाकात नथा घालून गोट, तोडे,

वाकी, टिका, ठुशा, राखडया, मुदी, अग्रफुलं, बाळया, वुगडया वगैरे सारे दागदागिने आणि भरजरी चोळया पैठण्या लेवून न लाजता आपापल्या नवऱ्याच्या मांडीवर वसल्या होत्या.

· नवरात्रात इथं देवीपुढं नऊ दिवस गोंधळ असायचा. सप्तशतीचे पाठ व्हायचे. गाणीबजावणी आणि कीर्तनं व्हायची. भास्करबुवांची कितीतरी कीर्तनं इथं झाली. दसऱ्याला शिलंगणाची स्वारी सोनं लुटून आली की, इथंच मानपान व्हायचे. कलावंतांचे सत्कार व्हायचे. शेवटी व्हायचा नाच. सरकारवाडयात सणासमारंभात नाचणारी एक कलावंतीण होती. तिचं खानदान मोठं होतं, पिढयान्‌पिढया त्या कलावंतिणींची पावलं आमच्या वाडयात तालासुरांत पडत होती. कधी कुणाचं वाकडं पाऊल पडल्याची दफ्तरात नोंद नाही, की माजघरात कुजबूजही नाही. गाण्यानाचण्यासाठी आमच्या घराण्याने ह्या कलावंतिणीला कायमचं वतन व दरसाल दसऱ्याला रोख रकमेची नेमणूक करून दिलेली होतं. असे रंगलेले दसरे मी सरकारवाडयात पाहिले आहेत. नाचणारी कलावंतीण होती मुसलमान. मला तो दसरा आठवतोय. शिलंगणाची स्वारी दिल्ली दरवाजाशी आली. आमचे वडील शेला सावरीत आघाडीला होते. बकऱ्याच्या रक्ताने लालावलेली तलवार खांद्यावर घेऊन मी त्यांच्या शेजारीच होतो. माझ्या मागे भवानबंकीच्या हातात बकऱ्याची फरामुंडी लोंबत होती. शिंगं नगारे वाजत होते. जरीपटका अन् भगवा झेंडा घेऊन मानकरी उभे होते. ताशे तडाडत होते. औक्षणासाठी आम्ही दरवाजात थांबलो होतो.

वहिनीसाहेब पंचारती घेऊन आल्या. औक्षण झालं. भवानी महालात बैठक भरली. महाल गच्च भरला होता. सुरुवातीला गोंधळ्यांनी देवीची काही पदं म्हटली. मानपान झाले आणि अख्तरबाई नाचायला उभी राहिली. सारंगी वाजू लागली. आप्पा गुरवाचा पखवाज घुमू लागला. अख्तरबाईची पावलं पडू लागली. नाचता नाचता ती दाणेदार आवाजात म्हणत होती,

‘ घनश्याम पिया मोहे साथ न आ
ससुराल सामने है तू चले चले जा ’


तिचे हातवारे, तिच्या डोळयांच्या आणि भिवयांच्या हालचाली, तिच्या पावलांचा होणारा तालबद्ध आघात तिच्या मानेची, हनुवटीची, खांद्यांची आणि साऱ्याच देहाची हालचाल इतकी मोहक आणि चपळ होती की, सारा महाल स्वत:ला विसरून जाऊन तिचा नाच बघत होता. ती स्वत:ला तर केव्हाच त्या गोकुळात हरवून बसली होती. आप्पाची बोटं पखवाजावर नाचत होती. नाचता नाचता तिचं गाणं आपोआप थांबलं, पण शरीर मात्र वाढत्या लयीने थयथयत राहिलं. कितीतरी वेळ ती नाचत होती. आपलं सारं कसब ती ओतत होती. नाचता नाचता अखेर तिने एक प्रदीर्घ गिरकी घेतली आणि एकदम जमिनीवर बसली. पखवाज

For

Quality Polythene Bags

in any size

& gauge



*Contact :*

# M/s. Balsons

Pimpri,

Poona - 18.

थांबला. 'वाहवा वाहवा' असा एकच आवाज उठला. काही वेळ ती तशीच मस्तक भुईवर टेकवून बसली. नंतर तिने हळू हळू मान वर उचलली. तिचे ते पांढरे शुभ्र केस भुरभुरत होते. तोंडावरच्या सुरकुत्यांतून घाम चमकत होता. धाप लागली होती. हळू हळू गुडघ्यांचा आणि जमिनीचा आधार घेत घेत ती उभी राहिली. ती खूपच दमली होती, अख्तरबाईचं वय साठी उलटून बरंच पुढं गेलेलं होतं.

अख्तरबाईने भवानीदेवीला मुजरा केला आणि ती आमच्या वडिलांच्या गादी-पुढं आली. तिने मुजरा केला. वडिलांनी तिच्या बिदागीच्या तबकाला हात लावीत म्हटलं,

"वाहवा, अख्तरबाई आज कमाल केलीत! आज वय विसरलांत! वाहवा!"

बिदागीचं तबक ओढणीच्या ओटीत घेत घेत ती म्हणाली,

"मेहेरबानी! लेकिन सरकार, हा आजचा आखिरी दिवस! आता जान थकली चाकरी करणं मुश्किल आहे. सारी जिगर करून हा अखेरचा दसरा साजरा केला."

असं म्हणत म्हणत तिने आपल्या चोळीतून कापडी थैली काढली. त्या थैलीतून कागदाची टोकं बाहेर डोकावत होती. ती थैली तिने आमच्या वडिलांच्या पुढं ठेवली आणि मुजरा केला. वडिलांनी थैली हातात घेत विचारलं,

"हे काय आहे?"

"सरकार, हे इनाम आहे. माझ्या घराण्याला आपल्या सरकारवाड्याने दिलेली चाकरीची ही सनद आहे. त्या चाकरीसाठी दिलेल्या उत्पन्नाचे हे कागद आहेत. सांभाळा! आता चाकरी करणं मला अशक्य आहे. म्हणून हे इनाम मी परत करते."

"नाही नाही अख्तरबाई, जन्मभर हे इनाम तुम्हीच खा. तुम्हांलाच दिलेलं आहे. चाकरी नाही घडली तरीही राहू द्या!"

"नको सरकार. न केलेल्या चाकरीचं अन्न मला नको."

अख्तरबाईचं खानदान हे असं होतं. ह्या भवानी महालात अशी नायकीण नाचून गेली आहे. अशी नेकी सरकारवाड्यान पाहिली आहे. याच भवानी महा-लात विद्वान पंडितांचे आदर झाले आहेत. पेहेलवानाच्या शक्तीचा गौरव झाला आहे. अनेक रम्य आठवणी ह्या महालाने जपून ठेवल्या आहेत.

भवानी महालाला लागूनच जामदारखान्याचं दालन होतं. दाग-दागिन्यांनी पेट्या भरलेल्या होत्या. हळू हळू सर्व पेट्या रिकाम्या होत गेल्या. जरीचे शेले, शालू, पैठण्या इतक्या प्रकारच्या होत्या की, एक प्रदर्शन सजलं असतं.

माडीवर अनेक दालनं होती. त्यांत सर्वांत सुंदर होता शिणगार महाल. हा महाल फारच कलात्मक बांधलेला होता. तो एका कोपऱ्यात होता. बाहेरच्या दोन बाजूस कलाकुसरीचे सज्जे होते आणि इतर दोन्ही अंगांस ऐसपैस गच्ची होती. गच्चीवर कुंड्या ठेवून गुलाबाचा बाग केलेला होता. शिणगार महाल इतर दालनां-

पासून जरा अलिप्त ठेवलेला होता. ह्या महालात प्रेक्षणीय काही असेल तर आतल्या बाजूला भिंतीवर काढलेली चित्रं. अप्रतिम ! विविध रंगांत नाना तऱ्हेची अतिशृंगारिक चित्र कलावंताने रंगविली होती. शृंगाराशिवाय त्यात दुसरा विषयच नव्हता. चित्र रंगवताना चित्रकाराने कसलाही संकोच ठेवला नव्हता. तिथं राज्य होतं रतिमदनाचंच फक्त ! पण आम्ही लहान लहान शाळकरी पोरं त्या चित्रांतील कलेचा फारच बारकाईने अभ्यास करताना आमच्या धुंडिराजकाकांनी आम्हांला चार–पाचदा पाहिलं. नहमीच्या त्यांच्या पद्धतीप्रमाणे काहीही न बोलता एके दिवशी ते पुण्याला गेले. पांढरा ऑईलपेंट घेऊन आले आणि त्यांनी शिणगार महालाच्या साऱ्या भिंती रंगवून टाकल्या ! शिणगार महालाची मशीद झाली !

त्या पलीकडच्या दालनाचं नाव होतं दाजीसाहेबांची कोठी. हे दाजीसाहेब म्हणजे माझे चुलत आजोबा. मी त्यांना पाहिलेलं नाही. पण त्यांच्या आठवणी सारा गाव सांगतं. दाजीसाहेब तालीमबाज होते. स्वभावाने मोठे खेळकर, थट्टेखोर. गाण्याचा मोठा शौक. घोड्यावर बसण्यात पट्टीचे स्वार. अन् विशेष म्हणजे वाचन फार दांडगं. त्यांच्या कोठीत पखवाज, तंबोरे, सुरेख सुरेख कपडे, पुस्तकं, सोंगट्या, बुद्धिबळं, गंजिफा, पानदानं आणि अत्तर गुलाबाच्या कुप्या झकास असायच्या.

[ पृष्ठ १८८ वर ]

दीपावली अभिष्टचिंतन





'ब्लॉक' पाहिजे ?

४ रूमचा नव्हे. पण चार स्क्वे. फु. इतका मोठा ब्लॉक मात्र आम्ही जरूर पुरवू

के. जोशी अँण्ड को.

ब्लॉक मेकर्स व आर्ट प्रिंटर्स फोन–५७६७९

भिकारदास मारुती मंदिराजवळ, पुणें २

# भारतभूचे नंदनवन


मो. ग. तपस्वी



नंदनवन हे भारतभूचे
अथवा मानू स्वर्गधरेचा ?
देवदार, पाईन, वेत, फर
यांचे घेउन धागे सुंदर
हिरव्या गालिचावर इथल्या
चिनारि कशिदा खुले मनोहर
थोर चितारी इथे चितारी
जरतारी पट मखमालीचा
मुसमुसलेली सुवर्ण काया
लावण्याची पसरी माया
सफरचंद मद–गंध धुंदवित
इथे दुतर्फा मधुफळ–राया
हिमशिखरांची नीलसुंदरी
लाजुन ओढी पदरढ गांचा
झेलम लचकत इथे खळाळे
नसानसांतुन ओज सळसळे
चैतन्याची जाण झळाळे
निर्झरातुन हर्ष झुळझुळे
इथे रमे मन आज–सेवनी,
विचार विसरून पार उद्याचा
सोनमर्ग गुलमर्ग, गर्क हे
लाल उषेच्या अधर चुंबनी
तीच लालिमा लेवुन लाज
दाल किनारी संध्यारमणी
प्रणयाराधन हे काश्मिरी
बघुन मावळे गोल रवीचा
तिळचा तळ्यांच्या निळ्या जलावर
तृप्तीलाही तृषा स्मरावी
शिकाऱ्यातुनी विहार करता
मुक्या मनाची शिकार व्हावी
भान नसावे, जाण नुरावी,
गंध उरावा गोड स्मृतींचा
नंदनवन हे भारतभूचे
अथवा मानू स्वर्गंधरेचा

# घनश्याम हवा!

सौ. सुलोचना घोटीकर




रे सांग उद्धवा ! कधी हरी येणार ?
ते रूप मनोहर पुन्हा कधी दिसणार ?
किति वाट पहावी ! काळ संपला फार
हे जीवन वाटे तयाविना निस्सार
रे वेड लाविले मंजुळ मुरलि रवाने
तो सूर वांछितो किति रे अधीर मनाने
जल भरण्या कारण नकोच जाणे आज
मन अस्थिर होई सुचे न काही काज
तू म्हणसि, " सावळा हरी दूर मथुरेला
परि मानस–मंदिरी तुमच्या सदैव बसला "
मधु बोल परिसुनी कशी पूर्ती होणार ?
जो समोर ना तो आम्ही कसा बघणार ?
प्रतिबिंब कशाला ? भास न तृप्ती देई
घनश्याम हवा, अन् नकोच दुसरे काही
तू दाखवशिल ना आम्हांस प्रत्यक्षात ?
ज्या सदैव पुजिले जागेपणि, स्वप्नात ! ○



काय करायचे ते लवकर ठरवा

त्याप्रमाणे कणखर कृती करा

आता वेळ फार फार थोडा आहे

ती नेहमी गजबजलेली असणारी कुणा रईसाची तिमजली उंच हवेली या वेळी खिन्नतेत बुडून गेली होती. पश्चिमेची सूर्यकिरणे कुठेकुठे रेंगाळत होती तेवढाच काय तो प्रकाश. बाकी अंधार आणि शुकशुकाट. दारातच दिसलेली ती गौरवर्णी बहुधा या घराची मालकीण असावी. थोडेसे हसून तिने आमचे स्वागत केले एवढेच. नंतर मात्र खोल्यामागून खोल्या ओलांडल्या, एक दोन जिने चढलो तरी कुठे आवाज नाही, हालचाल नाही. रहस्यकथेतल्या एखाद्या भुजंगनाथ देशमुखांच्या

काश्मिर वार्तापत्रे



हिरवी स्वप्ने,
लाल छाया !

जुनाट पडक्या वाड्यात शिरावे तसे वाटत होते. याच भयमिश्रित कुतूहलाच्या मनःस्थितीत शेवटी तिसऱ्या मजल्यावरील एका कोपऱ्याच्या लहानशा खोलीच्या दाराशी आम्ही – मी (माणूस प्रतिनिधी) व एक दुभाषा काश्मिरी मित्र – येऊन उभे राहिलो. आमच्या येण्याची वर्दी दुसऱ्या जिन्याने बहुधा आधीच वर पोचलेली असावी. कारण फार वेळ थांबावे लागले नाही. हिरव्या पडद्याआडून Come in, Come in असा आवाज आला व आम्ही लगेच खोलीत प्रवेश

– – – – – –

'माणूस' प्रतिनिधी

– – – – – –

# दीपावली

## शुभचिंतन

आमचे हितचिंतकांस, ठेवीदारांस, भागधारकांस, कामगारबंधूस व व्यापारी मित्रांस ही दिपावली व नूतन वर्ष सुखाचे व भरभराटीचे जावो.

**स्वास्तिक** रबर प्रॉडक्टस् लि.
पुणे ३

PARKERSON/SRP/27-65

केला. पन्नाशीच्या घरातली, चौरस हाडापेराची एक भारदस्त व्यक्ती मोठ्या लाकडी पलंगावरून कष्टाने उठण्याचा प्रयत्न करीत होती व आम्हांला खुर्चीवर बसण्यास सांगत होती, डोक्याला पट्टी होती चेहरा काळजीने अगदी काळवंडल्यासारखा दिसत होता. काही कुशल प्रश्न झाले, आमच्या समोरच्या खुर्चीवर ती व्यक्ती स्थानापन्न झाली आणि संभाषणाला हळू हळू वेग येऊ लागला. त्या व्यक्तीचे अंग अजूनही ठणकत असावे असे बोलताना सारखे जाणवत होते. अतिशय मवाळ शब्दांत, एकही अपशब्द न उच्चारता, खिन्नता दाटलेल्या स्वरात ती व्यक्ती सांगत होती–

'असे, इतक्या वर्षांत कधीही घडले नव्हते. आमच्या वाडवडिलांच्या काळातही नाही. हा सर्व मुसलमान मोहल्ला. आमचे एकच काय ते हिंदू घर. पण कधीच कसला त्रास नाही, तेढ-संशय नाही. वातावरण पूर्ण विश्वासाचे, एकमेकांना वेळी-अवेळी, उपयोगी पडण्याचे. घरातल्या मुलाबाळांचा, बायकामाणसांचाही सर्वत्र अगदी निःशंक वावर होता, येणेजाणे होते. त्या दिवशी पण, मी सकाळी नेहमीप्रमाणे आमच्या मळ्याकडे निघालो तेव्हा, गावात गेले ८–१५ दिवस गडबड, दंगल चालू होती तरी, मला आपल्या घरादारावर काही संकट येईल अशी मुळीसुद्धा शंका आली नाही. दिवसभर मी मळ्यातच होतो आणि काम संपल्यावर टांग्यातून मी दुपारी चार-साडेचारच्या सुमारास मोहल्ल्यापर्यंत आलो तरीही काही कल्पना आली नाही. आम्ही मुलासारखा सांभाळलेला एक मुलगा टांग्यात माझ्याबरोबर होता. घरापासून थोड्या अंतरावर टांगा आला आणि वातावरण बदलल्याचे प्रथमच एकदम जाणवले. कोणी सांगत होते घरावर दगडफेक झाली आहे, पुढे न जाणे चांगले. पण फार विचार करायलाही वेळ मिळाला नाही. टांगा थांबून आम्ही उतरतो आहोत, इतक्यात लहानशा जमावाने आम्हांलाच गराडा घातला डोक्यात काठीचे एकदम तडाखे बसले, कपड्यावरून, अंगावरून रक्त वाहू लागले. हातातले घड्याळ, बोटातली आंगठी, खिशातले पाकीट वगैरे केव्हा लुबाडले गेले ते कळलेच नाही. माझ्याबरोबरचा मुलगा रडत-ओरडत घरापर्यंत जाऊन काही गडीमाणसांना तेवढ्यात घेऊन आला नसता, तर माझे प्राण वाचणेच कठीण होते. सगळीकडून मार बसत होता, आणि मी निपचीत रस्त्यावर पडून होतो. टांग्याचे घोडे कोणीतरी पळवून नेले आणि रॉकेल वगैरे ओतून टांग्यालाही आग लावण्यात आली. बराच आरडाओरडा झाला, घरातली एकदोन गडीमाणसे आली, थोड्या वेळाने पोलिसही पोचले. सगळ्यांच्या मदतीने मी घरापर्यंत कसाबसा पोचलो, तो तिथेही सगळा शुकशुकाट. भांडी-कुंडी, कपबशा, लाकडी स्टँड्स, आलमाऱ्या— जे जे हाताने उचलून नेण्यासारखे होते ते सगळे सामान – नाहीसे झाले होते. मौल्यवान चीजवस्तु जी सापडली ती पळवण्यात आली होती. दगडफेक सुरू झाली तेव्हा मागील दाराने घरातील बायकामाणसे दुसरीकडे निसटली म्हणून

त्यांना काही इजा पोचली नाही. पण घरही सोडवेना. त्यामुळे जी रेंगाळली त्यांना काही ' अनुचित प्रकार सहन करावे लागलेच. '

' केव्हा घडला हा प्रकार ! ' मी.

' अठ्ठावीस तारखेला. '

' पोलिस तपास वगैरे सुरू आहे का ? ' मी.

' आले होते दोन–चार वेळा. नावे सांगा असे म्हणत होते. पण मी लुटालूट करताना कोणाला पाहिलेच नाही तर नावे कोणाची सांगू ! माझ्यावर हल्ला कोणी केला तेपण मला आठवत नाही. पण पोलिसांच्या खरोखरीच मनात असते तर त्यांना गुन्हेगार सापडणे बिलकुल अवघड नव्हते. घरातले इतके सामान पळवले गेले आहे की पाच–पन्नास घरांचा शोध घेतला तर काही न् काही वस्तू सापडल्याशिवाय राहणार नाहीत अशी माझी खात्री आहे. म्हणून पोलिसांचे शोधाशोधीचे नुसते नाटकच चालू आहे असे मला वाटते. '

' शेजारीपाजारी नंतर आले होते का ? त्यांच्या काय प्रतिक्रिया ? ' मी.

येतात. खाली माना घालून बसतात. वाईट झाले असे म्हणतात. बाहेरचे लोक आले होते असे सांगतात. पण ते किती खरं बोलतात, मनापासून सांगतात हे काही समजत नाही. कदाचित ते काही करू शकले नसतील हेही खरं असेल–मला मात्र काहीच मत बनवता येत नाही.

' पुढे काय ? ' मी.


' प्रश्नच आहे. एवढा मोठा दवाखाना, प्रॅक्टिस. शिवाय शेतीवाडी, मळा, घर. राहण्याला आता मन कचरतं, सोडावं तरी पंचाईत. '

' आपला दवाखाना कुठे आहे ? ' मी

' अगदी मध्यवस्तीत. वडलांच्या वेळेपासून तिथेच आहे. मी वडलांचा मोठा मुलगा... मपण तुम्ही हे काही नावबिव लिहू नका, प्रसिद्ध करू नका.


दिपावली शुभचिंतन

सह्याद्रि
रासायनिक रंग



सह्याद्रि डायस्टफ्स
ॲण्ड केमिकल्स प्रा. लि.
कारखाना व रजि. ऑफिस
विठ्ठलवाडी, पुणे - ९
Pra:67-2/4

# कॅमल क्रायलिन

## रंग वापरून मी माझी साडी स्वतःच रंगवली.






PRATIBHA 676 D

तुम्हीसुद्धां प्रयत्न करून पहा. तशा डिझाईनची फक्त तुमचीच साडी असेल. तुमच्या साड्या, मुलांचे कपडे, उशांचे अभ्रे आणि खिडक्या-दारांचे पडदेहि तुम्ही रंगवूं शकाल. क्रायलिन रंगांमुळें भरतकामाचे कष्ट करण्याची गरजच राहणार नाही.

* क्रायलिन रंग खरेदी करताना 'मार्गदर्शन व सूचना' ही पुस्तिका जरूर मागा.

**कॅम्लिन प्रायव्हेट लि.**
मुंबई • दिल्ली • कलकत्ता • मद्रास
कॅमल चित्रकला साहित्याचे निर्माते.

मला त्याची जाहीर चर्चा नको आहे. तुम्ही पुण्याहून इतक्या लांबून आलात म्हणून मी बोललो तरी. नाही तर कुणाला मी काही सांगतही नाही."

मध्येच चहा आला होता. गृहस्थ पाश्चात्त्य रीतीरिवाजात मुरलेला दिसतो! त्याने आमच्या दोघांचा चहा करून दिला. साखर किती हवी नको ते विचारले. बिस्किटेही उंची होती. दोन-दोन कप घेऊन झाले तरी किटली रिकामी होत नव्हती. त्याचा आग्रहही संपत नव्हता.

पुरोगामी विचारसरणीच्या बऱ्याच जाणकार निरीक्षकांकडून असे ऐकले होते की परमेश्वरी वगैरे सगळे निमित्त आहे, खरे कारण आर्थिक आहे. पंडितांना पूर्वीच्या प्रमाणात नोकऱ्या मिळेनाशा झाल्या आहेत, नुकसानभरपाई न देता त्यांच्या जमिनी काढून घेण्यात आल्यामुळे अब्दुल्ला राजवटीपासून हा समाज रुष्ट आहे शिक्षणाच्या प्रसारामुळे बहुजनसमाज सर्व क्षेत्रात पुढे सरकत आहे याचाही पंडित समाजाच्या प्रतिष्ठेवर विपरीत परिणाम झाला आहे. त्यांचे समाजातील पूर्वीचे स्थान गेल्यामुळे एक प्रकारच्या वैफल्याने हा समाज ग्रासलेला आहे आणि जेथे फुले वेचली तेथे गवऱ्या वेचायला कोणाला आवडेल? ही ठसठस, हा असंतोष परमेश्वरीच्या निमित्ताने आता बाहेर पडत आहे, इतकेच. मी ज्या घरात बसलो होतो, ज्या व्यक्तीशी इतका वेळ बोलत होतो व आतापर्यंत जे पाहत–ऐकत–वाचत आलो होतो त्याच्याशी या कारणमीमांसेचा मेळ नीट बसत नव्हता. हे खरे आहे की आपल्यापेक्षा कमी शिकलेल्या व कमी कार्यक्षमता असलेल्या माणसाच्या हाताखाली काम करणे कोणाच स्वाभिमानी पुरुषाला आवडणार नाही. आपल्या मुलाला पहिल्या वर्गाचे गुण असताना त्याला महाविद्यालयात प्रवेश नाकारला जातो, [आणि जेमतेम काठावर असलेल्यांची भरती केली जाते] याबद्दल वैषम्य वाटणेही स्वाभाविक आहे. गुणांची अशी उपेक्षा, अवहेलना, अधिक्षेप मानहानिकारकच आहे व त्याबद्दल चीड–संताप येणे हे एक जिवंतपणाचेच लक्षण मानले पाहिजे. पण अशा आर्थिक, व्यावसायिक, सामाजिक संतापाची प्रतिक्रिया आंदोलन स्वरूपात व्यक्त न होता स्थलांतरमार्गाने व्यक्त होते असा सर्व ठिकाणचा अनुभव आहे. गेल्या वीस वर्षांत काश्मिर पंडितांचे हे 'लोकशाही स्थलांतर' सुरूच आहे. मग हे आंदोलन–इतके उग्र आंदोलन–आत्ताच का? आंदोलन समितीच्या अध्यक्षांनी मला सांगितले होते—

'आम्ही आता उरलो आहोत किती? वीस वर्षांपूर्वी लाख–सव्वा लाख होतो. आता जेमतेम चाळीस पन्नास हजार असू. आमची नवी पिढी तर इथे राहायलाच तयार नाही. माझी मुलगी तुमच्या पुण्याजवळच्या नगरला कॉलेजमध्ये शिकत आहे. नेहमी अगदी वरच्या वर्गाचे गुण मिळवते. आता तिकडचेच एखादे स्थळ मिळेल. ती संसाराला लागेल. कलकत्ता, मुंबई, दिल्ली कितीतरी ठिकाणी आमचा समाज आता स्थायिक झाला आहे. एवढ्या मोठ्या देशात चाळीसपन्नास हजारांची बुद्धिमान जमात कुठेही, कशीही रिचवली जाईल. यासाठी सरकारकडे मदत वगैरे

मागण्याचीही आम्हांला मुळीच गरज नाही. आमच्या बुद्धिमत्तेवर आमचा पूर्ण विश्वास आहे. प्रश्न आमचा नाही, प्रश्न तुमचा आहे. काश्मिर तुम्हांला भारतात राहायला हवं आहे की नको ते एकदा ठरवा. काश्मिर भारतातच राहावा हे मनोमन मानणारे आम्ही मूठभर लोक हाच तुमचा येथला खरा आधार आहे. नोकऱ्यांचा प्रश्न काय घेऊन बसलात ! आमच्या मुलीबाळी दिवसाढवळ्या पळवल्या जाऊ लागल्या, घरादारांवर हल्ले होऊ लागले, रस्त्यात शिवीगाळ आणि मारहाण सुरू झाली, मानसिक छळ असह्य झाला म्हणून आम्ही ही किंकाळी फोडली आहे. ऐकायची असेल तर ऐका. काही करायचे असेल तर आत्ताच करा. मागाहून संधी गेली म्हणून तुम्हीच ओरडत बसाल.'

तेव्हा प्रश्न राजकीय आहे आणि राजकीय पातळीवरूनच तो सोडविला जाणे अवश्य आहे. राजकीय डावपेचाचा भाग म्हणून काश्मिरातील हा अत्यल्प हिंदू समाज आज उखडला जात आहे आणि त्याची झळ साऱ्या हिंदुस्थानला लागणार आहे. चाळीस-पन्नास हजारांची बुद्धिमान जमात काश्मिरात राहिली काय किंवा केरळात नांदली काय, एरव्ही ती गंभीर बाब ठरली नसती. मद्रासी ब्राह्मण नाही का आज कित्येक वर्षांपासून आपल्या प्रांतातून परागंदा झालेला आहे? तो मुख्यत: सामाजिक-आर्थिक प्रश्न आहे. पण काश्मिर हे वेगळे प्रकरण आहे. तो भारताचा सीमाप्रांत आहे हे आपल्याला कधीही विसरून चालणार नाही. उरला-


*A very special offer*
*upto*
*DIWALI*

WORLD'S

WIDELY READ MAGAZINE

Reader's Digest

Usual Rate Rs. 30/-
*for One Year*
Rs. 15/- only
if you enroll during this Divali.

*Send your order with payment to :*

R. G. Dixit & Co.
NEWS AGENT,
*372 Near Sadashiv Peth Houd,*
*Poona 2.*

सुरला पंडित समाज काश्मिरातून उखडला गेला की या सीमाप्रांतात आपले असे भारताचे असे जीवाभावाचे कोणी राहणार नाही, ‘भारतमाता की जय’ हा एकतेचा मंत्र तेथे कधी कोणी उच्चारणार नाही, आमचा तिरंगी ध्वज तेथे कधीही, कुठल्याही इमारतीवर फडकणार नाही, श्रीनगर हे पाश्चात्त्य वा चीन–रशिया यांच्या शीत वा गरम युद्धाचा आखाडा बनून राहणार आहे, आणि स्वित्झर्लंड-सारखे एक हवा खाण्याचे ठिकाण या पलीकडे आमचा वा काश्मिरचा संबंध उरणार नाही, हे आम्ही आत्ताच समजून चुकले पाहिजे. आणि हे जर घडणार असेल तर आमचे रक्त या भूमीवर कशासाठी सांडले गेले याचा जाब विचारला गेला पाहिजे. आमचे तरुण तरुण अधिकारी परवाच्या भारत–पाक युद्धात कशासाठी मेले? आमचे जवान कशासाठी लढले? कोटीकोटी लोकांना अर्धपोटी ठेवून, दुष्काळात आणि उपासमारीत ढकलून आमचे अब्जावधी रुपये या काश्मिर खोऱ्यात कशासाठी ओतले गेले आणि अजूनही जात आहेत हे हुडसून खडसून एकदा विचारले पाहिजे.

प्रश्न पंडितांच्या नोकऱ्याचाकऱ्यांचा नाही—ते तो सोडवायला समर्थ आहेत. प्रश्न जातीय दंगलींचा नाही—ज्यांनी रांची आणि श्रीनगर येथील दंगली एकाच मापाने मोजल्या त्यांच्या राजकीय अकलेची कीवच करावीशी वाटते. इतके सगळे होऊनही काश्मिरातील बहुसंख्य मुसलमान जातीय भावनेच्या आहारी सहसा गेलेला


# TOOLS - CRAFT

825 Budhwar Peth,
Near Sonya Maruti Corner,
POONA 2.

*Sole Selling Agents* :
BATU Milling Cutters,
Reamers & JESONS Drills & Taps
"AMBA" Revolving Centres
and Dead Centres

*Phone : 26467*

नाही हे आपण ओळखले पाहिजे. पंडित समाजानेही आपल्या परिपत्रकातून, लिखाणा भाषणातून हिंदु-मुस्लिम ऐक्याचा सतत पहिल्यापासून पाठपुरावा केलेला आहे- एक उदाहरण देतो. अनंतनाग जिल्ह्यातील चुनीगुंद हे एक लहानसे गाव. गावात एक शिवमंदिर होते. या दंगलीत जमावाने त्याची पार मोडतोड केली. पण लगेच या मंदिराच्या उभारणीसाठी निधीही जमवण्याचे काम दुसऱ्या काही लोकांनी. हाती घतले आणि मी चौकशी केली त्या दिवशी निधीचा आकडा पाच हजारांपर्यंत गेलेला होता. ही माहिती पंडित समाजाच्या एका कार्यकर्त्यानेच मला दिली आणि त्याची शहनिशा करून घेण्यासाठी मी अनंतनागला समक्ष जाऊनही आलो. हे निधी जमवण्याचे काम कोणी केले असेल ! शेख अब्दुलांचा उजवा हात म्हणून


त्रिविध कार्यकरी

# थ्रे सि ल

घरोघरी व कारखान्यांत अत्यंत उपयुक्त

* थ्रेसिलमुळे नट, बोल्टस् सैल होत नाहीत किंवा हादऱ्याने निखळून पडत नाहीत.
* थ्रेसिलचे साहाय्याने गॅस, पाणी यांची गळणारी फिटिंग्ज खात्रीने बंद करता येतात.
* थ्रेसिल हे बहुपयोगी असे आश्चर्यकारक लुकण (ॲडेसिव्ह) आहे.

रेडिओ, पंखे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, फर्निचर यांचे, तसेच सायकली, स्कूटर्स, मोटारींचे बॉडी बिल्डिंग कारखाने वगैरे अनेक ठिकाणी बहुविध कारणांसाठी वापरले जाते.

*उत्पादक*

**मे. इंडस्ट्रिअल इलेक्ट्रॉनिक ॲण्ड अलाईड प्रॉडक्ट्स**

१४२३, शुक्रवार पेठ, पुणे २.

*महाराष्ट्राचे एकमेव वितरक*
**मे. डी. पी. सेल्स् कॉर्पोरेशन**
३९/३१, एरंडवणा
पुणे ४.

*गुजराथचे एकमेव वितरक*
**मे. ज्योती ट्रेडिंग कंपनी**
अप्सरा सिनेमा बिल्डिंग
प्रतापनगर रोड, बडोदा ४.

* स्टॉकिस्ट नेमणे आहेत *

ओळखले जाणारे मिर्झा अफझल बेग यांची ही कामगिरी. अनंतनाग येथे ते आपल्या राहत्या घरात सध्या नजरकैदेत आहेत. अनंतनाग येथे जाळपोळी करण्याकरता परवा जमाव जमला असता नजरकैदेचे नियम मोडून बेग मशिदीत गेले, त्यांनी भाषणे करून जमावाला शांत केले, ही वस्तुस्थिती नाकारून कसे चालेल ?

मी बेग यांच्या घरी जाऊन त्यांचे आभार मानले, दोनतीन तास त्यांच्याशी भरपूर चर्चा केली. बेगम अब्दुल्ला याही त्या वेळी तिथेच होत्या. मी आभार मानल्यावर बेग यांनी पहिलेच वाक्य उच्चारले ते असे : ' Don't think that it was a political stunt. It is our creed.' जातीय ऐक्य हा काश्मिरचा ऐतिहासिक वारसा आहे हे ते पुनः पुनः सांगत होते आणि अगदी शेवटी रस्त्यावर फर्लांगभर मला पोचवायला आले तेव्हाही बेग मला हेच सांगत होते– ' कुठल्याही स्त्रीची अब्रू माझ्या डोळ्यांदेखत मी लुटली जाऊ देणार नाही. मग ती स्त्री हिंदू असो वा मुसलमान.' सात जूनच्या ख्रिश्चन विरोधी दंगलींनी बेग यांना असेच व्यथित केले होते आणि परवाच्या श्रीनगरच्या दंगली थांबविण्यासाठी ' मला श्रीनगरात येऊ द्यात, माझ्या अनुयायांना, लोकांना भेटून शांततेसाठी प्रयत्न करू द्यात ' अशी त्यांची मागणी असतानाही ' राजकीय विरोधक ' म्हणून त्यांची ती मागणी नाकारली गेली. बेग यांच्या बोलण्यावर कितपत विश्वास ठेवावा हे मी माझ्याबरोबर असलेल्या पंडित समाजाच्या एका स्थानिक जाणत्या कार्यकर्त्याला परतताना वाटेत मुद्दाम विचारलेही. त्यानेही बेग यांची भूमिका प्रामाणिक असल्याची ग्वाही दिली. म्हणजेच प्रश्न जातीय नाही. बेग व त्यांच्या सहकाऱ्यांना, म्हणजेच शेख अब्दुल्लांना काश्मिर स्वतंत्र राहावेसे वाटते– मग या स्वतंत्र काश्मिरात हिंदू गुण्यांगोविंदाने नांदण्यास त्यांची हरकत नाही, आडकाठी नाही. काश्मिर पाकिस्तानात जावे असे वाटणारा दुसरा एक गट आहे व तो अधूनमधून जोरही करीत असतो. दंगली घडवून भारतीय शासन बदनाम करण्याची, काश्मिर शासनाला आतून सतत धक्के देण्याची एकही संधी हा गट वाया दवडीत नाही. पहिले पंधरा दिवस सादिक सरकारविरुद्ध शांततेने चाललेले पंडितांचे सत्याग्रह आंदोलन या किंवा यांसारख्या भारतद्रोही गटानेच जातीय वळणावर नेले ही वस्तुस्थिती आहे. या भारतद्रोही कारवायांच्या बंदोबस्तासाठी समर्थ व कणखर शासन हा जसा एक उपाय आहे तसाच कडवी भारतनिष्ठ लोकसंख्या हाही दुसरा व अधिक खात्रीचा उपाय आहे. आज फक्त काश्मिरातील पंडितसमाजाची भारतनिष्ठा संशयातीत आहे. अशा परिस्थितीत ही संख्या कमी करणाऱ्या घटनांकडे डोळेझाक करायची, काहीतरी वरवरची मलमपट्टी करून वेळ मारून न्यायची की, कठोर उपाययोजना करून अशा घटनांना आळा घालायचा ! पंडित समाजालाच केवळ संरक्षण देऊन भागणार नाही. भारतनिष्ठ लोकसंख्या काश्मिरात भरपूर प्रमाणात स्थिर केल्याशिवाय काश्मिर केवळ सैन्यबलाच्या जोरावर भारतीय संघराज्यात राहू शकेल या

म्हणण्यात काही अर्थ नाही. भारत सरकार काश्मिरात पोत्याने पैसा ओतून, सादिक –शमसुद्दीन सारखी बाहुली गादीवर बसवून काश्मिरात भारतीय अस्तित्व टिकवू पाहत आहे. पण हा प्रयत्न अगदी फोल आहे. तुमच्या–आमच्या घामाचा आणि परदेशातून लाचारीने भीक मागून आणलेला पैसा काश्मिरात आज अक्षरशः गटारात फेकल्यासारखा वाया जात आहे. सैन्याने आणि पैशाने काश्मिर आपल्याकडे ठेवण्याचा गेल्या वीस वर्षांतील आपल्या सरकारचा प्रयत्न पूर्ण फसला आहे. या गोष्टीही लागतात, पण किती ! तळेच फुटके असल्यावर वरून त्यात कितीही पाणी ओतत राहून काय मिळणार आहे ? सादिक सरकार खाली खेचून राष्ट्रपती राजवट आणूनही फार काय होणार आहे ? तळापासून किडलेली, बरबटलेली तेथील सरकारी यंत्रणा तशीच कायम राहणार असेल तर राष्ट्रपती राजवटीनेही तेथे काहीच नवीन साध्य होणार नाही.

यासाठी सीमाप्रांत म्हणून काश्मिरची एक स्वतंत्र नीती यापुढे आखण्यात यायला हवी. संशयातीत भारतनिष्ठ लोकसंख्येचे तेथील प्रमाण सतत वाढते ठेवायला हवे, ३७० व्या कलमासारखे काश्मिरच्या भारतीयकरणात आडकाठी करणारे जे कायदे असतील ते ताबडतोब रद्द व्हायला हवेत, विशेष सवलती वगैरे देऊन भारतीयांना तेथे उद्योगधंदे काढण्यास, शेतीवाडी करण्यास प्रोत्साहन द्यायला हवे. काश्मिरला अलग ठेवून तो भारताचा अविभाज्य भाग आहे म्हणून अधूनमधून गर्जना करण्याचा आजचा हास्यास्पद प्रकार ताबडतोब थांबायला हवा. करायचे असेल तर हे सगळे आणि असेच आणखी कितीतरी मुळापासून करा, तडकाफडकी लवकर करा. नाहीतर शेख अब्दुलाच्या हातात काश्मिरची किल्ली सोपवण्यावाचून तुम्हांला गत्यंतर उरणार नाही. कारण इतकी वर्षे तुरुंगात खितपत पडून शेख अब्दुल्ला हेच आज काश्मिरी मुसलमानांचे नेते आहेत, जवळजवळ दैवताप्रमाणे त्यांच्यावर सर्वांची अपार श्रद्धा आहे. त्वरेने भारतीयकरण किंवा अब्दुल्लांसमोर लोटांगण हे दोनच पर्याय आज उपलब्ध आहेत. तिसरा पर्याय म्हणजे आज आहे तो. सतत पेटलेले कुंड. कधी घुसखोर उठाव करतील, कधी पंडित मारले जातील, कधी फुटबॉल मॅचवरूनही दंगली उसळतील– जाळपोळी होतील– काही नेम नाही. भारताचा पैसा जात राहील, सैन्यबल खर्ची पडेल आणि काश्मिर कणाकणाने, क्षणाक्षणाने भारतापासून दूर दूरच जात राहील. काय ते लवकर ठरवा, त्याप्रमाणे कणखर कृती करा– वेळ आता फार थोडा उरला आहे.

## समाप्त

# डॉक्टर राम मनोहर लोहिया

चंद्रशेखर मराठे

"समाजवादी आंदोलनाला मूलभूत सिद्धांताचा पाया लाभलेला नाही हेच त्याच्यावर आज पसरलेल्या अवकळेचे प्रमुख कारण आहे ... समाजवादाने कम्युनिझमकडून आर्थिक उद्दिष्टे घेतली व भांडवलशाही व उदारमतवाद यांजकडून सर्वसाधारण उद्दिष्टे घेतली. अशा प्रकारे आर्थिक व सांस्कृतिक उद्दिष्टांचे एकमेकांवर कलम करणे धोक्याचे आहे...कम्युनिझम व भांडवलशाही यांची आधारभूत प्रमेये उखडून काढून, आपली आर्थिक व सर्वसाधारण उद्दिष्टे यांची सुसंगत गुंफण करणारी प्रणाली समाजवादाने शोधून काढली नाही तर समाजवाद हे एक तर्कदुष्ट तत्त्वज्ञान म्हणूनच शिल्लक राहील व त्याची बाल्यावस्था कधीच संपणार नाही..."

समाजवादासंबंधीचे हे अवतरण, नुकतेच स्वर्गवासी झालेले झुंजार समाजवादी नेते डॉक्टर राम मनोहर लोहिया यांचे आहे. हे विचार व्यक्त झाल्याला आज पंधरा वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी, समाजवादी विचारसरणीच्या पंगुपणाची यथार्थ कल्पना आणून देणारे हे अवतरण आजही लागू पडते. सत्तारूढ पक्षाचा समाजवाद अधिकाधिक बालीश होत चालला आहे, विरोधी पक्षांतील समाजवादी शक्तीही असंघटित, संदिग्ध व दिशाहीन झाल्या आहेत. या साऱ्यांचे मूलभूत कारण समाजवादी तत्त्वज्ञानाची बाल्यावस्था हेच असावे. समाजवादाच्या नैसर्गिक मर्यादांची इतकी स्पष्ट जाणीव असणाऱ्या डॉक्टर लोहियांनी मग समाजवादी चळवळीसाठी एवढी धडपड



**शासनसंस्था, आजचा समाजवाद आणि समाजवादी**

का केली ? त्याचे फलित काय ? भारताच्या भूमीमध्ये समाजवाद रुजू शकेल का आणि त्याचे स्वरूप काय राहील ? हे व असेच प्रश्न, समाजवादाविषयी आस्था बाळगणाऱ्या मंडळींच्या मनात डॉक्टरांच्या अकाली निधनामुळे निर्माण होणे स्वाभाविक आहे. (कोठल्याही चौकटीत न सामावता, स्वतःच्या कल्पनेप्रमाणे गरीब जनतेसाठी सतत झगडणाऱ्या एका अलौकिक नेत्यास, भारतीय जनता डॉ. लोहियांच्या दुःखद निधनामुळे मुकली आहे.)

मला वाटते डॉक्टरांचा समाजवाद हा त्यांच्या कार्यकर्तृत्वात गौण आहे. गरीब जनतेविषयी अपरंपार कळकळ व त्यापायी सत्ताधाऱ्यांचा कडवट रोष ओढवून घेण्याची धमक हे गुण भारतातून आजतरी नष्ट झाले आहेत. अशा या दुर्मिळ गुणांचा आश्वासक आढळ भारतीय जनतेला डॉक्टरांच्या ठायी झाला होता. या त्यांच्या दैवी मजबुरीपायी त्यांनी नेहरूंसारख्या अत्यंत लोकप्रिय युगपुरुषावरदेखील कठोर व प्रसंगी अत्यंत कटू टीका केली—स्वतःच्या पक्षाच्या सरकारने केरळमध्ये कामगारांवर गोळीबार केल्यावर त्या सरकारचा राजीनामा मागण्याचे अलौकिक राजकीय धैर्य दाखविले—व ते होत नाही, असे दिसताच स्वतःच पक्षाच्या सर-चिटणीसपदाचा राजीनामा देऊन टाकला. अनेकदा प्रक्षोभक गौप्यस्फोट करून सरकारला व देशाला गदागद हलविले.

डॉक्टर लोहिया यांचे चरित्रसार मला दिसते ते एवढेच की सत्ताधाऱ्यांच्या अन्यायावर, निष्क्रीयतेवर व ढोंगीपणावर घणाघाती प्रहार करणे हाच त्यांचा धर्म होता. त्यांच्या हयातीत केंद्रीय सत्ता जरी त्यांच्या पक्षास मिळाली असती तरी त्यांचे निसर्गदत्त स्थान त्या सरकारच्या बाहेरच राहिले असते यात तिळमात्र शंका नाही.

असा हा प्रतिकारितेचा सगुण अवतारच, समाजवादी का होईना पण राजसत्तेने समाजाचे अनुकूल परिवर्तन करण्याचे स्वप्न पाहत होता हे विचित्र खरंच ! पंडित नेहरूंच्या बाबतही हाच प्रकार घडला आहे. पंडितजी स्वभावाने कट्टर सरकार-द्वेष्टे होते. सरकार या संस्थेबाबत त्यांनी अनेकदा उघडउघड तिरस्कार व्यक्त केला आहे. पण स्वातंत्र्याप्राप्तिनंतर त्यांनीच भारतामध्ये एका अगडबंब सरकारी-करणाची प्रक्रिया सुरू केली. साम्यवादाचा जनक महापंडित कार्ल मार्क्स याचीही अशीच फसगत झाली असे दिसते. सरकार म्हणजे प्रस्थापित हितसंबंधांच्या हातातील बाहुले हा सार्वकालिक सिद्धांत मांडून, त्याने आपले नवे तत्त्वज्ञान मात्र सत्तेभोवतीच गुंफले व त्यातून मानवाचे कल्याण होईल असा भ्रम निर्माण करण्यास हातभार लावला.

## पिंड विचारवंताचा

हे असे का होते ? डॉक्टर लोहिया यांना क्रांतीची विफलता स्पष्टपणे कळून चुकली होती. द्वेषावर आधारित क्रांतिमुळे एका जुलमी सत्तेची जागा दुसरी जुलमी सत्ता घेते याचा उल्लेख त्यांनी अनेकवार केला आहे. यासाठी क्रांती ही क्रोध व करुणा यांवर आधारित असावी असे ते प्रतिपादन करीत. व्यवहारामध्ये क्रोध आणि द्वेष यांत गुणात्मक असा काय फरक आहे ? पण या दोहोंत थोडा फरक आहे आणि तोच डॉक्टरांच्या वैचारिक स्वतंत्रतेचा निदर्शक आहे. जेव्हा एकाच गोष्टी-बद्दल सतत क्रोध वाटू लागतो तेव्हा त्याचे द्वेषामध्ये रूपांतर होते. नित्य नव्या अन्यायाशी मुकाबला करावयाचा असेल तरच क्रोधाचा प्रश्न उद्भवतो. डॉक्टर

**फक्त रु. ३० भरून अनेक वस्तू बक्षिसे मिळवा !**

शिवणयंत्रे, रेडिओ, ट्रान्झिस्टर, सायकली, स्टील कपाटे, सोफा सेट, सोफा कम बेडसेट, डार्यानिंग सेट, किचन टेबल, वगैरे किंमती वस्तू मिळण्याची नावीन्यपूर्ण योजना.

*आमच्या लक्ष्मी रोडवरील ( ट्रेनिंग कॉलेज पिछाडीस )*
*भव्य शो-रूमला भेट द्या—*

**पंकज** जनरल ट्रेडिंग कंपनी

*२५१/१ नारायण पेठ, विजय टॉकीज जवळ, पुणे २.*

असे सूचित करतात, की संपन्न व समान अशा मानवी जीवनाचे कोणी ठराविक शत्रू नसतात तर हे शत्रू सारखे बदलत असतात. त्यांचे स्वरूप ओळखण्याइतकाच क्रोध उपयुक्त आहे. द्वेषाच्या आहारी जाऊन नवे प्रतिगामीत्व निर्माण करण्यात काय स्वारस्य आहे ?

डॉक्टर लोहियांच्या विचारांतील ही सूक्ष्मता, आवाका व गतिमानता पाहिली की हा मनुष्य समाजवादी, राजकारणी, पुढारी, टीकाकार वगैरे अपघाताने झाला— तो त्याचा खरा पिंड नव्हे असे वाटू लागते. डॉक्टरांना रूढार्थाने राजकारण जमले नाही हे तर उघडच आहे. नेहरूंची इतराजी ओढून घेणे ही एकच गोष्ट त्यांच्या राजकीय अपयशाची पुरेशी द्योतक आहे. गांधी व नेहरू यांचे एवढे निकटचे सान्निध्य व विश्वास लाभला असूनही डॉक्टरांनी, खडतर मार्ग स्वीकारला व एका अर्थाने राजकीय आत्महत्याच केली—या गृहस्थाला राजकारणी कसे म्हणावे ? पक्षनिष्ठेच्या बाहेर जाऊन वारंवार प्रक्षोभक पवित्रे घेणे हा तर त्यांचा कायमचा मार्ग होता. 'आपला पक्ष कधी चूक करू शकतच नाही,' अशी समजूत असणे हे राजकारण्याचे पहिले कर्तव्य आहे. हे 'कर्तव्य' अर्थातच डॉक्टरांनी पाळले नाही.

त्यांच्या विचारांची दिशा व व्याप्ती पाहता डॉ. लोहिया हे पिंडाने विचारवंत होते—दुसरी तिसरी कोणतीही भूमिका त्यांना मानवणारी नव्हती असेच वाटू लागते. पण झाले असे की राष्ट्रीय चळवळीच्या काळात काही संवेदनशीलता असलेला व धैर्य असलेला प्रत्येक मनुष्य राजकीय क्षेत्राकडे ओढला गेला. त्या वेळचे राजकारणही 'वन-ट्रॅक' अशा स्वरूपाचे होते. लोहियाजींची संवेदनशीलता व धैर्य तर असामान्यच होते; ते त्या काळात राजकारणाकडे ओढले गेले ते जन्मभर राजकारणातच राहिले. पण आपल्या झंझावाती जीवनातही समाजवादाचा त्यांनी जो मूलभूत विचार केला आहे तो पाहून मन थक्क होते. या माणसाला एखाद्या मानवी प्रश्नाचा ध्यास घेऊन त्यावर सर्वस्व केंद्रित करणाऱ्या बुद्धाचे, आईन्स्टाईनचे व डार्विनचे मन लाभले होते यात शंका नाही.

मध्यमवर्गीयांसाठी सर्व प्रकारचे उत्तम
फर्निचर बनविणार
**स्टॅन्डर्ड** फर्निचर वर्क्स
नूर बिल्डिंग,
तुळशीपाईप रोड, दादर (बी. बी.) रेल्वे स्टेशनजवळ,
मुंबई २८

समाजवादाला जी सैद्धान्तिक बैठक नाही म्हणून डॉक्टर निराशा व्यक्त करीत, ती बैठक घेण्याचे बौद्धिक व आत्मिक सामर्थ्य त्यांच्या ठायी निस्संशय होते. त्यांच्या निधनामुळे समाजवादी तत्त्वज्ञानाची पोकळी भरून काढण्यासाठी दुसरा एखादा डॉक्टर लोहिया – प्रत्यक्ष राजकारणातून अलिप्त राहणारा – जन्मास यावा लागेल.

भांडवलशाही व साम्यवाद ही दोन सारखीच घातकी जुळी भावंडे आहेत, हे त्यांनी स्पष्टपणे ओळखले होते. या दोहोंत त्यांचा विरोध ज्या कारणांसाठी होता ती पाहिली म्हणजे डॉक्टरांच्या बौद्धिक झेपेची कल्पना येते. आर्थिक प्रश्नांचा विचार राष्ट्रीय पातळीवरून न करता त्यांनी जागतिक पातळीवर नेला व दोन तृतीयांश दरिद्री जगाच्या समस्यांना भांडवलशाही व साम्यवाद जबाबदार आहेत म्हणून त्यांस विरोध केला. भांडवलशाहीतील मालकी कल्पनेलाच त्यांचा विरोध होता असे नव्हे तर भांडवलशाही ठोक उत्पादनपद्धतीसही होता. साम्यवादामध्ये सरकारी मालकीखालीच पण ठोक उत्पादनपद्धतीच अंमलात आली. खाजगी मालकी व सरकारी मालकी ही दोन्ही डॉक्टरांना सारखीच त्याज्य वाटत असे. याचे कारण असे की दोहोंत ठोक उत्पादनपद्धती (व तिच्या अनुषंगाने येणारी भांडवल-प्रधान अर्थव्यवस्था, बाजारपेठेसाठी झगडे वगैरे) अभिप्रेत आहे. दोन तृतीयांश जगामध्ये मनुष्यबळ भरपूर पण उत्पादनाची साधने कमी असल्याने ठोक उत्पादन-पद्धती निरुपयोगी आहे. तस्मात भांडवलशाही व साम्यवाद या दोहोंचा विकसन-शील जगास काही उपयोग नाही, असे डॉक्टरांचे मत होते.

समाजवादाला एवढे आर्थिक अधिष्ठान अन्य कोणी दिल्याचे माझ्या माहितीत तरी नाही. समाजवादी म्हणवणाऱ्या सर्व सरकारांनी ठोक उत्पादनपद्धतीचाच आश्रय केला ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. त्यामुळे समाजवाद हा आयत्या बिळातील नागोबा आहे, भांडवलशाहीने (वसाहतींना पिळून) उभारलेल्या संप-त्तीचे वाटप करण्यापलीकडे त्याचे काही कर्तृत्व नाही असा समज झाला. असल्या परभृत समाजवादाचा विकसनशील देशास–जेथे उत्पादन ही समस्या आहे – काही उपयोग नाही; किंबहुना हा खरा समाजवादच नव्हे ही भूमिका डॉक्टरांची होती हे त्यांचे अनन्य-साधारण वैशिष्ट्य होय.

समाजवाद कसा नसावा हे डॉ. लोहियांना उमगले पण तो कसा असावा हे सांगताना त्यांनी गांधीवादाचा आश्रय घेतला. पाटणा येथील सोशॅलिस्ट पार्टीच्या अधिवेशनात त्यांनी मांडलेल्या कल्पना—अल्पप्रमाण यंत्र, भूसेनेद्वारा पडीक जमि-नींची लागवड, व गाव, जिल्हा, प्रांत व केंद्र ही विकेंद्रित चौखम्मा राज्यपद्धती, म्हणजे गांधीवादाचीच थोडी यंत्राळलेली आवृत्ती होय. डॉक्टरांच्या या कार्यक्रमास 'समाजवाद' हे नाव दिले तर त्यातून नावाबद्दलच्या अट्टाहासाखेरीज काहीच व्यक्त होणार नाही. एका अर्थाने डॉक्टरांना समाजवादाची सैद्धांतिक बैठक तयार करण्यास, राजकारणाच्या वेगामध्ये वावच मिळाला नाही–पण त्यांनी घातलेला

वैचारिक पाया फार मोलाचा आहे. विशेषत:, आर्थिक तत्त्वज्ञानाच्या मूलभूत मर्यादा व त्याचे ऐतिहासिक–भौगोलिक संदर्भ जाणण्याची डॉक्टरांची हातोटी समाजवादी तत्वज्ञानाच्या प्रगतीस उपकारक ठरेल.

## भारतीय समाजवादाची वाटचाल

पण भारतात आजवर समाजवादाची प्रगती का झाली नाही या प्रश्नाचे उत्तर समाजवादाच्या सैद्धान्तिक पंगुपणापेक्षा निराळ्या गोष्टीत शोधले पाहिजे. पंडित नेहरू, जयप्रकाश नारायण, नरेंद्र देव, डॉ. लोहिया, एस. एम. जोशी, असे रथीमहारथी समाजवादाच्या बाजूने लढत आले असता भारतभूमीत समाजवाद रुजू शकत नाही याची कारणे फार गुंतागुंतीची आहेत. संक्षेपाने बोलावयाचे तर असे म्हणता येईल की धर्म व जातिबंधनाच्या रूपाने भारतीय जनतेने समाजाची बंधने फार काळ सोसली आहेत– आता ती दूर झाली असता पुन्हा एखाद्या नव्या 'वादा'च्या रूपाने ती स्वीकारण्यास भारतीय जनता तयार नाही. दुसरे म्हणजे भारतीय जनता व हिंदू धर्म मूलत: व्यक्तिवादी असून त्यास संघटनात्मकतेचे वावडे आहे. पापपुण्य आणि कर्मसिद्धान्त यांच्या अद्यापही शाबूत असलेल्या प्रभुत्वामुळे येथे सामाजिक विषमता अंगवळणी पडली आहे. चांगले जीवनमान हा अद्यापही जीवनाचा एकमात्र हेतू होऊ शकत नाही. ही झाली सनातन कारणे. आणखी एक कारण अगदी आधुनिक आहे ते म्हणजे व्यावसायिक संघटनांचा उदय हे होय. सत्ता ही स्वयंभू नसते तर ती विविध हितसंबंधांच्या तालावर नाचत असते. कामगार व विविध आर्थिक वर्ग दडपणाने आपली उद्दिष्टे सरकारकडून साध्य करून घेतात पण प्रत्यक्ष सत्ता हाती बाळगण्याची कोणीच इच्छा धरीत नाही. ज्याला कारभार चालवावयाचा असतो– ( मग तो देशाचा असो की कारखान्याचा ) त्याला काही बंधने, काही जबाबदाऱ्या आपोआपच पाळाव्या लागतात. संघटनात्मक दबावाने आपली उद्दिष्टे साध्य करून घेण्यात, हा धोका नसतो. त्यामुळे समाजवादाचे भावुक आकर्षण आता कोणत्याच वर्गात राहिले नाही.

सर्वांचे एकच मत

कोणत्याही तऱ्हेच्या टोप्या, गंजिफ्रॉक, सॉक्स वगैरे सर्व प्रकारची होजिअरी व लहान मोठ्यांचे अद्ययावत तयार कपडे

एन. व्ही. गोखले

यांचे दुकानातच घ्यावेत

प्रार्थना समाजजवळ, गिरगाव, मुंबई ४

वाजवी किंमत व उत्कृष्ट माल हे वैशिष्ठ्य.

आज भारतातील समाजवादी म्हणवणाऱ्या शक्ती एका भिंतीपाशी येऊन उभ्या आहेत. राष्ट्रीयीकरण हीच ती भिंत ! या भिंतीच्या पलीकडे सगळी स्वर्गसुखे आहेत, सर्वंकष राष्ट्रीयीकरण केले तर सर्व प्रश्न सुटतील असे वाटत नाही. पण समाजवादी म्हणवून घ्यावयाचे तर या भिंतीपलीकडे उडी मारल्याखेरीज गत्यंतर नाही असा हा पेच आहे. त्यामुळे आपण सांगतो तोच समाजवाद असा पवित्रा घेण्याखेरीज कोणत्याही राजकीय पक्षाला काहीच करता येत नाही.

सर्वंकष राष्ट्रीयीकरण हा कायदेशीर व सरकारी अराजकाचाच एक नमुना ठरेल यात शंका नाही. या अवस्थेत प्रत्येक हितसंबंध संघटनात्मक दबावाचा फायदा घेऊन आपले हित साधेल व सर्व देशाच्या हिताची काळजी कोणीच वाहणार नाही. एका अर्थाने अ‍ॅडॅम स्मिथच्या सुप्रसिद्ध ‘ व्यक्तिगत हितसंबंधांची बेरीज म्हणजेच राष्ट्रीय हितसबंध ’ या वचनाची आठवण या संदर्भात येणे स्वाभाविक आहे. म्हणजे समाजवादी मार्गाने आपण भांडवलशाही सिद्धांताप्रत जाणार की काय ? राष्ट्रीयीकरणापलीकडे काय या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर सापडेपर्यंत समाजवादास भवितव्य नाही.


अशा प्रकारे डॉक्टर लोहियांच्या प्रारंभीच्या अवतरणापाशीच आपण पुन्हा येऊन पोहोचलो. (हेच डॉक्टरांचे वैचारिक मोठेपण ? ) प्रत्यक्ष परिस्थिती पूर्णपणे वेगळी दिसत असता–पुढचे काही आकलन होत नसता–राष्ट्राचे व्यवहार आपण एका ‘ समाजवाद ’ या शब्दावरच्या प्रेमामुळे, त्या शब्दांत कोंबण्याचा बालिश प्रयत्न करीत आहोत. शब्दाच्या गुलामीचे एवढे विदारक उदाहरण अन्यत्र कोठे सापडणार नाही. भांडवलशाहीच्या, साम्यवादाच्या, साम्राज्यशाहीच्या, सत्ताधाऱ्यांच्या हुकूमशाहीला बेडरपणे तोंड देणारे डॉक्टर लोहिया यांनी एका शब्दाची ही हुकूमशाही कधीच मानली नसती असे मानण्यास जागा आहे. दुर्दैवाने अन्यायाविरुद्धचा, निर्बुद्धपणाविरुद्धचा आणि ढोंगीपणाविरुद्धचा त्यांचा लढा यशस्वी होण्याअगोदरच काळाने त्यांस चिरविश्रांती दिली. गरिबांविषयीची त्यांची कळकळ व अन्यायाविरुद्धची त्यांची तिडीक या गुणांपैकी थोडा जरी अंश, आज प्रत्येक भारतीयात उतरला तरी डॉक्टर लोहियांसारख्या अनेक महात्म्यांचे जन्मभराचे कष्ट सार्थकी लागले असे होईल.

O

साप्ताहिक ‘ माणूस ’चा यापुढील अंक
तारीख १८ नोव्हेंबर १९६७ रोजी प्रसिद्ध होईल.


— *संपादक*






## दीपावली शुभचिंतन

दिवाळी व नूतन वर्ष
आमच्या ग्राहकांस व
हितचिंतकांस सुखसमृद्धीचे
व आनंदाचे जावो.



किर्लोस्कर ® दर्जेदार डिझेल एंजिनांचे भारतातील अग्रेसर उत्पादक

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड**

रजि. ऑफिस : एलफिन्स्टन रोड, खडकी, पुणे-३ (भारत).

TOM & BAY KO: 6751M

होय, वाघाशी झुंज ! कल्पना रोमांचकारी. वाघाशी झुंजावं आणि पाश्चात्त्य कलावंतांपेक्षा मराठी कलावंत धाडसात मागं नाही, हे दाखवून द्यावं, हा विचारही मोठा पौरुषशाली ! हौसेला तर मोलच नाही. वाघाशी समोरासमोर पंजाला पंजा आणि खांद्याला खांदा भिडवून झुंजावं ही ह्या तरुणाला हौस, पण जर समजा, वाघानं सहज तोंडावर आपल्या पंजाचा फटकारा मारला तर ? रुपेरी पडद्यावरून कायमचंच पडद्यामागे जावं लागणार ही खात्री !
तरीही सूर्यकांत वाघाला सामोरे गेलेच.


# वाघाशी झुंज!

पुण्याला बऱ्याच कंपन्यांची चित्रं सुरू होती. एकूण तीन स्टुडिओंतून कामं चालली होती. आता मी पुण्यास नवीन नव्हतो. प्रथम मी कोल्हापूर सोडून पुण्यास कामाला आलो, त्या वेळी जो त्रास झाला, तो आता होत नव्हता. याचे कारण ज्या निरनिराळ्या भूमिका मी यशस्वी केल्या त्याचा हा परिणाम ! आता पुणे पूर्ण माझ्या परिचयाचे झाले होते. माझ्याबद्दल सिनेसृष्टीत एक धाडसी व रगेल नायक म्हणून बोलले जाऊ लागले होते. पण माझ्यात ही धाडसी वृत्ती निर्माण झाली कशी ? त्यालाही काही कारणं झाली—मी लहानपणी मा. विठ्ठलराव, भगवानराव

सूर्यकांत

यांचे चित्रपट पाहत असे आणि ती चित्रे म्हणजे तुफान मेलपासून हंटरवाली, सायकलवाली, जादूचा दिवा वगैरे आणि त्या चित्रपटांत जो नायक मा. विठ्ठल हा शेकडो माणसांना दाद न देणारा, क्षणात डोंगरावर तर क्षणात तेथून खाली खोल दरीत. त्यांनी एक उडी घेतली व एक कोलांटी उडी मारून उभा राहून तोंडाने 'हूं !' असे केले, की संपले !

त्या वेळी मी विचार करावयाचा की इतक्या उंचावरून उडी मारून यांना लागत कसं नाही ? पण हा माझा भ्रम ज्या वेळी मी सिनेमा क्षेत्रात आलो त्या वेळी नाहीसा झाला. आणि मला कळून आले की हे सर्व कॅमेरा-ट्रिकने होतं. तरी पण त्या नायकाविषयी (मा. विठ्ठलबद्दल) माझा आदर वाढला होता आणि या सृष्टी-तले माझे पहिले पाऊल त्यांच्यासारख्या अनुभवी जगप्रसिद्ध नायकाबरोबर पडले हे मी माझे भाग्य समजतो. पहिल्याच चित्राला त्यांनी मला जे सहकार्य दिले, जो हात दिला व मार्ग दाखवला त्यामुळेच मी आज या सृष्टीची वाटचाल करीत आहे. सिनेसृष्टीत इंडियन डग्लस अशी ज्यांना पदवी होती, त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली याचा आनंद तो काळ आठवला, की आजही होतो...आणि वाटतं की, आपणही त्यांच्याप्रमाणे धाडसाची कामं करावी आणि तेव्हापासून माझं मन बेडर होऊ लागलं. कोणतंही कठीण काम करताना मन कचरत नसे, उडी मारणे, मारामारी करणे वगैरे कामं मी सफाईने करू लागलो.



अशाच एका प्रसंगाची मला आठवण झाली. पुण्यात माझी दोन पिक्चर्स चालू होती. श्री. सुधीर फडके यांनी एक पिक्चर सुरू करण्याचे ठरवले. कथा निवडली. कथा होती शिकारी जीवनावर. म्हणजे पिक्चरची बॅकग्राऊंड जंगलची आलीच. आता कलावंतांची निवड करावयाची होती. त्यासाठी डायरेक्टर यशवंत पेठकर व सुधीर फडके यांनी त्यांतील हीरोच्या कामासाठी माझी निवड केली. शिकारी ड्रस व हातांत बंदूक शोभणारा त्या काळातला मीच नायक होतो. माझ्याबरोबर मदन बक्षी हा काम करीत होता. झाले. कथानक आम्हा सर्व कलावंतांना ऐकवण्यात आले. कथा फक्त सहा माणसांची होती. या चित्रातली माझी भूमिका निराळी, वेगळी होती. मुहूर्त डेक्कन स्टुडिओत ठरला आणि त्याच दिवशी असे ठरले की, हे चित्र हिंदी भाषेत करावयाचे. त्या बरोबर मला वाटले आपले काम गेले. पण सुधीर फडके यांनी निर्णय घेतला की कलावंत हेच राहतील. आणि आमचे हे चित्र सुरू झाले. त्या वेळी हिंदीत नावाजलेले कलावंत ललिताबाई, बेबी शकुंतला, राजाभाऊ परांजपे. त्या वेळी या कलावंतांनी भाषेच्या बाबतीत मला खूपच मदत केली. म्हणूनच मी या कलावंतांच्या बरोबर काम करू शकलो—पिक्चरच्या कथानका-प्रमाणे शुटिंग सुरू होते. आणि एके दिवशी श्री. सुधीर फडके माझ्याजवळ म्हणाले, "सूर्यकांत, या चित्रपटात एक सीन आहे आणि तो कसा घ्यायचा याच्या विचारात आम्ही आहोत. तुम्हांला माहीतच आहे की, चित्रपटाची सुरुवात दोन शिकारी मित्रांच्यावर आहे. आणि हे दोन मित्र जंगलातून चालले असताना अचानक वाघाची आरोळी ऐकू येते. आणि ते मित्र त्या आवाजाच्या रोखाने इकडे तिकडे पाहत असतात. इतक्यात वाघाची झडप नायकाचे अंगावर पडते." तेव्हा मी म्हणालो, "मला माहीत आहे हा सीन. तुम्हाला काय म्हणावयाचे आहे ?" त्यावर सुधीरजी म्हणाले, "चित्रपटाचे नायक तुम्ही आहात. तेव्हा या सीनला तुम्ही तयार आहात काय ? आम्ही हा सीन खरा घेणार आहोत—अनायासे पुण्यात देवलांची सर्कस आली आहे, त्यांच्या सर्कसमधील वाघ आणायचे आम्ही ठरवले आहे व त्या प्रमाणे त्यांच्याशी आमची बोलणी पण झाली आहेत. तरीपण नायकाची म्हणजे तुमची तयारी पाहिजे, आणि नसेल, तर आम्ही त्यांच्याच सर्कसमधील एका तुमच्या-सारखा दिसणाऱ्या माणसास तुमचे कपडे घालून बॅकने तो सीन घेऊ, तेव्हा काय करावयाचे ?"—सुधीरजींचे बोलणे एकून माझ्या धाडसी मनोवृत्तीने उचल खाल्ली एक क्षण मी शांत बसलो. सुधीरजी पाहत होते. मी त्यांना लगेच सांगितले, "हे पाहा बाबूजी, पिक्चरचा हीरो मी आहे. आतापर्यंत माझे काम डुप्लिकेट मी कुणालाच करू दिले नाही, तेव्हा हेही काम मीच करणार. तुम्ही काही काळजी करू नका !" माझे बोलणे ऐकून आश्चर्याने त्यांच्या भुवया उंचावल्या; कारण माझ्याकडून अशा उत्तराची त्यांना अपेक्षा नव्हती. कारण माझ्या मित्राचे काम करणाऱ्या मदन बक्षीने त्यांना या सीनला नकार दर्शविला होता. त्याचे डुप्लिकेट करण्याचे ठरवले होते.

त्याप्रमाणे माझेही उत्तर मिळेल अशी सुधीरजींना अपेक्षा होती. पण माझ्या उत्तराने त्यांना आनंद झाला. त्यांनी आभार मानले व ते निघून गेले.

ते गेल्यानंतर मी पाच मिनिटे विचार केला, त्या वेळी वर्तमानपत्रांतून काही हिंदी नटांबद्दल बातम्या येत होत्या, अमक्या नटाने सिंहाबरोबर फाईट केली. आणि ही करत असता सिंहाने त्यांना पंजा मारला. पण थोडक्यात धोका टळला. तावडतोब त्यांना हॉस्पिटलमध्ये पोहोचते केले, त्यांच्या जखमांवर औषधोपचार करण्यात आला. दोन दिवस शुटिंग थांबवण्यात आले. पण कलावंताने दुसऱ्या दिवशी शुटिंगला येण्याची तयारी दर्शविली. त्याबद्दल सर्वांनी त्यांचे कौतुक केले—' मी मनात म्हणालो, हे जर सत्य आहे, हिंदी कलावंत जर आपल्या कलेशी इतके प्रामाणिक आहेत तर आम्ही महाराष्ट्रीयन काय कमी आहोत. नाही. निश्चित नाही. मग महाराष्ट्रीय सिंहाचे छावे ते कसले? आणि मी माझ्या मनाची तयारी पक्की झाली. सुधीरजींना मी निरोप पाठवला आणि माझी विनंती कळवली, की पिक्चरमधील माझा ड्रेस मला पाठवा व देवलांची माझी ओळख करून द्या, मी रोज सकाळी त्यांच्या सर्कसमध्ये वाघाबरोबर फायटिंग रिहर्सलला जाणार आहे— मला दहा दिवसांचा अवधी असावा. नंतर शुटिंग करावे, कारण आता मी तयारी-


॥श्री॥

दि बृहन्महाराष्ट्र शुगर
सिंडिकेट लिमिटेड

*रजिस्टर्ड ऑफिस : १८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे २*
*फॅक्टरी : श्रीपूर, व्हाया अकलूज, जि. सोलापूर*

तुम्ही देवातें भजाल । देव तुम्हां तुष्टतील ।
ऐसी परस्परें घडेल । प्रीति जेथ ॥—*श्री ज्ञानेश्वरी*

साखरेचा नवीन हंगाम दिवाळीनंतर सुरू होईल.

**साखर व स्पिरिटच्या उत्पादनाच्या जोडीला मद्यार्क उत्पादनाची योजना हाती घेणार आहोत**

*आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना ही दिवाळी व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.*

**श्री. गो. श्री. वाळिंबे**
बी. कॉम., मॅनेजर

**श्री. शं. ल. लिमये**
बी. एस्सी. एलएल बी., अध्यक्ष

'NANDADEEP

निशीच मैदानात उतरणार होतो. हे माझ्या मनातील विचार बोलून दाखवायला पुण्यात एकच मित्र होते आणि ते म्हणजे श्री. वसंतराव शिंदे. त्यांचे माझ्यावर अतिशय प्रेम होते. एखादी गोष्ट करताना मी त्यांचा विचार घेत असे, कारण योग्य तोच सल्ला ते देत असत. पुण्यातील सुरुवातीच्या काळात त्यांनी मला खूप सहकार्य दिलं. त्यांना ही गोष्ट सांगताच ते म्हणाले, " सूर्यकांत, गोष्ट चांगली आहे. मराठीतील धाडसी नायक म्हणून तुमचे कौतुक होईल. मराठीत ही गोष्ट प्रथमच घडत आहे. तरी पण या बाबतीत तुमच्या जीविताला काही धोका झाला तर ! प्रोडयूसर काय करणार आहेत आणि त्यांनी केले तरी त्यांचा नंतर उपयोग तरी काय ? या बाबतीत तुम्ही तुमच्या घरच्या मंडळींचा विचार घेतला काय ?" मी 'नाही' म्हणून सांगितले. ते म्हणाले, " तुम्हांला वाटते तितके हे सोपे नाही." पण मी माझा निश्चय पक्का असल्याचे त्यांना सांगितले, त्यावर थोडा वेळ विचार करून ते म्हणाले, " हरकत नाही. मी रोज तुमच्याबरोबर रिहर्सलला येणार आणि तुम्हांला एक ताकीद. उगाच अंगातील ताकदीमुळे आडदांड वागायचे नाही."–

दुसऱ्या दिवशी मी व वसंतराव शिंदे कंपनीच्या गाडीतून देवल सर्कसमध्ये गेलो. देवल माझी वाटच पाहत होते. त्यांना अगोदर तसे सुधीरजींनी कळवले होते– मला बसायला सांगितले व बसल्या जागेवरूनच त्यांनी नोकराला हुकूम सोडला, 'ए, भारतला घेऊन ये.' मला वाटले मुलाला आणायला सांगितले असेल– मग, थोडा वेळ बोलणे झाले. त्यांनी माझ्या मनाची तयारी असल्याची खात्री करून घेतली व म्हणाले, " अहो, जनावर पाळीव असले तरी ते जनावर आहे. त्याच्या मनाचा कोणाला अंदाज येईल काय !" मी व वसंतराव यांनी एकमेकांकडे पाहिले. ते म्हणाले, " हं–आमच्या सर्कसमध्ये अशी उदाहरणे घडली आहेत." हे बोलत असताना मघाचा नोकर आला व त्याने सांगितले, " भारतला आणले." पण मला त्याच्या बरोबर कोणीच दिसले नाही. देवलांनी मला चलायला सांगितले. मी व वसंतराव त्यांच्यामागे चाललो आणि ज्या वेळी वाघाच्या पिंजऱ्याजवळ आलो,


**दीपावली अभीष्टचिंतन**

आपली कांती नि कीर्ति समृद्ध करण्यासाठी
कीर्तीने एक तपाचेवर अखंड सेवा केली आहे.
*बनारस, बॅंगलोर, कांजीवरम, इंदोरी, प्युअर सिल्क, ड्रेलॉन, नायलॉन*
वगैरे पेठांच्या साड्या शालू. सहस्रपटीने ग्राहकांची अभिवृद्धी होत आहे
असे एकच ठिकाण

# कीर्ति

फॅमिली शॉप. फोन ५७३७३, लक्ष्मी रोड, पुणे २. 'HIND'

तेव्हा मला समजले की ' भारत ' हे त्या वाघाचे नाव आहे. मी पाहतच राहिलो. पिंजऱ्याच्या गाडीत येरझारा घालणारे चिरंजीव भारत हे शरीराने भक्कम होते. त्यांची गुरगुर चालू होती. गोल पिंजऱ्यालगत गाडी आणून उभी केली होती. गोल गाडीवर दरवाजा उघडणारा माणूस इशाऱ्याची वाट पाहत होता–गोल पिंजऱ्याचे दार उघडले आणि माझ्या मनाची दारं थाड थाड वाजायला लागली. देवल पुढे होते. मी मागे मागे होतो. वसंतराव जाळीलगत बसले होते. मधून मधून मी त्यांच्याकडे पाहत होतो. ते हसून मला प्रोत्साहन देत होते. दवलांनी दोन स्टुले आणायला सांगितली. स्टुले ठेवली–आणि देवलांनी इशारा करताच वाघाचा पिंजरा उघडला गेला. आणि वाघाने उडी मारण्याअगोदरच एकवेळ देवलांच्याकडे व एकवेळ माझ्याकडे पाहून उडी घेतली. देवलांनी त्याला 'भारत ' म्हणून इशारा केला– त्या बरोबर त्याने एक जांभई दिली व आपल्या पंजांनी जमीन उकरण्यास सुरुवात केली, तसे मी देवलांना विचारले, " हा काय प्रकार ?" त्यांनी सांगितले वाघाने आळस दिला– आळस–चांगलाच आहे याचा आळस, नंतर त्याला दूध पिण्यास दिले. आणि देवलांनी इशारा करताच तो स्टुलावर ऐटीत जाऊन बसला. ' हं बोला, आता काय करू मी ?' असंच जणू काय विचारीत होता. हा सर्व प्रकार चालू असताना सर्कसमधील कलाकार आपली प्रॅक्टिस थांबवून आमच्याकडे पाहत होते. कारण मी व वसंतराव हे फिल्मी कलाकार त्यांच्या क्षेत्रात आज नवीनच होतो.

देवलांनी मला जवळ बोलावले व म्हणाले, " काय सूर्यकांत, आहे ना तयारी ? करायची काय प्रॅक्टिसला सुरुवात ?–" हे म्हणत असता ते 'भारत 'जवळ पोहोचले होते. धोतराचा सोगा एका हातात धरून दुसऱ्या हाताने वाघाच्या अंगावरून हात फिरवीत होते. आणि वाघही प्रेमाने त्यांचा हात चाटत होता, लाळेने देवलांचा हात ओला झाला होता. तो हात वाघाच्या पाठीवर पुसत त्यांनी

[ पृष्ठ १३८ पाहा ]


# सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटशेजारी, मुंबई २

*राहण्याची व भोजनाची मनपसंत व्यवस्था*

**अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.**

**टिळक हॉलमध्ये लग्न–मुंजी समारंभ व मेजवान्यांची उत्कृष्ट सोय**

**फोन नं. ३८३३७.**



१३३ गुलजारी घाट — रमणीय स्थान । जंगल ।
इसीके सामने दक्षिण तरमें हुशंगाबाद है ।
१३४ बांद्राभानघाट — रमणीय स्थान ।
रमणीय जंगल । ६ मील ।
१३५ जानपुर घाट — जंगली मार्ग । २ मील ।
१३६ चिचली घाट — जंगलका मार्ग । पोस्ट है । २ मील ।
१३७ मढावन घाट — १॥ मील
१३८ कुसुमेली संगम घाट — ३ मील कुसुमेली नदी ।

द्वितीय पर्व
अध्याय एक

# कुणा एकाची भ्रमणगाथा

हिशेब केला, की कुसुमेली संगम इथून साडेचौदा मैल. प्रकृतीचं रडगाणं नेहमीचंच. त्याचं काय एवढं ! उठलो, अन् रेवास्तोत्र म्हणत तडातडा चालू लागलो. पाय आपलं काम करीत राहिले, डोळ भंवताल निरखीत राहिले.

ज्या कुणी या लहानुल्या खेड्याचं नाव गुलजारी घाट ठेवलं, तो मोठा रसिक असला पाहिजे. खरोखरी इथं नर्मदाकाठ मोठा गुलजार आहे. दो बाजूंना सेमर, चारोळी, बीजकली असं वन्यापैकी अरण्य आहे. दचका उपजावा, इतकं ते घनदाटही नाही. एखादी बनचमेली एका झाडावर चढते, अन् आपले पागोरे पलीकडल्या झाडापर्यंत पोचवून त्या दो भावांची रामभरतभेट घडवून आणते.

एरवी नर्मदातीरावरून कोण कोण चालत असतं. वाट काही केवळ परिक्रमावासीयांची पैतृक संपत्ती नव्हे. या खेड्यातले खेडूतही याच पावटीचा उपयोग करतात. कुणी कवतिकाची लेक मेण्यात बसून पहिल्यांदाच सासरी निघालेली असते. तिला सोबत करण्यासाठी साजणी गडणी. भरघोस मिशांचा, कल्ले राखलेला एखादा भालाईत बरोबर नसेलच, अशी काही शपथ घेता येत नाही. खरं पाहिलं तर वाट तशी अडचणीची. भोयांना मेणा घेऊन या वाटेनं उजूपणं धावता येत नाही. तरी पण ते हुंकार भरीत, मेण्याचं जडशीळ ओझं वागवीत हीच पावटी झिजवीत असतात. कारण असं की, या वाटेनं चालत असता मैयाचं निळंनितळ पाणी सारखं दृष्टीसमोर असतं.

गो. नी. दांडेकर

कसं असतं ? कुणी भेटा, कुणी बिघडा, कुणी असा, कुणी नसा ! रेवामाई आपली वाहतच असत्ये ! खेड्यामागं खेडी मागं पडतात, तरीदेखील.

मैयाच्या तीरावरल्या खेड्यातल्या या मातीच्या घरांमध्ये असं काही चमत्कारिक सारखेपण आहे ! कुठल्याही खेड्याचं नाव हिरावून घेऊन ते पलीकडल्या खेड्याला ठेवलं तरी पाचपन्नास घरांची ती दोन्ही खेडी काही तक्रार करायची नाहीत. म्हणतील नेहमीच्या एकसुरी जीवनात तेवढाच विरंगुळा.

* * *

दिवस कलला. कुसुमेली संगमावर येऊन उभा राहिलो. गुडघ्याच्याही वरपर्यंत पाय धुळीत मळून गेले होते. अगोदर मैयाच्या पात्रात धोंड्यावर बसून हातपाय नीट लख्ख धुऊन काढले. धूत असता अचानक लक्ष शरीराच्या दुबळेपणाकडे गेलं. मोठं नवल वाटलं.

म्हणजे आता पाहा, उणीपुरी बावीस-तेवीस वर्षं व्हायला आली, रोज हे रोडके हातपाय पाहतो आहे. हे फुटरं शरीर आता काही अपरिचित राहिलं नाही. कित्येकदा हे पाय ठेचाळले. त्यात काटे शिरले. गारठ्यामुळं पावलं चिराडली. किती धुळीची किती पुटं चढली. गुडघ्यावर किती जखमांच्या किती खुणा !

पावलं माझी लहान आहेत. त्यांच्या त्या बायकीपणामुळं कितीएकदा अनेकांकडून बोलून घेतलं आहे. अनेकदा ती कुणाला दिसू नयेत, म्हणून झाकून घ्यायला धडपडलो आहे. लाजेनं झाकोळून गेलो आहे.

अगदी लहानपणी तर शरीर सुरकुतलेलंच होतं म्हणे, तजेला असा कधी त्यावर आलाच नाही. अगोदर सुदामजी. वडील तिरस्कारानं कधी कधी 'पाप्याचं पितर' म्हणत. त्यात पुन्हा पावलं लहान. एखाद्या पोरीची असावीत तशी.

नवल असं वाटलं, की हे क्षीण, हाडकुळं शरीर घेऊनच भटकणं सुरू आहे. अनिर्बन्ध. मनस्वी. एका परीनं बरंही वाटलं. मनाची समजूत घातली, की हडकुळं आहे. तेच बरं. म्हणजे धावाय्–पळायला सोपं. उगीच एवढं थोरलं ओझं वाहायला


पुण्यातील अग्रेसर सरकारमान्य संस्था

**प्रोफिशियण्ट शॉर्टहॅन्ड अँड टाइपरायटिंग इन्स्टिट्यूट**

**६८६ बुधवार पेठ, पुणे २**

इंग्रजी व मराठी टाइपरायटिंग व इंग्रजी तसेच मराठी लघुलेखन

*आमची वैशिष्टये* : ★ नवीन टाइपरायटर्स ★ अनुभवी व तज्ज्ञ शिक्षक
★ नोकरी करणारांसाठी सोयीस्कर वेळा ★ स्त्रियांसाठी स्वतंत्र सोय

**रा. दा. मोंढे, प्राचार्य**

नको ! जाडाजुडा असतो तर, केवढा शीण ! भटकणं तर पाचवीलाच पुजलं आहे ! मग ते अवजड शरीर वाहत, ते ओझं वागवीत, वणावणा हिंडावं लागलं असतं !

" ब्रह्मचारीजी ! आपके पैर कितने छोटे हैं ! "

दचकून समोर पाहिलं. एक माई माझ्या पावलांकडे पाहत कुतूहलानं हसत उभी होती.

वेश तर परिक्रमावासी होता. एक पांढरं मळकं पातळ, सांवळी मुद्रा, तीही काही मोठी लक्षात राहील अशी नव्हे. आकृतीही मूठभरच. तीही डोळयांत भरणारी नाही.

तिनंही माझ्या बारक्या पावलाला हसावं ? थोडकासा चिडलोच. म्हणालो,

" देखिये माई, आपके पैर भी बहुत बडे नहीं कहे जा सकते । अगर होते, तो मेरे आपको देता, आपके मैं ले लेता ! "

लटका विस्मय दाखवीत तिनं दोन्ही हात तोंडाआड धरले, अन् म्हणाली,

" मैया री मैया, रूठ गय सायत ! "

मी त्याच चिडक्या स्वरात म्हटलं,

" आपने बातभी रुठवानेकीही की थी ! जो भी हो, आखिर भगवानने छोटेही दिये है, मैं क्या करूं ? बताइये–करूं भी क्या ? कुछ उपाय थोडेही है ? "

अन् मग एकदम ती हसली. हसली काय, सगळा दिवस सुगंधी झाला. असं मंजूळ हसू कधी पाहिलं ऐकलंच नव्हतं. विस्मयानं तिच्या मुद्रेकडे पाहत राहिलो. हसली अन् मग म्हणाली,

"माई, परिक्रमावासी हो! फक्कडोंने इतना क्रोध नहीं करना चाहिये । पहले भी

[पृष्ठ १६४ वर]


दीपावली शुभचिंतन



सर्व प्रकारची वाद्ये मिळण्याचे
विश्वसनीय ठिकाण
नाविन्यपूर्ण इलेक्ट्रिक गिटार, मेंडोलीन व
बुलबुलतरंग इत्यादींचे आद्य प्रवर्तक
हरिभाऊ विश्वनाथ कं.
संगीत वाद्यालय
दादर, मुंबई २८.

## रंगा मराठे



मला वाटलं ह्या बोडक्या पुलाचीच छाया भाऊमामांच्या घरावर पडली आहे, त्यांच्या घरातल्या साऱ्याच माणसांची अवस्था ह्या पुलासारखी झाली आहे.

# खोडक्या फुलाची गोष्ट

बाहेर मुसळधार पाऊस पडत होता. हवेत रेफ्रिजरेटरसारखा गारवा वाटत होता. त्यातच सुसाटयाचा वारा खिडकीतून आत शिरून अंगाला झोंबत होता. एस्. टी. ची बस काळोखात समोरील रस्ता कापीत चालली होती. दुतर्फा असलेली झाडं झपाटयानं मागे पडत होती. त्यांचे हिरवेगार शेंडे पाण्याने निथळत होते. बसच्या प्रकाशझोतात ते चमकत होते. दुतर्फा मागे पडणारी ओलीचिंब झाडं आणि प्रकाशाच्या टप्प्यात येणारा रस्ता यापेक्षा बाहेरचं काहीही दिसत नव्हतं. पाहण्याची इच्छा नव्हती. सकाळी सहा वाजता प्रवास चालू झाला त्याला आता चौदा तास झाले होते. प्रवासानं अंग आंबून गेलं होतं. कपडे खराब झाले होते. बसच्या टपातून मधून मधून माझ्या अंगावर पाणी ठिबकत होतं. सारे प्रवासी माझ्यासारखेच कंटाळले होते. आणखी थोडयाच वेळात आमची बस सोनगावला पोचणार होती. मला बस स्टँडपासून फर्लांगभर चालत जावं लागणार होतं. भाऊमामांना मी पत्र पाठवून एस्. टी. नं येणार असं कळविलं होतं व लिहिलं होतं, की शक्य झाल्यास स्टँडवर कुणाला तरी पाठवावं.

बस गावात शिरली आणि दुतर्फा चुपचाप झोपलेली कुडाची घरं दिसू लागली.

नागनाथाचा पडका बुरुज दिसू लागला आणि त्या पलीकडच्या बाजूला असलेल्या स्टँडवर गाडी थांबली. पाऊस आता थंडावला होता पण सारं वातावरण भिजून चिंब झालं होतं. नागनाथाच्या पडक्या बुरुजापलीकडचं पटांगण, देवळाचा चौथरा दिसत होता. याच पटांगणात माझ्या बालपणाच्या अनेक स्मृती साठवलेल्या होत्या. त्या चौथऱ्यावर बसून अनुराधेला आणि तिच्या मैत्रिणींना गोष्टी सांगितल्या होत्या. एस्. टी. च्या बसमधून माझी ट्रंक आणि वळकटी मी उतरवून घेतली आणि स्टँडवर कुणीच कसं आलं नाही असा विचार करीत सामान घेऊन निघण्याच्या तयारीत होतो इतक्यात एक गडी पुढे येऊन म्हणाला,

"चला जी." त्यानं सामान उचललं तेव्हा मी विचारलं,

"कोण रे तू?"

"काय आता मोट्टं झाल्यात म्हुन वळख विसरला जी ?"

"कोण गेना कारे तू ?"

"व्हय जी."

गेना सामान घेऊन चालू लागला आणि त्याच्या मागून मी. गेनाला मी ओळखू शकलो नव्हतो. पण त्यानं मला अचूक ओळखलं होतं. गेल्या दहा–बारा वर्षांच्या काळात तो खूपच म्हातारा दिसू लागला होता. माझ्या लहानपणाचा मला जो गेना आठवत होता तो पिळदार शरीराचा, मजबूत बांध्याचा आणि झपाझप काम करणारा. भाऊमामांकडे एकदा चोर आला होता तेव्हा याच गेनानं त्याला पकडला होता आणि त्याची मुंडी बगलेत अशी आवळली होती की चोरं अर्धमेला झाला होता. भाऊमामांच्या घरात गेना लहानाचा मोठा झाला होता. घरातली आणि बागेतली सारी कामं तोच करायचा–आता मात्र तो थकला होता. फर्लांगभर चालत जाताना मी गेनाजवळ घरची चौकशी करीत होतो.

भाऊमामांची तब्येत आताशा ठीक राहत नव्हती. अनुराधा माहेरी कायमची परत आली होती. तिचा भंगड आणि व्यसनी नवरा परागंदा झाला होता. केशवचं दोन वर्षांपूर्वीच लग्न झालं होतं. त्याचा अधू पाय अजून बरा होत नव्हता आणि काही न करता तो बावळटासारखा घरात बसून खात होता. भाऊमामा जितके कष्टाळू आणि जिद्दीचे तितकाच केशव ऐतखाऊ, आळशी आणि बावळट. बापाला न शोभणारा मुलगा ! भाऊमामांना ते एक फार मोठं शल्य होतं. मी उत्सुकतेनं विचारलं,

"केशवची बायको कशी आहे रे ?"

"वयनी साबना त्या अक्षी लक्ष्मीवानी हायत बघा."

मी ऐकलं होतं की केशवला बायको फारच सुंदर आणि सालस मिळाली आहे. भाऊमामांनी जिद्दीला पडून पैशाच्या जोरावर गरिबाघरची मुलगी–लक्ष्मीसारखी सून–घरात आणली होती.

गेना भाऊमामांच्या घरची एकेक माहिती मला सांगत होता आणि मी ती उत्सुकतेनं ऐकत होतो. रस्ता संपून नदीच्या उताराला आम्ही लागलो होतो. नदीवरचा बोडका पूल ओलांडून गेलं की भाऊमामांचं घर लागणार होतं. पुलावरून पाणी वाहत होतं.

"हा बोडका पूल बघा लई वंगाळ हाय."

"कारे गेना ?"

"दर वरसाला बघा–एक–दोन मानसांचा बळी घेतो बघा."

"असं ?"

"गतच्या वर्साला बघा भामांचा पाय घसरला अन् पडले की पान्यात. मी उडी मारली अन् पकडून आणलं काठाला."

माझ्या लहानपणी हा बोडका पूल नव्हता. नदीचं पात्र पण लहान होतं. पावसाळ्यातसुद्धा फूटभर पाणी असायचं. आम्ही पुलाजवळ आलो. गेनाच्या पायाखालचा रस्ता होता. नदीचं पाणी खळाळत होतं. गुडुप अंधार होता. नदी पलीकडच्या घरांतले कंदील लुकलुकत होते, भाऊमामांचा वाडा डौलानं नदीच्या पलीकडच्या काठावर दिसत होता. गेनानं माझा हात घट्ट पकडला व बोडका पूल ओलांडून आम्ही पलीकडच्या काठाला पोचलो.

मी घराच्या कमानीत आत शिरलो. अंगण ओलांडून पायऱ्या चढून ओटीवर आलो. ओटीवरच्या कोनाड्यातली चिमणी धूर ओकत होती. एक लांबच लांब विटलेली सतरंजी ओट्यावर अंथरलेली होती व भिंतीला टेकून दोन तक्के ठेवले होते. सतरंजीवर पानसुपारीचा डबा होता. घराचं हे रूप मी कित्येक वर्षांपासून पाहत होतो. त्यात काहीही बदल झाला नव्हता. मी माजघरात आलो अन् झोपाळ्यावर बसलो.

झोपाळ्याचा आवाज ऐकून देवघरात पूजा करीत असलेले भाऊमामा म्हणाले,

"आलास का रे?"

"हो आलो ना!"

"गेना आला होता ना स्टँडवर? बरा आहेस ना? विहिरीवर जाऊन हातपाय धू. मग आपण बरोबर जेवायला बसू. अरे, आज चतुर्थी आहे. उपवास सोडायचा आहे. गेना, त्याला पाणी काढून दे."

मी विहिरीवर जाऊन हातपाय धुतले. भाऊमामांची पूजा आटोपली आणि आम्ही जेवायला बसलो. सावित्रीमामींनी सोवळ्यानं स्वयंपाक केला होता. त्यांचं सोवळं ओवळं फारच कडक–भाऊमामा त्यांच्याशी एक अक्षरही बोलत नसत. वर्षानुवर्षांचा त्यांचा अबोला होता. सावित्रीमामी म्हणजे भाऊमामांच्या धाकट्या भावाची बायको. लग्नानंतर वर्षाच्या आतच तिला वैधव्य आलं होतं. भाऊमामांची सारी मुलं तिला आई



म्हणत. मामी माझ्याशी काही बोलल्या नाहीत. विचारलं,

" बरा आहेस ना ?"

" हो. "

" आता आला आहेस तो राहा आठ-पंधरा दिवस. विश्रांती घे चांगली. "

मी 'हो' म्हटलं. भाऊमामा पण म्हणाले,

" अरे किती वर्षांनी आलास ? आता राहा भरपूर. "

केशव आणि त्याची बायको मला कोठेच दिसली नाहीत. अनुराधा कुठे आहे म्हणून मी विचारणार होतो. पण गप्पच राहिलो. जेवण झाल्यावर मामींनी मला अंथरूण घालून दिले आणि मला कधी झोप लागली ते समजलं नाही.

पहाटे मला जाग आली. विहिरीवर रहाटाचा आवाज ऐकू येत होता. भाऊमामा पहाटे उठून बागेत कामाला गेले होते. मी उठून पडवीत आलो. विहिरीवर अनुराधा पाणी भरत होती. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहता पाहता गतस्मृती जाग्या झाल्या.

अनुराधा त्या वेळी दहा–बारा वर्षांची असेल. विहिरीच्या रहाटावरचा तिचा हात सुटला आणि तिचा तोल गेला. आणि ती विहिरीत पडणार इतक्यात मी झटकन तिला धरली. ती खूपच घाबरली व मोठ्यांदा ओरडली होती. भाऊमामा तिचा आवाज ऐकून धावत आले आणि तिच्या अंगावर ओरडले,

" शिच्चे ओरडायला काय झालं एवढं ? मरत होतीस का ?"

अनुराधा त्या वेळी थरथर कापत होती. तो प्रसंग मला आठवला. बालपणचे सारेच प्रसंग मला आठवू लागले. मी, अनू आणि केशव दुपारीच घरातून मामींची परवानगी घेऊन किल्ला बघायला बाहेर पडलो. सोनगावपासून तीन मैलांवरच्या किल्ल्यात आम्ही गेलो. परतायला खूप उशीर झाला. येताना आम्ही रमत गमत आलो. वाटेत चिंचा–कैऱ्या पाडल्या. संध्याकाळ उलटून गेली तशी भाऊमामा खूपच चिडले. आम्ही भीतभीतच घरी परतलो. भाऊमामा मला खूप बोलले. आम्हांला तिघांना त्या दिवशी न जवताना झोपावं लागलं.

भाऊमामांना बहीण नव्हती, माझ्या आईला त्यांनी बहीण म्हणून मानले होते. मी अगदी लहानपणापासून दरवर्षी आईबरोबर सोनगावला मामांच्या घरी येत असे. माझ्या बालपणच्या साऱ्या स्मृती मामांच्या घरात रेंगाळत होत्या. गेल्या दहा–बारा वर्षांत मात्र मी इकडे आलो नव्हतो. माझ्या आईचं आणि भाऊमामांचं खूपच कडाक्याचं भांडण झालं होतं. तिला अनुराधेला सून करून घ्यायची होती. पण भाऊमामांनी त्याला विरोध केला. तेव्हापासून माझी आई सोनगावला आली नाही. आमच्या घराण्याचा आणि भाऊमामांचा संबंध जवळजवळ तुटला. मी मॅट्रिकच्या वर्गात असतानाच आई वारली पण भाऊमामा आले नाहीत. मी इंजिनीअर व्हावं असं तिला फार वाटत होतं. पण तिची ती इच्छा अपुरीच राहिली. पण मी ती पुरी

करायची ठरवलं होतं. पण त्यानंतर मी इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षात असताना माझे वडील वारले आणि मी सर्वस्वी पोरका झालो. माझी आई किंवा माझे वडील मी इंजिनीअर झालो हे पाहायला राहिले नाहीत.

त्यानंतर मी स्वतंत्रपणे कॉंट्रॅक्टर म्हणून काम करू लागलो. पहिली तीन-चार वर्षं मला फारच त्रासाची गेली. पण नंतर मला खूप मोठी कामं मिळू लागली. मी एक निष्णात इंजिनीअर म्हणून ओळखला जाऊ लागलो. आयुष्याला आता स्थैर्य प्राप्त झालं. नुकतंच मी एक मोठा पूल बांधण्याचं काम सुरू केलं होतं. माझ्या आईच्या नावानं सोनगावला एखादं देऊळ बांधावं असं माझ्या मनात होतं आणि म्हणूनच मी इथं आलो होतो.

मी तोंड धुवायला विहिरीवर गेलो तोच अनुराधा घागर भरून घरात निघाली. मला पाहिल्यावर म्हणाली,

"काल रात्री आलास ना ?"

"हो, पण तू कुठे दिसली नाहीस ?"

"मला बरं वाटत नव्हतं म्हणून लवकर झोपले. तोंड धुऊन घरात ये. चहा ठेवलाय."

मी विहिरीवर तोंड धुऊन स्वयंपाकघरात गेलो. माऊमामा, केशव, सावित्री


**डॉ. ग. श्री. खैर यांची बहुमोल पुस्तके आपल्या ग्रंथालयासाठी आजच मागवा**

- **मूळ गीतेचा शोध** ५.००
  सकाळ ग्रंथ पुरस्कार मंडळाने रु. १००० पुरस्कार दिलेला
  श्रीमद्‌भगवद गीतेवरील एक अमोल विचारप्रवर्तक ग्रंथ.
- **शिक्षण, शील व संस्कार** ६.००
  शिक्षक, पालक, विद्यार्थी यांना उपयुक्त ग्रंथ
  गुरु-शिष्यांचे ४० वर्षांचे अनुभव.
- **सदाचार चिंतनी** (तिसरी आवृत्ती) २.००
  विद्यार्थ्यांना व नागरिकांना सुविचार रूपाने
  मार्गदर्शन करणारे पुस्तक
- **गीतेतील मुख्य विचार** १.५०
  रोजच्या रोज वाचण्याकरिता प्रमुख ५२ विचारांचा संग्रह.
- **बालगडचा किल्ला व इतर कथा** ०.७०
  लहान मुलांसाठी मनोरंजक व उपदेशपर गोष्टी

**अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २.**

**दादर बुक डेपो, दादर, मुंबई २८**

मामी, केशवची बायको सारी मंडळी माझी वाट पाहत होती. मी पाटावर बसल्यावर मामींनी चहा आणून ठेवला. अनू भिंतीला टेकून उभी होती. मामी म्हणाल्या

" तू आता मोठा कंत्राटदार झाला आहेस म्हणे. "

" तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने झालो आहे खरा. पण आई असती तर फार बरं झालं असतं. "

भाऊमामांनी एक मोठा सुस्कारा सोडला आणि ते म्हणाले,

" श्रीहरी ! आमचं सारं चुकलं. ताईवर आम्ही रागावलो. "

माझ्या आईला ते ' ताई ' म्हणत असत. तिच्यावर त्यांचं फार प्रेम होतं पण त्यांनी तिचा हट्ट ऐकला नाही. आणि अनुराधाचं लग्न आपल्या मनाप्रमाणे व कुणाचीही पर्वा न करता एका श्रीमंत उडाणटप्पू माणसाशी लावून दिलं. अनुराधा वर्षभरात परत आली ती कायमची ! तिच्या नवऱ्यानं सारी इस्टेट व्यसनापायी उधळून लावली व तो परागंदा झाला. अनुराधेच्या आयुष्याचं आपण नुकसान केलं याचं शल्य भाऊमामांना टोचत होतं.

एकामागून एक साऱ्या गोष्टी कुणालाही न जुमानता भाऊमामांनी केल्या त्याची सारी शल्यं आता त्यांना उतारवयात त्रास देत होती. त्यांनी आपलं सारं आयुष्य रंगेलपणात आणि मस्तीत घालवलं होतं. अपार कष्ट केले. वडिलोपार्जित बाग त्यांनी नावलौकिकाला आणली. भरपूर पैसा मिळवला आणि घालवला—

भाऊमामांची पत्नी पार्वतीमामी दिसायला फार सुरेख होत्या. मामा मोठ्यांदा हाक मारायचे,

" अहो ऐकलं का ? " — की त्या दारात कापत येऊन उभ्या राहायच्या एकापाठोपाठ एक त्यांची बाळंतपणं झाली. मूल व्हायचं आणि वर्षभरात जायचं मोठा मुलगा बापू तो अगदी भाऊमामांची प्रतिकृती होता. बागेत काम करायला लागला की वाघासारखा कामं करायचा. साऱ्या सोनगावात बापू सर्वांचा लाडका. सर्वांना उपयोगी पडणारा. नाटकात काम करायचा. तो माझ्या बरोबरीचा, त्याला अचानक टॉयफाईड झाला आणि तो तडकाफडकी गेला. त्याच्या खालची अनुराधा. नंतर केशव—केशव लहानपणापासून अशक्त, आजारी आणि एका पायानं अधू होता

दीपावली शुभेच्छा

आमचे आश्रयदाते आणि हितचिंतक यांस ही दीपावली आणि नूतन वर्ष सुखाचे आणि भरभराटीचे जावो.

जोशी – दामले मंगल कार्यालय

पुणे २

केशवच्या पाठीवर एकापाठोपाठ एक मामींची बाळंतपणं झाली. मुशीत घातलेल्या घोटीव आणि रेखीव लक्ष्मीसारख्या मामी दिसायच्या. मामांच्या अतिरेकी स्वभावामुळे त्या अगदी गोगलगाईसारख्या गरीब झाल्या होत्या. केशवनंतर मामींची सात-आठ बाळंतपणं झाली. मुलं व्हायची. जायची. मामी खचल्या, त्यांना बाळंतरोग झाला आणि शेवटच्या बाळंतपणात त्या इहलोक सोडून गेल्या. भाऊमामांची लक्ष्मी-त्यांच्या संसाराची शोभा—निघून गेली. त्यांचा संसार उजाड झाला. तरीसुद्धा ते खचले नाहीत, त्यांचा पीळ कमी झाला नाही. मामी गेल्या तेव्हा भाऊमामा अनुराधेला आणि केशवला जवळ घेऊन ढसढसा रडले. मी त्या वेळी सोनगावला होतो. भाऊमामा त्या वेळी म्हणाले होते,

" अहो, तुम्ही आम्हांला सोडून गेलात. आम्ही तुम्हांला काही सुख दिलं नाही. जातानासुद्धा तुम्ही आम्हांला सांगून गेला नाहीत. शेवटपर्यंत घाबरलात. श्रीहरी श्रीहरी—"

चहा पिऊन झाला तेव्हा अनुराधेला मामा म्हणाले,

" अग, त्याला आणखी चहा दे ना. तो शहरातला आणि आता बडा कॉंट्रॅक्टर आहे. "

खांद्यावरच्या पंचानं भाऊमामा मिशांना लागलेलं दूध पुसत होते. मी त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलं. चेहऱ्यावरचा करारीपणा कमी झाला नव्हता. आयुष्याशी, आपल्या मतांशी आणि वृत्तीशी प्रामाणिक राहून त्यांनी आलेल्या परिस्थितीशी गेंड्यासारखी टक्कर दिली होती.

मी मामांना म्हटलं,

" मामा, मी इथं कामाकरिता आलो होतो."

" काय काम काढलंस ? कामं नेहमीच चालतात तुमची. आता काम वगैरे काही नाही. आता स्वस्थ चित्तानं राहा—"

" तसं नव्हे मामा. इथं सोनगावला.आईच्या नावानं एक देऊळ बांधायचा विचार आहे माझा. "

आमच्याकडे सर्व प्रकारचे
लेडीज कपडे
वेळेवर शिवून मिळतील
स्टिचवेल टेलर्स
१/२ कर्वे रोड, पुणे ४.

" श्रीहरी–श्रीहरी–आमच्या ताईच्या नावानं ? तिचं हे माहेर, आमच्यामुळे तिला हे पारखं झालं. आम्ही तिच्याशी भांडलो. "

" ते जाऊ दे मामा. तुम्हांला काय वाटतं ? "

" श्रीहरी–ठीक आहे. कुठे बांधणार ? "

" ते अजून ठरवलं नाही. कुठे बांधावं ? "

मी अनुराधेकडे बघितलं. ती म्हणाली,

" नागनाथाच्या देवळाच्या पलीकडे फर्लांगावर एक जागा फार छान आहे. "

" तिथं पलीकडे फडक्यांचा वाडा आहे. त्याच्यासमोर मोकळी जागा आहे. मोठा पार आहे. ताई तिकडे नेहमी फिरायला जायची. तिची ती आवडती जागा. तू असं केशव आणि अनूला घेऊन संध्याकाळी तिकडे जा. जागा पाहून घे. मग बघू– " मामा म्हणाले.

" मामा, तुम्ही पण चला ना. "

" अरे, आलो असतो. आज बरीच कामं उरकायची आहेत. गडी कामाला येतील. बागेत काम खूप आहे–श्रीहरी. "

असं म्हणत भाऊमामा उठले आणि म्हणाले,

" अरे गेना, शहाळी पाड आणि अनू, ऐकलं का, आज काहीतरी गोडधोड करा. आज हा बऱ्याच वर्षांनी आला आहे. "

मी पाट उचलून ठेवला आणि बाहेर माजघरात आलो व झोपाळ्यावर येऊन बसलो. केशव पण माझ्याजवळ येऊन बसला. मी त्याला एकेक विचारू लागलो, " काय रे, हल्ली शेतात काय लावलंय ? गोठ्यात म्हशी किती आहेत ? नदीत रहाट कधी बसवला ? गेनाची बायको कुठे दिसत नाही ? नारळीची झाडं किती आहेत ? बागेत आणखी काय काय लावलंय ? "

इथं आल्यानंतर मला बऱ्याच गोष्टी समजल्या होत्या. गेनाची बायको पळून गेली होती. भाताच्या कणग्यांत मागच्या वर्षी चोर लपला होता. भाऊमामांचा सोनं करण्याचा नाद अजून सुटला नव्हता. मागच्या वर्षी एक बुवा येऊन बरेच दिवस राहिले होते. त्यांच्याकरिता मामांनी खूप पैसा खर्च केला. त्यांनी बऱ्याच ठिकाणी खड्डे खणले. किमया केली. पण सारं फुकट. सर्वांनाच त्रास झाला होता. केशवचा अधू पाय अजून औषधोपचार करूनही बरा होत नव्हता. अनुराधा बाहेर आली. तिला मी विचारलं,

" तुला आठवतं, आपण लपंडाव खेळायचो. तेव्हा तू एकदा भाताच्या कणग्यात लपली होतीस. मी तुला शोध शोध शोधलं. "

" तू ओरडून विचारलंस अनु तू कुठे आहेस, मी हरलो. मग मी भाताच्या कणग्यातून बाहेर आले. "

अनूला सारं काही आठवत होतं. बालपणाच्या माझ्या सहवासातल्या साऱ्या

स्मृती ताज्या होत्या. एकदा आम्ही सारीजण माडीवर पत्ते खेळत बसलो होतो. मी, केशव, बापू, अनू आणि अनुच्या मैत्रिणी. खाली मोठ्या माणसांची जेवणं चालली होती. मला चावटपणा करायची लहर आली. मी दिव्यावर फुंकर मारली. सारीकडे गुडुप काळोख झाला. अनू मोठमोठ्यांदा घाबरून ओरडू लागली. खाली जेवायला बसलेले भाऊमामा आमचा आरडाओरडा ऐकून वर आले आणि आमची सर्वांचीच पाचावर धारण बसली. अनूने सांगितलं की मी दिवा मालवला आणि मग भाऊ-मामांनी मला टाटोळ्यानं फोडून काढलं.

भाऊमामांच्या हातचा तो रारोळ्याचा मला मिळालेला पहिला आणि शेवटचा प्रसाद.

संध्याकाळी मी, अनुराधा, केशव आणि त्याची बायको सर्वांनीच फिरायला जायचं ठरवलं. नागनाथाच्या पलीकडची ती जागा मला पाहायची होती. संध्याकाळी आम्ही लौकरच बाहेर पडलो. बोडक्या पुलावरून पाणी वाहत होतं. दुपारी जेवण आटोपून मी माडीवर आराम करीत असताना मला खिडकीतून हा बोडका पूल दिसत होता. मामांच्या घराच्या मागच्या बाजूला लागून बाग होती. ती ओलांडून उतार लागत होता व मग हा बोडका पूल. माझ्या लहानपणी हा कधीच नव्हता. इथं आल्यावर मला प्रथमच या बोडक्या पुलाचं दर्शन घडलं. नदीचं पात्र अरुंद आणि पावसाळ्या-तही त्या वेळी पाणी कमी असायचं. पण आता गेल्या बारा वर्षांत नदीचं पात्र मोठं झालं होतं आणि रुंदावलं होतं आणि त्या नंतर हा बोडका पूल आला होता. माजघराला लागून असलेली पडवी ओलांडून गेलं की बाग–पायउतार–आणि त्यानंतर मामांच्या घरासमोर हा बोडका पूल. का कुणास ठाऊक इथं आल्या-पासून हा बोडका पूल सारखा माझ्या मनाला शब्दासारखा टोचत होता.

बोडका पूल ओलांडून आम्ही सारेजण स्टँडवर आलो आणि केशवचा पाय दुखू लागला. त्याचं हे पायाचं दुखणं असंच चाललं होतं. वहिनींना त्याला हात धरून चालवावं लागलं. त्या म्हणाल्या, "आम्ही दोघं इथं स्टँडवर बसतो. तुम्ही नाग-नाथाच्या देवळात जाऊन जागा पाहून परत या."

केशवची ती अवस्था आणि वहिनींचा केविलवाणा चेहरा पाहून मला अतिशय वाईट वाटलं. भाऊमामांना एकुलता एक मुलगा पण तो असा. मला बापूची आठवण झाली. पिळदार, कणखर आणि चार गड्यांची रग असलेला भाऊमामांची प्रतिकृती बापू.

मी आणि अनू नागनाथाच्या देवळात शिरलो. काल इथं आल्यावर याच वास्तूचं मला प्रथम दर्शन झालं होतं. त्याच्या भिंती आता कोसळल्या होत्या. बाजूचा बुरूज ढासळला होता. मी अनुराधेला विचारलं,

"तुला आठवतं का, आपण लहानपणी या देवळाच्या आवारात खेळायचो".

"हो. आठवतं ना. या पारावर बसून तू आम्हांला गोष्टी सांगायचास त्या पण

आठवतात."

"काय सांगायचो मी गोष्टी ? मला तर आता काहीही आठवत नाही."

"तू सांगितलेली एक गोष्ट मला अजूनही आठवते."

"कसली ? "

"कुठल्या तरी मुलीची ती गोष्ट होती. सारं आयुष्य ती दुसऱ्याकरता जगली. तिच्या आईनं तिला सांगितलं होतं दुसऱ्याकरता जग. त्यातच सुख आहे."

"पुढे काय झालं त्या मुलीचं ? "

"काय होणार ? जे माझं झालं तेच बहुधा तिचं झालं असेल."

असं म्हणून अनुराधा हसली. मी पण हसलो आणि एकदम गंभीर झालो. विषयांतर करणं जरुरीचं होतं म्हणून मी म्हटलं,

"उद्या सकाळच्या बसनं जावं म्हणतो."

"का, एवढी घाई ? आला आहेस तो राहा ना थोडे दिवस."

"माझी सारी कामं खोळंबून राहिली असतील. एक फार मोठं कॉंट्रॅक्ट घेतलय् मी."

"मग इतक्या घाईनं आलास तरी कशाला ?"

"तुला माहीतच आहे. आईच्या नावानं देऊळ बांधायची इच्छा आहे. आणि..."

"आणि काय ?"

"तुला पण भेटायची इच्छा होती."

"मग एवढ्यात भेट संपली वाटतं ?"

मग बराच वेळ स्तब्धता. आम्ही नागनाथाचं दर्शन घेऊन बाहेर पडलो तेव्हा अनुराधा म्हणाली,

"अजून लग्न केलं नाहीस ते ?"

"माझ्यासारख्याला कोण मुलगी देणार? शिवाय अजून लग्नाचा विचार केलाच नाही."

"का ?"

"जिच्याशी मला लग्न करायचं होतं, तिचं लग्न झालं."

अनुराधा काहीच बोलली नाही. आम्ही दोघं चालत होतो. सारं निस्तब्ध होतं. फारसं न बोलता खूप बोलल्यासारखं वाटलं.

"तुझा पत्ता तरी काय आहे ?"

मी माझं व्हिजिटिंग कार्ड तिच्या हातांत दिलं आणि म्हटलं,

"कधी काही लागलं, माझी मदत लागली तर कळव."

अनू आणि मी चालू लागलो, तेव्हा दुतर्फा बाजार होता. त्या पलीकडे नागनाथाच्या देवळाच्या मागचं तळं डाव्या हाताला टाकून आम्ही बरेच पुढे आलो आणि भाऊमामांनी सांगितलेल्या जागेच्या बाजूनं जाऊ लागलो. ती जागा मला पसंत पडली तर मी आईच्या नावानं देऊळ बांधण्याचा विचार मनाशी पक्का केला होता.

रात्री आम्ही सारी एकदमच जेवायला बसलो. तेव्हा भाऊमामांनी विचारलं,

" पाहिलीस कारे जागा ?"

" पाहिली ना."

" कशी काय वाटली ?"

" फारच रम्य जागा आहे ती. "

" आवा फडकेची ती जागा आहे. मी त्याला विचारून तुला कळवतो. "

मी भाऊमामांना माझा उद्या सकाळी जाण्याचा विचार सांगितला. त्यांनी खूप आग्रह केला. पण मी माझ्या कामाचं स्वरूप त्यांना सांगितलं. कोणत्याही परिस्थितीत मला उद्या परत जायला हवं होतं. कारण उद्याचा सारा दिवस एस्. टी. च्या प्रवासात जाणार होता. परवापासून मी माझ्या उद्योगाला लागणार होतो. मी बऱ्याच दिवसांनंतर आल्यामुळे साऱ्यांनाच बरं वाटलं होतं. आनंद झाला होता. अनुराधा खाली मान घालून जेवत होती. भाऊमामांनी हुकूम सोडला,

" अनू, उद्या सकाळी याच्याबरोबर खाऊचा डबा द्या. गेनाला पण सांग की, थोडीशी शहाळी आणि बागेतला भाजीपाला याच्याबरोबर द्या. याची आई जाताना पोतंभर माहेरची भेट घेऊन जायची. "


दिवाळी शुभेच्छा

* * *

धी विनेट प्रेस

१०, नार्दुल्ला टँक रोड,
ऑफ भवानीशंकर रोड,
दादर, मुंबई २८.

फोन : ४५४०३८.

भाऊमामांच्या डोळ्यांच्या कडा पाणवल्या होत्या. त्यांच्या मिशा पाहिल्या की भीतीच वाटायची. चेहऱ्यावरचा करारीपणा कायम होता. एका विलक्षण जिद्दीनं त्यांनी आपल्या मतांना चिकटून राहून आयुष्याशी टक्कर दिली होती. त्यामुळे अनेक माणसं त्यांत भरडून निघाली होती. पण आता ते थकले होते. सुंभ जळला होता पण त्याचा पीळ कायम होता.

जेवण झाल्यावर मी पत्ते खेळण्याची कल्पना काढली. अनूनं त्याला साथ दिली. मी, केशव, वहिनी, अनू पत्ते खेळावयास बसलो. अनूचा चेहरा मी न्याहाळत होतो. तिच्या चेहऱ्यावर तेज ओसंडत होतं. ती माझ्याकडे अशा तऱ्हेने पाहत होती की, तिला काय सांगायचं आहे हेच मला समजेना. रात्री आम्ही बराच वेळ पत्ते खेळत होतो. उद्या पहाटे लौकर उठून मला एस्. टी. ची बस गाठायची होती. भाऊमामा बहुधा जागे असावेत. बरीच रात्र झाल्यावर ते माजघरात येऊन म्हणाले,

" अरे, पोरांनो झोपा आता–उद्या सकाळी ह्याला लवकर जायचंय–श्रीहरी. "

'श्रीहरी' या भाऊमामांच्या उद्गारात एक विलक्षण नैराश्य असावं असा मला भास झाला. आयुष्याच्या डावात सारेच फासे उलटे पडत गेले. मी माडीवर झोपायला गेलो. मला खिडकीतून तो बोडका पूल सारखा दिसत होता.

पहाटे मी लौकर उठलो. गेना मला उठवायला आला. भाऊमामांनी त्याला सांगून ठेवलं होतं. मी विहिरीवर गेलो तेव्हा स्वयंपाकगृहात अनुराधा काहीतरी करीत होती. ती बरीच लौकर उठली असावी. मी तोंड धुऊन स्वयंपाकघरात आलो. अनुराधेनं पाट मांडला. मला चहा दिला. मी सारखा तिच्याकडे पाहत होतो पण ती सारखी खाली मान घालून बसली होती. चहा झाल्यावर ती म्हणाली,

" आता लौकर परत ये. "

" येईन ना. "

" मी वाट पाहते. "

ती मान वर करील म्हणून मी सारखी वाट पाहत होतो. पण एकदाही तिनं वर मान करून पाहिलं नाही. तिनं फडक्यात बांधलेला खाऊचा डबा माझ्या हातांत ठेवला आणि म्हटलं,

" मी खास तुझ्यासाठी ओल्या नारळाच्या वड्या केल्या. तूच खा मात्र. नाहीतर कुणाला देशील. "

" तू एवढ्या आपुलकीनं केलंस ते मी दुसऱ्याला कसं देईन ?"

मी तो डबा हातात घेतला तेव्हा ती म्हणाली,

" या डब्याच्या खाली एक पत्र ठेवलंय, ते पण सावकाशीनं वाच. "

असं म्हणून ती झटकन निघून गेली. मी देवघरात जाऊन देवाला नमस्कार केला. भाऊमामांना, मामींना नमस्कार केला.

मामी म्हणाल्या, " आता लौकर या. "

मामा म्हणाले, " शतायुषी भव. श्रीहरी. "

गेनानं माझं सामान बांधून ठेवलं होतं, त्यात एका पिशवीची आणखी भर पडली होती. मी सर्वांचा निरोप घेऊन निघालो. अनुराधेकडे पाहिलं. तिची माझी दृष्टादृष्ट झाली. गेना डोक्यावर सामान घेऊन खाली उतरला आणि त्याच्या पाठोपाठ मी पायऱ्या उतरत असताना भाऊमामा म्हणाले, " सावकाश या–पत्र टाका. श्रीहरी. " मी बाग ओलांडून पायउताराला लागलो तेव्हा माझ्या डोक्यात भाऊमामांचे ' श्रीहरी ' हे शब्द घुमू लागले. आम्ही दोघं त्या बोडक्या पुलापाशी आलो आणि मी मागे वळून पाहिलं. भाऊमामांचं कौलारू घर मोठ्या जिद्दीनं आणि नेटानं उभं होतं. त्याकडे पाहून माझ्या डोक्यात एक विचार आला की, ह्या बोडक्या पुलाची छाया भाऊमामांच्या घरावर पडली आहे. कारण त्यांच्या घरातल्या साऱ्याच माणसांच्या आयुष्याची अवस्था ह्या बोडक्या पुलासारखी झाली आहे, अशी माझी खात्री झाली होती.

भाऊमामांची बायको ऐन संसारातून निघून गेली होती. सावित्रीमामींना अकाली वैधव्य आलं होतं. अनुराधा परत आली होती. केशवचा पाय अधू होता. बापू ऐन जवानीत निघून गेला होता. आणि हा गेना. याची तरणीताठी बायको पळून गेली होती.


मी गेनाचा हात धरून पुलावरून पलीकडे येत असताना माझ्या डोक्यात विचार आला की, आईसाठी देऊळ बांधायच्या ऐवजी इथं एक चांगला पूल बांधायलाच पैसे पाठवावे आणि लिहावं की, हा बोडका पूल उडवून टाका.–

एस्. टी. च्या बसमध्ये गेनानं सामान ठेवलं. मी जागेवर येऊन बसलो आणि थोड्याच वेळात बस सुटली.

नागनाथाच्या देवळाचा बुरूज, त्या पडक्या भिंती, देवळाचं आवार आणि तो बोडका पूल मागे पडला. आणि अचानक मला खाऊच्या डब्याची आणि त्याखाली ठेवलेल्या अनुराधेच्या पत्राची आठवण झाली.

माझ्या मनातल्या मनात सुरूंग लावून तो बोडका पूल मी उडवून टाकला आणि अनुराधेच्या पत्राचा मी विचार करू लागलो.


# निर्यातीच्या आघाडीवर-
# भारतीय बुध्दीवंतांची निर्यात-



वि. म. दांडेकर

संचालक
गोखले राज्यशास्त्र आणि
अर्थशास्त्र संस्था, पुणे

विकसनशील देशांतून विकसित देशांकडे—उदाहरणार्थ, आशिया व आफ्रिका खंडांतील देशांतून युरोप—अमेरिकेकडे, किंवा श्रीमंत देशांतून अधिक धनवान देशांकडे—उदाहरणार्थ, युरोपातून अमेरिकेकडे—शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, प्रशासक, संचालक व व्यवस्थापक इत्यादी बुद्धिजीवी मंडळींची जी रीघ आजकाल लागलेली आहे तिला 'बुद्धिवंतांची निर्यात' ( ब्रेन-ड्रेन ) अशी संज्ञा देण्यात आलेली आहे. अशा प्रकारे जी मंडळी परदेशांत जातात त्यांमध्ये समाज शास्त्रे, भौतिक शास्त्रे, स्थापत्यादी तंत्रविज्ञाने, वैद्यक इत्यादी शास्त्रांत उच्च शिक्षण घेतलेले लोक, तसेच सरकारी प्रशासनात व आर्थिक विकास कार्यक्रमात कामाचा अनुभव असलेले प्रशासक, कारखान्यांचे संचालक, व्यवस्थापक, इत्यादी लोकांचा अंतर्भाव होतो. ही मंडळी विकसित देशांमध्ये जाऊन मुख्यत: तेथील विश्वविद्यालयांत, उद्योगधंद्यांत, रुग्णालयांत आणि थोड्याफार प्रमाणात तेथील सरकारी नोकऱ्यांत प्रवेश मिळवितात. त्यांच्यापैकी काही लोक संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मार्फत किंवा



परस्पर आशियातील व आफ्रिकेतील इतर विकसनशील देशांतही जातात आणि तेथे मोठमोठ्या पगारांच्या बहुधा सरकारी नोकऱ्या मिळवितात. हे देशांतर कधी कायमचे तर कधी हंगामी, कधी अल्प मुदतीचे तर कधी दीर्घ मुदतीचे असते. परंतु जरी ते हंगामी स्वरूपाचे आणि अल्पमुदतीचे असले तरी ते काही मंडळींच्या बाबतीत इतके वारंवार होत असते की ही मंडळी आपल्या मातृभूमीत क्वचितच उपयुक्त कार्य करताना आढळतात.

बुद्धिवंतांच्या या निर्यातीबाबत ज्यांची उत्तरे मिळाली पाहिजेत असे अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत : ही बुद्धिवान मंडळी आपापले देश सोडून नोकऱ्यांसाठी इतर देशांत का जातात ? या देशांतराची कारणे कोणत्याही अर्थाने स्वाभाविक आहेत काय ? हे देशांतर अपरिहार्य आहे की ते थांबविता येणे शक्य आहे ? ते विकसनशील देशांना हानिकारक आहे काय ? ते थांबविण्याचा प्रयत्न केल्यास त्याचे दुष्परिणाम आज होणाऱ्या हानीपेक्षाही अधिक होतील काय ? हे प्रश्न गुंतागुंतीचे आहेत आणि त्यांचा विचार करताना भावना उद्दीप्त होण्याचा संभव आहे. म्हणून या प्रश्नांचा विचार शांतपणे आणि पूर्वग्रह बाजूस ठेवून करावयास हवा. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, ज्या देशांना या गोष्टीचे परिणाम भोगावे लागतात, त्यांची मुळीच फिकीर न करता या प्रश्नांची उत्तरे दिली जावीत.

या देशांतराचे पुष्कळसे पटणारे स्पष्टीकरण आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आर्थिक परिभाषेत देणे शक्य आहे. ज्या वस्तूला ज्या बाजारात जास्त किंमत मिळते त्या बाजारात ती वस्तू विक्रीसाठी जाते, याच साध्या सिद्धांताचे हे एक उदाहरण मानता येईल. या दृष्टिकोनातून या देशांतराकडे बघून त्याच्या बऱ्यावाईट परिणामांची

चिकित्सा होऊ शकेल. परंतु दुर्दैवाने पुस्तकी अर्थशास्त्रज्ञांव्यतिरिक्त इतर कोणासही हे स्पष्टीकरण मान्य होत नाही. विशेषतः, या प्रश्नातील संबंधित मंडळींना म्हणजे देशांतर करणाऱ्या बुद्धिवंतांना तर हे स्पष्टीकरण अपमानास्पद वाटते. त्यामुळे ही मंडळी बहुधा अर्थशास्त्र बाजूस ठेवून अन्य कारणमीमांसा पसंत करतात. अशा कारणमीमांसेचा एक नमुना असा आहे– "अलीकडे असा एक गैरसमज प्रचलित झालेला आहे की, जेथे पैसा मिळतो तेथे बुद्धिवंत जातात. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की जेथे बुद्धिवंत असतात तेथे बुद्धिवंत जातात. जेथे त्यांच्या कर्तृत्वाला आव्हान मिळते तेथे बुद्धिवंत जातात. जेथे त्यांच्या बौद्धिक व व्यावहारिक कर्तृत्वाची कदर होते तेथे बुद्धिवंत जातात." ('सायन्स' १४०, ३६९२, ऑक्टोबर १, १९६५, १) यासंबंधीच्या प्रचलित सर्व कारणमीमांसांत बहुधा ही सर्वांत संपूर्ण बौद्धिक मीमांसा असावी. इतरही काही कारणमीमांसा आहेत. त्यात राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक मुद्यावर विशेष भर दिलेला असतो. त्यातून या प्रश्नाच्या चर्चेत आवेश, अहंकार व पूर्वग्रह शिरतात. अर्थात केवळ या कारणान या कारणमीमांसा आपण त्याज्य मानणे योग्य होणार नाही. कारण आवेश, अहंकार, पूर्वग्रह इत्यादी गोष्टी मूळ परिस्थितीतच विद्यमान आहेत.

बुद्धिवंतांच्या निर्यातीचे परिणाम ज्यांना भोगावे लागत आहेत अशा इतर देशांप्रमाणेच भारतातही या विषयावर साधक-बाधक चर्चा सुरू झालेली आहे. दिल्लीच्या 'सेमिनार' मासिकाच्या एप्रिल १९६७ च्या अंकात 'आपल्या बुद्धिवंतांची निर्यात' या विषयावरच एक परिसंवादात्मक लेखमाला प्रसिद्ध झालेली आहे. या परिसंवादात सिमल्याच्या 'इन्स्टिटयूट ऑफ अॅडव्हान्सस्ड स्टडीज' या संस्थेचे एक ज्येष्ठ प्राध्यापक श्री. पुण्यश्लोक राय, दिल्लीच्या 'इंडियन स्कूल ऑफ इंटरनॅशनल स्टडीज'चे श्री. महेंद्र कपूर, श्री. ए. डी. मोदी हे एक उद्योगपती व सामाजिक-आर्थिक प्रश्नांचे अभ्यासक, श्री. जगदीश भगवती हे अर्थशास्त्रज्ञ


*With Best Compliments From*

SURANG KALAMANDIR

*Interior Decorators and Theatre Service*

*278, Jivan Udyog, 2nd Floor, D. N. Road, Fort, Bombay 1*

*Call at 262384*

व अमेरिकेतील एक अतिथि-प्राध्यापक, श्री. सुरेंद्र सूरी हे समाजशास्त्रज्ञ व अमेरिकेतील अतिथि-प्राध्यापक आणि श्री. शैलेन घोष हे वृत्तपत्रकार व संशोधक यांनी भाग घेतलेला आहे. अशा या प्रातिनिधिक आणि जाणत्या लेखकांमुळे भारतामध्ये या विषयाची जी चर्चा चालू आहे तिचे स्वरूप या परिसंवादावरून पुष्कळच स्पष्ट होते. म्हणून प्रारंभी या परिसंवादात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांचा परामर्श घेणे युक्त होईल.

श्री. सुरेंद्र सूरी यांनी आपली स्वतःचीच हकीकत सांगितली आहे. ती एक सर्वांच्या परिचयाची कहाणी आहे, आणि तिच्यात या प्रश्नाच्या महत्त्वाच्या अनेक अंगांचा अंतर्भाव झालेला आहे. म्हणून त्यांची ही हकीकत मी सारांशाने सांगतो. तरी पण त्यांच्या कथनातील आवेश कायम ठेवण्यासाठी त्यांची हकीकत शक्यतो त्यांच्याच शब्दांत सांगण्याचा मी प्रयत्न करतो.

परदेशांत दहा वर्षे वास्तव्य केल्यानंतर सुरेंद्र सूरींनी आपल्या मायदेशाला परत येण्याचे ठरविले. आपण काय निर्णय घेत आहोत याची त्यांना चांगली कल्पना होती. ते म्हणतात : " मला (भारतात) पगार खूपच कमी मिळेल याची मला कल्पना होती. मला हेही माहीत होते, की तेथील कामाची जागा व साधने ही कमी प्रतीची असतील, ग्रंथालयात पुरेशी पुस्तके असणार नाहीत, 'जर्मनीचा सामाजिक इतिहास' यांसारख्या माझ्या खास संशोधन-विषयासंबंधी मला ज्यांच्याशी विचार-विनिमय करिता येईल अशी फारच थोडी माणसे तेथे उपलब्ध असतील. इतरही अनेक अडचणींना व कष्टांना मला तोंड द्यावे लागेल, अशी खूणगाठ मी मनाशी बाळगलेली होती. या साऱ्या शंका-कुशंका मनात असूनही मातृभूमीच्या बौद्धिक, सामाजिक व राजकीय विकासाला यथाशक्ती हातभार लावावा या निश्चयाने मी मायदेशी परतलो. आणि तरीही दुर्दैवाने मी भारतात आल्यापासून केवळ तीन वर्षांच्या आतच मला पुनश्च बाहेर जावे लागले."


" खो-गो " खोकल्यावर ताबडतोब गुण देणाऱ्या गोळ्या अल्पमोली, बहुगुणी

२५ गोळ्यांस फक्त २५ पैसे.

अहिल्या आयुर्वेदिक औषधालय


गोरेगाव, मुंबई-६३.

व्यापाऱ्यांनी सवलतीच्या दरांसाठी व आकर्षक बोर्डससाठी लिहावे.

हे का घडले ? सूरींचा खास संशोधनाचा विषय ' जर्मनीचा सामाजिक इतिहास ' हा होता. त्यात ते पारंगत होते. त्यामुळे स्वाभाविकच भारतातील सामाजिक जीवन व परिस्थिती यांची त्यांना नीटशी माहिती नव्हती. ते म्हणतात, " मी भारतात परत आल्यानंतर भारतीय समाजरचनेसंबंधीच्या मला पूर्वी माहीत नसलेल्या अनेक गोष्टी–विशेषत:, येथील वर्गरचना आणि कौटुंबिक लागेबांधे या गोष्टी माझ्या प्रथमच लक्षात आल्या. मला असे आढळून आले की, भारतात यशस्वी व्हावयाचे असेल तर निदान प्रारंभीच्या काळात तरी ज्या वर्गरचनेकडे व वर्गघटकांकडे मी फारसे लक्ष दिलेले नव्हते ते फार महत्त्वाचे ठरतात. परंतु मला परत जावे लागण्याचे मुख्य कारण दुसरेच आहे. भारतामध्ये वडीलधारेपणाची परंपरा अजून चालू आहे व आजही ती खूप प्रबळ आहे. वरिष्ठ पदांवर असणाऱ्या व्यक्ती आपल्या योग्यतेचा व कर्तृत्वाचा विचार न करता आपल्या हाताखालच्या लोकांकडून आपल्याला वाङमयीन नजराणा मिळावा अशी अपेक्षा बाळगतात. हाताखालच्या लोकांनी लेख लिहावेत आणि ते वरिष्ठांच्या नावावर प्रसिद्ध करावेत, अथवा कनिष्ठांनी लिहिलेल्या पुस्तकांना वरिष्ठांनी प्रस्तावना लिहावी, असे या नजराण्यांचे स्वरूप असते.

" भारतात आल्यानंतर थोड्याच दिवसांत दिल्लीतील एका लहानशा माहिती केंद्रात संशोधन–संचालक म्हणून मी काम करू लागलो. भारतीय राजकारण, शिक्षण व समाजरचना यांविषयी मी संशोधनास सुरुवात केली. हाती घेतलेला पहिलाच विषय राजकीय होता. ' केरळमधील साम्यवादी पक्षाची राजवट ' हा तो विषय. लौकरच मला एक हितचिंतक भेटले. ते म्हणाले, ' तुम्ही कोणाची बाजू घेणार ? नेहरूंची, साम्यवादी पक्षाची की अमेरिकनांची ?' या प्रश्नाचे मला हसू आले. मी म्हणालो, ' मला कोणाचीच बाजू घ्यावयाची नाही. सत्यसंशोधन आणि सत्यकथन एवढेच माझे काम आहे. ' माझ्या सत्यनिष्ठेचा विजय होईल, असा मला भरवंसा होता.

" पण तसे घडले नाही. मी स्वत:च स्वेच्छेने तो विषय सोडून दिला आणि तो एका सहकाऱ्याकडे सोपवून मी दुसरा विषय हाती घेतला. तो म्हणजे ' विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील बेशिस्तीचा प्रश्न '. परंतु या बाबतीतही मी चाकोरी सोडून फारसे बाहेर जाऊ नये अशासाठी माझ्यावर सदिच्छापूर्वक, आंजारून–गोंजारून, नाजुकपणे दडपण येतच राहिले....माझ्या संस्थेच्या प्रमुख सूत्रधारांपैकी एकजण एके दिवशी माझ्याकडे आले आणि वडीलधारेपणाने त्यांनी मला एक मौलिक उपदेश केला. ते म्हणाले, ' श्री. सूरी, तुमचे विचार काहीही असोत, त्यांच्याशी आम्हांला काही कर्तव्य नाही. परंतु कृपा करून तुम्ही जे बोलाल किंवा लिहाल त्याबाबत तारतम्य ठेवा. ' त्यांच्या या उपदेशांबद्दल मी त्यांचे आभार मानले, परंतु तो स्वीकारणे हे अर्थातच मला शक्य नव्हते.



**वरिष्ठ अधिकाऱ्यांना नजराणा**

" या साऱ्याचा आणि विशेषत: मी वरिष्ठांशी लांगूलचालन न करण्याचा परिणाम असा झाला की, माझ्या नोकरीची दोन वर्षांची हंगामी मुदत संपताच मला नोकरीवरून काढून टाकण्यात आले. त्यानंतर त्याच संस्थेत भल्या मोठ्या पगारावर चिटणिसाची जागा कदाचित् मला मिळाली असती. परंतु माझ्या हे लगेच लक्षात आले की त्या जागेवर केवळ एक गौरवान्वित कारकून किंवा संस्थेवर चढवलेला साज म्हणूनच मला राहता येईल; खरेखुरे संशोधन करण्याची संधी मला मिळणार नाही किंवा मला माझी मते मोकळेपणाने व उघडपणे व्यक्त करता येणार नाहीत. यामुळे पुनश्च परदेशाखेरीज आपल्याला गती नाही याबद्दल माझी खात्री झाली."

अशा प्रकारे श्री. सुरेंद्र सूरी यांना भारतात परतल्यापासून तीन वर्षांच्या आतच पुन: भारत सोडावा लागला. गेली पाच वर्षे ते प्रारंभी जर्मनीत आणि आता अमेरिकेत प्राध्यापक म्हणून काम करीत आहेत. ते म्हणतात, " भारतामध्ये माझ्या वरिष्ठ सहकाऱ्यांबाबत माझा जो भ्रमनिरास झाला त्यामुळेच मला बौद्धिक निर्वासित बनावे लागले आहे. जर्मन व अमेरिकन शिक्षण संस्थांविषयी माझ्या मनात जी निष्ठेची व आत्मीयतेची भावना निर्माण झाली आहे त्याचे कारण माझ्या येथील वरिष्ठ सहकाऱ्यांच्या न्यायनिष्ठेवर आणि प्रामाणिकपणावर माझा विश्वास आहे, हे होय. येथे मी स्वत:शी प्रामाणिक राहून काम करू शकतो. जरी

क्वचित् काही निर्णय माझ्या मनाविरुद्ध गेले, मला नोकरीवरून काढूनही टाकण्यात आले तरी हे निर्णय माझ्या गुणदोषांचे निःपक्षपाती मूल्यमापन करूनच घेण्यात येतील अशी माझी खात्री आहे. म्हणून ते निर्णय मला अनुकूल असोत की प्रतिकूल असोत, मी ते आदरपूर्वक धीरोदात्तपणे मान्य करीन.

" यापुढे जर्मनी, अमेरिका, कॅनडा, इंग्लंड या किंवा दुसऱ्या कोणत्याही पाश्चात्त्य देशांत अथवा ऑस्ट्रेलिया किंवा न्यूझीलंड येथेच राहून अध्यापनकार्य करावयाचे असा माझा निश्चय आहे. भारताला परत जाऊन तेथे शिक्षण क्षेत्रात संशोधन किंवा दुसरे काही कार्य करण्याकरता कायमची किंवा दीर्घकालीन नोकरी पत्करण्याचा माझा सध्या तरी विचार नाही ".

श्री. सुरेंद्र सूरी म्हणतात, " आज मी एक बुद्धी निर्यात केलेला माणूस आहे. " यातील अव्याप्तीचा दोष बहुधा त्यांच्या लक्षात आलेला नसावा !

श्री. सूरींच्या या हकीकतीतून स्पष्ट होणारे या विषयासंबंधीचे काही पैलू आता आपण पाहू. येथे हे लक्षात ठेवावे की बुद्धिवंतांच्या निर्यातीचे एक ठळक आणि प्रातिनिधिक उदाहरण म्हणूनच मी सूरींची हकीकत घेतली आहे. सूरींनी आपली जी हकीकत सांगितली आहे तिच्याव्यतिरिक्त मला त्यांच्याविषयी काहीही माहिती नाही. आणि त्यांच्या वैयक्तिक प्रकरणावर काही टीकाटिप्पणी करण्याचा अथवा व्यक्तिशः त्यांना काही सल्ला देण्याचा माझा हेतू नाही. म्हणून यापुढील विवेचनात सूरींचा उल्लेख केवळ या विषयातील एक प्रातिनिधिक व्यक्ती म्हणून मी करीत आहे.

सूरींच्या हकीकतीतून उपस्थित होणारा पहिला मुद्दा असा की, भारतामध्ये ज्ञानाच्या क्षेत्रातही वैचारिक स्वातंत्र्य नाही. हे सामान्यतः खरे आहे असे मला वाटत नाही. भारतामध्ये भरपूर मतस्वातंत्र्य आहे असे मी मानतो. किंबहुना हे स्वातंत्र्य वाजवीपेक्षा थोडे जास्तच असण्याचा संभव आहे. अर्थात् सरकारी किंवा


आमची वैशिष्ट्ये

**फॅशन आणि मॉडेल फोटोग्राफी**

याशिवाय आमच्या येथे व्यावसायिक व औद्योगिक फोटोग्राफीची कामे विशेष केली जातात.

**' अरुण राजदत्त '**

फोन. २६४२७५

२५, कारवार स्ट्रीट, मोंगल बिल्डिंग, जी. पी. ओ. नजीक, बॅलार्ड इस्टेट. मुंबई नं. १.

निमसरकारी संस्था आणि खासगी शैक्षणिक संस्था यांच्यांत या बाबतीत काही फरक असणे स्वाभाविक आहे. श्री. सूरी कोणत्या संस्थेत काम करीत होते याची मला नेमकी कल्पना नाही. परंतु त्यांच्या हकीकतीवरून ती निमसरकारी संस्था असावी असे वाटते. सरकारी व निमसरकारी संस्थांमध्ये स्वाभाविकपणेच मतस्वातंत्र्य काहीसे मर्यादित असते. संसदीय लोकशाहीमध्ये सरकार संसदेला जबाबदार असते, ही गोष्ट लक्षात घेतल्यास अशी मर्यादा अपरिहार्य ठरते. पाश्चात्य देशांमध्ये देखील सरकारी व बिनसरकारी संस्थांमध्ये असा फरक असावा.

श्री. सूरी यांनी भारतात येऊन एक वर्ष होण्याच्या आतच संशोधनासाठी जे दोन विषय निवडले तेही या संदर्भात विचारात घेण्यासारखे आहेत. यांपैकी एक विषय 'केरळमधील साम्यवादी पक्षाची राजवट' हा होता तर दुसरा 'विद्यार्थ्यांमधील बेशिस्तीचा प्रश्न' हा होता. हे दोन्ही प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे असून ते नीट समजण्यासाठी भारतातील सामाजिक व वर्गीय परिस्थितीचे सखोल व सहानुभूतिपूर्ण ज्ञान असण्याची आवश्यकता आहे. सूरी यांनी स्वतःच कबूल केल्याप्रमाणे त्यांचे याबाबत जवळ जवळ पूर्ण अज्ञानच होते. अशा परिस्थितींत त्यांच्या जागी, दुसरा एखादा समाज-शास्त्रज्ञ असता तर, मला वाटते, वैचारिक स्वातंत्र्याच्या मुद्यावर भांडण करण्यापूर्वी त्याने थोडे दमाने घेतले असते. सूरींशी माझी व्यक्तिशः ओळख नसल्यामुळे याबाबतीत माझ्याकडून त्यांच्यावर अन्याय होण्याची शक्यता आहे. तरीपण आपल्या हकीकतीत त्यांनी दुसऱ्या एका ठिकाणी स्वतःसंबंधी जे म्हटले आहे तेच खरे असावे असे मला वाटते. ते म्हणतात, "माझ्याबरोबर काम करणे सोपे नाही. माझे इतरांशी फारसे पटत नाही." परदेशची वारी करून येणाऱ्या अनेक लोकांच्या बाबतींत असेच घडते. का कोणास ठाऊक, ही परदेशची वारी अनेकांना अशीच बाधते !

*With*

*Best Compliments*

*From*

**CIEM TRADING Co. PVT. LTD.,**

MALAD, BOMBAY 64.

रूढ चाकोरी सोडून न जाण्यासंबंधीचे दडपण सर्वत्रच असते, आणि सर्वांनाच ते गृहीत धरून हळूहळू आपल्या नवीन चाकोऱ्या पाडाव्या लागतात. हे समाजशास्त्रज्ञांबाबतच घडते असे नाही, इतरांबाबतही असेच घडते. माझ्या माहितीचे एक तरुण स्थापत्यविशारद आहेत. त्यांनी जर्मनीतील एका नामवंत स्थापत्यविशारदांच्या बरोबर राहून नदीवरील पुलांच्या स्थापत्यरचनेविषयी अगदी नवीन तंत्र उपलब्ध करून घेतले. भारतात परत आल्यानंतर त्यांनी या विषयातील सल्लागार म्हणून व्यवसाय सुरू केला, आणि एका वर्षाच्या आत येथे आपला चांगला जम बसविला. ३–४ मोठमोठ्या पुलांच्याबाबत त्यांच्या स्थापत्यरचना खुल्या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट ठरून स्वीकारल्या गेल्या. शेवटी एका फार मोठ्या पुलाच्या बाबतीतही त्यांनी आपली स्थापत्यरचना पुढे मांडली. त्या पुलासाठी कित्येक लाख रुपये खर्च येणार होता. त्यांनी सुचविलेल्या रचनेप्रमाणे या खर्चात दहा टक्क्यांपेक्षा अधिक बचत होत होती. खुल्या स्पर्धेत त्यांची रचना सर्वोत्कृष्ट ठरली, परंतु ती स्वीकृत झाली नाही. सरकारच्या मुख्य स्थापत्यविशारदांना भेटून त्यांनी आपली स्थापत्यरचना त्यांना समजावून देण्याचा प्रयत्न केला. सरकारी स्थापत्यविशारदांना त्यांनी सुचविलेली रचना अमान्य होती असे नाही. परंतु ती ज्या नवीन स्थापत्य तत्त्वांवर आधारलेली होती ती तत्त्वे सरकारी स्थापत्यविशारदांच्या परिचयाची नसल्याने ही नवीन स्थापत्यरचना स्वीकारावयाचा धोका पत्करण्यास ते तयार नव्हते. साहजिकच या तरुण स्थापत्यविशारदांना या गोष्टीचा सात्त्विक संताप आला आणि त्या भरातच ते भारत सोडून निघून गेले. मला त्यांच्या भूमिकेबद्दल पूर्ण सहानुभूती आहे, परंतु त्यांनी हे लक्षात घ्यावयास हवे होते की, पाश्चात्त्य देशांतदेखील कालबाह्य ठरलेली तंत्रे व तंत्रज्ञाने आजही विद्यमान आहेत आणि अत्याधुनिक तंत्रांच्या व तंत्रज्ञानांच्या बरोबरीनेच त्यांचाही वापर केला जातो. जुन्या तंत्रांची व तंत्रज्ञानांची जागा घेण्यासाठी नव्या तंत्रांना व तंत्रज्ञानांना सर्वत्रच झगडा करावा लागतो. आता दुसरा एखादा तरुण स्थापत्यविशारद पुनश्च जर्मनीस जाऊन नदीवरील पुलांच्या नवीन स्थापत्य–तत्त्वांचा अभ्यास करून परत येईल आणि या देशामध्ये त्या आधुनिक तत्त्वांचा सरसकट स्वीकार व्हावा यासाठी आवश्यक तो झगडा करण्यास सिद्ध होईल तेव्हाच हे नवीन स्थापत्यज्ञान आम्हांस उपलब्ध होईल. भारताने तोपर्यंत वाट पाहणे अपरिहार्य आहे.

असो. आपण पुनश्च सूरींच्या हकीकतीकडे वळू. त्यांच्या हकीकतीतील या भागापासून जर काही बोध घ्यावयाचा असेल तर तो मला हा दिसतो; सूरींना संशोधन संस्थेचे संचालक म्हणून नेमल्यानंतर त्यांच्या ज्ञानक्षेत्रातील वैचारिक स्वातंत्र्यावर जर खरोखरीच मर्यादा घातल्या गेल्या असतील तर ती गोष्ट रास्त व न्याय्य झाली नाही, यात मुळीच शंका नाही. परंतु मला असे वाटते की त्यांच्याबाबत झालेली चूक या पेक्षाही अधिक मूलगामी स्वरूपाची होती. सूरींना त्या संशोधन

संस्थेचे एकदम संचालक नेमण्यात आले हीच मुळात चूक झाली, असे मला वाटते. १९५८ साली भारतात परत येण्यापूर्वी दहा वर्षे सूरी परदेशांत होते. ते एक समाजशास्त्रज्ञ असले तरीही भारतीय समाजाची व संस्कृतीची त्यांना फारच थोडी माहिती होती. त्यांच्या संशोधनाचा खास विषय 'जर्मनीचा सामाजिक इतिहास' हा होता. ते सुरुवातीसच अशी शंका व्यक्त करतात की, "माझ्या माहितीप्रमाणे अलीकडील काळात भारतामध्ये जर्मनीच्या सामाजिक इतिहासाचा गाढा अभ्यास केलेला एकही विद्वान नसावा. त्यामुळे भारतात गेल्यानंतर आपण या विषयात अगदी एकाकी पडणार याची मला जाणीव होती. या विषयाचे संशोधन करण्यासाठी आवश्यक ते साहित्य आपणांला उपलब्ध होऊ शकणार नाही याचीही मला कल्पना होती." त्यांची ही शंका अर्थातच रास्त होती. परंतु त्याचबरोबर भारतात गेल्यानंतर काही महिन्यांच्या आतच भारतीय राजकारण, शिक्षणव्यवस्था आणि समाजरचना यांविषयी संशोधन करण्याची व त्या संशोधनाचे मार्गदर्शन करण्याची क्षमता आपल्यामध्ये आहे की नाही यासंबंधी त्यांच्या मनात थोडीशी शंका निर्माण व्हावयास हवी होती. परंतु याविषयी यत्किंचितही शंका त्यांच्या मनास शिवली नाही. परदेशांतून परत येणाऱ्या अनेक लोकांच्या बाबतींत ही वृत्ती प्रातिनिधिक आहे.

## अवास्तव प्रतिष्ठा

परदेशांतून शिक्षण घेऊन येणाऱ्या लोकांच्या बाबतीत माझ्याकडून अन्याय होऊ नये म्हणून या ठिकाणी मला हे सांगितले पाहिजे की याच्या अगदी उलट नमुन्याची माणसेही अनेकदा भेटतात. काही दिवसांपूर्वी एका भारतीय विद्यापीठातील कृषि-अर्थशास्त्र विभागाकरिता एका प्राध्यापकाच्या जागेसाठी मी काही उमेदवारांच्या मुलाखती घेत होतो. त्यांपैकी एक उमेदवार नुकताच एका स्कॉटिश विश्वविद्यालयातून पीएच. डी. ची पदवी घेऊन भारतात परत आलेला होता. त्याच्या तेथील अभ्यासाचा विषय 'स्कॉटलंडमधील शेतीच्या यांत्रिकीकरणाच्या समस्या' हा होता. मुलाखतीच्या वेळी प्रारंभिक प्रश्नोत्तरे झाल्यानंतर मी त्याला विचारले, "कृषिअर्थशास्त्र या विषयातील संशोधनासंबंधी तुमच्या काय कल्पना आहेत; तुम्ही व्यक्तिशः कोणत्या विषयावर संशोधन करू इच्छिता; किंवा आपल्या विभागात संशोधनासाठी कोणते विषय हाती घ्यावेत असे तुम्हांला वाटते ?" तो म्हणाला, "माझ्या विभागात इतर सहकारी कोण असतील आणि त्यांच्या आवडीचे कोणते विषय असतील याची मला कल्पना नाही. परंतु व्यक्तिशः माझ्यापुरते बोलावयाचे तर स्कॉटलंडमधील शेतीसंबंधीच अधिक संशोधन करण्याची माझी इच्छा आहे." अस्तु !

आपण पुनश्च सूरींच्या हकीकतीकडे वळू. मी वर म्हटल्याप्रमाणे भारतीय राजकारण, शिक्षण-व्यवस्था व समाजरचना यांविषयी संशोधन-कार्य हाती घेण्याच्या बाबतीतील स्वतःच्या क्षमतेविषयी सूरी यांच्या मनात मुळीच शंका नव्हती.

अर्थातच स्वतःच्या मर्यादा स्वतः ओळखणे हे अवघड आहे हे लक्षात घेऊन सूरींची भूमिका क्षम्य समजता येईल. परंतु या संदर्भात ज्या संस्थेने सूरींना आपल्या संशोधन विभागाचे संचालक नेमले तिच्या अधिकाऱ्यांची भूमिका ही मात्र जितकी सार्वत्रिक तितकीच अक्षम्य मानावयास हवी. सूरी हे वरील विषयांतील संशोधनास मार्गदर्शन करू शकतील याविषयी संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या मनात बहुधा मुळीच शंका नव्हती. परदेशांतील उच्च शिक्षणाला भारतात जे अवास्तव महत्त्व व प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे ती याच्या बुडाशी आहे. या प्रतिष्ठेचे समर्थन आज काहीही असो. परंतु हे लक्षात घ्यावयास हवे की परदेशी शिक्षणाला प्राप्त झालेले हे महत्त्व व ही प्रतिष्ठा ही नवीन नाहीत आणि भारतात व परदेशांत दिल्या जाणाऱ्या शिक्षणातील तफावतीबाबतच्या प्रामाणिक व बुद्धिनिष्ठ विचारावर ती आधारलेली नाहीत. परदेशी शिक्षणाची प्रतिष्ठा ऐतिहासिक आहे, आणि भारतातील ब्रिटिशांच्या दीडशे वर्षांच्या राजवटीचा तो परिणाम आहे. परदेशांत घेतलेले शिक्षण हे अधिक श्रेष्ठ दर्जाचे असते ही गोष्ट प्रत्यक्ष व दृश्य उदाहरणांनी भारतीय मनात अगदी खोलवर ठसलेली आहे.

ब्रिटिश अमदानीत क्वचित् अपवाद वगळल्यास राज्यकारभारातील व सैन्यातीलच नव्हे तर तांत्रिक व शैक्षणिक नोकऱ्यातीलही सर्व वरच्या जागांवर ब्रिटिशांची


*महिलांना शुभवार्ता*

तुम्ही तापत ठेवलेले दूध उतू जाणार नाही अगर करपणार नाही
एवढेच नव्हे तर दूध तापवल्यानंतर खुणेची शिट्टी वाजते
असे आधुनिक भांडे

**ममता** मिल्क कुकर १ लिटर, २ लिटर अगर ५ लिटर भांडे

*सोल एजन्सी–एम्. एस्. एजन्सी,*
६२३।६ ए. सदाशिव पेठ, पुणे २

**पुण्यातील विक्रेते** ★ व्हरायटी स्टोअर, लक्ष्मी रोड ★ दीपक नॉव्हेल्टीज, बाजीराव रोड ★ जनता स्टोअर, टिळक रोड ★ चेतना स्टोअर, तुळशीबाग ★ किरण स्टोअर, तुळशीबाग.

*नकली मालापासून सावध राहा*

मक्तेदारी असे. अर्थात् त्यांच्यापैकी अनेकजण आपापल्या क्षेत्रात कर्तबगार असत, परंतु हे सर्वच वेळा खरे नसे आणि तसे असण्याची गरजही नसे. अगदी अलीकडे १९४० सालीसुद्धा, वऱ्हाडातील एका सरकारी महाविद्यालयाचे प्राचार्य एक सेवा-निवृत्त ब्रिटिश लष्करी अधिकारी होते ! महाविद्यालयाच्या आवारात ते घोड्या-वरून फेरफटका मारीत आणि त्या वेळी विद्यार्थ्यांनी थांबून आपल्याला सलाम करावा अशी त्यांची अपेक्षा असे. अर्थात् हे गृहस्थ स्वभावाने दिलदार होते आणि त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल इतरांना विश्वास वाटे. असो. जेव्हा भारतीयांना ब्रिटि-शांच्या बरोबरीने उच्च अधिकारांच्या जागा देणे सुरू झाले तेव्हा त्यांनी काही काळ तरी इंग्लंडमध्ये राहून शिक्षण घेतलेले असले पाहिजे ही गोष्ट अनिवार्य ठरली. भारतातील सनदी नोकरीची (आय. सी. एस्.) प्रवेश-परीक्षा इंग्लंडमध्ये घेतली जाई आणि त्या परीक्षेत निवड झालेल्यांना काही काळपर्यंत इंग्लंडमध्ये राहून सनदी नोकरीस आवश्यक ते शिक्षण घ्यावे लागे. विश्वविद्यालयीन परीक्षां-मध्ये सर्वोच्च क्रमांकांनी उत्तीर्ण होणारी तरुण मुले या परीक्षेसाठी इंग्लंडला जात आणि तेथे निवड झाली म्हणजे काही काळ तेथे राहून तेथील शिक्षणाने जेवढे शक्य तेवढे साहेब बनून सनदी नोकर म्हणून भारतात परत येत. जे उमेदवार निवड-परीक्षेत अयशस्वी होत ते वृत्तीने अभ्यासू असले तर सामान्यतः ब्रिटिश


नवीन वर्ष सुखाचे जावो !

पुण्यांत याल तेव्हां—
उद्यान निवास



या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वंकष निवासामध्येंच कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर

टेलीफोन ५७७९१ माहिती मागवा उद्यान प्रासाद स्काऊट ग्राऊंड समोर, पुणे २

काही त्रुटिता भरून काढण्यासाठी
भारी व्याजाने ठेवी घेणे आहेत.

विश्वविद्यालयातील एखादी पदवी मिळवून परत येत. येथे आल्यानंतर त्यांना सरकारच्या शिक्षणखात्यात किंवा एखाद्या ब्रिटिश उद्योगसंस्थेत नोकरी मिळे. कमी बुद्धिवान मंडळी ब्रिटिश बारमध्ये पुरेसा वेळ घालवून 'बार ॲट लॉ' बनून परत येत. ते परदेशातून जाऊन आले आहेत, हेच त्यांचे वैशिष्ट्य असे. आजही 'विलायत–पलट' ही एक विशेष योग्यताच समजली जाते. कालांतराने सनदी नोकरीची प्रवेश-परीक्षा भारतात घेतली जाऊ लागली. तरी पण परीक्षेनंतर काही काळ इंग्लंडात प्रशिक्षण घेणे अनिवार्य असे. भारतीय वैद्यकीय व इतर तंत्रज्ञानात्मक नोकऱ्यांमध्येही प्रवेश मिळविण्यासाठी ब्रिटिश विद्यापीठाची पदवी अथवा सनद मौल्यवान् समजली जाई. अशा प्रकारे परदेशाला जाऊन आलेल्या मंडळींचा एक वर्ग निर्माण झाला होता. ब्रिटिश अमदानीत या वर्गातील लोकांना ब्रिटिशांच्या खालोखाल स्थान होते. देशातील इतर लोकांच्या मानाने या मंडळींचे पगार वा प्राप्ती फारच अधिक असे. साहजिकच त्या काळच्या समाजात हा वर्ग उच्चभ्रू ठरला, आणि मग या वर्गात सामील होण्यासाठी जमीनदार व श्रीमंत लोकांनासुद्धा इंग्लंड व युरोपची एखादी सफर करणे आणि आपल्या मुलांना शिक्षणासाठी तिकडे पाठविणे आवश्यक होऊ लागले. हा वर्ग भारतीय समाजापासून पूर्णपणे दुरावलेला किंवा पराङ्मुख झालेला असे, आणि जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा आपण भारतीय समाजापासून कसे वेगळे आहोत याचे प्रदर्शन करणे, यातच त्याला भूषण वाटे. हेच या वर्गाचे मुख्य वैशिष्ट्य होते.

ही परंपरा आजतागायत चालू आहे. अर्थात् आजचे तिचे स्वरूप पुष्कळ आधुनिक व सुसंस्कृत आहे. परंतु आजही परदेशी शिक्षणाला प्राप्त असलेली प्रतिष्ठा ही या परंपरेतूनच आलेली आहे. ही प्रतिष्ठा इतकी अवास्तव आहे की श्री. सूरी जरी केवळ व्हिएन्नाच्या रस्त्यांतून १० वर्षे नुसते भटकले असते तरी ते भारतात परत आल्यानंतर, माझी अशी खात्री आहे की, ज्या संस्थेचे संचालक म्हणून त्यांची नेमणूक झाली होती तिच्या संचालकपदी त्यांची नियुक्ती होण्यास मुळीच अडचण पडली नसती. अर्थात् सूरींनी परदेशातील १० वर्षे व्हिएन्नाच्या रस्त्यांतून भटकण्यात घालविली नव्हती. ते स्वतःच सांगतात त्याप्रमाणे परदेशांतील ही १० वर्षे त्यांनी 'अध्ययनात, अध्यापनात, संशोधनात, लेखनात, आपली विद्वत्ता वाढविण्यात आणि माणूस म्हणून स्वतःचा विकास करण्यात' घालविली होती. ते भारतास परतले त्या वेळी ते थोडाबहुत आंतरराष्ट्रीय नावलौकिक गाठी असलेले समाजशास्त्रज्ञ होते. 'जर्मनीचा सामाजिक इतिहास' या विषयात ते एक तज्ज्ञ होते. असे असूनही माझी अशी कल्पना आहे की ज्या अधिकाऱ्यांनी त्यांना संशोधन विभागाचे संचालक म्हणून नेमले त्यांनी ते १० वर्षे परदेशात काय करीत होते यासंबंधी थोडीही चौकशी केली नसावी. त्यांच्या दृष्टीने ते कुठेही का असेनात, भारतात १० वर्षे नव्हते एवढे पुरेसे होते. नेमणुकीपूर्वी एखाद्या निवड समितीने त्यांची

औपचारिक मुलाखत घेतली असलीच तर त्यांनी त्या समितीला आपल्या प्रकाशित संशोधनांची यादी दिली असेल. त्या यादीतील बहुतेक प्रकाशने जर्मन भाषेत असतील तर तेवढयानेच ती निवड समिती चीत झाली असेल. त्या यादीत काही इंग्रजी प्रकाशने असली तर समितीच्या एखाद्या सभासदाने कदाचित् एखादा दुसरा प्रश्न विचारण्याची खटपट केली असेल. श्री. सूरींना तो प्रश्न बहुधा फारच बालिशपणाचा वाटला असेल. कारण त्या निवड समितीवरील कोणत्याही सभासदाला जर्मनीच्या सामाजिक इतिहासासंबंधी नाही म्हटले तरी काय माहिती असणार ? तात्पर्य, मुलाखतीच्या शेवटी श्री. सूरी यांच्या मनातील स्वत:संबंधीची अहंभावना अधिकच दृढ बनली असेल. परंतु बहुधा साऱ्याच मंडळींनी एवढी तसदी घेतली असेल असे वाटत नाही. सूरींचा पोषाख व त्यांच्या बुटाची चमक पाहूनच बहुधा संस्थेच्या अधिकाऱ्यांनी त्यांची योग्यता ओळखली असेल आणि आपल्या संशोधन विभागाचे संचालकत्व त्यांच्या चरणी अर्पिले असेल.

या कल्पनाविलासात मजकडून त्या संस्थेच्या अधिकारी वर्गावर अन्याय होत असेल याची मला जाणीव आहे, कारण परदेश–निवासाला आजही या देशात अवास्तव प्रतिष्ठा असली तरी परदेशची वारी करून आलेल्या अनेक लोकांच्या बुद्धिमत्तेविषयी व कर्तृत्वाविषयी आता पुष्कळच अनुभव उपलब्ध आहे. त्यामुळे श्री. सूरी यांना संशोधन विभागाचे संचालक म्हणून नेमताना भारताच्या सामाजिक व राजकीय समस्यांच्या बाबतीतील संशोधनाचे संचालन करण्याच्या कामी श्री. सूरी यांच्या मर्यादा संस्थेच्या अधिकाऱ्यांनी जाणल्या नसतील असे नाही. या मर्यादा पूर्णपणे ओळखूनही त्यांनी श्री. सूरी यांची नेमणूक केली असल्याची शक्यता आहे. संशोधन–संचालक या नात्याने त्यांच्या नोकरीची मुदत संपल्यानंतर जेव्हा संस्थेच्या अधिकाऱ्यांनी त्यांना मोठ्या पगारावर संस्थेचे चिटणीस म्हणून नियुक्त करण्याची मनीषा व्यक्त केली त्या वेळी श्री. सूरी यांना असा संशय आला की ती जागा स्वीकारल्यास आपली अवस्था एखाद्या 'गौरवान्वित कारकुनासारखी किंवा संस्थेच्या साजासारखी' होईल. हा संशय अर्थातच रास्त होता, परंतु येथील परिस्थितीची श्री. सूरींना जरा अधिक कल्पना असती तर पहिल्यांदाच जेव्हा संस्थेचे संशोधन–संचालक म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली त्या वेळीही नेमकी हीच शंका त्यांच्या मनात डोकावून जाती. संस्थेच्या अधिकाऱ्यांनी जेव्हा त्यांना संशोधन संचालक म्हणून नेमण्याचे ठरविले त्या वेळीही संस्थेला एखाद्या गौरवान्वित कारकुनाचीच गरज होती, असे मला म्हणावयाचे नाही. परंतु संस्थेला एखाद्या साजाची आवश्यकता असण्याची मात्र खचित शक्यता आहे.

या प्रश्नाकडे त्या संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या दृष्टिकोनातून पाहिले तर याविषयी त्यांची बाजू कळण्यास मदत होईल. श्री. सूरी यांच्यासारखा परदेशांत १० वर्षे

वास्तव्य केलेला एक तरुण भारतात परत येतो. त्या संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या अल्पमतीप्रमाणे तो थोडाफार आंतरराष्ट्रीय लौकिक मिळविलेला समाजशास्त्रज्ञ आहे. भारतात परत येऊन 'येथे कायमचे राहण्याचा आणि मातृभूमीच्या बौद्धिक, सामाजिक व राजकीय उद्धाराला यथाशक्ती हातभार लावण्याचा' त्याचा निर्धार आहे. येथे आपल्याला फारच कमी पगार मिळेल. किंबहुना 'परदेशामध्ये आपल्या चिटणीसांना व मदतनीसांना जो पगार आपण देत होतो त्यापेक्षाही कमी पगार' आपल्याला घ्यावा लागेल. याची त्याला कल्पना आहे. अर्थातच असे असूनही त्याची किमान पगाराची अपेक्षाही पुष्कळच वर आहे. किंबहुना त्या संस्थेत दिल्या जाणाऱ्या कमाल पगारापेक्षाही ती जास्त आहे. परंतु या तरुणाने भारतात स्थायिक व्हावे आणि मातृभूमीच्या बौद्धिक, सामाजिक व राजकीय उद्धाराला हातभार लावावा अशी त्या संस्थेच्या अधिकाऱ्यांचीही उत्कट इच्छा आहे. अर्थातच त्यांच्या हे लक्षात येते की या देशामध्ये जेवढा पगार देणे शक्य आहे त्यापेक्षा या तरुणाच्या किमान गरजाच कितीतरी अधिक आहेत. परंतु त्याला इलाज नाही. जर्मनीच्या सामाजिक इतिहासातील तज्ज्ञ आणावयाचा म्हणजे एवढी किंमत दिलीच पाहिजे. आपण जास्तीत जास्त जेवढा पगार देऊ शकतो त्यापेक्षा त्याची मागणी फार अधिक नाही, यात ते समाधान मानतात आणि त्या तरुणाच्या स्वार्थत्यागाबद्दल


*आमच्या ठेवीदारांना दिवाळी व*
*नूतन वर्ष सुखाचे व समृद्धीचे जावो.*

**सरदेसाई आणि कंपनी**

*१४ मर्झबान रोड, मुंबई – १* (B. R.)

आमच्या नवीन धंद्याच्या विस्तारासाठी ठेवी घेणे आहेत.

**किमान रक्कम रुपये ५०० /–**

*मुदत वर्षे :* १, २, ३, ५

रु. ५००० पर्यंत व्याज द. सा. द. शे. ७, ८, ९, १०

रु. ५५०० पेक्षा अधिक व्याज ,, ,, ,, ,, ८, ९, १०, १२

*अधिक माहितीसाठी संपर्क साधा*

**मुंबई ऑफिस :** १४ मर्झबान रोड, मुंबई १ – फोन नं. २६११४१

**पुणे ऑफिस :** १०९३ सदाशिव पेठ, बाजीराव रोड, पुणे २ फोन नं. ५५६२९

" माणिक ज्योती " जंगली महाराज रोड, पुणे ४ – फोन नं. ५८३६२

'NANDADEEP'

त्यांना कौतुक वाटते. तात्पर्य, शक्य तेवढी ओढाताण करून आपल्या अधिकारातील जास्तीत जास्त पगार त्याला ते देऊ करतात. ओघानेच त्याला संस्थेचे संचालकत्वही दिले जाते. कारण सगळ्यांत जास्त पगाराची तेवढीच जागा असते. तसा विचार केला असता तर त्याला संचालक न करताही संचालकापेक्षा अधिक पगार देता आला असता. परंतु तसे करावयाचे तर उभयपक्षी थोडेफार मनाचे औदार्य असावयास हवे. ते सहसा आढळत नाही. म्हणून त्या संस्थेचा अधिकारीवर्ग या तरुणाला कमाल पगार व त्या निमित्ताने संचालकत्व देऊ करतात. संचालक म्हणून त्याच्या पात्रतेविषयी त्यांच्या मनात कसलाही भ्रम नसतो. परंतु आपल्या संस्थेच्या प्रतिष्ठेसाठी तिला शोभेलसा एखादा साज त्यांना हवाच असतो, आणि ज्या समाजात परदेश-गमनाला इतकी प्रतिष्ठा आहे तेथे अशा नेमणुकींचा उपयोगही होतो.

शिवाय, आजकाल अशा प्रकारच्या बहुतेक संस्थांमध्ये परदेशी मंडळींची सारखी ये–जा चालू असते व त्यांची मदतही या संस्थांना मिळत असते. ही परदेशी मंडळी साहजिकच भारतीय विद्यापीठांच्या पदव्यांपेक्षा परदेशी विद्यापीठांच्या पदव्यांना अधिक मान देतात. काही दिवसांपूर्वी अमेरिकेहून आलेल्या एका प्राध्यापकांनी आमच्या संस्थेला भेट दिली असता मला माझे शिक्षण कुठे झाले म्हणून विचारले, मी जेव्हा त्यांना माझे शिक्षण कलकत्ता विद्यापीठात झाल्याचे सांगितले तेव्हा


**इंडिया फर्टिलायझर इंडस्ट्रीज**

३३१, सॅम्युअल स्ट्रीट, मुंबई ३, फोन नं. ३२४४०१.

*अधिक धान्य पिकवा मोहिमेत अत्यंत यशस्वी ठरलेली आमची*

**" बैलगाडी "**

छाप मिश्रखतें वापरा !

*सर्व प्रकारची मिश्रखते सरकारमान्य किंमतीस आणि*

*ताबडतोब मिळण्याची व्यवस्था*

गावोगावी स्टॉकिस्ट अगर एजंटस् नेमणे आहेत

*चौकशी : पुणे ऑफिस*

१०९३ सदाशिव पेठ, बाजीराव रोड, पुणे २.

फोन : ५५६२९ । ५८१३२

' नंदादीप '

त्यांनी मला विचारले, "तुम्ही उच्च शिक्षणासाठी परदेशात गेला नव्हता काय ?" त्यांच्या या प्रश्नाने मी खराखुरा सुशिक्षित नसल्याचे माझ्या लक्षात आले. सारांश, संस्थेच्या संचालकाजवळ परदेशी पदवी असणे उपयुक्त असते, आणि जितका अधिक काळ तो परदेशांत राहिलेला असेल तितके संस्थेच्या दृष्टीने हिताचे ठरते. इतर काही नसले तरी अशा विलायत-पलट संचालकाला परदेशी पाहुण्यांना 'हाऊ डू यू डू' कसे म्हणावयाचे आणि ते जाताना त्यांना निरोप कसा द्यावयाचा याची चांगली माहिती असते. या बाबतीतील आवश्यक तो अनुभव मला नसल्याने या गोष्टी मला नीटशा जमत नाहीत याची मला जाणीव आहे. जेव्हा एखादा जग-प्रवासी आमच्या संस्थेला भेट देतो तेव्हा त्याचे छान चाललेले असलेच पाहिजे असे मी गृहीत धरून चालतो आणि त्यामुळे रीतसर 'हाऊ डू यू डू' असे म्हणून त्याचे स्वागत करण्यास मी विसरतो. त्याहीपेक्षा खेदाची गोष्ट म्हणजे, मला असे कळते की, मी परदेशी पाहुण्यांची फार लवकर बोळवण करतो. सारांश, परदेशांत थोडेफार शिक्षण घेतलेला संचालक संस्थेच्या दृष्टीने उपयुक्त ठरतो आणि एखादा तरुण भारताबाहेर १० वर्षे राहिलेला असेल तर तो संचालकपदाला फारच योग्य मानला जातो. आजकाल भारतामध्ये नवीन संस्था उभारावयाची व ती वाढवा-वयाची तर या गोष्टी अपरिहार्य ठरतात. परिणामतः, पुष्कळदा असे दिसून येते की परदेशामध्ये खास उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांना भारतात आल्यानंतर खूप मोठे पगार व मोठे हुद्दे देऊ केले जातात. परंतु त्यांच्याकडे सोपविण्यात येणाऱ्या कामाचा मात्र त्यांच्या प्राविण्यविषयाशी काहीही संबंध नसतो. काही वेळा त्यांच्या प्राविण्यविषयाचा त्या संस्थेला तसा प्रत्यक्ष काही उपयोगही होण्याचा संबंध नसतो. उदाहरणार्थ श्री. सूरी यांच्या जर्मनीच्या सामाजिक इतिहासातील ज्ञानाचा किंवा मी वर उल्लेखिलेल्या स्कॉटलंडच्या शेतीत स्वारस्य असणाऱ्या कृषिअर्थशास्त्रज्ञाच्या ज्ञानाचा आमच्या संस्थांना काय उपयोग ? नवीन संस्थेला किंवा विभागाला एक


*आमची दोन संग्राह्य प्रकाशने*

**★ संतांच्या आत्मकथा ★ संतांच्या चरित्रकथा**

संपादन : रा. चिं. ढेरे

बहिणाबाई, कचेश्वर व निरंजन रघुनाथ या संतांच्या आत्मकथा आणि महिपतींच्या ग्रंथातील संतांच्या चरित्रकथा यांची साक्षेपी संपादने. सोबत प्राचीन मराठीतील चरित्र–आत्मचरित्रांचे विस्तृत विवेचन.

*मूल्य प्रत्येकी पाच रुपये. दोन्ही पुस्तकांसाठी रजि. टपालखर्च रु. १–२५*

**पुष्पक प्रकाशन** ४१३ ब, शनिवार पेठ, पुणे २.

शोभेचा साज या व्यतिरिक्त या तज्ज्ञांचा काहीच उपयोग असत नाही.

यामुळे कोणा एका संस्थेने श्री. सूरी यांची ते परदेशातून परत येता येताच आपल्या संशोधन विभागाचे संचालक म्हणून नेमणूक केली याबद्दल मला नवल वाटत नाही. प्राय: कोणाचीच चूक नसताना त्यांना ती नोकरी सोडावी लागली हे दुर्दैव म्हटले पाहिजे. परंतु त्यानंतर लागलीच त्यांना भारताला रामराम ठोकण्याची गरज का भासावी? जेथे त्यांना त्यांच्या योग्यतेची अन्य नोकरी मिळू शकली असती अशा इतर अनेक संस्था व विश्वविद्यालये भारतात आहेत. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न करणे योग्य झाले असते. आमच्यापैकी अनेक लोकांच्या बाबतीत हे घडलेले आहे आणि जगभर बहुतेक सर्व तरुणांच्या बाबतीत असेच घडत असावे, अशी माझी कल्पना आहे. आम्ही एखादी नोकरी धरतो. ती आम्हांला सुखकारक वाटली नाही किंवा तिच्यापेक्षा अधिक चांगली दुसरी मिळत असली तर पहिली नोकरी सोडून आम्ही दुसरी नोकरी धरतो. अशा प्रकारे आपल्याला जास्तीत जास्त अनुकूल नोकरी मिळेपर्यंत आम्ही नोकऱ्या बदलत राहतो आणि शेवटी आपल्याला अनुकूल नोकरी मिळाली म्हणजे तेथे स्थायिक होतो. या दृष्टीने पाहिल्यास श्री. सूरी यांना काही वास्तविक अडचणी होत्या हे मान्य केले पाहिजे. ते म्हणतात, "परदेशांत दहा वर्षे काढल्यानंतर भारतातील शिक्षण संस्थांशी, माझ्या जुन्या प्राध्यापकांशी, जुन्या मित्रांशी असलेले माझे संबंध इतके क्षीण झालेले होते की एखादी नोकरी मिळविण्याच्या दृष्टीने त्यांचा फारसा उपयोग होणार नाही याची मला कल्पना होती." या अडचणींची जाणीव असूनही ज्याने भारतात स्थायिक होण्याचा निश्चय केलेला होता त्याने जरा धीराने घेतले असते, भारतातील आपले संबंध व स्थान जरा धोरणाने प्रस्थापित केले असते तर यथाकाल त्याला स्थायिक होण्यासाठी सोयीची व अनुकूल नोकरी मिळाली असती असे मला वाटते. परंतु ही ज्याच्या त्याच्या वैयक्तिक प्रकृतीची बाब आहे, आणि याबाबत


# आमची प्रकाशने

- **अल्ला हो अकबर** : *(कादंबरी)* लेखक : प्रा. ना. सी. फडके, मूल्य रु. ८/–
- **वळणावरचं वय** *(कादंबरी)* : लेखक : उद्धव ज. शेळके, मूल्य रु. ८/–
- **सावली** *(कादंबरी)* : लेखिका : सौ. निर्मला कुलकर्णी, मूल्य रु. ५/–
- **रामराज्याची स्फूर्तिकेंद्रे** : लेखक : रा. चिं. ढेरे, मूल्य रु. ३/–

**ललित वैभव प्रकाशन** ४१३ ब, शनिवार पेठ, पुणे २.

ज्याने त्याने आपले धोरण ठरवावयाचे असते. सूरी यांच्या अडचणी वास्तविक होत्या. भारतामध्ये त्यांचे संबंध फारच थोडे होते आणि या दृष्टीने पाहिल्यास दुर्दैवाने परदेशातील त्यांचे संबंध अधिक दृढ होते. त्यामुळे पहिल्याच निराशेच्या भरात भारताला पुनश्च परत न येण्याचा निश्चय करून ते परदेशी निघून गेले. ही घटना दुर्दैवी असली तरी तिची कारणमीमांसा समजण्यासारखी आहे. आपला देश व आपले लोक यांच्यापासून श्री. सूरी हे फार दूर राहिले आणि फार दीर्घ-काळपर्यंत त्यांनी त्यांच्याशी आपली फारकत होऊ दिली, हेच त्यांच्या अडचणीचे मूळ कारण आहे.

## केवढी ऐक्याची भावना !


तरीपण या निमिताने श्री. सूरी आपल्या कनिष्ठ सहकाऱ्यांविषयी जी तक्रार करतात ती मात्र मला न्याय्य वाटत नाही. ते म्हणतात, "ज्या वेळी वरील संस्थेमध्ये मी अडचणीत आलो आणि नंतर जेव्हा मला नोकरीवरून काढून टाकण्यात आल्यामुळे मी दाद मागू लागलो तेव्हा इतर अनेक कनिष्ठ सहकाऱ्यांशी माझा निकटचा संबंध आला. हे लोक तरुण होते, विद्वान् होते. त्यांच्यापैकी अनेकजण सत्यनिष्ठ, प्रेमळ, मित्रत्वाची जाण असणारे, प्रामाणिक व निष्कलंक मनाचे होते. माझ्यावर झालेल्या अन्यायाची त्यांना माहिती होती, आणि माझी नोकरी गेल्यानंतर त्यांच्यापैकी अनेकांनी मला लहानसहान कामे मिळवून देऊन पुष्कळ मदतही केली. त्यांची ही मदत मला न मिळती तर माझ्यावर उपास-मारीचाच प्रसंग ओढवला असता. परंतु इतके असूनही त्यांच्यामध्ये खरीखुरी ऐक्यभावना नव्हती. माझ्यावर अन्याय झालेला आहे हे त्यांना दिसत होते, परंतु ते सारे विस्कळीत होते. त्यांच्यांत ऐक्य नव्हते. आणि त्यांनी माझ्याकरिता कोण-तीही भरीव उपाययोजना केली नाही; किंबहुना मी तर असे म्हणेन की माझ्या कनिष्ठ सहकाऱ्यांनी एकजुटीने अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी कोणतेही परि-णामकारक पाऊल उचलले नाही, यामुळेच मी शेवटी नाउमेद झालो." मला वाटते, या ठिकाणी श्री सूरी आपल्या सहकाऱ्यांवर धडधडीत अन्याय करीत आहेत. आपण असे गृहीत धरू की श्री. सूरी यांच्यावर त्यांच्या वरिष्ठांकडून खरो-खरीच अन्याय झाला होता. मग प्रश्न असा उभा राहतो की अशा स्थितीत त्यांच्या कनिष्ठ सहकाऱ्यांनी नक्की काय करावयास हवे होते ? कोणती परिणामकारक उपाययोजना करावयास हवी होती ? त्यांनी संप करावा अशी सूरींची इच्छा होती, की रस्त्यांतून निषेधमोर्चा काढावा अशी त्यांची अपेक्षा होती ? जर्मन किंवा अमेरिकन शिक्षण संस्थांविषयी मला फारशी माहिती नाही, त्यामुळे तेथे एखाद्या कार्यकर्त्यावर कधीच अन्याय होत नाही की काय आणि जेव्हा असा अन्याय होतो तेव्हा त्याचे सहकारी काय करतात याची मला कल्पना नाही.

भारतात असलेल्या आपल्या सह-कार्‍यांना एक कळकळीचे आवाहन करून श्री. सूरी म्हणतात, " भारतातील शैक्षणिक जीवनात आवश्यक ती क्रांती घडून यावयाची असेल तर ती निष्ठावंत कनिष्ठ कार्यकर्त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण एकजुटीनेच होऊ शकेल. ज्यांनी आपले जीवन ज्ञानाचा व सत्याचा शोध घेण्या-साठी वाहिलेले आहे त्यांनी ढोंगी लोकांचे ंग चव्हाट्यावर आणले पाहिजे. स्वत:ची प्रतिष्ठा व सत्यनिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी प्रखर अशी आचारसंहिता अवलंबिली पाहिजे. त्यांच्या मानगुटी बसलेल्या जुनाट पुराण-पुरुषांना त्यांनी ओढून बाहेर काढले पाहिजे. " श्री. सूरी यांचे भारतातील कनिष्ठ सहकारी जेव्हा ही गोष्ट परि-णामकारकपणे घडवून आणतील तेव्हा ते त्यांना क्षमा करतील आणि कदाचित् मायभूमीच्या बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय उद्धाराकरिता ते भारतात परत येतील, अशी मी आशा करतो. तोपर्यंत ते आपल्या कनिष्ठ सह-कार्‍यांपासून तुटून दूरच राहतील; कारण ते म्हणतात त्याप्रमाणे, " प्रत्येक बुद्धिवंताने राष्ट्रवादी असलेच पाहिजे अशी माझी धारणा नाही. भारतीय बुद्धिवंतांना परदेशात नोकर्‍या मिळत असतील, तेथील परिस्थिती त्यांना अधिक अनुकूल असेल आणि तेथे त्यांच्या बुद्धिविकासाला योग्य वाव मिळत असेल तर परदेशी जाण्याबाबत त्यांच्यावर बंधन असण्याचे कारण/नाही. जगामध्ये बुद्धिवंतांच्याकरिता मुक्त आंतरराष्ट्रीय


सर्वांस

दीपावली शुभचिंतन

व्यक्तीच्या बचतीमधूनच
सामाजिक
व राष्ट्रीय उन्नती साधते.
यासाठी
दिवाळीच्या शुभमुहूर्तावर
याच बँकेत खाते
उघडून राष्ट्रविकासास
हातभार लावा



बँकिंगचे सर्व व्यवहार
केले जातात.

दि युनायटेड
वेस्टर्न बँक लि.

शेड्युल्ड बँक सातारा

स्थापना : १९३६



" मुंबईत ब्रिलक्रीमची साधी ट्यूबही मिळू नये ! "

क्षत्र उपलब्ध असलेच पाहिजे." केवढी ही एकजुटीची व ऐक्याची भावना !

श्री. सूरी यांच्या प्रकरणाची मी इतक्या विस्ताराने चर्चा करण्याचे कारण असे की अशा प्रकारच्या अनेक हकीकती आज सर्वांच्या परिचयाच्या झाल्या आहेत, आणि त्यांच्या मुळाशी असलेल्या प्रवृत्ती सर्वत्र आढळत आहेत. या दृष्टीने श्री. सूरी यांची हकीकत परिपूर्ण व प्रातिनिधिक असली तरी तिच्यात एका घरगुती बाबीची उणीव आहे असे वाटते. श्री. सूरी यांची पत्नी परदेशी नाही, किंवा असली तरी त्यांच्या हकीकतीत तिचे प्रत्यक्ष दर्शन घडलेले नाही. श्री. सूरी यांची पत्नी परदेशी असती तर त्यांची ही कहाणी अधिक परिपूर्ण झाली असती. किंबहुना मग दुसऱ्या कुठल्याही स्पष्टीकरणाची किंवा कारणमीमांसेची गरजच उरली नसती. कोणत्याही भारतीयाच्या दृष्टीने त्याला परदेशांत असताना ज्या सुखसोयींची व ऐषआरामांची सवय जडते आणि ज्या गोष्टी भारतात मिळविणे व चालू ठेवणे त्याला अवघड जाते त्यांपैकी परदेशी पत्नी ही एक महत्त्वाची बाब आहे. मी तर असे ऐकतो की परदेशांत सहज उपलब्ध असलेल्या लहानसहान सुखसोयींची एकदा सवय जडली की त्यांच्याशिवाय आयुष्य दु:सह होते. आणि मग परदेशी पत्नी नसली तरीही भारतातील जीवन असह्य बनते.

या दोन जगांमध्ये फार मोठे अंतर आहे. हे अंतर केवढे आहे यासंबंधी एकेकाळी माझी जी कल्पना होती त्यापेक्षाही ते फार अधिक आहे अशी आता माझी खात्री झालेली आहे. कांही वर्षांपूर्वी मला असे वाटते की रिझर्व्ह बँकेचे किंवा भारत सरकारचे वरिष्ठ अधिकारी, राष्ट्रीय विज्ञान प्रयोगशाळा व तंत्रविज्ञान संस्था यांचे संचालक, किंवा औद्योगिक व व्यावसायिक संस्थांचे उच्च अधिकारी ज्या बंगल्यांतूत किंवा बिऱ्हाडांतून राहतात तेथील सुखसोयी बौद्धिक कामाच्या दृष्टीने पुरेशा सुखकारक असाव्यात. परंतु अलीकडे या वर्गातील काही मित्रांशी यासंबंधी बोलणे झाल्यानंतर हे खरे नाही, असे माझ्या लक्षात आले आहे. ही माझी मित्रमंडळी अमेरिकेला जाऊन तेथे दोन-तीन वर्षे राहून आलेली आहेत. त्यांच्याशी बोलल्यानंतर मला हे समजले की, या राजेशाही बंगल्यातील जीवनही अमेरिकेतील जीवनाच्या तुलनेने फारच कष्टाचे आहे. येथील टेलिफोन वारंवार नादुरुस्त होतात, रेफ्रिजेरटर फार आवाज करतात, आणि त्यांच्या मोटारींचे तेलपाणी तत्परतेने होत नाही. अशा किती गैरसोयी सांगाव्यात? तात्पर्य, ज्यांना शक्य असेल त्यांनी पुनश्च अमेरिकेला जावे हेच खरे!

## हास्यास्पद, पण काय?

अशाच एका मित्रांना भेटण्यासाठी मी एकदा त्यांच्या घरी गेलो होतो. ते नुकतेच अमेरिकेतून परत आले होते. मी त्यांच्या घरी गेलो त्या वेळी त्यांच्या पत्नी घरी नव्हत्या. त्या बाजारहाटाकरिता बाहेर गेलेल्या होत्या. परंतु थोड्याच वेळात घामाघूम होऊन त्या आपल्या बाजारमोहिमेवरून परत आल्या. त्या आपल्या पतिराजांसाठी ब्रिलक्रीम विकत आणण्याकरिता गेल्या होत्या. ब्रिलक्रीम आणण्याकरिता अर्थातच तेवढ्या बाजारमोहिमेची गरज नव्हती. परंतु त्यांना बाटलीतून मिळणारे ब्रिलक्रीम नको होते, ट्यूबमधून मिळणारे हवे होते. कारण अमेरिकेत असताना त्यांना ट्यूबमधील ब्रिलक्रीम वापरण्याची सवय झाली होती. आणि ट्यूबमधील ब्रिलक्रीम त्या वेळी मुंबईत कुठे मिळेना. हताश होत्सात्या त्या म्हणाल्या, "मुंबईतली एकूण एक दुकानं मी पालथी घातली परंतु कुठेही ब्रिलक्रीमची ट्यूब मिळत नाही. म्हणे भारतात फक्त बाटलीतूनच ब्रिलक्रीम मिळतं.!" हे ऐकून माझे मित्रही तितकेच हताश होऊन म्हणाले, "काय हे! ब्रिलक्रीम बाटलीतून विकायचं म्हणजे किती हास्यास्पद! आमची कशी सुधारणा होणार काही कळत नाही!" यावर मी काय बोलणार? एवढेच म्हटले की, "खरोखरीच यापेक्षा अधिक हास्यास्पद काय असू शकेल?" ही हकीकत काही वर्षांपूर्वीची आहे. तेव्हापासून देशाचा थोडाफार आर्थिक विकास घडून आलेला आहे, आणि मला असे समजते की आता भारतातही ट्यूबमधून ब्रिलक्रीम मिळू लागले आहे. त्यामुळे बुद्धिवंतांनी हा देश सोडून परदेशी निघून जाण्याचे निदान एक तरी कारण कमी झालेले असावे.

असो. ही झाली पत्नी साहेबीण नसतानाची हकीकत. ती साहेबीण असेल तर भारतात परत येऊन येथे स्थायिक होण्याचा प्रश्न साहजिकच अधिक गुंतागुंतीचा व अवघड होतो. त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या सर्वांनाच सहज समजण्यासारख्या असल्याने त्यांची चर्चा करण्याची जरुरी नाही. या समस्यांत अडकलेल्या लोकांविषयी मला पूर्ण सहानुभूती आहे. यातील बहुतेक लोकांना त्यांच्या या वैयक्तिक समस्यांची कारणे समजतात आणि ते त्यांचे परिणाम शांतपणे सहन करतात. परंतु काही मंडळी आपल्या या समस्या वैयक्तिक आहेत हे कबूल करण्यास तयार होत नाहीत. त्या ऐवजी आपला देश व देशबांधव यांना सूरींनी वापरलेल्या शब्दांतच दोष देऊन आपले दुःख सुसह्य करण्याचा ते प्रयत्न करतात. हे सारे कां तर त्यांच्या गोऱ्या बायकांना या देशात व येथील लोकांमध्ये राहणे आवडत नाही. अर्थातच त्या बिचाऱ्या बायांचा यात काहीच दोष नाही. त्यांच्या अडचणी साहजिकच आहेत. परंतु आपल्या या वैयक्तिक समस्यांचे खापर आपल्या देशाच्या आणि देशबांधवांच्या माथी फोडण्याचा आमच्या बुद्धिवंत मित्रांचा प्रयत्न पाहिला म्हणजे मात्र त्यांची कीव येते.

आता श्री. सूरी यांच्या हकीकतीतील मुख्य सूत्राकडे वळू. ते म्हणजे वरिष्ठ व कनिष्ठ यांच्या हितसंबंधांतील संघर्ष. भारतातील वडीलधारेपणाच्या परंपरेचा श्री. सूरी उल्लेख करतात. या परंपरेमध्ये कनिष्ठांनी स्वतः लेख लिहून ते आपल्या वरिष्ठांच्या नावे प्रसिद्ध होऊ द्यावेत किंवा अशासारखेच दुसरे वाङमयीन नजराणे वरिष्ठांच्या सेवेत रुजू करावेत अशी कनिष्ठांकडून अपेक्षा असते, असे सूरी म्हणतात. या बाबत मला स्वतःला वरिष्ठ वा कनिष्ठ अशा कोणत्याच बाजूने अनुभव नाही. परंतु असे प्रकार घडतात हे माझ्या ऐकिवात आहे, म्हणून या बाबतीतील सूरी यांच्या म्हणण्यात तथ्य आहे असे वाटते. सूरी म्हणतात त्याप्रमाणे या गोष्टीचा


महाराष्ट्रात महशूर !

**अभ्याससाहित्य–योजना**

स्वस्त–वाचन–योजना

**( ललित ग्रंथालय )**

पुस्तके–मासिके–विक्री

**प्रकाशन**

**कलाभारती**

'उद्यान प्रासाद,' भिकारदास मारुतीजवळ, पुणे.

वडीलधारेपणाच्या परंपरेशी काही संबंध असू शकेल. परंतु माझ्या कल्पनेप्रमाणे अशा प्रथांची सुरुवात ब्रिटिश राजवटीतच झाली आणि त्या काळातच त्या अधिक दृढमूल झाल्या. ब्रिटिश अमदानीत बहुतेक सर्व उच्च शिक्षण सरकारच्या अधिकार कक्षेत होते. अधिकाराची सोपानपरंपरा हा भारतातील ब्रिटिश राजवटीचा कणा होता. या परंपरेत फक्त सर्वांत वरच्या अधिकाऱ्यालाच जाहीरपणे बोलण्याचा किंवा लिहिण्याचा अधिकार असे. तीच परंपरा अजून चालू आहे. आज उच्च शिक्षणाची जबाबदारी विश्वविद्यालयांकडे आलेली असली तरी त्यांवर अजूनही सरकारी परंपरेचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष प्रभाव पुष्कळच आहे. राष्ट्रीय संशोधन संस्था या तर बहुतेक सर्व सरकारच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आहेत. साहजिक विश्वविद्यालये व संशोधन संस्था यांच्यातील नोकरीचे नियम सरकारी नोकऱ्यांच्या नियमांच्या धर्तीवरच बनविलेले असतात. माझी अशी कल्पना आहे की आजदेखील एखाद्या प्राध्यापकाला आपल्या विषयातील एखाद्या शास्त्रीय नियतकालिकात जरी काही शास्त्रीय मजकूर प्रसिद्ध करावयाचा असेल तरीसुद्धा त्या करिता विभागप्रमुखांची परवानगी काढावी लागते. असे असल्यामुळे काही वरिष्ठ अधिकारी या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन आपल्या कनिष्ठांकडून वाङ्मयीन नजराणे घेत असणे अशक्य नाही. ही प्रथा आज किती प्रचलित आहे याची मला नीटशी कल्पना नाही. परंतु ती बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालू असल्यास तिची गंभीरपणे दखल घ्यावयास हवी हे निर्विवाद आहे.

अशा प्रकारे वरिष्ठ व कनिष्ठ यांच्यातील विद्यमान संघर्षाची कारण-परंपरा भारतातील सामाजिक जीवनात घर करून बसलेल्या वडीलधारेपणाच्या व नोकरशाहीच्या परंपरांच्या आधारे करता येत असली तरी वरिष्ठ व कनिष्ठ यांमधील सध्याच्या संघर्षाची आर्थिक कारणमीमांसा अधिक सहजपणे समजण्यासारखी आहे, असे

TIME-SWITCHES
EXCELLENT AND
RELIABLE
TIME KEEPERS

For
* Neon Signs
* Street Lights
* Domestic Elec. Appliances.

PRECIES INDUSTRIES
1/2 Karve Road, Poona 4.

मला वाटते. वरिष्ठ व कनिष्ठ यांच्या हितसंबंधातील हा संघर्ष सहज लक्षात येण्यासारखा आहे. कनिष्ठ सहकाऱ्यांमुळे वरिष्ठांच्या मनात एक प्रकारची असुरक्षिततेची भावना निर्माण होते आणि वरिष्ठांच्या अस्तित्वामुळे कनिष्ठ मंडळींमध्ये एकप्रकारची वैफल्याची भावना उत्पन्न होते. यातूनच हा संघर्ष निर्माण होतो. श्री. पुण्यश्लोक राय हेदेखील या प्रश्नाकडे या संघर्षाचा एक भाग म्हणून पाहतात. त्यामुळे त्यांच्या मते बुद्धिवंतांच्या निर्यातीचे काही परिणाम लाभदायकच आहेत. ते म्हणतात, "बुद्धिवंतांच्या निर्यातीमुळे या ठिकाणी स्थिरस्थावर झालेल्या मंडळींचे आसन डळमळीत करू शकतील अशा नव्या दमाच्या तरुणांचा ओघ परदेशाकडे वळत असल्याने देशातील स्थैर्याला मदतच होते." ज्या कनिष्ठ मंडळीमधील वैफल्याच्या भावनेसंबंधी ते म्हणतात, "ज्या संघर्षामुळे आपल्या देशातील अनेक बुद्धिवान तरुणांना परदेशांत जावे लागते तो संघर्ष आर्थिक नसून आपली कर्तबगारी दाखविण्याला परदेशांत अधिक वाव आहे, या अपेक्षेने हे तरुण परदेशात जातात." हा संघर्ष आर्थिक नसता तर बरेच झाले असते. परंतु 'कर्तबगारी दाखविण्याला अधिक वाव' याचा अर्थ काय ? परदेशात मिळणाऱ्या भल्या मोठ्या पगारांच्या नोकऱ्या हाच त्याचा अर्थ ना ?

## अनिवार्य संघर्ष

माझ्या मते हा मूलतः राष्ट्रीय दारिद्र्याचा प्रश्न आहे. आज आमच्या देशात वरच्या दर्जाच्या फारच थोड्या जागा उपलब्ध आहेत. त्यांच्या खाली कनिष्ठ श्रेणीतील अनेक जागा आहेत. परंतु पगार आणि दर्जा यांचा विचार करता वरिष्ठ जागा व त्यांच्या खालोखाल कनिष्ठ जागा यांमध्येही फार मोठे अंतर आहे. वेतनश्रेण्यांची ही रचना आम्हांला ब्रिटिश राजवटीकडून वारशाने मिळालेली आहे. ब्रिटिश अमदानीत प्रत्येक वरिष्ठ जागेवर ब्रिटिश माणूस असे आणि त्याचा पगार आणि दर्जा त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या हिंदी माणसाच्या पगारापेक्षा व दर्जापेक्षा कितीतरी पटींनी वर असे. आता वरच्या जागांवर हिंदी माणसे आली असली तरी वेतनश्रेणीच्या या रचनेत फारसा फरक झालेला नाही. अशा परिस्थितीत आपल्या वरचा अधिकारी केव्हा तरी निजधामाला जाईल आणि मग आपण कदाचित वर सरकू शकू अशी आशा उराशी बाळगून वाट पाहत राहण्याखेरीज कनिष्ठ मंडळींना फारसे काही करता येत नाही. वरचा अधिकारी निवर्तला म्हणजे कनिष्ठांपैकी एखादा वर सरकतो आणि बाकीच्यांची पुनश्च प्रतीक्षा सुरू होते. ही परिस्थिती अत्यंत वैफल्यजनक आहे हे उघड आहे. परंतु या वैफल्यातून बाहेर पडण्याच्या प्रयत्नामध्ये जेव्हा कनिष्ठ मंडळी आपली योग्यता व कार्यक्षमता प्रस्थापित करू लागतात तेव्हा वरिष्ठांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होते. वरिष्ठ व कनिष्ठ यांच्यांतील संघर्षाचे हे आर्थिक स्वरूप असून त्याच्या बुडाशी राष्ट्रीय दारिद्र्य आहे.

या संघर्षाचे हे आर्थिक स्वरूप मान्य करण्याऐवजी पुष्कळदा परंपरागत पौर्वात्य संस्कृती व आधुनिक पाश्चात्त्य संस्कृती या दोन संस्कृतींमधील हा संघर्ष आहे असे भासविण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु हे खरे नाही. या संघर्षात सहभागी असलेले वरिष्ठ लोक सारेच परंपरागत पौर्वात्य संस्कृतीतून निर्माण झालेले पुराण-पुरुष आहेत असे नाही. आज आपणांस अशी पुष्कळ मंडळी परिचित आहेत की त्यांनी आपल्या आयुष्याची पन्नास वर्षे जुन्या पारंपरिक पौर्वात्य समाजात घालविली आहेत म्हणून नव्हे तर केवळ पाच वर्षे आधुनिक पाश्चात्त्य समाजात काढली आहेत म्हणून ते सध्या वरिष्ठ जागा भूषवीत आहेत. वयाने व अनुभवाने कनिष्ठ अशा या मंडळींना पगाराच्या व दर्जाच्या दृष्टीने वरिष्ठ जागा का व कशा मिळतात याची कारणमीमांसा मी वर केलीच आहे. अशा जागा जेव्हा त्यांना मिळतात व त्या जागांना जेव्हा ते लोभावतात तेव्हा म्हातारी माणसे ज्या चिकाटीने आपापल्या जागांना चिकटून बसतात त्याच चिकाटीने ही तरुण मंडळीही आपल्या जागांना चिकटलेली आढळतात. कारण जीवन हे सगळ्यांनाच प्यारे आहे. त्यांच्या या वृत्तीमुळे त्यांच्याही कनिष्ठांमध्ये वैफल्य निर्माण होते. काही वेळा हे कनिष्ठ लोक परदेशची वारी करून आलेले हुशार तरुणच असतात असे नाही; त्यांच्यापैकी निदान काहीजण तरी परदेशात जाण्यासाठी धडपड करीत असतात कारण त्यायोगे आपल्याभोवतीची वैफल्याची कोंडी आपल्याला फोडता येईल, अशी त्यांना आशा वाटत असते. या कनिष्ठ मंडळींत परदेशची वारी केलेले परंतु बुद्धीने व कर्तृत्वाने कमी असणारे लोकही असतात आणि परदेशांतून परत आल्यानंतर आपल्या परदेशी पदव्यांच्या जोरावर ते स्थानिक वरिष्ठ मंडळींना बाजूस सारून पुढे जाण्याच्या प्रयत्नात असतात. तात्पर्य, या संघर्षात सामील असलेली मंडळी वरिष्ठ असोत वा कनिष्ठ असोत, वृद्ध असोत वा तरुण असोत, परदेशची वारी करून आलेली असोत किंवा परदेशला जाण्याची धडपड करीत असोत, त्या सर्वांचे उद्दिष्ट एकच असते. एकूण परिस्थितीच अशी आहे की हा संघर्ष अनिवार्य व्हावा.

## वंचना, वंचना

वरिष्ठ व कनिष्ठ बुद्धिवंतांमधील या संघर्षाप्रमाणेच या संबंधात आढळून येणारी आणखी एक वस्तुस्थिती आहे की जिचा उल्लेख श्री. पुण्यश्लोक राय 'समुदाय' या संज्ञेने करतात. ते म्हणतात, "नालायक परंतु निराशेने पछाडलेला हा एकसंध समुदाय सर्वत्र नजरेस येतो. या तरुण व वयस्क लोकांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. शिक्षणाच्या रंगरूपाखेरीज त्याचा अधिक स्पर्श त्यांना झालेला नसतो. त्यांच्याजवळ एम. एस्सी. व पीएच. डी. या पदव्या असतात, परंतु त्यांना बाजारात किंमत नसते. या कवडीमोल शैक्षणिक सनदा आपल्या गळ्यात बांधून आपली अथपासून इथिपर्यंत वंचना करण्यात आलेली आहे अशी यांची दृढ भावना

असते. तरीही ही अशीच वंचना अधिकाधिक होत राहावी असा त्यांचाच आग्रह असतो.'

श्री. सूरीही याला दुजोरा देतात. पदवीधर असुशिक्षित तरुणांची संख्या भारतात दिवसेंदिवस वाढत आहे असे सांगून ते म्हणतात, "या तरुणांबाबत मला सर्वांत अधिक चिंतेची बाब दिसते ती अशी की, या तरुणांना कोणतीही नैतिक मूल्ये व नैतिक निष्ठा नसतात. पैशाकरिता किंवा वरिष्ठ जागा मिळविण्याकरिता हे लोक कोणाकरिताही काहीही करण्यास तयार असतात." अर्थातच या परिस्थितीचा दारिद्र्याशी काही संबंध असेल अशी शंकाही श्री. सूरी यांना शिवत नाही.

अशा प्रकारच्या पदवीधर परंतु सुशिक्षित नसलेल्या तरुणांची संख्या देशात वाढत आहे यात मुळीच शंका नाही. परंतु हे लक्षात घ्यावयास हवे की यात केवळ देशातील शिक्षणक्रम पुरा करून शिक्षणाचा आभास प्राप्त केलेले तरुणच नाहीत. त्यांच्यापैकी काही जणांच्या शिक्षणाला परदेशी शिक्षणाची झालरही असते. ज्यांना बाजारात फारशी किंमत नाही त्या सगळ्याच एम. एस्सी. व पीएच. डी. च्या पदव्या भारतीय नसतात. त्यापैकी काही परदेशी विद्यापीठांच्याही असतात. आणि भारतीय विद्यापीठांनी त्यांच्या काही पदवीधरांना अशिक्षित ठेवलेले असेल तर परदेशी विद्यापीठांनीही आपल्या साऱ्याच पदवीधरांना फार सुशिक्षित बनविलेले असते असे समजण्याचे कारण नाही. आता सूरी म्हणतात तो 'नैतिक मूल्यांचा अभाव' आणि 'पैशाकरिता किंवा वरिष्ठ जागा मिळविण्याकरिता कोणाकरिताही काहीही करण्याची तयारी' याबाबत बोलावयाचे तर दिशाहीन झालेले हे सारे तरुण एकाच माळेचे मणी असतात. मात्र त्यांपैकी ज्यांच्याजवळ परदेशी शिक्षण व परदेशी पदव्या असतात त्यांना पैसा, स्थान व सत्ता मिळविण्याकरिता 'कोणाकरिताही काहीही करण्याची' संधी साहजिकच अधिक प्रमाणात उपलब्ध असते. परदेशी न गेलेले व परदेशी जाऊन आलेले हे सर्व तरुण श्री. राय म्हणतात त्या समुदायाचे अविभाज्य घटक आहेत. बुद्धिमत्तेच्या कार्यक्षेत्रात त्यांना प्रवेश मिळविता आला नाही हीच त्यांची नालायकी होय, आणि त्यांच्यामध्ये दिसणारा नैतिक मूल्यांचा अभाव हा केवळ या निराशेचाच परिणाम होय.

तात्पर्य, बुद्धिवंतांमधील वरिष्ठ व कनिष्ठ यांच्यांतील संघर्ष आणि बुद्धिवंतांच्या गोटात प्रवेश मिळविण्यामध्येच अपयश आलेले इतर असंख्य पदवीधर या दोनही वस्तुस्थितीत एकाच मूल परिस्थितीचे वेगवेगळे दृश्य पैलू आहेत. आज देशातील बौद्धिक जीवनात वैफल्याची व संतापाची जी भावना दिसून येते तिला या दोन्ही गोष्टी निःसंशय जबाबदार आहेत. म्हणून या गोष्टींच्या मुळाशी कोणती कारणे आहेत याचा विचार करावयास हवा.

माझ्या मते ब्रिटिश राजवटीकडून आमच्याकडे वारशाने आलेली बुद्धिवंतांमधील वर्गवारी आणि आर्थिक विषमता या परिस्थितीच्या बुडाशी आहेत. मी वर



दीपावली शुभेच्छा
KIRLOSKAR
REGD TRADE MARK
BEARING DIVISION
बेअरिंग डिव्हिजन
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड,
रजिस्टर्ड ऑफिस—एलफिन्स्टन रोड, खडकी, पुणे ३.
TOM & BAY KO: 6752 M

सांगितल्याप्रमाणे ब्रिटिश आमदानीत सर्व वरच्या जागा ब्रिटिशांनी अडविलेल्या असत. आणि त्यांचे पगार व इतर प्राप्ती यांचा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी यत्किंचितही संबंध नसे. परंतु ही गोष्ट एवढ्यावरच थांबली नाही. ब्रिटिश शासकांना साहजिकच पांढरपेशी मंडळी मदतीला लागत. या पांढरपेशा वर्गाने राजनिष्ठ राहावे म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांपेक्षा बरेच कमी परंतु तरीही येथील अर्थव्यवस्थेला पेलणार नाहीत एवढाले पगार या पांढरपेशा वर्गाला दिले जात. त्यामधील वरिष्ठ अधिकाऱ्याने क्रमाक्रमाने अधिकाधिक राजनिष्ठ असावे म्हणून वरिष्ठ व कनिष्ठ श्रेणीतील पगारांतही खूप विषमता ठेवलेली असे. या नोकऱ्यामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी इंग्रजी शिक्षणाची आवश्यकता असे की, ज्याचा शेवटचा टप्पा विश्वविद्यालयीन पदवी हा असे. या कारणाने विश्वविद्यालयीन शिक्षण व पदव्या यांना आणखीनच प्रतिष्ठा लाभली. गेल्या काही वर्षांत तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढलेली असली तरी विश्वविद्यालयीन शिक्षण व पदवी यांचे स्तोम आजही चालूच आहे. फक्त त्याचे स्वरूप काहीसे आधुनिक व सुसंस्कृत झालेले आहे एवढेच.

परिणामतः, ज्यांना ज्यांना विश्वविद्यालयीन शिक्षण घेणे परवडते ते सारे तरुण विद्यापीठांत प्रवेश मिळवितात; किंबहुना या शिक्षणावरच सारे आयुष्य पणाला लावायचे असल्याने ज्यांना या शिक्षणाचा खर्च झेपत नाही असे तरुणही कष्टाने पोटाला चिमटा घेऊन हे शिक्षण घेऊ लागतात. विद्यापीठाची प्रवेशपरीक्षा फारशी अवघड नसते, आणि जे कोणी या परीक्षेत उत्तीर्ण होतात त्यांना विद्यापीठात प्रवेश नाकारणे अशक्य होते. विश्वविद्यालयीन शिक्षणाखेरीज दुसरा मार्गही पुष्कळदा त्यांच्यासमोर नसतो. एक वर्षानंतर या तरुणांना विद्यापीठाच्याच स्थापत्य, तंत्रविज्ञान, वैद्यक वगैरेंसारख्या तांत्रिक शिक्षणशाखांत प्रवेश मिळविण्याची संधी मिळते. आजकाल या तांत्रिक शिक्षणाला खूपच बाजारभाव आहे. या शाखांमध्ये सामान्यतः स्पर्धात्मक गुणांच्या आधारावर प्रवेश देण्यात येतो. ज्यांना हा प्रवेश मिळतो ते इतरेजनांतून बाहेर पडून बुद्धिवंतांच्या रांगेत स्थान मिळविण्याच्या मार्गाला लागतात. इतरेजन रुळलेल्या चाकोरीतून पुढे चालू लागतात. त्यांच्यापैकी ज्या थोड्या लोकांमध्ये आवश्यक ती बुद्धिमत्ता व व्यासंग असतो ते विज्ञान, समाजशास्त्रे, भाषा, इत्यादी शाखांकडे वळतात आणि यथाकाल बुद्धिवंतांच्या गोटात प्रवेश करतात. काहीजण वरिष्ठ सनदी नोकऱ्यांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी स्पर्धात्मक परीक्षांना बसतात आणि त्यांत यशस्वी झाल्यास बुद्धिवंतांच्या गोटात अधिकाराने जाऊन बसतात. ज्यांचा वशिला लागू शकतो असे इतर काहीजण खासगी उद्योगधंद्यांत वरच्या जागा मिळवितात आणि उच्चभ्रू लोकांमध्ये प्रविष्ट होतात. परंतु या साऱ्यांची बेरीज केली तरी विश्वविद्यालयांत शिरलेल्या एकूण संख्येच्या मानाने त्यांची संख्या फारच नगण्य असते. बाकी सारे लोक ठरलेल्या चाकोरीतून पुढे जात

राहतात. कारण परत फिरणे अशक्य असते. विश्वविद्यालयीन शिक्षण पुढे चालू ठेवण्यास आवश्यक ती बुद्धिमत्ता, व्यासंग व आर्थिक परिस्थिती यांचा यांपैकी बहुतेक मंडळींत अभाव असतो. त्यांच्या पायदळी विश्वविद्यालयीन शिक्षणाची दुरवस्था झालेली असते. त्यामुळे या मंडळींना सुरुवातीपासून शेवटपर्यंत अत्यंत निकृष्ट दर्जाचे शिक्षण मिळते. आपण घेत असलेले शिक्षण रटाळ, निरर्थक व बाजारात कवडीमोलाचे आहे हे सालोसाल त्यांच्या लक्षात येत असते. तरीही अगतिक होऊन ते शिकतच राहतात. त्यांनी मिळविलेल्या बी. ए., बी. एस्सी. किंवा बी. कॉम. या पदव्या निरुपयोगी ठरतात म्हणून ते एम्. ए, एम्. एस्सी. किंवा एम्. कॉम. होतात., आणि जेव्हा त्यांना असे आढळून येते की याही पदव्यांना फारसा उपयोग नाही तेव्हा ते पीएच्. डी. करू पाहतात. सारीच शिक्षणपद्धती आणि विशेषत: परीक्षापद्धती हा एक मोठा सट्टा आहे हे त्यांना अनुभवाने माहीत असते, आणि म्हणून खटपट करीत राहिलो तर केव्हातरी या व्यूहातून बाहेर पडून बुद्धिवंतांच्या गोटात प्रवेश मिळू शकेल अशी त्यांना आशा वाटत असते. त्यामुळे संपूर्ण आशाभंग होईपर्यंत त्यांचा प्रयत्न चालू असतो. " या कवडीमोल शैक्षणिक सनदा आपल्या गळचात बांधून आपली अथपासून इतिपर्यंत वंचना करण्यात आलेली आहे अशी त्यांची दृढ भावना असते. तरीही ही अशीच वंचना अधिकाधिक होत राहावी असा त्यांचाच आग्रह असतो, " असे जे श्री. पुण्यश्लोक राय म्हणतात ते याच अर्थाने होय.

## प्रशस्तीपत्रांचे ओझे

मी वर सांगितल्याप्रमाणे परदेशांतील शिक्षण ही काही निराळी चीज नसून देशातील शिक्षणपद्धतीचीच ती एक पुढली पायरी आहे. देशात विश्वविद्यालयीन शिक्षण घेण्याचा जो हेतू असतो तोच हेतू त्यापुढे परदेशी शिक्षण घेण्याचा असतो. त्यामुळे उच्च शिक्षणाकरिता आवश्यक तो बुद्धिमत्ता व व्यासंग असणारेच विद्यार्थी परदेशांत जातात असे नाही, तर पुष्कळ सामान्य विद्यार्थीही परदेशात जातात. देशात शिकत असताना ज्याप्रमाणे आपण काय शिकत आहोत याची त्यांनी कधी पर्वा केलेली नसते त्याचप्रमाणे परदेशी विद्यापीठांत शिकतानासुद्धा आपण कसले शिक्षण घेत आहोत याची ते पर्वा करीत नाहीत. बी. ए. ची परीक्षा निरुपयोगी असल्याचे आढळून आल्यामुळे ते एम्. ए. झालेले असतात आणि एम्. ए. ची पदवीही तितकीच निरुपयोगी आहे असे लक्षात आल्यामुळे ते पीएच्. डी. झालेले असतात. ही पीएच्. डी. घेऊनही त्यांना यशाचा मार्ग दिसत नाही. मग त्यांना कोणी असे सांगते की इंग्लंडला किंवा अमेरिकेला जाता आले तर बहार होईल. म्हणून ते परदेशगमनाच्या खटपटीला लागतात. आजपावेतोच्या शिक्षणात त्यांनी मिळविलेली श्रेणी फारशी उच्च दर्जाची नसते. परंतु कनवाळू प्राध्यापक प्रशस्तिपत्रे देऊन ही उणीव भरून काढतात. खेरीज, परदेशी जाण्याकरिता आजकाल अनेक मार्ग उप-

लब्ध झालेले आहेत, आणि ज्याच्याजवळ पुरेसा वशिला व चिकाटी असेल तो त्यांपैकी कोणत्या तरी एका मार्गास लागतो. अशा रीतीने येनकेन प्रकारेण परदेशी गेलेले अनेक विद्यार्थी आज परदेशात शिक्षण घेत आहेत आणि त्यांतील कित्येक हे शिक्षण पूर्ण करून परतही आलेले आहेत.

अलीकडेच एका अमेरिकन विद्यापीठात मी गेलो असता त्या ठिकाणी मला अनेक भारतीय विद्यार्थी भेटले. नंतर विद्यापीठाच्या प्राध्यापकांबरोबर चहा घेत असताना स्वाभाविकपणेच भारतीय विद्यार्थ्यांचा प्रश्न निघाला. तेथील प्राध्यापक मित्र म्हणाले, " आमच्या विद्यापीठात प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या दरसाल वाढतच आहे. आणि त्यांतून योग्य निवड करण्याचा प्रश्न अधिकाधिक बिकट होत आहे. या सर्वच विद्यार्थ्यांच्या अर्जाबरोबर त्यांच्या प्राध्यापकांकडून घेतलेले उत्कृष्ट अभिप्राय असतात, आणि आम्ही खासगी विचारणा केली तरी तुमच्यासारखे प्राध्यापक असेच प्रशस्त अभिप्राय देतात. त्यामुळे आता ही निवड कोणत्या आधारावर करावी हे आम्हांस कळेनासे झाले आहे. " त्यांच्या म्हणण्यातील खोच अर्थातच माझ्या लक्षात आली, आणि या बाबतीतील आमचा दोष मी प्रांजलपणे कबूल केला. परंतु त्यावर मी पुढे म्हणालो, " प्रश्नाला आणखी एक बाजू आहे, याची आपणांस कल्पना नसावी. जेव्हा आमच्या शिफारसपत्रांच्या आधारे तुम्ही पुष्कळशा खरोखर लायक नसलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठात प्रवेश देता तेव्हा त्यांचा बोजा तुम्हांला दोन, तीन किंवा चार वर्षे सोसावा लागतो, याची मला जाणीव आहे. त्यानंतर हे विद्यार्थी तुमचे शिक्षण पूर्ण करून, पदव्या व प्रमाणपत्रे मिळवून, मोठमोठ्या अपेक्षा उराशी बाळगून भारतात परत येतात. त्या वेळी तुम्हीही उदारमनाने त्यांना प्रशस्त प्रशस्तीपत्रे देता. किंबहुना तुम्ही दिलेली प्रशस्तीपत्रे ही बहुधा आम्ही दिलेल्या प्रशस्तीपत्रांपेक्षा अधिक प्रशस्त असतात. कारण ' उत्कृष्ट, ' ' असामान्य ' इत्यादी विशेषणांचा उपयोग आम्ही करतो त्यापेक्षा तुम्ही अधिक उदारमनाने व सढळपणे करता. ही सर्व प्रशस्तपत्रे घेऊन हे विद्यार्थी परत येतात. त्यानंतर मात्र त्यांचे या प्रशस्तीपत्रांसकट सारे ओझे आम्हांला जन्मभर वाहावे लागते. "

सारांश, मी वर सांगितल्याप्रमाणे आजच्या परिस्थितीचे मूळ कारण पांढरपेशा व्यवसायांना मिळालेली अवास्तव प्रतिष्ठा आणि त्यातून होणारी आर्थिक प्राप्ती हे आहे. ही प्रतिष्ठा व आर्थिक प्राप्ती इतर समाजांच्या आर्थिक परिस्थितीशी पूर्णपणे विसंगत आहे. पांढरपेशा वर्गातही तिने आत्यंतिक विषमता निर्माण केलेली आहे. त्यामुळे या वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी आणि त्यातील वरच्या श्रेणीत पोचण्यासाठी म्हणून विश्वविद्यालयीन शिक्षण व त्यातील अधिकाधिक शिक्षण याकरिता भयंकर संघर्ष सुरू झालेला आहे. त्यातूनच तथाकथित उच्च शिक्षणासाठी परदेशाला जाण्याची धडपड सुरू झालेली आहे. यामुळे या वर्गात मागणीच्या मानाने अधिक पुरवठा होत असून विशेषज्ञतेचा अतिरेक होत आहे. आमची अर्थव्यवस्था या सर्व

लोकांना त्यांना अपेक्षित असलेली किंमत देऊन काम देऊ शकत नाही. यातून साहजिकच वैफल्य व संताप निर्माण होतो. आणि यांपैकी ज्या लोकांना परदेशांत मागणी आहे त्यांना तिकडे जाणे भाग पडते. ही परिस्थिती बुद्धिवंतांच्या निर्यातीला कारणीभूत आहे.

यावर उपाययोजना करावयाची असेल तर पांढरपेशा वर्गाला मिळालेली ही अवास्तव प्रतिष्ठा व आर्थिक प्राप्ती यांतच दुरुस्ती करावयास हवी. याचा अर्थ असा की इतर व्यवसायांच्या तुलनेने पांढरपेशा व्यवसायांना जी आज गैरवाजवी किंमत देण्यात येते ती कमी केली पाहिजे आणि पांढरपेशा वर्गातही वेगवेगळ्या श्रेणींमध्ये आज विद्यमान असलेली विषमता कमी केली पाहिजे. यात विरोधाभास वाटेल. परंतु आजच्या परिस्थितीवर हाच उपाय आहे. पांढरपेशा वर्गाला दिली जाणारी किंमत आमच्या अर्थव्यवस्थेच्या आवाक्याबाहेरची आणि मागणी व पुरवठा या न्यायाने ठरणाऱ्या बाजार भावालाही न पेलणारी आहे. त्यामुळे या वर्गात खरोखरी लायकी नसलेले असे तरुण इतक्या मोठ्या संख्येने शिरू पाहतात की परंपरेने ठरलेली आणि त्यांना अपेक्षित असलेली किंमत देऊन त्यांचा उपयोग करून घेणे अर्थव्यवस्थेला शक्य होत नाही. अर्थातच वर सुचविलेला उपाय या वर्गाला पटणार नाही आणि या वर्गातील लोकांच्या हातातच आजचे देशाचे धोरण असल्याने साहजिकच ते या उपाययोजनेला तयार होणार नाहीत.


*विविध विषयांवरील आमची नवी प्रकाशने*

| | | |
|---|---|---|
| ★ उपासना-माहात्म्य | ले. पृथ्वीराज मालेराव | ५.०० |
| ★ सुबोध-उपासना | ले. पृथ्वीराज मालेराव | ३.५० |
| ★ रोहन कन्हाय | ले. वि. ग. कानिटकर | २.५० |
| ★ निसर्गावर मात | ले. अविनाश फणसळकर | २.५० |
| ★ भूगोलावरील साहसी प्रवासी भाग १ | ले. वि. आ. मोडक | २.५० |
| ★ भूगोलावरील साहसी प्रवासी भाग २ | ले. वि. आ. मोडक | २.०० |
| ★ भूगोलावरील काही विचित्र प्राणी | ले. वि. आ. मोडक | ३.५० |
| ★ भूगोलावरील वनस्पतींचे प्रदेश | ले. वि. आ. मोडक | २.५० |

**संयुक्त साहित्य**

प्रकाशक, गोखले हॉलसमोर, लक्ष्मी रोड, पुणे २.

याला एक पर्याय म्हणून काही वेळा असे सुचविण्यात येते की विश्वविद्यालयातील प्रवेशावर व उच्च शिक्षणासाठी परदेशी जाण्यावर मर्यादा घालावी आणि पर्यायी व्यावसायिक शिक्षणास प्रोत्साहन द्यावे. उदाहरणार्थ आज आपल्या देशात स्त्री-रोगचिकित्सा हा विषय घेऊन एम. डी. झालेल्या अनेक डॉक्टरणी आहेत. परंतु दाया आणि कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमात गर्भवलये बसविण्यासाठी लागणाऱ्या आरोग्य-सेविकांचा देशात तुटवडा भासत असून ते काम अमेरिकेतून आलेल्या शांतिसेविका करीत असतात. आमच्याकडे उच्च स्थापत्य-विशारद भरपूर आहेत. परंतु परदेशातून आणलेली बहुमोल यंत्रसामग्री सुस्थितीत ठेवू शकतील असे कसबी तंत्रज्ञ आमच्यापाशी नाहीत. विश्वविद्यालयात अध्यापन करू शकतील असे समाजशास्त्रज्ञ आमच्याकड गरजेपेक्षा जास्त झालेले आहेत. परंतु प्राथमिक शिक्षकांची मात्र आज देशात वाण आहे. हा तुटवडा भरून काढण्यासाठी अनेक व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेले आहेत. परंतु ते तरुणांना आकर्षित करू शकत नाहीत. कारण विश्वविद्यालयीन पदवीधरांनाच लठ्ठ पगारांच्या नोकऱ्या देण्याचे धोरण आजही चालू आहे. जोपर्यंत ही परिस्थिती चालू राहील तोपर्यंत विश्वविद्यालयातील प्रवेशावर मर्यादा घालणे शक्य होणार नाही. आणि त्याच कारणाने जोपर्यंत परदेशी शिक्षण व परदेशी पदव्या मिळविणाऱ्यांना भरमसाट पगाराच्या नोकऱ्या मिळत आहेत तोपर्यंत परदेशी जाण्यावरही मर्यादा घालता येणार नाही.

अशा प्रकारे देशातील आजचे बौद्धिक जीवन आणि त्यातील दोष हेच बुद्धिवंतांच्या निर्यातीला जबाबदार धरण्यात येत असले तरी सत्यस्थिती बदलावी अशी मनोमन इच्छा कोणालाच आहे असे दिसत नाही. या निवळ सबबी आहेत. बुद्धिवंतना मुक्तद्वार असावे. आणि जे लोक आंतरराष्ट्रीय बाजारात स्वतःला विकू इच्छितात, त्यांना तसे करू द्यावे-थोडक्यात, बुद्धिवंतांची निर्यात होऊ द्यावी एवढेच या वादात पडलेल्या बुद्धिवंतांचे म्हणणे आहे. या युक्तिवादाची काही उदाहरणे पाहू.

अत्यंत उच्च प्रकारची विशेषता मिळविलेल्या लोकांना भारतात राहणे का शक्य होत नाही, याचे एक कारण श्री. महेंद्रकुमार आपल्या लेखात सांगतात. ते म्हणतात, " आज भारताच्या गरजा अशा प्रकारच्या नाहीत की ज्यायोगे विज्ञान व तंत्रज्ञान यांमध्ये उच्चतम दर्जाचे शिक्षण घेतलेल्या भारतीयांचा या देशाला काही उपयोग होऊ शकेल." परंतु म्हणून ते असे मात्र सुचवीत नाही की, आपण आपल्या तरुणांना बेहद्द उच्च शिक्षण देण्याऐवजी आपल्या देशाला उपयुक्त ठरतील अशा विषयाचे व एवढ्याच दर्जाचे शिक्षण आज द्यावे. ही कल्पना बहुतेक भारतीय बुद्धिवंताना मान्य होत नाही. आणि लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्य यांच्या नावे ती ताबडतोब निकालात काढतात. महेंद्रकुमार म्हणतात, "प्रत्येक बुद्धिवंताला आपला व्यवसाय निवडण्याचे व आपल्या संशोधनाचे क्षेत्र ठरविण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. तसे नसेल तर स्वतःला लोकशाहीला पुरस्कर्ता म्हणविणारा भारत आणि हुकूम-

शाहीचा पुरस्कर्ता चीन यांत फरक तो काय राहिला ? बुद्धिवंतांना व्यक्ती म्हणून जगता आले पाहिजे. आणि त्यांना मान्य नसलेल्या मार्गाला त्यांची बुद्धी लावण्याची जबरदस्ती त्यांच्यावर होता कामा नये. व्यक्तिस्वातंत्र्यानेच बुद्धीचा विकास होऊ शकतो."

या सिद्धांतातूनच निघणारा उपसिद्धांत असा : "म्हणून जर एखाद्या भारतीय बुद्धिवंताची मनोदेवता त्याला असे सांगत असेल की, तुझ्या देशाला तुझा काही उपयोग नसून तू आपल्या बुद्धीचा विकास घडवून आणण्यासाठी परदेशातच राहिले पाहिजेस तर तो बुद्धिवंताच्या निर्यातीचा पुरस्कार करतो आहे, असे समजून त्याचा निषेध करण्याऐवजी त्याने त्याला योग्य तो मार्ग स्वीकारल्याबद्दल त्याचे कौतुकच केले पाहिजे. कारण तसे करण्याने तो निदान सर्वसामान्य ज्ञानविकासाला तरी हातभार लावू शकतो." शुद्ध व निर्मळ ज्ञान, लोकशाही व आंतरराष्ट्रीय सहकार्य या बाबतीतील भारतीय बुद्धिवंतांचा उत्साह खरोखरीच अमाप आहे. महेंद्रकुमार म्हणतात, "भारतीय लोक आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये काम करीत असोत किंवा विकसनशील देशामध्ये स्थायिक झालेले असोत. ते आंतरराष्ट्रीय विकासालाच हातभार लावीत असतात. त्यांचे हे कार्य म्हणजे वस्तुतः आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या तत्त्वाचे मूर्त स्वरूप असते."

समाजातील बुद्धिवंतांच्या स्थानाविषयी भारतीय बुद्धिवंतांच्या अपेक्षा व भूमिका यांचाही या ठिकाणी उल्लेख करणे योग्य होईल. याविषयी त्यांची एक विशिष्ट भूमिका आहे की जिच्यामुळे जगातील सारी स्वातंत्र्ये त्यांना आपोआपच अपेक्षित असतात. बुद्धिवंतांच्या निर्यातीसंबंधी जेव्हा आपण चर्चा करतो तेव्हा आपण सामान्यतः शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, प्रशासक व व्यवस्थापक इत्यादी सर्व वर्गांचा अंतर्भाव करीत असतो. परंतु भारतामध्ये या विषयाची चर्चा करताना बुद्धिवंत हा शब्द


। दिवाळी शुभेच्छा ।

**प्लास्टोन अँड केमिकल्स इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन**

३–ब नटराज, २ री हसनाबाद लेन, सांताक्रुझ, मुंबई ५४.

फोन–५३११५५

व्यासंगी विद्वान एवढ्याच मर्यादित अर्थाने वापरला जातो आणि मग अशा बुद्धिवंताला समाजामध्ये एक विशिष्ट आणि अवघड कामगिरी बजावायची असते असे गृहीत धरले जाते. श्री. महेंद्रकुमार म्हणतात, " बुद्धिवंतांचे मुख्य कार्य सामाजिक धोरणाबाबत समाजास अचूक मार्गदर्शन करणे हे आहे." याचा अर्थ असा की दैनंदिन व्यावहारिक जीवनामध्ये अधिकाधिक सुधारणा घडवून आणणे हे ज्यांचे कार्य आहे अशा तंत्रज्ञांपेक्षा बुद्धिवंत हा काही वेगळा असतो. तो राजकारणी पुरुषही नसतो. कारण महेंद्रकुमार म्हणतात त्या प्रमाणे, " बुद्धिवंतांच कार्यक्षेत्र हे राजकारणापासून अलिप्त असते. बुद्धिवंत राजकारणात शिरला तर राजकारणापासून अलिप्त राहिल्याने त्याला जे मार्गदर्शन करता आले असते ते तो करू शकणार नाही. राजकीय किंवा प्रशासनीक मार्गदर्शन करणे हे बुद्धिवंतांचे काम नसून केवळ बौद्धिक नेतृत्व हेच त्यांचे कार्य असावयास हवे." मातीला स्पर्शही न करता निर्मळपणे कार्य करणारा तो बुद्धिवंत ही कल्पना भारतीय बुद्धिवंतांमध्ये फार खोलवर रुजलेली आहे. त्यामुळे हे ओघानेच यते की ज्या समाजासाठी त्याला कार्य करावयाचे आहे त्या समाजातच त्याने राहिले पाहिजे, असे तो मानीत नाही. आपल्या चर्चेच्या संदर्भात असे म्हणता येईल की, अशा या बुद्धिवंताने स्वतः परदेशात राहूनही आपल्या देशाचे बौद्धिक नेतृत्व करणे व देशाला मार्गदर्शन करणे पूर्णपणे शक्य आहे.

बुद्धिवंतांच्या दृष्टीने ही व्यवस्था फारच सोयीची आहे, यात शंका नाही. तंत्रज्ञ, राजकारणी व प्रशासक यांच्याहून तो मूलतःच वेगळा समजला गेला तरी सर्वसामान्य मानवाच्या गरजा त्यालाही भासतातच. श्री. महेंद्रकुमार म्हणतात, " विद्वानांचे देशांतर हा परदेशांतील शिक्षणाचा अटळ परिणाम असतो. परदेशांमध्ये आपले उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर भारतीय बुद्धिवंतांना साहजिकच असे वाटते की आपल्याला योग्य नोकरी मिळावी. परंतु योग्य नोकरीसंबंधीच्या त्यांच्या अपेक्षा भारतातील परिस्थितीनुरूप ठरत नसून ज्या देशात त्यांनी शिक्षण घेतलेले असते त्या देशातील परिस्थितीनुरूप त्या बनलेल्या असतात. त्यामुळे उच्च शिक्षणाबरोबरच त्यांच्या अपेक्षाही उंचावलेल्या असतात. त्यामुळ स्वदेशी परत जाण्याला तशीच काही अपरिहार्य कारणे नसतील तर ज्या योगे आपल्या अपेक्षा सफल होऊ शकतील अशा प्रकारच्या नोकऱ्या परदेशांत मिळविण्याचा ते यत्न करतात." अर्थातच त्यांनी स्वदेशी परत आले पाहिजे असे काहीच कारण नसते. कारण वर सांगितल्याप्रमाणे परदेशात राहूनही ते आपल्या समाजाविषयीची कर्तव्ये पार पाडू शकतात, आपल्या देशाचे बौद्धिक नेतृत्व करू शकतात आणि त्याला धोरणात्मक मार्गदर्शन करू शकतात.

श्री. जगदीश भगवती यांची भूमिका थोडीशी तडजोडीची आहे. जे लोक अनेक वर्षे परदेशांत वास्तव्य करून नुकतेच भारतात परतले आहेत, जे भारतात राहू



निर्मळपणे कार्य करणारा बुद्धिवंत

इच्छितात, परंतु ज्यांना वरचेवर परदेशला जावेसे वाटते अशा लोकांचे ते प्रतिनिधित्व करतात. म्हणून भारतीय विश्वविद्यालयांमध्ये शैक्षणिक रजेसंबंधीचे धोरण उदार असले पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. ते म्हणतात, "भारतीय बुद्धिवंतांना जबरदस्तीने भारतात डांबून ठेवले, त्यांना वरचेवर शैक्षणिक रजा देऊन परदेशी विद्यापीठात जाऊन येण्याची संधी दिली नाही तर बुद्धिवंतांची निर्यात थांबेल परंतु त्यांची बुद्धी कुजून जाईल." याची कारणे सांगताना ते म्हणतात, "भारतात बहुतेक सर्व क्षेत्रांत व संस्थांत वेगवेगळया विषयांसंबंधी वैचारिक वातावरण निर्माण होण्यास आवश्यक असे संख्येने व दर्जाने पुरेसे विद्वान आज उपलब्ध नाहीत. अशा वातावरणाच्या अभावी विद्याव्यासंग अद्ययावत ठेवणे अशक्य होते. शिवाय भारतातील आजची सामाजिक परिस्थिती अशी आहे की, विद्याव्यासंगात अनेक अगांतुक व्यत्यय प्रत्यही येत असतात. त्यामुळे सातत्याने विद्याव्यासंग करणे अवघड होते. असले अगांतुक व्यत्यय दिवसेंदिवस वाढत असल्याने विद्याव्यासंगाचा बळी देण्याचे अनेक सोपे मार्ग उपलब्ध होत आहेत. अशा

स्थितीत शिक्षण क्षेत्रातील भारतीय बुद्धिवंतांना अधूनमधून या वातावरणातून बाहेर पडून एखाद्या परदेशी, नामांकित संस्थेच्या ज्ञानसंपन्न वातावरणात राहून पुनश्च ताजेतवाने होण्याची संधी देणे अधिकच निकडीचे ठरते."

## आपल्या रिकाम्या संस्था

श्री. भगवतींनी दिलेली कारणे वास्तविक व पटण्यासारखी आहेत. परंतु बुद्धिवंतांच्या अशा निर्यातीने आहे ही परिस्थिती कशी सुधारेल हे मात्र ते सांगत नाहीत. जर निम्मेशिम्मे बुद्धिवंत कायम परदेशातच राहाणार असतील आणि उरलेले निम्मे बुद्धिवंत भारतात राहाण्याने संपुष्टात येणारे आपले ज्ञान पुनश्च भरून घेण्यासाठी वर्षाआड परदेशी विश्वविद्यालयात जाणार असतील तर श्री. भगवतींना अभिप्रेत असलेले वातावरण भारतीय विद्यापीठात किंवा शिक्षणसंस्थांत निर्माण होण्यासाठी पुरेसे बुद्धिवंत या देशात कधीतरी गोळा होतील काय ? यावर ते कदाचित् असे म्हणतील की कालांतराने आपल्याजवळ बुद्धिवंतांचा भरपूर पुरवठा होईल आणि मग आपल्याला आपल्या शिक्षणसंस्थांत योग्य ते वातावरण निर्माण करता येईल. दुर्दैवाने गेल्या वीस वर्षांतील अनुभव अगदी उलट आहे. या काळात परदेशी शिक्षणाची मागणी कमी होण्याऐवजी ती दरसाल वाढतच आहे. याचे कारण आपल्या देशाची आर्थिक प्रगती फार झपाट्याने होत आहे, असे म्हणण्याचे धाडस कोणी करणार नाही, असे मी समजतो. वस्तुस्थिती अशी आहे की आपल्या होतकरू तरुणांना उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठवून आणि नंतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्यांना वाऱ्यावर सोडून देऊन खरोखरी आपल्या तरुणांना पुरेशा संख्येने व आवश्यक त्या गुणवत्तेचे उच्च शिक्षण देऊ शकतील अशा संस्थाच आपण देशात निर्माण केल्या नाहीत. उलट देशामध्ये शैक्षणिक सोयींची खूप वाढ झालेली असताही या बाबतीतील आपली क्षमता दिवसेंदिवस कमी होत चाललेली आहे. आपण अनेक नवी विद्यापीठे, तंत्रज्ञानाच्या संस्था व राष्ट्रीय वैज्ञानिक प्रयोगशाळा सुरू केल्या आहेत, परंतु तज्ज्ञ शिक्षक व शास्त्रज्ञ, तसेच गुणवान विद्यार्थी या सर्वांचाच ओघ परदेशाकडे लागून राहिला असल्याने त्यांच्या अभावी या सर्व संस्था वरवर भरलेल्या दिसल्या तरी वास्तविक रिकाम्याच आहेत. बुद्धिवंतांच्या निर्यातीचा परिणाम या सर्व संस्थांना प्रकर्षाने जाणवत असून तो दिवसेंदिवस अधिकाधिक जाणवत राहणार यात शंका नाही.

श्री. भगवती यांनीही या वाढत्या निर्यातीचे स्वरूप अनवधानाने सूचित केले आहे. परदेशातून असणाऱ्या आपल्या उच्चपदस्थ बुद्धिवंतांचा आपल्या देशाला काय लाभ होऊ शकतो यासंबंधी लिहिताना ते म्हणतात, " यामुळे परदेशांतील खऱ्याखुऱ्या चांगल्या विश्वविद्यालयांमध्ये आपल्या हुशार विद्यार्थ्यांना पाठविणेही आपल्याला अधिक सोपे झालेले आहे. त्यायोगे परदेशांतील उच्च शिक्षणापासून होऊ शकणारा लाभ द्विगुणित झालेला आहे." यालाच पुष्टी देऊन असे म्हणता

येईल की या कामी आपल्याला परदेशातील आपल्या उच्चपदस्थ बुद्धिवंतांचेच साह्य होत आहे असे नव्हे, तर जे काही कमी महत्त्वाचे लोक भारतामध्ये परतले आहेत त्यांचीही मदत होत आहे. हीही मंडळी आमच्या तरुण विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी परदेशात जाण्याचा उपदेश करीत असतात. या कामी परदेशातून इकडे येणाऱ्या परदेशी अतिथि-प्राध्यापक व तज्ज्ञ यांचाही हातभार लागत आहे. हे प्राध्यापक व तज्ज्ञ विशेष विद्वान् असतात म्हणून नव्हे तर त्यांच्या ओळखीनें व साहाय्यानें परदेशी विश्वविद्यालयात प्रवेश मिळविणे सुकर होते म्हणून आमचे तरुण विद्यार्थी त्यांच्या मागे-मागे करीत असतात. आज आपली संपूर्ण शिक्षणव्यवस्था हे परदेशी विश्वविद्यालयांशी संपर्क साधण्याकरिता उभारलेले एक संपर्क कार्यालय बनलेले आहे. उच्च शिक्षणासाठी परदेशी जाऊ इच्छिणाऱ्यांना आवश्यक ती सामग्री आणि संपर्क मिळवून देणे एवढेच आमच्या शिक्षणसंस्थांचे कार्य झालेले आहे. देशाच्या एकूण शिक्षणव्यवस्थेवर याचा काय परिणाम होत आहे याची कोणालाच फिकीर दिसत नाही.

## निकोप राष्ट्रभावना

श्री. भगवती शेवटी म्हणतात की, परदेशांत राहणारे भारतीय भारताची जागतिक प्रतिष्ठा व कीर्ती वाढवीत आहेत. ही एक सर्वांना प्यारी असलेली केविलवाणी श्रद्धा आहे. भगवती म्हणतात, " परदेशी विश्वविद्यालयांमध्ये कार्य करणाऱ्या अनेक भारतीय गणितज्ञांनी, भौतिक वैज्ञानिकांनी, संख्याशास्त्रज्ञानी व अर्थशास्त्रज्ञांनी " आमच्या देशाची कीर्ती जगभर पसरविली आहे. आजपावेतो विद्येच्या क्षेत्रांत आपल्याला फारसा मान नव्हता. आज तो आहे. ही गोष्टच प्रतिष्ठा वाढविणारी आहे. आम्ही जर आपली दारे बंद करून आपल्याला आपल्या देशातच कोंडून घेतले असते तर ही गोष्ट घडून आली असती काय ? " श्री. भगवती यांना हे चांगले माहीत आहे की, परदेशातील भारतीय शास्त्रज्ञांची व्यक्तिशः जी काही प्रतिष्ठा वा कीर्ती असेल ती असो, परंतु जो पर्यंत ते परदेशात आहेत तो पर्यंत ते आपल्या देशाची प्रतिष्ठा वा कीर्ती वाढवू शकणार नाहीत. गरीब व अविकासित देशांतील जे शास्त्रज्ञ आपल्या देशाची प्रतिष्ठा व कीर्ती आज वाढवीत आहेत ते आपापल्या देशात गरीब परिस्थितीत, आधुनिक सुखसोयी नसताना, मर्यादित पैसा व साधनसामग्रीनिशी, घडोघडी परदेशांकडे याचना न करिता, स्वयंप्रज्ञेनें स्वस्थानी काम करीत आहेत. हेच शास्त्रज्ञ आपल्या देशाची जागतिक प्रतिष्ठा वाढवू शकतात.

अशा प्रकारे बुद्धिवंतांच्या निर्यातीची कारणमीमांसा, किंबहुना तिचे समर्थन, बहुतेक भारतीय बुद्धिवंत करीत असतात. या सर्वांचे या बाबतीत एकमत आहे की, बुद्धीचा विकास व बुद्धिवंतांची उन्नती ही केवळ परदेशांत गेल्यामुळेच होऊ शकते. श्री. राय म्हणतात, बुद्धीची निपज आणि विकासच होऊ न देणे हा काही बुद्धिवंतांची निर्यात थांबविण्याचा मार्ग नव्हे. परदेशांतील अध्ययनावर बंदी घाल-

ण्यात आली तर आधुनिक विज्ञान व तंत्र यांचा आत्मविश्वासाने उपयोग करू शकतील असे तरुणच आपल्या देशात निर्माण होऊ शकणार नाहीत."

सरळ थोडक्यात सांगावयाचे तर या लोकांना असे म्हणावयाचे आहे की आपल्या देशात जे सर्वसामान्यांपासून वेगळे आहेत किंवा वेगळे होऊ शकतात त्यांनी संधी मिळताच देश सोडून परदेशांत निघून जावे. कारण हा देश भिकार आहे व येथील लोक गलिच्छ आहेत. या बुद्धिवंतांपैकी काहीसे उच्च असणारे स्थापत्यविशारद, डॉक्टर, तंत्रज्ञ, प्रशासक व व्यवसाय व्यवस्थापक पुष्कळदा नेमक्या याच शब्दांत आपले हे म्हणणे मांडीत असतात. हे लोक सहसा या प्रश्नाच्या जाहीर चर्चेत भाग घेत नाहीत. त्यांच्यापेक्षा थोडीशी अधिक सुसंस्कृत मंडळीच अशा चर्चेत भाग घेतात. त्यांच्यापैकी पुष्कळसे पुस्तकी पंडित असतात व त्यामुळे ते आपले म्हणणे अधिक सुसंस्कृतपणे मांडू शकतात; परंतु सर्वांचा मतितार्थ एकच असतो.

ही भूमिका मान्य केली म्हणजे अर्थात् सारा प्रश्नच संपतो. तरीपण विचारवंत या प्रश्नाचे अस्तित्व अमान्य करू शकत नाहीत. श्री. शैलेन घोष यांनी प्रश्नाचे अस्तित्व मान्य केले आहेच, शिवाय या प्रश्नाची निरगाठ जेथे सुटली पाहिजे तेथे नेमके बोटही त्यांनी ठेवले आहे. परंतु दुर्दैवाने चर्चेच्या ओघात भारताच्या आध्यात्मिक मूल्यांची परंपरा व धार्मिक शिकवण यांच्या धुक्यात ते सापडलेला मुद्दा हरवून बसतात. त्यांनी ज्या मुद्यावर नेमके बोट ठेवलेले आहे तो मी त्यांच्याच शब्दात सांगतो. ते म्हणतात, "आम्ही भारतीय लोक फाजील वंशाभिमान यांत परिणत होणाऱ्या मानसिक अधोगतीला भितो. या बाबतच्या आमच्या अंतःप्रेरणा सखोल व सुदृढ आहेत, यात शंका नाही. परंतु त्याचबरोबर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निकोप राष्ट्रवादासंबंधीच्या ज्या आमच्या किमान गरजा आहेत त्यांकडे आम्ही लक्ष पुरविले नाही. ज्या देशाला दारिद्र्याच्या चिखलामधून स्वतःलाच वर काढावयाचे आहे त्याला कार्यप्रवण होण्यासाठी किमान राष्ट्रवादाची गरज असते. राष्ट्रवादामुळेच त्याच्या सुप्त शक्ती जागृत होतात आणि त्याच्या सृजनशीलतेला आव्हान मिळते. ही प्राथमिक गरज मान्य केली नाही तर आपण आपले सामाजिक प्रवाहपतितत्व थांबवू शकणार नाही. तिरुण वद्यार्थ्यांपासून मान्यवर शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ यांच्यापर्यंत सर्व पातळ्यांवरील बुद्धिवंतांचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर आपणांला राष्ट्रीयत्वाची भावना जागृत केली पाहिजे. ही भावना एकदा जागृत झाली की कोणताही बुद्धिवंत आपले तनमनधन मातृभूमीला अर्पण करण्याऐवजी ते परदेशात विक्रीस काढणार नाही. आणि ज्या कोणास आपल्या मातृभूमीला काही अर्पण करावयाचे आहे त्याला कोणीही परावृत्त करू इच्छिणार नाही. ही प्रेरणा नसेल तर या रोगास कोणीही आळा घालू शकणार नाही."

'सेमिनार' मासिकाच्या जून १९६७ च्या अंकात श्रीभट्टाचार्य यांचे एक पत्र प्रसिद्ध झाले आहे. त्यांनी याच मुद्यावर भर दिला आहे. ते म्हणतात, "बुद्धि-

वंतांची निर्यात हे एका खोलवर रुजलेल्या गंभीर रोगाचे बाह्यात्कारी व क्लेशदायक लक्षण आहे. या रोगाचा परिणाम या बाह्य लक्षणाशी संबंधित असलेल्या क्लेशांपेक्षा किती तरी अधिक भयानक आहे, ही गोष्ट आपण स्पष्टपणे समजून घेतली नाही तर यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा देशावर किती भयानक परिणाम होणार आहे याकडे दुर्लक्ष करून परदेशांत गेलेल्या लोकांना परत कसे आणावयाचे यासंबंधीच्या वर्तमानपत्री चर्चेतच आम्ही गुंतून बसू.''

मी वर सांगितल्याप्रमाणे बुद्धिवंतांच्या निर्यातीच्या एकूण मुळाशी असलेला व खूप खोलवर गेलेला रोग म्हणजे आपण ब्रिटिश राजवटीकडून वारशाने घेतलेला समाजातील बुद्धिवंतांच्या तौलनिक प्रतिष्ठेचा व प्राप्तीचा प्रश्न आहे. आज समाजातील इतर व्यवसायांच्या तुलनेने बौद्धिक व्यवसायांना अवास्तव प्रतिष्ठा व



अर्थप्राप्ती मिळते. शिवाय बुद्धिवंतांच्यातही वेगवेगळ्या पातळ्यांमध्ये असह्य विषमता निर्माण झालेली आहे. या परिस्थितीचे दोन परिणाम झालेले आहेत. पहिला असा की बुद्धिजीवी वर्गांनी इतर समाजांपासून स्वतःची पूर्णपणे फारकत करून घेतलेली आहे. देशांतर करणे हे केवळ एक पुढले पाऊल आहे. आणि ते ओघानेच येत असल्याने बुद्धिवंतांना देशांतराची खंत वाटत नाही. दुसरा परिणाम असा की बुद्धिजीवी वर्गामध्ये बौद्धिक वातावरणच उरलेले नाही. या वर्गामध्ये चुकीच्या प्रवृत्ती व चुकीचे हेतू असणारे नको ते लोक घुसलेले आहेत. त्यामुळे देशाचे बौद्धिक जीवन नोकरशाही, गुलामीवृत्ती, लाचलुचपत, वैफल्य व संताप यांनी कलुषित झालेले आहे. याच कारणाने तरुण बुद्धिवंत आपल्या देशापासून आणि समाजापासून चार हात दूर राहू इच्छितात.

या रोगावरील उपचार देशातच सुरू झाला पाहिजे. आणि ज्या जागी रोग आहे तेथच त्याचा इलाज झाला पाहिजे. याकरिता दोन उपाय अंमलात आणावे लागतील. पहिला असा की विश्वविद्यालयीन शिक्षण व पदवी यांना प्रतिष्ठा व पैसा या दोन्ही बाबतींत आज जे अवास्तव महत्त्व प्राप्त झालेले आहे, ते कमी केले गेले पाहिजे. दुसरा उपाय असा की बुद्धिजीवी वर्गातील वेगवेगळ्या पातळ्यांमध्ये प्रतिष्ठा व पैसा यांबाबत जी असमर्थनीय विषमता निर्माण झालेली आहे ती कमी केली गेली पाहिजे. असे करताना अगदी उच्चपदस्थ लोकांची प्रतिष्ठा व प्राप्ती ताबडतोब कमी करणे कदाचित व्यवहार्य ठरणार नाही. परंतु आज सर्वांत वरच्या जागेला जो पगार दिला जातो तो तेवढाच राहील, त्याहून अधिक वाढणार नाही, असा कडक नियम ताबडतोब करता येईल. त्याचप्रमाणे भविष्यकाळी सध्याच्या रचनेत जेव्हा जेव्हा काही बदल करण्याचा प्रसंग येईल तेव्हा तेव्हा हा वर्ग इतर समाजांच्या अधिक जवळ येईल, तसेच या वर्गाच्या अंतर्गत असलेली विषमता कमी होईल, असा कटाक्ष ठेवता येईल. ज्या देशांतील समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था एकपक्षीय किंवा हुकूमशाहीची नाही तेथे असे बदल घडवून आणणे सोपे नाही याची मला कल्पना आहे. तरीपण हे धोरण राजकीयदृष्टया स्वीकृत झाले तर इष्ट दिशेने व्यावहारिक पावले टाकणे अशक्य नाही, असे मला वाटते.

एकदा हे धोरण स्वीकारले की मग देशातून अधिकाधिक प्रमाणात होणारी मानवी साधनसामग्रीची ही निर्यात थांबविण्यासाठी देशाच्या सीमा बंद करणे अपरिहार्य ठरेल. तरुण मंडळींना अमिषाला बळी पडू द्यावयाचे आणि मग त्यांनी सहजसुलभ मोहांचा प्रतिकार करावा अशी अपेक्षा बाळगावयाची हे न्याय्य नाही. हे मोह टाळण्याच्या कामी तरुणांना मदत केली पाहिजे. आणि ही मदत देशाची दारे बंद करूनच करता येण्यासारखी आहे. यात ओशाळण्यासारखे काही नाही. लोकशाही घटनेने मिळणाऱ्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरुद्ध असे त्यात काही नाही. मूलभूत हक्कांमध्ये जगभर प्रवास करण्याच्या अनिर्बंध हक्काचाही समावेश होतो,

असे कोण्या कायदेपंडितांचे मत असले तर ते निरर्थक व अवास्तव आहे. यात कोठेही लोकशाही तत्त्वांचा भंग होत नाही. जगातील अत्यंत लोकशाहीप्रधान देशांमध्येही लोकशाहीचा अवलंब व वापर केवळ देशाच्या अंतर्गत व्यवहारातच केला जातो. देशाच्या बाहेर लोकशाहीचा अवलंब करण्याचा आज कोणी प्रयत्नही करीत नाही. जगातल्या पुढारलेल्या लोकशाहीप्रधान देशांमध्येच परदेशी लोकांना आपले नागरिकत्व देण्यासंबंधीचे नियम सर्वांत अधिक कडक व भेदभाव करणारे आहेत. त्यांपासून आपले हितरक्षण करण्यासाठी आपल्या देशातील परदेशगमनाचे नियम तितकेच कडक करण्यात कोणताच दोष नाही. बुद्धिवंतांची निर्यात म्हणजे जेथे किमती जास्त असतात तिकडे विक्रीचा माल जात असतो, या व्यापारी तत्त्वाचेच दृश्य स्वरूप आहे, अशी त्याची जी कारणमीमांसा केली जाते ती फारच ऐसपैस व सोयीची आहे, कारण प्राध्यापकांच्या पगारामध्ये भारतात व परदेशांत जेवढी तफावत आढळते तेवढीच ती मोलकरणींच्या पगारांतही आढळते. परंतु म्हणून काही आमच्या मोलकरणींना परदेशांची दारे खुली नाहीत. वस्तूंचे व उत्पादनसाधनांचे बाजारभाव हीच एक कसोटी मान्य करावयाची तर आमच्या एकूण लोकसंख्येपैकी निदान अर्ध्या लोकांची तरी परदेशी वर्णी लागली पाहिजे. परंतु असे घडत नाही आणि हे कोणी मान्यही करीत नाही, तोपर्यंत तरी आपण आज चालू असलेल्या बेसुमार परदेशगमनाला पायबंद घातला पाहिजे आणि बुद्धिवंतांची ही निर्यात थांबविली पाहिजे.

## पायरोवा

हे झाले की मग आमच्या देशातील सारे बुद्धिवंत येथे स्थायिक होऊन स्थिरचित्ताने व हेतूपूर्वक आपल्या कामाला लागतील. त्यांच्या कामासाठी आवश्यक असणाऱ्या कामाच्या जागा, ग्रंथालये, प्रयोगशाळा यांसारख्या भौतिक व्यवस्था व सुखसोयी त्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या पाहिजेत. व्यक्तिशः नागरिक या नात्याने ते गरिबीत राहतील. कारण आपला देश गरीब आहे. परंतु कार्यकर्ते म्हणून काम करीत असताना त्यांना कसलीही उणीव भासता कामा नये. या भौतिक सोयी उपलब्ध झाल्या तर माझा असा विश्वास आहे की, आपल्याला अनेक गुणवान् बुद्धिवंत सातत्याने मिळत राहतील. आपल्या शैक्षणिक, बौद्धिक परंपरेत जरी आज थोडाफार खंड पडलेला असला तरी ती अजूनही इतकी सामर्थ्यवान आहे की जगातल्या कोणत्याही संस्थांची बरोबरी करू शकतील अशा संस्था निर्माण करणे आपल्याला अशक्य नाही. परदेशांत भरकटत गेलेले, अधांतरी लोंबकळत राहिलेले, आपल्या मायदेशातील संस्थांच्या उभारणीत जे कधी सहभागी झाले नाहीत, इथल्या मातीत जे कधी पाय रोवून उभे राहिले नाहीत अशा आमच्या बुद्धिवान तरुणांना आपण आयुष्यात काय गमावून बसलो आहोत याची जाणीव नाही.

विकसित देशांमध्ये जाऊन विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या निवडक क्षेत्रांत उच्च शिक्षण व अनुभव मिळण्याची आम्हांला काही जरूरी नाही असे म्हणणे हास्यास्पद होईल. परंतु अशा प्रकारे उच्च शिक्षण व अनुभव घेण्यासाठी आपल्या लोकांना बाहेर पाठविताना आपण तारतम्य वापरले पाहिजे. अशा उच्च शिक्षणासाठी आवश्यक ती भौतिक साधने आपल्या देशात उपलब्ध नाहीत व ताबडतोब उपलब्ध होण्यासारखी नाहीत अशी खात्री करून घेतल्यावरच अशा लोकांना बाहेर पाठविणे रास्त ठरेल. केवळ परदेशांतील विद्यापीठांत सर्वसामान्य शैक्षणिक व बौद्धिक वातावरण असते आणि विद्याव्यासंगी विद्वानांचे साहचर्य लाभते, असल्या कारणांसाठी परदेशी शिक्षणाचा पुरस्कार करून त्याला प्रोत्साहन दिले जाता कामा नये. बौद्धिक वातावरण आणि विद्याव्यासंगी विद्वानांचे साहचर्य यांचे महत्त्व ज्या बुद्धिवंतांना समजते ते परदेशांकडे धाव न घेता मायदेशातच राहतील तर आवश्यक ते वातावरण आणि विद्वानांचे साहचर्य निर्माण करणे मुळीच अवघड नाही. या दृष्टीने पाहिल्यास सामाजिक शास्त्रांसंबंधीची पुस्तके, नियतकालिके व इतर साहित्य परदेशांतून मुक्तपणे येत राहिली तर कोणत्याही सामाजिक शास्त्रात उच्च शिक्षण घेण्यासाठी कोणालाही परदेशी पाठविण्याची मुळीच गरज उरणार नाही. हीच गोष्ट भौतिक विज्ञाने व जीवविज्ञाने यांसारख्या विशुद्ध विज्ञानांच्या बाबतीतही खरी आहे. अर्थात् ज्या संशोधन-कार्यासाठी अत्यंत भारी किंमतीची शास्त्रीय उपकरणे व साधने यांची जरूरी असते त्यांच्या बाबतीत अपवाद करावा लागेल. परंतु याही बाबतीत ही साधने आपल्या देशात नाहीत म्हणून आपल्या तरुणांना परदेशांत पाठविण्यापेक्षा आवश्यक ती उपकरणे व साधने मिळविणे हेच अधिक योग्य होईल. आपल्या देशामध्ये परदेशांतून आणलेली कितीतरी बहुमोल यंत्रसामग्री व शास्त्रीय उपकरणे योग्य वापर व दुरुस्ती न झाल्यामुळे निष्कारण पडून राहिलेली आहेत, याची मला जाणीव आहे. ही एक अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. बहुमोल उपकरणांची व साधनांची आवश्यक ती दुरुस्ती करून ती चांगल्या स्थितीत ठेवू शकतील असे तंत्रकुशल कारागीर आपल्याजवळ तयार होईपर्यंत अशी बहुमोल यंत्रसामग्री व उपकरणे परदेशांतून आणू नयेत हेच खरे. परदेशांमध्ये पाठवून शिक्षण देण्याची जर काही जरूरी असेल तर ती प्रगत वैज्ञानिक पातळीवर नसून या खालच्या पातळीवरील तांत्रिक ज्ञानाच्या आणि हस्त-कौशल्याच्याबाबत आहे. ही यंत्रसामग्री दुरुस्त करून सुस्थितीत ठेवू शकतील असे तंत्रज्ञ एकदा आपल्याकडे तयार झाले की लौकरच ते ही यंत्रे व उपकरणेही तयार करू लागतील. परदेशांतील प्रयोगशाळांमध्ये आयत्या मांडलेल्या यंत्रांचा व साधनांचा उपयोग कसा करावयाचा एवढेच आज आमच्या शास्त्रज्ञांना कळते. त्याऐवजी त्यांना लागणारी उपकरणे ते आपल्या देखरेखीखाली देशातच कुशल कारागिरांकडून तयार करवून घेऊ लागले तर त्यांना या उपकरणांची अंतर्बाह्य माहिती होऊन आपापल्या



मग मोलकरणींचीही निर्यात का नको ?

शास्त्रशाखांचे ज्ञानही अधिक उत्तम रीतीने अवगत होईल.

मला असे वाटते की परदेशात शिक्षण व अनुभव घेण्याची गरज सामान्यत: औद्योगिक तंत्रविज्ञान, उत्पादनव्यवस्था व संघटन यांसारखे जे विषय प्रगत अर्थव्यवस्थांमधील आर्थिक व्यवहारात प्रत्यक्ष काम करूनच शिकतां येतात अशा व्यावहारिक क्षेत्रांपुरतीच अधिक तीव्रतेने भासेल. विशुद्ध शास्त्रे व तंत्रविज्ञान, यांचे शिक्षण देशातील सुसज्ज शैक्षणिक संस्थांमध्ये राहून सहज घेता येण्यासारखे आहे. त्याकरिता परदेशात जाण्याची गरज भासू नये. दुसरी गोष्ट अशी की, परदेशी शिक्षणाची गरज आणि उपयुक्तता ही सामान्यत: कनिष्ठ पातळीवर जेवढी भासेल तेवढी ती वरिष्ठ पातळीवर भासणार नाही. आज आपल्या देशात जे लोक आपापल्या संस्थांमध्ये वरिष्ठ पदांवर असतात ते त्या पदांवर असल्यामुळे परदेशी जातात, किंवा परदेशी जाऊन आल्यामुळे वरिष्ठ पदांवर नियुक्त होतात. परदेशांतील शिक्षणाचा जास्तीत जास्त फायदा पदरात पाडून घ्यावा या हेतूने हे घडत नाही, तर परदेशी शिक्षणाला जी अवास्तव प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे

तिच्यामुळे हे घडते. याऐवजी जर कनिष्ठ पातळीवरील लोकांना विवक्षित शिक्षण व अनुभव मिळविण्यासाठी परदेशी पाठविले आणि ते तिकडून परत आल्यावर आपापल्या जागी पुनश्च रुजू झाले तर त्यांनी आणलेल्या ज्ञानाचा व अनुभवाचा अधिक तारतम्याने विचार होईल आणि देशातील परिस्थितीला आवश्यक असे बदल त्यात करून त्यांचा अधिक चांगला उपयोग केला जाईल.

वर ज्या कनिष्ठांचा मी उल्लेख केला आहे ते म्हणजे शाळेतून किंवा विश्व-विद्यालयांतून नुकतेच बाहेर पडलेले अनुभवी तरुण नव्हेत. हे कनिष्ठ तरुण असतील परंतु स्वस्थानी विशिष्ट कामात पुरेसा अनुभव घेऊन ते सुस्थिर झालेले असतील. उच्च शिक्षणाच्या बाबतीतील त्यांच्या गरजा निश्चित असतील आणि असे शिक्षण त्यांच्या कामाच्या दृष्टीने निश्चित उपयुक्त ठरणारे असेल. हे लोक बौद्धिक व भावनात्मक दृष्ट्या परिपक्व असतील. त्यामुळे परदेशातील एक दोन वर्षांच्या वास्तव्याने ते विचलित होणार नाहीत. विवक्षित शिक्षणासाठी, विवक्षित ठिकाणी आणि एक किंवा दोन वर्षांच्या विवक्षित कालावधीसाठी अशा तरुणांना परदेशी पाठविण्यात यावे, आणि तेथून परतल्यावर त्यांनी आपल्या कामावर पुनश्च रुजू झाले पाहिजे असे बंधन त्यांच्यावर असावे. परदेशातील शिक्षण हा स्वदेशातील त्यांच्या कामाचाच एक भाग मानला जावा.

अशा प्रकारे आमच्या तरुणांना परदेशांमध्ये निवडक स्वरूपाचे व सहेतुक शिक्षण मिळाले तर त्यापासून आपला खूपच लाभ होईल यात मुळीच शंका नाही. म्हणून आपल्या सीमा बंद कराव्या लागतील असे जरी मी वर म्हटले असले तरी बाकीच्या जगापासून बौद्धिकदृष्ट्या आपण स्वतःस कोंडून घ्यावे असा त्याचा हेतू नाही. परदेशातील उच्च जीवनमानाच्या दडपणापासून आपले स्वतःचेच हितरक्षण करण्यासाठी आणि आपल्या बुद्धिवंतांना आपण मुकू नये यासाठी आपल्याला देशाची दारे बंद करावी लागतील. तथापि, दारे बंद झाली तरी खिडक्या मात्र उघड्याच राहतील आणि त्यातून सर्व प्रकारचे ज्ञान, विज्ञान, विद्या व विचार मुक्तपणे आमच्या देशात येत राहतील. तसेच आमच्यातील निवडक तरुण काही निश्चित कामांचे शिक्षण घेण्यासाठी परदेशांत जातील व तेथून परत येऊन स्वस्थानी रुजू होऊन हस्तगत केलेल्या ज्ञानाचा व विद्येचा उपयोग करतील. या प्रकारे विकसित व विकसनशील देशांमधील भौतिक संबंधांवर नियंत्रण ठेवणे अगत्याचे झाले आहे. हे एखाद्या आदर्शवादासाठी किंवा देशाभिमानाच्या फाजील कल्पनेकरिता नव्हे तर आपल्या दारिद्र्यामुळे ते करणे आपल्याला क्रमप्राप्त आहे. श्रीमंत आणि गरीब यांचा संपर्क आला असता गरीब लोक श्रीमंतांना लुटतील अशी भीती कोण्या एके काळी विद्यमान असली तरी तो धोका आता खासच उरलेला नाही. श्रीमंताकडून गरिबांची लूट किंवा पिळवणूक होण्याचा धोका आता अधिक संभवनीय आहे.

याकरिता गरिबानेच श्रीमंतापासून स्वतःचे रक्षण केले पाहिजे. याचा अर्थ असा की, विकसनशील देशांनी विकसित देशांशी संबंध ठेवताना अधिक जागरूक राहिले पाहिजे, अधिक तारतम्य बाळगले पाहिजे आणि अधिक सहेतूक बनले पाहिजे. या कामी त्यांना विकसित देशांकडून समजूतदारपणा, सहानुभूती व सहकार्य लाभावयास हवे.

आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यासंबंधीच्या संयुक्त राष्ट्रांच्या सल्लागार मंडळातर्फे ( U. S. Advisory Commission on Inter – national Educational and Cultural Affairs) 'बुद्धिवंतांची निर्यात ' (ब्रेन-ड्रेन) या विषयावर जिनीव्हा येथे ता. २५ व २६ ऑगस्ट १९६७ रोजी जगातील निवडक विचारवंतांचा एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादात पुण्याच्या .गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक प्रा. वि. म. दांडेकर यांनी भारताच्या संदर्भात. या विषयासंबंधी जे विचार मांडले ते त्यांच्याच शब्दांत या लेखाच्या द्वारे वाचकांना सादर केले आहेत.



प्रा, वि. म. दांडेकर

# पण नाही, पण....

व. पु. काळे

प्रदीप साखळकरची ही विचित्र 'थेअरी' तुम्हांला पटणार नाही हे मी प्रथमच सांगतो. प्रदीपचा मित्र रमाकांत शेवडे त्या दिवशी ज्या प्रमाणे प्रदीपचं ते अजब विधान ऐकून म्हणाला, " बोगस ! –" तसंच तुम्हीही कदाचित एकदम म्हणाल, " बोगस ! "

–पण असं एखाद्याला एकदम " बोगस " ठरवू नका ! –जग तुम्हांला वाटतं त्यापेक्षा फार निराळं आहे. समोर दिसणारा माणूस हा दिसतो त्यापेक्षा फार निराळा असतो. तर्काला सोडून किंवा स्वतःच्या वृत्तीला सोडून तो एकदम वेगळीच कृती करून दाखवतो. तुम्ही चमकता. हे कसं घडलं, असं निष्कारण, वारंवार, दुसऱ्यांना विचारीत बसता ! –आपल्याला माणसं कशी आहेत हे अजून समजत नाही, असं म्हणत स्वतःला अज्ञानी मानून गप्प बसता.

–असं का होतं माहीत आहे का ?–मी सांगतो. आपण पटकन् एखाद्याला " बोगस " म्हणून निकालात काढतो; व मोकळे होतो. मला तुम्ही सांगा, एवढ्या घाईघाईनं निर्णय घेऊन तुम्हांआम्हांला कुठं जायचं असतं ?–ही घाई नडते आपल्याला. आपण थोडं शांतपणानं घेतलं तर माणसाच्या सगळ्या हालचाली आपल्याला समजतील. माणसाच्या हालचाली, माणसाचे विचार ह्यावर किती गोष्टींचा पगडा असतोच असतो. पण निर्जीव वस्तूही माणसावर आपली हुकमत गाजवतात.

**इन जनरल बायका म्हणजे चालती बोलती कोडीच.**
**पण त्रिवेणी म्हणजे त्यातल्या त्यात विशेषच कोडं होतं.**



–चमकलात ना ह्या विधानावर ?–चमकणारच ! प्रदीप साखळकर त्या दिवशी रमाकांत शेवडेला असंच म्हणाला तेव्हा, रमाकांत पटकन् म्हणाला,

" बोगस."

" बिलकुल नाही. निर्जीव, जड वस्तूही माणसांवर परिणाम करतात. त्यांचे विचार बदलून टाकतात. "

" अशक्य ! "

" अरे अशक्य काय ?–माणूस ग्रहांच्या अंगठ्या काय मग उगीच वापरतो की काय ? "

प्रदीपचं हे विधान रमाकांतला खोडून काढता आलं नाही. आणि नंतर ज्या घटना घडत गेल्या, त्या पाहून तर रमाकांतनं प्रदीपला गुरूच मानलं; अर्थात् त्या सर्व घटना केवळ, केवळ रमाकांतच्या बायकोमुळे घडल्या !–

रमाकांतची बायको हे एक महान् कोडं होतं. –इन् जनरल बायका म्हणजे चालती बोलती कोडीच असतात. पण रमाकांतची बायको म्हणजे त्यातल्या त्यात एखाद्या विशेषांकाप्रमाणे–विशेष कोडं होतं.

रमाकांतचं लग्न झाल्यावर स्वतंत्र बिऱ्हाडासाठी तो जागा शोधायला लागला. त्या वेळी रमाकांतची बायको त्रिवेणी त्याला म्हणाली, " माणसांचा संपर्क होणार नाही अशी जागा पाहा. खोलीत अंधार चालेल, हवा कमी चालेल, पाण्याची गैर-सोयही मी खपवून घेईन. पण जाता-येता माणसांना सहज डोकावून पाहता येईल अशी जागा नको. "

रमाकांतचं व त्रिवेणीचं नशीब बलवत्तर म्हणायचं. त्यांना विलेपार्ल्याजवळ एका चाळीत जागा मिळाली. ती चाळ तशी दिसायला फार और होती. दारं-खिडक्या, भिंती, जिने, सगळंच काही विचित्र होतं. त्या चाळीसमोर आणखी एक चाळ होती. ती ह्या मानानं कितीतरी उजवी होती. एकाच मालकाच्या त्या दोन चाळी. पण त्यांच्या बांधणीत जमीन अस्मानाचा फरक होता.

पण रमाकांत–त्रिवेणीला त्याच्याशी कर्तव्य नव्हतं !–चाळ नवी होती. ती जोवर एवढ्यात पडण्याची भीती नव्हती तोवर तिथं राहायला हरकत नव्हती. खोली कोपऱ्यातली होती. अगदी त्रिवेणीला हवी तशी !–दोनच खोल्या होत्या, पण चांगल्या हवेशीर होत्या. हवेशीर म्हणजे वाजवीपेक्षा जास्तच हवा होती. कारण पुढच्या खोलीला पाच खिडक्या होत्या. त्या पाच खिडक्या तरी सारख्या असा-यच्या !–छे. नाव नको. बारकाईनं पाहणाऱ्या माणसाला त्या प्रत्येक खिडकीत काय काय फरक आहे ते पटकन् कळलं असतं. खिडक्यांचे नुसते गज जरी मोजले असते तरी पत्ता लागला असता.

पण कसंही असलं तरी त्रिवेणी जागेवर खूष होती. कारण त्या खोलीला माणसांचा संपर्क होणार नव्हता. त्रिवेणी फार म्हणजे पराकाष्ठेची माणुसघाणी

होती. रमाकांतच्या वारंवार येणाऱ्या मित्रांशीही त्रिवेणी चकार शब्द बोलायची नाही. प्रदीपनं तर रमाकांतचं घर वर्ज्य केलं होतं.

रमाकांत व त्रिवेणी ह्यांना पार्ल्याच्या जागेत आता नुकतेच दोन-तीन महिने झाले होते. एके दिवशी रमाकांत व त्रिवेणी एरोड्रोमच्या बाजूला फिरायला चालले होते, तेवढचात समोरून एक गृहस्थ आला. त्रिवेणीकडे पाहून तो हसला व त्याने " ठीक आहे ना ? " म्हणून विचारलं.

रमाकांतला प्रचंड धक्का बसला. त्यानं त्रिवेणीकडे पाहिलं. तिच्या कपाळावर आठी पाहून तर तो आणखीनच बुचकळचात पडला.

" तुझ्या ओळखीचा आहे का तो ? "

" भलतंच ?—तुमच्या नातेवाईकांशी पण मी कधी अजून बोलत नाही फार. मी किती माणूसद्वेष्टी आणि विचित्र बाई आहे हे तुम्हांला माहीत आहे. "

" मग तो प्राणी कसा बोलला ? "

" आता मला काय माहीत ते ! "

" म्हणजे त्यानं तुझी सभ्य भाषेत टवाळी केली का ? "

" असेलही. "

*With Best Compliments From*

**Associated Transport Co.**

*Licensed Clearing, Shipping, Forwarding, Warehousing and Insurance Agents,*

OFFICE

Sheel Chambers, 1st Floor, 10, Cawasji Patel Road
S. P. M. Road, Fort, Bombay 1

POONA BRANCH

3 rd Floor, The Bank of India Bldg.
Laxmi Road, Poona 2

Telephone No. 256870, 256947

Grams : 'ASSOTRANCO'

ह्या दोघांचा हा संवाद होईतो तो गृहस्थ दूरवर गेला होता. रमाकांत त्याच्यामागे धावत गेला. पाठीमागून त्या माणसाची मान पकडीत रमाकांत म्हणाला,

" कायहो मिस्टर, सभ्य माणसासारखा पोषाख करून वावरता आणि अनोळखी बायकांची छेड काढता का?"

पण तो प्राणी ताकदवान होता व शांतही होता. त्यानं आपली मान सहज सोडवून घेतली व तो बिलकुल आवाज न चढवता म्हणाला,

" मी ओळखीचा आहे की नाही हे तुमच्या बायकोला अगोदर विचारा."

" ती तुम्हांला ओळखत नाही."

" ठीक आहे. मग तुमच्या बायकोला विचारा की, खिडकीतून अनोळखी माणसांना खुणा कोणत्या बायका करतात ?"

रमाकांत चमकला ! – तोवर आजूबाजूला गर्दी झाली. आणि तेवढ्यात रमाकांतच्या इमारतीचा मालक त्याच्या मोटारीतून तिकडून जात असताना गर्दी पाहून थांबला. नुसता थांबला इतकंच नाही, तर ज्या गृहस्थाची रमाकांतनं मान पकडली होती त्या गृहस्थाला मालक म्हणाले,

" कोण ?– गोपीनाथ ?– काय प्रकार आहे ?– Are you in difficulties ?"

" छे, छे. ह्यांचा जरा गैरसमज झालाय्."

तोच मालक म्हणाले, " कोण शेवडेसाहेब का ?– अरे काय भानगड आहे ?"

" काही नाही मालक."– रमाकांत चेहरा टाकून म्हणाला.

" चला गोपीनाथ, तुम्हांला लिफ्ट देतो."

आणि तो गृहस्थ मालकांच्या मोटारीतून गेला. फिरणं आटोपतं घेऊन रमाकांत–त्रिवेणी घरी परतली. ती दोघं घरी आली पण रमाकांतचं लक्ष लागेना. तो पुन: खाली उतरला व तडक समोरच्या इमारतीत मालकांच्या ब्लॉकमध्ये गेला. मालकांनी पहिलाच प्रश्न विचारला,

" काहीतरी घोटाळा होता समजुतीचा मघाशी. काय झालं होतं ?"

" ते सांगतो. पण तो गृहस्थ तुमच्या चांगल्या ओळखीचा दिसतोय."

" अहो तो टेनंट आहे माझा. ह्याच चाळीत आहे. त्याच्यासारखा सालस माणूस मी आजवर पाहिला नाही."

" मग त्यानं माझ्या बायकोची चेष्टा का करावी ?"

" चेष्टा केली म्हणजे काय केली ?– ठीक आहे ना ?– एवढंच विचारलं ना?"

" पण ओळख नसताना का विचारावं ?"

मालक रमाकांतच्या ह्या प्रश्नावर गप्प बसले. आणि मग जरा वेळानं शांतपणे म्हणाले,

" मिस्टर शेवडे, मामला जरा नाजूक आहे. मला तुमची किंवा तुमच्या मिसेस्‌ची काहीच माहिती नाही फारशी. पण गोपीनाथला मी फार वर्षं ओळखतोय. त्याचं म्हणणं फार निराळं आहे."

" मला कळू दे."

" तुम्हांला फुकट मनस्ताप होईल."

" होऊ दे. सांगा."

" गोपीनाथ म्हणतो, तुमची बायको खिडकीतून त्याला भलत्याभलत्या खुणा करते."

रमाकांत सर्द झाला. तिथं फार वेळ न थांबता तो घरी आला. त्रिवेणीनं विचारलं,

" काय म्हणतात मालक ?"

" ते त्याच माणसाची बाजू घेतात."

" जगात हलकट माणसांचीच मेजॉरिटी असते हेच खरं."

डोक्याला खूप त्रास करून घेतल्यावर एके दिवशी प्रदीप साखळकराला रमाकांतने हा किस्सा सुनावला. प्रदीपला खाद्य मिळालं.

" मी ह्याचा छडा लावतो."– त्यानं विडा उचलला.

एखाद्या डिटेक्टिव्ह ऑफिसरप्रमाणे प्रदीपने मग रमाकांतचं घर बारकाईनं पाहून घेतलं. आणि मग तो एक दिवस समोरच्या इमारीत मुक्कामाला गेला. त्या गॅलरीतून त्याला आता रमाकांतच्या चाळीतील सगळे व्यवहार दिसत होते. रमाकांत कामावर गेला. आणि खरोखरच त्रिवेणीनं खिडकीत उभं राहून चक्क प्रदीपलाच खुणा करायला सुरुवात केली. एरव्ही आपल्याला ही बाई ओळखही दाखवत नाही, मग हा काय अजब प्रकार आहे ? – म्हणजे ह्या मामल्यात गोपीनाथचं म्हणणं खरं ठरतं. मग रमाकांतला फार मोठा धक्का बसेल. काय करावं ?– वहिनी पण तशा नाहीत.

शेवटी एक कल्पना मनात येऊन प्रदीप तडक मालकांकडे गेला. त्यानं रमाकांतची ओळख सांगितली. नमस्कार–चमत्कार झाल्यावर प्रदीपनं विचारलं,

" काही दिवस खोली मिळेल का राहायला ?"

" सॉरी. तेवढंच फक्त विचारू नका."

" पेइंग गेस्ट पण नाही मिळायची ?"

" तुमच्या दोस्तालाच विचारा की."

" नको. मित्रामित्रांत व्यवहार नको वाटतो. तशी मला गरज फार कमी दिवसांसाठी आहे. माझ्या इमारतीचं बांधकाम सुरू झालं की प्लॉटवरच एक झोपडी उभी करून, किंवा तंबू ठोकून राहीन."

बांधकामाचं नाव काढल्यावर समोरची आसामी बडी आहे हे मालकांनी

ओळखलं.

" हात्तिच्या, तोवर माझ्या ब्लॉकमध्ये राहा. कुठं घेतलीय जागा ?"

" हा काय, पलीकडचाच प्लॉट नजरेत भरलाय."

" म्हणजे खरेदी व्हायची आहे तर अजून ? – माझाही त्या प्लॉटवर डोळा होता. पण तो सुंदरलाल खाली यायला तयार नाही."

प्रदीप आता जरा गडबडला. पण 'सुंदरलाल' हे त्या प्लॉटच्या मालकाचं नाव त्याला आपोआप कळलं. पुन: खडा टाकायचा म्हणून तो म्हणाला,

" किती म्हणतोय ?"

" नव्वदच्या खाली यायला तयार नाही."

" मलाही अडवलाय् त्याच आकडयावर. मी सत्तर कबूल केले होते."

" अहो, ती ऑफर तर मीही त्याला दिली होती." –मालक म्हणाले.

आपली आणखी एक 'ट्रिक' यशस्वी झाल्याचा प्रदीपला आनंद वाटला. आता आपल्याला हव्या त्या मुद्द्याकडे गाडी वळवणं आणखी शक्य झालं होतं; ह्याची प्रदीपला खात्री वाटली. तो मग हळूच म्हणाला,

" समोरची बिल्डिंग अलीकडचीच ना ? "

" हो."

" काय बिल्डिंग कॉस्ट पडली ? "

" तेवढंच नका विचारू. कारण समोरच्या इमारतीत मी वाट्टेल ते प्रकार केले आहेत. "

" कसे काय ? "

" पुष्कळ तऱ्हेने. जस्ट टू रिडयूस द कॉस्ट. "

" म्हणजे नक्की काय केलंत ? – प्लीज गाईड मी. " – प्रदीपनं जाणून बुजून स्वत:कडे कमीपणा घेत म्हटलं. एखाद्या पैसेवाल्या माणसाला, " मला मार्गदर्शन करा " म्हटलं– की तो एकदम खूष होतो, हे प्रदीपनं हेरलं होतं. मनुष्यस्वभावाची ही कळ कुठल्याही माणसाला बोलकं करण्यासाठी दाबता येते – हे प्रदीपला माहीत होते ! – इथंही तीच 'कळ' कामी आली. मालक उत्साहानं म्हणाले,

" या बाहेर. तुम्हांला प्रत्यक्षच काय ते दाखवतो. "

प्रदीप उठला. मालकांच्या पाठोपाठ बाहेर आला. समोर बोट करीत मालक म्हणाले,

" ते पाहा आता. तळमजल्यावरचा तो दरवाजा आहे, लोखंडी जाळीचा, तो मी पुण्याहून मागवला. "

" पुण्याहून ? "

" हो. म्हणजे, आमच्या कॉन्ट्रॅक्टरने. त्याच्याजवळ पुण्याच्या एका इमारतीसाठी तो बनवलेला होता. पण पुण्यातल्या लोकांनी ऐनवेळी तो नापसंत केला. मग तो

दीपावली शुभचिंतन

# दि स्वदेशी केमिकल्स

**प्रायव्हेट लिमिटेड**

फोन : २५२१३३

तिसरा मजला, आर्मी अॅण्ड नेव्ही बिल्डिंग
महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई १ (बी. आर.)

*निर्मिति*

- पोटॅशियम परमँगनेट
- पोटॅशियम् कार्बोनेट
- सल्फेट ऑफ अॅल्युमिना अॅनहायड्रस
- मॅग्नेशियम सल्फेट अॅनहायड्रस
- ट्राय सोडियम फॉस्फेट अॅनहायड्रस
- सोडियम अॅल्युमिनियम सल्फेट अॅनहायड्रस

*रजिस्टर्ड ऑफिस*

**चिंचपोकळी क्रॉस लेन, व्हिक्टोरिया गार्डन,**
**मुंबई २७, डी. डी.**

मी पाऊण किमतीत मिळवला. त्यात माझे ११२ रुपये वाचले. म्हणून म्हणालो, बिल्डिंग कॉस्ट विचारू नका. आता तुमच्या दोस्तानं खोली घेतली ना, त्याचंच पाहा. "

— प्रदीप कान टवकारीत म्हणाला,

" त्याचं काय ? "

" ती खिडकी पाहा ना. इतर सर्व खिडक्यांपेक्षा निराळी वाटते ना ? "

" हो. "

" आता ती खिडकी काय मी मुद्दाम बनवली ? मुळीच नाही. गिरगाव ग्रॅण्ट-रोड भागात एक मोठी इमारत कोसळली. अर्धी कोसळली आणि अर्धी कॉर्पोरेशननं पाडली. त्यातलं मटेरियल मी लिलावात घेतलं. ह्यात मला बऱ्याच खिडक्या मिळाल्या. त्या मी खालच्या दुकानांना वापरल्या. मागच्या बाजूला; आणि एक त्यातल्या त्यात चांगली होती ती तिथं वापरली."

— प्रदीपच्या टाळक्यात त्याच क्षणी एक कल्पना आली. संतोषानं मान हलवीत तो म्हणाला,

" वा, वा, तुम्ही ही चांगली आयडिया दिलीत. मालक, मला ती इमारत कुठे होती हे एक्झॅक्टली सांगाल का ? "

" तिथं तुम्हांला आता काहीच मिळायचं नाही. पण..."

" त्यासाठी नाही. सहज विचारतो."

मालकांनी पत्ता सांगितला.

मालकांनी दिलेल्या पत्त्यावर प्रदीप गेला. तिथं पाहतो तो एका नव्या इमारतीचं बांधकाम वेगानं चाललं होतं. पडलेल्या आणि पाडलेल्या इमारतीचा मागमूस तिथं उरला नव्हता. माहिती मिळवण्याचं उत्तम ठिकाण म्हणजे एखादं हेअर कटिंग सलून ! — प्रदीप समोरच्याच सलूनमध्ये गेला. प्रदीप जेव्हा आत शिरला तेव्हा सलूनचा नोकर सलून झाडत होता. आरशासमोर खुर्चीवर बसत प्रदीप म्हणाला,

" ह्या समोरच्या बांधकामापायी धुरळा फार येत असेल. "

— सलूनवाला लगेच म्हणाला,

" काही विचारू नका साहेब. तरी बांधकामाचा कचरा परवडला. मागं इमारत पाडायचं काम चाललं होतं, तेव्हा फार वैताग आला. "

— " तुम्हांला फक्त धुरळ्याचा त्रास झाला; पण त्या इमारतीत जे लोक राहत होते त्यांना केवढा वैताग आला असेल ?"

" आता साहेब वैताग म्हणजे साफ पोटापाण्याचा धंदा बसला की काहीकाहींचा."

" कोण कोण होते रे ? "

" साहेब ते तुमच्यासारख्यांनी विचारू नये आणि आम्ही सांगू नये."

“ का ? ”

“ साहेब ते न सांगण्यासारखं आहे. ”

सलूनवाल्याच्या कलानं घ्यायचं म्हणून प्रदीप म्हणाला,

“ बरं नका सांगू. कारण, तुमच्यासारखा सरळ माणूस उगीच आढेवेढे घ्यायचा. ”

ही आणखी एक मनुष्यस्वभावाची कळ. अगदी हलकटांतल्या हलकट माणसाला,–‘ काडचा ’ घालणाऱ्या माणसालाही–लोकांनी आपल्या सरळ स्वभावाचा म्हणून ओळखावं अशी भूक असते. तीच कळ प्रदीपनं दाबली. सलूनवाला खुलला; म्हणाला,

“ नाही म्हणजे साहेब, तसं नाही विशेष ! – पण साहेब, तुम्ही बाहेरगावचे की इथले ? ”

“ मी, साताऱ्याचा. ”

“ मग बरोबर. तुम्हाला सांगायला हरकत नाही. साहेब इथं सगळ्या ‘ त्या ’ बायका राहायच्या. ” – एवढं म्हणून सलूनवाल्यानं नाकपुडीवर बोट आपटलं.

प्रदीपला क्षणात उलगडा झाला !

प्रदीप साखळकर – रमाकांतच्या घरी जाऊन रमाकांतला म्हणाला, “ मालककडून ही एवढी खिडकी कायमची बंद करून घे नाहीतर बदलून घे.” ○


दीपावली शुभचिंतन

अर्कशालानिर्मित

युटोन | शिशुजीवन

स्त्रियांचे विकारांवर उत्कृष्ट टॉनिक


बालकांचे प्रकृति-स्वास्थ्यासाठी

आयुर्वेदीय अर्कशाला लिमिटेड, सातारा



"माझं भवितव्य आता ठरलं आहे.
सिंहासन नाही तर फाशीचा खांब.
खांब टळला होता पण
सिंहासन दिसत नव्हते"

—लेनिन



# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

२१

फिनलंड स्टेशन ते क्शेसिन्स्काया प्रासाद हे अंतर काही फार नव्हते. परंतु स्टेशनपासून जागजागी लेनिनचे एवढे भव्य स्वागत होत होते की क्शेसिन्स्काया प्रासादात पोचायला त्याला तास लागला. लेनिनच्या स्वागतासाठी दाटी-वाटीने उभ्या असलेल्या पेट्रोगाडमधील जनतेने त्या दिवशी वाहतुकीचे सारे नियम झुगारून दिले होते. 'तो आला, त्याने पाहिले, त्याने जिंकले' ही उक्ती लेनिनच्या बाबतीत सार्थ ठरली होती. रशियाची सूत्रे स्वीकारण्याचे कोणाच्या मनगटात सामर्थ्य आहे हे सांगायला आता भविष्यवेत्त्याची गरज उरलेली नव्हती. गेली दहा वर्षे लेनिन रशिया-पासून दूर होता. पेट्रोग्राडमध्ये आपले कसे काय स्वागत होते यासंबंधी तो प्रवासात साशंक होता. परंतु इतिहास जणू त्याच्या आगमनाचीच वाट पाहत उभा होता. लेनिनने रशियन भूमीवर पदार्पण केले तो क्षण नव्या इतिहासाचा प्रारंभकाल ठरणार होता. 'मी एक तर सिंहासनावर चढेन किंवा फासावर' अशी प्रतिज्ञा करूनच हा जातिवंत क्रांतिकारक मायभूमीला परतला होता. पेट्रोग्राडमधील ते विराट स्वागत पाहिल्यानंतर फाशीची काटेरी वाट आपल्याला तुडवावी लागणार नाही हे लेनिनला कळून चुकले. उरला होता तो सिंहासनाचा राजमार्ग. परंतु या मार्गा-वरील वाटचालही अवघड आहे याचे

लेनिनला मान होते. त्याच्याच भाषेत बोलायचे तर या सिंहासनाकडे जाण्यासाठ आणखी एका धक्क्याची गरज होती. क्शेसिन्स्काया प्रासादात पोचताच लेनिन त्याच तयारीला लागला.

या राजप्रासादातील जुन्या सरंजामशाही वैभवाच्या खुणा सांगणारे फर्निचर लेनिनच्या आगमनापूर्वी हलविण्यात आले होते. या किमती फर्निचरची जागा बोल्शेव्हिक पक्षाच्या कचेरीला शोभणाऱ्या साध्यासुध्या टेबल-खुर्च्यांनी घेतली होती. बोल्शेव्हिक क्रांतीची खलबते या प्रासादाच्या भिंतींना लवकरच ऐकावयास मिळणार होती.

दुपारी साडेबाराच्या सुमारास लेनिनने क्शेसिन्स्काया प्रासादात प्रवेश केला. या प्रासादाच्या वरच्या मजल्यावरील एक दालनामध्ये तीसएक प्रमुख बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांनी लेनिनच्या स्वागतासाठी चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. चहापानाला प्रारंभ होण्यापूर्वी, केंद्रीय बोल्शेव्हिक समितीच्या पेट्रोग्राडमधील पदाधिकाऱ्यांनी लेनिनच्या स्वागतावर भाषणे करावीत असेही ठरले होते. परंतु असल्या औपचारिक कार्यक्रमामध्ये लेनिनला मुळीच रस नव्हता. आता आपण कोणते पाऊल टाकावयाचे याचीच सर्वांनी गंभीरपण चर्चा केली पाहिजे असा त्याचा आग्रह होता.

क्शेसिन्स्काया प्रासादाबाहेर प्रचंड जनसमुदाय जमला होता. हातात लाल झेंडे घेतलेला हा जनसागर लाटेवर लाट आदळावी त्याप्रमाणे 'कॉमरेड लेनिन की जय'चा सतत गजर करीत होता. या नागरिकांचा उत्साह एवढा शिगेला पोचला होता की दर पाच मिनिटांनी लेनिनला व्हरांड्यात येऊन या स्वयंस्फूर्त अभिवादनाचा स्वीकार करणे भाग पडत होते. त्याने निदान चार शब्द तरी बोलावेत असाही सारखा आग्रह होत होता. लोकांची ही मागणी मान्य करण्यावाचून गत्यं-


दीपावली अभीष्टचिंतन

उंची कल्चर्ड मोत्यांचे

फॅन्सी खड्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार व ऑर्डरप्रमाणे तयार करून मिळतील.

**देवधर मोतीवाले,**

९३२ सदाशिव, लक्ष्मी रोड, पुणे २.

'HIND'

तरच राहिलेले नव्हते. आपली मूठ आवळीत लेनिन गर्जू लागला, 'मूठभर भांडवलदारांचे खिसे भरले जावेत, म्हणून लुटारू राज्यकर्ते युद्धाचा खेळ खेळत असतात. मातृभूमीच्या संरक्षणासाठी आम्ही झुंजत आहोत असा त्यांचा पुकारा असतो. पण हे सारे झूट आहे. आज युरोपच्या भूमीवर सुरू असलेले युद्ध म्हणजे भांडवलदार लुटारूंच्या एका टोळीने दुसऱ्या टोळीपासून आपले स्वतःचे रक्षण करण्यासाठी मायभूमीच्या संरक्षणाच्या नावाखाली घेतलेला एक बुरखा आहे असेच मी म्हणेन.'

जनसमुदायात अनेक सैनिकही होते. त्यातील एक सैनिक बोलला, 'ही असली भाषा बोलणाऱ्याच्या पोटात संगीन खुपसली पाहिजे.' या सैनिकाच्या शेजारी एक कामगार उभा होता. त्याला तो सैनिक म्हणाला, 'लेनिन काय बोलतोय हे तुम्हांला तरी कळतंय काय? त्याला म्हणावं खाली ये म्हणजे मी दाखवतो. आपण सारेचजण त्याला ठीक करू या. लेनिन जर्मनीचा हस्तक आहे असं जे म्हटलं जातं ते खरं आहे याची आता खात्रीच पटली. खरं म्हणजे त्याला...'

त्या सैनिकाचे पुढचे शब्द कोणालाच ऐकू आले नाहीत. कारण एवढ्यात लेनिन पुन्हा व्हरांड्यात आला होता आणि त्याचा पुन्हा जयजयकार सुरू झाला होता. लेनिनचे भाषण सुरू झाले. तो सैनिकही हळूहळू त्या भाषणात रंगून गेला. नकळत इतरांप्रमाणेच तोही टाळ्यांचा गजर करू लागला. लेनिनचे भाषण संपल्यानंतर तो सैनिक मघाच्याच कामगारास म्हणाला, 'लेनिन म्हणतो तेच खरं आहे. सारे भांडवलदार चोर आहेत. आपण आपल्या संगिनी त्यांच्याच पोटात खुपसल्या पाहिजेत.'

लेनिनला नको असतानाही चहापानाच्या वेळी स्वागतपर भाषणांचा कार्यक्रम झालाच. ही भाषणे आटोपल्यानंतर तो बोलावयास उभा राहिला. लेनिन एवढा प्रदीर्घ काळ रशियाबाहेर असतानाही आपण त्याचे कार्य नीट चालू ठेवले म्हणून तो आता आपले आभार मानील अशीच प्रत्येकाची कल्पना होती. परंतु लेनिनचे


**दीपावली अभीष्टचिंतन**

**★ साधना फोटो स्टुडिओ,** लक्ष्मी रोड, सोन्यामारुतीजवळ पुणे २.

**★ नंदकिशोर फोटो स्टुडिओ,** डेक्कन जिमखाना चौक, पुणे ४.

**★ रेडिओ फोटो हाऊस ★**
३७७ शुक्रवार, शाहू चौक, पुणे २.

प्रारंभीचे शब्द ऐकताच ही मंडळी चपापली. लेनिनने त्यांची प्रशंसा तर केली नाहीच. उलट अतिशय तिखट भाषेत तो त्यांना दूषणे देऊ लागला. लेनिन म्हणाला, 'तुमच्यासारखे भ्याड कार्यकर्ते बुर्झ्वा शत्रूपेक्षाही मला अधिक तिरस्कारार्ह वाटतात. तुमच्या हातून कधीकाळी क्रांती होईल ही अपेक्षा करणे व्यर्थ आहे. कारण सच्च्या क्रांतिकारकाला क्रांतिशिवाय दुसरा कोणताच विचार सुचत नाही. उलट तात्पुरत्या फायद्यासाठी तुमची क्षुद्र नजर सारखी घोटाळत असल्याचे मी पाहिले आहे. आता तरी आपण एक क्षणही वाया घालवता कामा नये. आपल्याला अभिप्रेत असलेल्या क्रांतीचा अर्धा भाग पुरा झाला आहे. आपल्याला आता उरलेला अर्धा भाग पुरा करावयाचा आहे. त्यासाठी नुकतेच जन्माला आलेले प्रजासत्ताक नष्ट करून सर्व सत्ता सोव्हिएटच्या हाती येईल अशी व्यवस्था केली पाहिजे. त्याशिवाय क्रांतीची पूर्तता होणार नाही. ही क्रांती करू इच्छिणाऱ्यांनी कालबाह्य ठरलेल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे नावदेखील वापरता कामा नये. आपण सारे कम्युनिस्ट आहोत आणि याच एका नावाने आपण ओळखले गेलो पाहिजे.'

त्या नंतर हसत हसत तो म्हणाला, 'मी जेव्हा झुरीकहून पेट्रोग्राडकडे येत होतो तेव्हा स्टेशनवरून सरळ आपल्याला फाशीच्या खांबाकडे नेण्यात येईल अशी एक कल्पना माझ्या डोक्यात थमान घालीत होती. आता आपण त्या खांबापासून बरंच दूर गेलो आहोत ही गोष्ट खरी असली तरी तो अनुभव घ्यावाच लागणार नाही, अशा भ्रमात मात्र राहू नका.'

पेट्रोग्राडला पोचून लेनिनला अवघे काही तासच झाले होते आणि तरीही क्रांतिशिवाय तो दुसरे काहीही बोलत नाही हे पाहून त्याचे सहकारी आश्चर्यचकित झाले. सुखानोव्ह लिहितो, 'या भाषणात लेनिन एकच गोष्ट सारखी सांगत होता. परंतु त्याचे भाषण ऐकताना हातोड्याचे घण आपल्या कानांवर पडत आहेत असा भास होत होता. लेनिनचे निरपवाद नेतृत्व प्रस्थापित करायला त्याचे हे पहिले भाषणही पुरेसे होते. साध्या शब्दांनी दरारा उत्पन्न करण्याची त्याची शक्ती खरोखरच असामान्य होती.'

HAPPY DIWALI HAPPY DIWALI

**Engineering Developments**

*1325 / IK / 1 Udyamnagar, Kolhapur*

*Phone : 1341*

LEADING MANUFACTURERS OF :

Crankshafts for Diesel Engines. Connecting rods for diesel engines, Surface plates and all types of Precision Job-work.

या बैठकीला जे तीस कार्यकर्ते उपस्थित होते त्यांपैकी एकट्या सुखानोव्हचा अपवाद सोडला तर बाकीचे सारेजण जुने आणि अनुभवी कार्यकर्ते होते. तरीही शाळकरी विद्यार्थ्यांनी आपल्या करड्या शिक्षकाचे भाषण ज्या भीतीने ऐकत बसावे त्या भीतीने हे सारे लेनिनचे भाषण ऐकत होते. लेनिनच्या या भाषणात सिद्धान्त आणि व्यवहार यांची संगती होती असेही नव्हे. एकीकडे तो अराजकाचा पुरस्कार करीत होता, तर लगेच दुसऱ्या वाक्यात सर्व सत्ता सोव्हिएटच्या हाती केंद्रीभूत झाली पाहिजे असे सांगत होता. एकीकडे तो लोकशाही आणि शांतता यांचा पुरस्कार करीत होता, तर अधून मधून तो याच कल्पनांची टर उडवीत होता. शासनयंत्रणाच नष्ट झाली पाहिजे, असे तो एकदा सांगत होता, तर दुसऱ्याच वाक्यात कामगारांच्या कणखर हुकूमशाहीची आवश्यकता तो प्रतिपादन करीत होता. ‘ एवढ्या परस्पर-विसंगतीने भरलेले भाषण क्वचितच कोणी ऐकले असेल ’ असे सुखानोव्हने लिहिले आहे. लेनिन जवळ जवळ दोन तास बोलत होता. या भाषणाच्या प्रारंभी त्याने घटना समितीला पाठिंबा दिला होता. परंतु नंतरच्या साऱ्या भाषणात मात्र ‘ आम्हांला संसदीय लोकशाही नको, ’ असेच तो सांगत होता. या परस्पर-विरोधी विधानांचा मेळ कसा घालायचा याचा विचार करण्याची त्या वेळी कोणालाच गरज वाटली नाही. हा समारंभ आटोपून घरी परतल्यानंतर

## ☐ अभिप्राय :

‘ हंस ’चे संपादक कै. अनंत अंतरकर यांचेकडे एक वर्षाला



१०–१२ कादंबऱ्या हाणणारा लेखक, न चुकता अभिप्रायाला पुस्तके धाडीत असे. वरचेवर उलट उत्तरासाठी टपाल हशील असलेली स्मरणपत्रे धाडूनही अंतरकर दाद देत नसत.

आपली नवी कादंबरी अंतरकरांकडे पाठवताना त्या गळेपडू लेखकाने संतापून लिहिले–

“ माझ्या मागील पुस्तकांवर आपण अभिप्राय दिला नाही. या वेळी मात्र हे मुळीच खपणार नाही...! ”

अंतरकरांचे उत्तर गेले–

“ हे मुळीच खपणार नाही, या आपल्या मताशी मी पूर्वीपासूनच सहमत आहे ! ”

–ग्यानबा

सुखानोव्ह म्हणाला, ' आपल्याला कोणीतरी चाबकाने फोडत आहे, असे लेनिनचे भाषण ऐकताना सारखे वाटत होते. त्याबरोबरच एक गोष्ट समजून आली की, माझ्यासारख्या स्वतंत्र वृत्तीच्या माणसाला लेनिनची संगत परवडणार नाही.'

लेनिन आणि क्रुपस्काया यांनी त्या रात्री आपल्या बहिणीकडे–ॲनाकडे–मुक्काम केला. मारिआही आपल्या भावाच्या भेटण्यासाठी तेथे आली होती. त्या दिवशी लेनिन फारसे कुणाशीच बोलला नाही. क्रुपस्कायाने लिहिलेले आहे– 'साऱ्या गोष्टी इतक्या स्पष्ट झाल्या होत्या की, लेनिनने त्यांचा पुनरुच्चार करण्याची गरजच उरलेली नव्हती.' पेट्रोग्राडच्या वास्तव्यातील पहिल्याच दिवशी लेनिनने बोल्शेव्हिक पक्षावर आपले सर्वंकष प्रभुत्व प्रस्थापित केले आहे ही गोष्ट त्या वेळी खरोखरच स्पष्ट झाली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी रशियाभर विखुरलेल्या सोव्हिएट्समधील बोल्शेव्हिक प्रतिनिधींची पेट्रोग्राड येथे बैठक बोलविण्यात आलेली होती. लेनिनचे विचार या प्रतिनिधींना समजावेत म्हणून त्याच्या आगमनापूर्वीच हा कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला होता. परंतु ही गोष्ट दिवसभराच्या गडबडीत लेनिनला सांगावयाची राहूनच गेली होती. पक्षप्रमुख पेट्रोग्राडला परतला असताना त्याच्याशिवाय इतर कोणीही या बैठकीत बोलणे इष्ट ठरणार नव्हते. लेनिन क्शेसिनकाया प्रासादातून ॲनाच्या घरी गेल्यानंतर या बैठकीच्या निमंत्रकापुढे बैठकीची बातमी लेनिनला कशी कळवायची हा प्रश्न उभा राहिला. त्याला रात्री उठवून हे कळविण्याचे धाडस करण्यास कोणीच तयार नव्हता. शेवटी उद्या सकाळी त्याला भेटून या बैठकीचे निमंत्रण द्यावे असे ठरले.

आदल्या दिवशीच्या श्रमांमुळे आणि जागरणामुळे लेनिन दुसऱ्या दिवशी दहा वाजता उठला. त्यानंतर बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांनी त्याची भेट घेऊन त्याला बैठकीला येण्याचे निमंत्रण दिले. 'दुपारच्या बैठकीला येतो,' असे लेनिनने सांगताच या कार्यकर्त्यांनी त्याला सकाळच्या बैठकीसाठी आपला आगामी कार्यक्रम लिहून देण्याची विनंती केली. संपूर्ण कार्यक्रम लिहून काढण्याइतका वेळ नव्हता. म्हणून लेनिनने एक लहानसा कागद घेऊन त्यावर आपल्या आगामी कार्यक्रमाचे सूत्रबद्ध टिपण केले. लेनिनने ही सूत्रे इतक्या घाईघाईने लिहिली होती की, ती अक्षरे त्याची त्यालाच वाचता येणे कठिण झाले होते. या कागदावर आपण हे जे टिपण करीत आहोत त्याचे अल्पावधीतच रशियावर आणि पर्यायान साऱ्या जगावर किती दीर्घकालीन परिणाम होणार आहेत याची लेनिनला त्या वेळी मुळीच कल्पना नव्हती. इंग्लंडच्या मॅग्नाचार्टाप्रमाणे किंवा अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याप्रमाणे लेनिनची ही क्रांतिसूत्रे एका नव्या जगाची निर्मिती करणार होती. तळघात एखादा

खडा टाकताच त्यामुळे जशी पाण्यावर अगणित वर्तुळे निर्माण होतात तसाच हा कागदाचा साधा तुकडा मानवी इतिहासात अनेक वर्तुळे निर्माण करणार होता. आणखी सहा महिन्यांच्या आतच रशियात जी बोल्शेव्हिक क्रांती झाली तिचे मूळ या कागदाच्या लहानशा तुकड्यातच सामावलेले होते.

या क्रांतिसूत्रांच्या प्रारंभी लेनिनने महायुद्धाचा धिक्कार केलेला होता. महायुद्धाबाबतच्या हंगामी सरकारच्या धोरणावर दुपारच्या भाषणात तो कडाडून हल्ला चढविणार होता. त्याचीच ही नांदी होती. रशियाने भांडवलवादी सत्तांच्या संघर्षातून बाहेर पडले पाहिजे असा त्याचा प्रारंभापासूनच आग्रह होता. त्यातून या युद्धात भाग घेतल्यामुळे रशियाची जी दीन अवस्था झाली होती तिच्यामुळे या आग्रहाला नवा अर्थ प्राप्त झाला होता. रशियात संसदीय प्रजासत्ताक निर्माण करण्याऐवजी कामकरी, शेतमजूर, शेतकरी आणि सैनिक यांच्या प्रतिनिधींचे राज्य स्थापन झाले पाहिजे यावर या क्रांतिसूत्रात लेनिनचा विशेष भर होता. संपूर्ण समाजवाद एकदम प्रत्यक्षात आणण्याऐवजी उत्पादित वस्तूंचे उत्पादन आणि वाटप यांवर क्रमाक्रमाने सोव्हिएटचे नियंत्रण प्रस्थापित व्हावे असेही लेनिनने सुचविले होते. याशिवाय जागतिक समाजवादी क्रांतीसाठी कम्युनिस्ट इंटरनॅशनल ही संघटना उभारण्याचा आपला आग्रहही लेनिनने या क्रांतिसूत्रात ग्रंथित केला होता.

पेट्रोग्राडमध्ये येऊन चोवीस तास होत आहेत न आहेत तोच लेनिनने कोणतीही पूर्वतयारी न करता अगदी घाईघाईत लिहिलेली ही सूत्रे त्याच्या क्रांतिप्रवण मनःप्रवृत्तीची साथ देण्यास पुरेशी आहेत. लेनिन कागदाच्या त्या लहानशा तुकड्यावर एक एक शब्द लिहीत होता आणि त्यासरशी जणू विद्यमान समाजरचनेचा एक एक खांब खाली कोसळत होता. रशियाचे तत्कालिन स्वरूप पूर्णतया नष्ट करणे हाच त्याचा एकमेव ध्यास होता. लेनिनला तत्कालिन् सैन्य नको होते, नोकरशाही नको होती, पोलिसदेखील नको होते. त्याला संपूर्ण नवी उभारणी हवी होती. या नव्या उभारणीचे सुसंगत चित्र त्याच्या डोळ्यांपुढे उभे होते असेही नव्हे. परंतु जे जे म्हणून आज अस्तित्वात आहे त्याचा त्याचा विनाश करण्यातच तो आपली ध्येयपूर्ती मानीत होता.

'एप्रिल थीसीस्' या नावाने संबोधण्यात येणाऱ्या या सूत्रांमध्ये जर केवळ विद्यमान समाजरचना नष्ट केली पाहिजे एवढे एकच विधान लेनिनने केले असते तर या 'थीसीस्'ला फारसे महत्त्व प्राप्त झाले नसते. परंतु एकीकडे शासनसंस्थाच नष्ट व्हावी असे म्हणणारा लेनिन बोल्शेव्हिक क्रांती झाल्यानंतर सर्व सत्ता सोव्हिएटच्या हाती केंद्रित व्हायला हवी असे आग्रहाने प्रतिपादन करीत होता. सध्याची शासनसंस्था नष्ट केल्यानंतर तिच्या जागी कामगारांची हुकूमशाही स्थापन व्हावी हे सुचविताना या नव्या शासनयंत्रणेचे स्वरूप लेनिनने क्रांतिपूर्वी कधीही विशद

केलेले नाही. येथेच त्याचे नेचॅयेव्हबरोबरचे साम्य प्रतीत होते. जे उभे आहे ते मोडले पाहिजे हे सांगणारा क्रांतिकारक लेनिन नवे काय उभारावयाचे याचे संगतवार आणि तपशीलवार चित्रण करीत नाही. तसा विचार करण्याची त्याला गरजही वाटत नाही. यातच समाजवादापेक्षा त्याचा क्रांतीचा आग्रह अधिक प्रभावी होता हे स्पष्ट रीतीने दिसून येते. क्रांतीसाठी त्याला तत्त्वज्ञान हवे होते आणि त्यासाठीच तो मार्क्सवादाकडे वळला होता इतकेच. लेनिनच्या व्यक्तिमत्त्वाच्या रसायनाची तपासणी केली तर त्यात क्रांतीचा मालमसालाच अधिक आढळतो. त्या रसायनात मार्क्सवादाला स्थान असलेच तर ते फार दुय्यम आहे.

बोल्शेव्हिक प्रतिनिधींच्या दुपारच्या बैठकीला लेनिन हजर राहिला. सकाळच्या बैठकीत त्याची क्रांतिसूत्रे वाचून दाखविण्यात आली असल्यामुळे आपल्या भाषणात त्याने या सूत्रांचे विवरण केले. कम्युनिस्ट पक्षाचा दहा कलमी कार्यक्रम जाहीर करताना तो म्हणाला, 'जगातील बहुतेक सोशल डेमोक्रॅटिक कार्यकर्त्यांनी समाजवादाचा विश्वासघात करून आपापल्या सरकारांशी संगनमत केले आहे. त्यामुळेच सोशल डेमोक्रॅटिक पक्ष या नावातील मूळचा अर्थ नष्ट झाला आहे. म्हणून आजपासून आपला पक्ष 'कम्युनिस्ट पक्ष' या नावाने ओळखला जावा.

बोल्शेव्हिक प्रतिनिधींची बैठक क्शेसिन्स्काया प्रासादाच्या पहिल्या मजल्यावर चालू असताना तळमजल्यावर मेन्शेव्हिक कार्यकर्ते जमले होते बोल्शेव्हिक आणि मेन्शेव्हिक या दोन गटांत ऐक्य प्रस्थापित करता येईल काय यासंबंधी त्यांचा विचार चालू होता. म्हणून बोल्शेव्हिकांनी खाली येऊन दोन्ही गटांची संयुक्त बैठक व्हावी व त्यात समझोत्याचा विचार व्हावा असा मेन्शेव्हिकांनी, लेनिनला निरोप धाडला. मेन्शेव्हिकांबद्दल लेनिनला प्रारंभापासूनच तिरस्कार वाटत होता. हा तिरस्कार व्यक्त करण्याची संधी मिळावी म्हणून त्याने संयुक्त बैठकीची मेन्शेव्हिकांची सूचना मोठ्या आनंदाने मान्य केली.

या संयुक्त बैठकीत बोलताना आपल्यासमोर श्रोते आहेत हे लेनिन जणू विसरूनच गेला होता. स्वतःशीच बोलावे अशा थाटात तो आपले विचार मांडीत होता. आपल्या विचारांबद्दल इतरांना काय वाटते हे जाणून घेण्याची त्याची मुळीच इच्छा नव्हती. 'मी काय म्हणतो ते ऐका, माझ्या विचारांशिवाय दुसरा पर्याय संभवतच नाही,' हा त्याचा स्वभावच होता. आपल्या या भाषणात लेनिन मेन्शेव्हिकांबद्दल इतक्या तुच्छतेने बोलत होता की त्याची ती भाषा काही बोल्शेव्हिकांनाही पसंत पडली नाही. परंतु त्याबरोबरच आपली नापसंती व्यक्त करण्याचीही त्यांच्यांत हिंमत नव्हती. लेनिनची अनुदार भाषा ऐकताच मेन्शेव्हिक प्रतिनिधी प्रक्षुब्ध झाले. ते म्हणू लागले, 'लेनिनचे हे भाषण ऐकले की त्याला अभिप्रेत असलेल्या क्रांतीनंतर

## □ प्रचार

दारूबंदीवर मोरारजींचे खास प्रेम आहे. एकदा दारूबंदी सप्ताहाच्या उद्‌घाटनाला मोरारजीभाई गेले असताना समोर जमलेल्या श्रोतृवृंदाकडे पाहून मोरारजी म्हणाले—

" समजा, मी इथे एका पिपात पाणी, एका पिपात दारू ठेवली व समोरून एखादे गाढव आले तर ते देखील काय पिईल ? " प्रश्न विचारून मोरारजी थांबले.

तमाम गांधीटोपीधारी मुंडकी उद्‌गारली,

" पाणी – पाणी पिईल ! "

आत्मविश्वासाने मोरारजींनी पुढचा प्रश्न केला—

" का ? ते पाणी का पिईल ? "

बावचळलेल्या श्रोत्यांतून कुणीतरी ओरडला—

" ते गाढव आहे म्हणून ! "

ग्यानबा



तो कामगारांच्या हुकूमशाहीच्या नावाखाली स्वतःचीच हुकूमशाही प्रस्थापित करील याचा वेगळा पुरावा शोधण्याची गरज नाही. लेनिन आज जी क्रांतिसूत्रे सांगत आहे ती त्याची खास स्वतःची आहेत. या प्रतिपादनाला मार्क्सवादाचा किंचितही आधार नाही. नेचॅयेव्ह आणि बाकुनिन या निर्भेळ क्रांतिकारकांचा मुखवटाच लेनिनने आपल्या तोंडावर चढविला आहे. तो समाजवादाची भाषा बोलत असला तरी त्याला समाजवादाविषयी फारशी आस्था नाही. त्याला हवी आहे क्रांती. '

**या बैठकीला जोसेफ गोल्डेनबर्ग हा मध्यवर्ती बोल्शेव्हिक समितीचा सदस्य हजर होता. लेनिनचे ते भाषण ऐकून गोल्डेनबर्गसारखा त्याचा जुना मित्रही भडकला. लेनिनचे भाषण आटोपताच तो बोलावयास उभा राहिला. गोल्डेनबर्ग म्हणाला— ' बाकुनिनसारख्या कट्टर अराजकवाद्याला आतापर्यंत वारस लाभलेला नव्हता. त्या रिकाम्या जागेवर लेनिन जाऊन बसला आहे. आता आपण जे लेनिनचे भाषण ऐकले ते सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या तत्त्वज्ञानाशी आणि शास्त्रीय मार्क्सवादाशी सर्वथैव विरोधी होते. लेनिनच्या भाषणात विशुद्ध अराजकवादाचाच पुरस्कार करण्यात आलेला आहे. लेनिनने आता बाकुनिनची वारसदारी पत्करलेली आहे. मार्क्सवादी लेनिनचा मृत्यू झाला असून प्रच्छन्न अराजकवादी लेनिन जन्माला आलेला आहे.**




ब्रेडसाठी शहरातून अशा रांगा दिसू लागल्या
की समजावे, अराजक जवळ आले
हुकूमशाहाची पावले वाजू लागली.

*

लेनिनवर एवढी कठोर टीका करूनच गोल्डेनबर्ग स्वस्थ बसला नाही. नवजात क्रांतीविरुद्ध यादवी युद्धाचा कट करीत असल्याचाही गोल्डेनबर्गने लेनिनवर जाहीर आरोप केला. लेनिन इतरांवर अतिशय कडवट टीका करीत असे. पण तसली टीका ऐकून घेण्याची मात्र त्याला सवय नव्हती. गोल्डेनबर्गच्या भाषणानंतर मेन्शेव्हिकांनी लेनिनची कुचेष्टा करण्यास प्रारंभ केला. त्यामुळे तो रागारागाने सभेतून बाहेर पडला. लेनिन निघून गेल्यानंतर सभाध्यक्ष श्वेईड्झ म्हणाला, ' त्याला क्रांतीच्या बाहेरच राहू द्या. आपण आपल्या मार्गाने जाऊ या. '

लेनिनबरोबर क्रपस्कायाही या बैठकीला गेलेली होती. या बैठकीत लेनिनवर जो टीकेचा भडिमार झाला तो पाहून क्रपस्कायाचे डोळे आसवांनी डबडबले. तीही लेनिनबरोबर बाहेर पडली. लेनिन निघून गेल्यानंतर, त्याचे प्रतिपादन आपल्यालाही पसंत नसल्याचे अनेक बोल्शेव्हिकांनी सांगितले. रशियात महिन्यापूर्वीच जी



हुकुमशाही ठेवावी की उलथवावी ! या गर्दीला ते ठाऊक
नसते, कळतही नसते, कोणीतरी या भेदरलेल्या,
हादरलेल्या मनांना अश्वासन देतो, आणि ...

*

क्रांती झाली होती तिचा लेनिनने उपहास करावा ही गोष्ट त्याच्या निकटवर्ती सहकाऱ्यांनाही रुचली नाही. आपल्या सहकाऱ्यांच्या रागालोभाचीही लेनिनला पर्वा नव्हती. सुखानोव्हने लिहिले आहे, ' आपल्या सहकाऱ्यांची तरी मर्जी राखावी म्हणून लेनिन या संयुक्त बैठकीत आपल्या आग्रहांना किंचित मुरड घालील अशी माझी कल्पना होती. परंतु आपल्या भूमिकेपासून रतिभरही दूर जाण्यास तो तयार नव्हता. या बैठकीतील लेनिन-विरोध पाहता तो अल्पावधीतच नव्या क्रांतीवर स्वार होणार आहे याची कोणालाच कल्पना नव्हती. '

काल सारे पेट्रोग्राड लेनिनच्या पायांशी लोळत आले होते आणि आज तो एकटा- अगदी एकटा-होता. या एकलेपणाची त्याला मात्र बिलकुल खंत नव्हती. परिस्थिती आपण पाहिजे तशी वाकवू, वळवू असा त्याचा विश्वास दारुण पराभवाच्या काळातही त्याला साथ देत होता.

परंतु संयुक्त बैठकीतील अपमानाची जखम लेनिनच्या मनात बरीच खोलवर गेलेली होती. त्याच्या शत्रूंप्रमाणेच त्याच्या मित्रांनीही या बैठकीत त्याच्यावर हल्ले चढविले होते. लेनिनची क्रांतिसूत्रे 'प्रावदा 'मध्ये प्रसिद्ध होताच कामेनेव्हनेही त्याच्यावर टीका केली. ही सूत्रे लेनिनच्या नावाखालीच प्रसिद्ध व्हायला हवीत असाही 'प्रावदा 'च्या संपादक मंडळाने आग्रह धरला. त्या वेळी बोल्शेव्हिक पक्ष-देखील लेनिनच्या क्रांतिसूत्रांशी संबंध ठेवू इच्छित नव्हता.

पेट्रोग्राग्राडला परतलेला लेनिन आपल्याला कसा दिसला याचे व्हिक्टर चेर्नोव्ह याने मोठे मार्मिक वर्णन केले आहे. चेर्नोव्ह लिहितो,

'लेनिन जबरदस्त ताकदीचा माणूस आहे यात मुळीच शंका नाही. परंतु गेली कित्येक वर्षे त्याला निर्वासित अवस्थेत काढावी लागल्यामुळे त्या कष्टमय आणि उपेक्षित जीवनाचा त्याच्या स्वभावावरही परिणाम झालेला आहे. आता तो कमालीचा एककल्ली झाला आहे. 'मी कोठे जात आहे हे मला माहीत नसेल, पण मी तेथे जाण्याचे एकदा ठरविल्यानंतर जाणारच ' अशी भाषा जर लेनिन बोलू लागला तर त्यात मला तरी मुळीच आश्चर्य वाटणार नाही. लेनिनला क्रांतीच्या स्वप्नाने अक्षरशः पछाडलेले आहे. त्याबरोबरच आपण एकटेच सच्चे क्रांतिकारक आहोत असेही तो मानतो. 'मी म्हणजेच सारा रशिया ' अशी लेनिनची धारणा आहे. स्वतःचे विचार आणि आपल्या पक्षाचा कार्यक्रम यात क्वचित द्वैत असू शकते हे मानावयास त्याची तयारी नाही. आपण सांगू तो समाजवाद अशी त्याची स्वतःपुरती समाजवादाबाबतची व्याख्या आहे. लेनिनचे बौद्धिक सामर्थ्य अनन्य साधारण आहे. पण ते तितकेच एकांतिकही आहे. लेनिन हा कमालीचा प्रामाणिक माणूस आहे. परंतु त्याबरोबरच आपण जे करू तेच न्याय्य आहे असेही तो धरून चालतो. लेनिनचा समाजवाद फटकळ आहे. जे काम चाकूने होण्यासारखे आहे त्यासाठी तो कुऱ्हाड वापरतो.'

चाकू बाळगणाऱ्यापेक्षा कुऱ्हाड वापरणाऱ्यालाच अधिक अनुयायी लाभतात हे मात्र चेर्नोव्हला तेव्हा कळले नव्हते.

लेनिनने बंद डब्यातून कसा काय प्रवास केला असेल आणि या प्रवासाच्या बद-ल्यात त्याने जर्मनीला कोणती आश्वासने दिली असतील यासंबंधी पेट्रोग्राडमध्ये कुजबूज सुरू झाली होती. लेनिनने पेट्रोग्राडमध्ये पाऊल ठेवले तेव्हा सारेजण त्याच्या आगमनानेच भारून गेले होते. त्याच्या आगमनातील नाट्य जसजसे ओसरू लागले तसतसा लेनिन खरोखरच कोणत्या हेतूने मायदेशी परतला आहे याची चर्चा सुरू झाली. खुद्द बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांनाही त्याचे स्वरूप कळलेले नव्हते. तेही लेनिन-कडे साशंक नजरेनेच पाहत होते. 'आपण जर्मनीला कोणतेही आश्वासन दिलेले

नाही ' असे लेनिन परोपरीने सांगत होता. परंतु त्याचा खुलासा ऐकूनही ऐकणाऱ्याची संशयनिवृत्ती होत नव्हती. लेनिनने आपल्या क्रांतिसूत्रांद्वारे रशियातील श्रमिक जनतेला उच्चभ्रू समाजाविरुद्ध यादवी युद्ध पुकारण्याचा आदेश देऊन जर्मनीच्या हितसंबंधांना पाठिंबा दिला आहे हा आरोप तर उघडपणे करण्यात येऊ लागला. वस्तुस्थिती अशी होती की लेनिनला ज्याप्रमाणे रशियाचे एक राष्ट्र म्हणून प्रेम नव्हते तसे जर्मनाबद्दलही नव्हते. उलट रशियाप्रमाणे जर्मनीतही समाजवादी क्रांती झाली पाहिजे असा त्याचा आग्रह होता. त्यातून लेनिनसारखा मनस्वी प्रवृत्तीचा क्रांतिकारक केवळ पैशाच्या अभिलाषेने एखाद्या राष्ट्राचा हस्तक होईल असे मानणे चुकीचे होते. परंतु लेनिनचे हितशत्रू हेतुत: त्याच्यावर तसा आरोप करत होते आणि त्याचा क्रांतीचा ध्यास ज्यांना समजू शकत नव्हता त्यांना या आरोपात तथ्य वाटत होते. त्यातून जर्मन प्रचारामुळे या आरोपाला खतपाणी मिळाले. लेनिन रशियात पोचल्याबद्दल जर्मन लष्करी कचेरीने आनंद प्रदर्शित केला होता. स्कॉटहोम येथील जर्मन कॉन्सल जनरल स्टेनवाख याने आपल्या सरकारला कळविले, 'लेनिनने विजेत्याच्या थाटात रशियन भूमीवर पदार्पण केले असून तो अगदी आपल्याला हवी तशी पावले टाकत आहे.'

जर्मनीला हवी तशी आज लेनिनची पावले पडत होती यात शंकाच नाही. तत्कालीन रशियन राजवटीचा जर्मनीप्रमाणेच लेनिन हाही शत्रू होता आणि त्यामुळेच लेनिनच्या धोरणावर जर्मन सरकार खूष होते. पण लेनिनची पुढची पावलेही आपल्याला पाहिजेत तशीच पडतील, असल्या भ्रमात जर्मन नेते वावरत नव्हते. प्रचलित परिस्थितीचा स्वहितासाठी फायदा होत असल्यामुळेच जर्मन नेते त्याबाबत लेनिनवर खूष होते.

जर्मनीच्या या प्रचारामुळे लेनिन जर्मन सरकारचा हस्तक आहे, या आरोपावर सर्वसामान्य रशियन नागरिकांचा विश्वास बसू लागला. लेनिनच्या स्वागतासाठी फिनलंड स्टेशनवर मोठ्या उत्साहाने हजर राहिलेल्या नौसैनिकांनी खास ठराव करून लेनि-

Phone : 57957 Estd. 1952.

**The Modern Paper Stores**

*25, Budhwar Peth, POONA 2.*

PLEASE CONTACT FOR :

Writing, Printing, Wrapping and Packing Paper
Waterproof and Corrugated Rolls.
Ivory and Art Cardsheets, B. B. Cloth, Drawing Paper,
Gumed Tape etc.

नच्या स्वागतात भाग घेतल्याबद्दल आपल्याला पश्चात्ताप होत असल्याचे जाहीर केले. या नौसैनिकांनी आपल्या ठरावात म्हटले होते, ' जर्मन सम्राटाच्या चिथावणी-वरून लेनिन रशियाला परतला आहे हे आता कळून आल्यामुळे त्याच्या स्वागत समारंभात सहभागी झाल्याचा आम्हांला खेद होत आहे. तो कोणत्या मार्गाने मायदेशी परतला आहे हे जर आम्हांला अगोदर कळले असते तर आम्ही त्याचा जयजयकार केलाच नसता. उलट आम्ही स्टेशनवरच लेनिनचा धिक्कार करून त्याला बजावले असते– ' ज्या देशाच्या मदतीने तू हा प्रवास केलास त्या देशात जाऊन राहा.'

कालपर्यंत रशियन जनतेला लेनिन आपला मुक्तिदाता वाटत होता. आज तोच लेनिन शत्रूचा हस्तक ठरला होता. क्शेसिन्स्काया प्रासादाभोवती जमा झालेले नागरिक लेनि-नच्या अटकेची मागणी करीत होते. लेनिनने एक-दोनदा व्हरांड्यात येऊन खुलासा करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा एक शब्ददेखील ऐकून घेण्याची कोणाची तयारी नव्हती. अखेरीस जमावाची समजूत घालण्याचा नाद त्याने सोडून दिला. लेनिनने आतापर्यंत काही कमी वादळांना तोंड दिलेले नव्हते. हेही वादळ आपण शमवू शकू असा त्याचा विश्वास होता. त्यामुळेच लोकांच्या विरोधाची पर्वा न करता तो पक्षसंघटनेचे कार्य करीतच होता. हळूहळू लेनिनच्या सहकाऱ्यांचा त्याच्याबद्दलचा संशय दूर होत होता. तो त्यांना म्हणायचा, ' माझी क्रांतिसूत्रे म्हणजे वेडचाची बड-बड आहे असे प्लेखानोव्ह म्हणतो. तुम्ही जरा विचार करा म्हणजे मग तुमचे तुम्हांलाच कळेल की सत्ता हस्तगत करण्याचा तोच एकमेव मार्ग आहे.' बुर्झ्वा राज-वटीला नामशेष करून तिच्या हातातील सत्ता बोल्शेव्हिक पक्षाकडे घ्यावयाची असेल तर ती बिकट कामगिरी पार पाडण्याचे सामर्थ्य एकट्या लेनिनच्या मनगटातच आहे ही वस्तुस्थिती त्याच्या मित्रांप्रमाणे शत्रूंनाही मान्य करावी लागली.

७ मे १९१७ रोजी बोल्शेव्हिक पक्षाचे सातवे अधिवेशन भरले. तेव्हा ' आमचा नेता लेनिन ' असे म्हणतच प्रत्येक कार्यकर्ता या अधिवेशनाला हजर राहिला होता.

या काळात पेट्रोग्राडमधील अशांत वातावरण चिघळत चालले होते. हंगामी सरकारापुढे दररोज एक नवा प्रश्न उभा राही व तो सोडविताना सरकारची त्रेधा-तिरपीट उडत असे. वाढत्या दैन्यामुळे रशियन जनतेत वैफल्याची भावना बळावत चालली होती. या बिकट परिस्थितीतून देशाला बाहेर काढू शकेल असा एकही पक्ष लोकांच्या नजरेसमोर येत नव्हता. ४ मे रोजी पेट्रोग्राडमधील सरकारनिष्ठ नागरिकांनी 'हंगामी सरकार चिरायू होवो' अशी घोषणा करीत मिरवणूक काढताच सरकारविरोधी पक्षांनी 'हंगामी सरकारचा धिक्कार असो,' असे फलक हातात घेऊन दुसरी मिरवणूक काढली. नेव्हस्की प्रॉस्पेक्टवर या दोन्ही मिरवणुकी समोरासमोर आल्या. घोषणा आणि प्रतिघोषणा यांचा हलकल्लोळ माजला. त्यातूनच दंगलीला प्रारंभ झाला. शहरात दंगल सुरू झाल्याची बातमी कळताच फिनलंड रेजिमेंटचे

सैनिक मेरिन्स्को प्रासादाकडे निघाले. रस्त्यावरच्या पोलिसाने त्यांना हटकले 'कुठं निघालात ?'

'हंगामी सरकारच्या मंत्र्यांना अटक करण्यासाठी.' असे सैनिकांनी उत्तर दिले. पेट्रोग्राड सोव्हिएटचा अध्यक्ष या नात्याने श्खेईड्झ त्यांना भेटावयास गेला. ते म्हणाले, " सैनिकहो, हंगामी सरकारला पकडून तुम्हांला काय मिळणार आहे ?"

सैनिक कोणताच विचार न करता मेरिन्स्को प्रासादाकडे निघाले होते. त्यामुळे श्खेईड्झने त्यांची समजूत काढताच ते आले तसे बराकीकडे परतले. लागलीच सैनिकांच्या या निदर्शनामागे आपला हात नव्हता असा लेनिनने खुलासा केला. परंतु त्यावर कोणाचाच विश्वास बसला नाही. तुरळक दंगली घडवून आणून सरकारी सामर्थ्याचा अंदाज घेण्याचा लेनिन प्रयत्न करीत आहे हे सर्वांनाच माहीत होते. परंतु त्याच्याविरुद्ध पुरावा मिळत नसल्यामुळे सरकारला स्वस्थ बसणे भाग पडले. दुसऱ्या दिवशी पुन्हा दंगली सुरू झाल्या. या दंगलींना आवर घालण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला. लेनिनला नेमके हेच हवे होते. पोलिसांच्या गोळीबाराला काही निदर्शक बळी पडले की लोकमत आपोआप सरकारविरुद्ध पेट घेणार असा त्याचा साधा हिशेब होता.


हे एक रहस्य

उत्तम मुद्रण म्हणजे

कला व उत्पादनाची सांगड

**के. सी. भिडे ब्लॉक मेकर्स**

अनुभवाचे पाठबळ व दर्जेदार माल यांमुळे

आमचे ब्लॉक्स अनेकांच्या

पसंतीस उतरत आहेत.

लिहा अथवा बोलवा.

फोन. नं. ५५३३८


१९७७ सदाशिव, माडीवाले कॉलनी,

पुणे २.

जर्मनीविरुद्ध निर्णायक विजय मिळेपर्यंत रशिया मित्रराष्ट्रांच्या खांद्याला खांदा लावून लढेल असे परराष्ट्रमंत्री मिलिउकोव्ह याने जाहीर केल्यामुळे सैनिक चिडले व त्यांनी आपण होऊन दंगली सुरू केल्या, असे बोल्शेव्हिकांनी सांगण्यास प्रारंभ केला. मिलिउकोव्हच्या धोरणाला उजव्या पक्षांचा पाठिंबा होता तर डाव्या गटांनी आपला विरोध जाहीर केला. गेल्या चार वर्षांच्या युद्धामुळे रशियात उपास-मारीने थैमान मांडले होते. अजूनही सरकार युद्धातून बाहेर पडून आपल्या दैनंदिन गरजांचा विचार करीत नाहीत हे पाहून कामगारवर्ग सरकारवर चिडू लागला होता. त्यातून नव्या सरकारच्या हाती झारशाहीसारखी अनिर्बंध सत्ता नव्हती. ठिक-ठिकाणी स्थापन झालेली सोव्हिएटस, सत्ताकेंद्रे बनत चालली होती. या सोव्हिएट्-सची सतत उपेक्षा करणे किंवा त्यांचा विरोध दुर्लक्षिणे हंगामी सरकारला पर-वडण्यासारखे नव्हते. मिलिउकोव्हच्या धोरणावर बहुतेक सर्व सोव्हिएटस नाराज होती व त्यामुळे त्याने मंत्रिपदाचा राजीनामा दिला. मिलिउकोव्हसारखा उजव्या गटाचा प्रवक्ता मंत्रिमंडळातून बाहेर पडल्यामुळे आता डाव्या पक्षांनी मंत्रिमंडळात सहभागी होऊन देशाची सध्याची दुरवस्था दूर करण्याचा प्रयत्न करावा असे प्रधानमंत्री एवोव्ह याने आवाहन केले. मेन्शेव्हिक, सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी व सोशल डेमोक्रॅटिक या डाव्या पक्षांनी एवोव्हच्या आव्हानाला मान देऊन मंत्रिपदे स्वीकारली. एवोव्ह मंत्रिमंडळाशी बिलकुल सहकार्य करावयाचे नाही असा बोल्शेव्हिकांचा निर्धार असल्यामुळे त्यांची मनधरणी करण्याचा एवोव्हने प्रयत्नही केला नाही.

परंतु हे सर्वपक्षीय सरकारही जनतेवर प्रभाव पाडू शकले नाही. अडचणींचा


## ☐ सायंकाळचे सुख



काका कारखानीस विधूर होऊन तीन-चार वर्षे झाली होती. पी. डब्ल्यू. डी. मधून इंजिनीअर म्हणून निवृत्त झाल्याने जवळ पैसा चांगला होता. यामुळे विधूर तसा मजेत होता.

अखेर कु. कुन्दावाला बोटमोडे, टी. डी. यांचेशी कारखानिसांचे सूत जमले.

रोज सायंकाळी कारखानीस, कुंदा-वालेकडे येऊ लागले. रोज कुंदाबालेचे तीन जिने चढून वरखाली करताना त्यांना धाप लागे. चाळीत मात्र आता

आवाका एवढा मोठा होता की, इच्छा असूनही वा प्रयत्न करूनही या अडचणी अल्पकाळात नाहीशा होणे शक्य नव्हते. परिस्थिती सुधारण्याची काहीच आश. दिसत नसल्यामुळे चिडलेल्या कामगारवर्गाने संपाचे हत्यार उपसले. सैनिकही सरकारच्या आज्ञा मानीनासे झाले. मोठमोठ्या शहरांमध्ये बेकार नागरिकांचे थवे हिंडू लागले. काहीच उद्योग नसल्यामुळे या लोकांकडून लूटमार करणे, आगी लावणे, सरकारी हुकूम मोडून दंगली घडवून आणणे हे प्रकार सर्रास सुरू झाले. साऱ्या रशियन समाजालाच वैफल्याने ग्रासून टाकले होते. हंगामी सरकारमध्ये केरेन्स्की हाच काय तो एकटा मंत्री असा होता की लोकांना त्याचा दरारा वाटत असे. त्यामुळे अराजकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या रशियाला असंतोषाच्या स्फोटातून वाचविण्यासाठी त्याची धडपड सुरू होती. परंतु त्याचे एकट्याचे प्रयत्न परिस्थितीला आवर घालू शकण्यास असमर्थ ठरत होते.

लेनिनला नेमके हेच हवे होते. सर्वसामान्य माणसाच्या वैफल्यातूनच क्रांतीच्या ज्वाला पेट घेतात हे त्याला पक्के ठाऊक होते. सशस्त्र उठाव करून विद्यमान राज्ययंत्रणा नष्ट करायची आणि तिच्या जागी बोल्शेव्हिक पक्षाचे एकतंत्री सरकार प्रस्थापित करायचे हा एकच विचार लेनिनच्या डोळ्यांपुढे सारखा तरळत होता. लेनिन रशियाला परतला तेव्हा, म्हणजे एप्रिलच्या मध्यास पेट्रोग्राडच्या बोल्शेव्हिक सेंटरचे पंधरा हजार सभासद होते. जूनपासून ही संख्या झपाट्याने वाढू लागली. बोल्शेव्हिकांच्या तीन घोषणा रलेल्या होत्या—'सर्व सत्ता सोव्हिएटच्या हाती,'

कारखानिसांचे येणे-जाणे सर्वांच्या परिचयाचे झाले होते. सायंकाळी सहाला कारखानीस जिना चढत व आठ-साडेआठला खाली उतरत.

दोघांसंबंधी सुरस नसूनही चमत्कारिक कथा अधूनमधून चाळीच्या मालकांच्या कानावर जात असत. अखेर या प्रकरणाला कंटाळून मालकांनी कारखानिसांना एक दिवशी हटकले—

"कारखानीस, तुम्ही रोज सायंकाळी तीन जिने चढता—उतरता, त्यापेक्षा वोटमोड्यांशी लग्नच केलेत तर हा त्रास वाचणार नाही का?"

कारखानिसांनी मालकांना आपादमस्तक न्याहाळीत म्हटले—

"त्रास वाचेल हो! लग्न करायलाही काही हरकत नाही. पण रोज संध्याकाळी कुणाकडे जायचे हा प्रश्न येणारच!"

—ग्यानबा

'भांडवलदारांचा निःपात होवो' आणि 'युद्धखोरांचा धिक्कार असो.' या घोषणांबद्दल कोणतीही चर्चा करणे त्यांना साफ नामंजूर होते.

हंगामी सरकार आपल्या परीने लोकांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु सर्वांना खूष करण्याच्या प्रयत्नांमुळे कोणताही एक विशिष्ट वर्ग संपूर्णतया खूष नव्हता. त्यातील कामगारवर्गाला लेनिनचे क्रांतीचे आवाहन आकर्षित करू शकले. परिस्थितीचे दान लेनिनच्या बाजूने पडत होते. लेनिन फारसा पक्ष-कचेरीबाहेर पडत नसे. तो एखाद्या खानदानी सरदारासारखा गर्दीपासून दूर राही. गर्दीला आपल्याकडे खेचण्याचे त्याच्यात सामर्थ्य होते. परंतु या गर्दीशी समरस व्हावे हे त्याच्या स्वभावातच नव्हते. या काळात त्याने 'प्रावदा'साठी खूप लेखन केले. 'प्रावदा'च्या एका अंकात तर त्याच्या एकट्याचे पाच लेख प्रसिद्ध झाले होते. हंगामी सरकारविरुद्ध असंतोषाचा डोंब पेटविणे हा त्याच्या साऱ्या लिखाणाचा एकमेव विषय होता. सशस्त्र उठावासाठी लोकसेना उभारली पाहिजे असे तो आग्रहाने सांगे.

१६ जून रोजी सोविएट सदस्यांच्या मेळाव्यापुढे लेनिनने अशा थाटात भाषण केले की, सत्ता अगदी लवकरच आपल्या हातात येणार आहे याबद्दल त्याची खात्री पटलेली आहे. लेनिननंतर मेन्शेव्हिक गटाच्या त्सेरेटेलीचे भाषण झाले. तो म्हणाला, 'सत्ता हस्तगत करण्याची भाषा कोणत्याही एका पक्षाने बोलता कामा नये. सर्व-पक्षीय सरकार हाच आजच्या परिस्थितीमध्ये सर्वोत्तम तोडगा ठरणार आहे. शिवाय असा कोणता पक्ष आहे की आज जर सत्ता मिळाली तर ती राबविण्याचे सामर्थ्य त्याच्यात आहे!'

त्सेरेटेलीचे हे भाषण म्हणजे लेनिनला एक आव्हानच होते. व्यासपीठावर उडी मारून तो म्हणाला, 'असा पक्ष येथे अस्तित्वात आहे.'

लेनिनचा तो आवेश पाहून प्रतिनिधींनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्सेरेटेलीला भाषण चालू ठेवणे अशक्य झाले. आता व्यासपीठ लेनिनच्या ताब्यात आले होते.

HAPPY DIWALI HAPP DIWALI

FUEL INJECTION EQUIPMENT

*Ichalkaranji*

*Dist. Kolhapur*

Phone : 112

*The only Manufacturer in India of*

Balancing machines, Hardness Testers,

Relief Grinding fixtures & many accurate fixtures.

तो गर्जू लागला, 'आपल्या हातात सत्ता घेण्याचे रशियातील एकाही पक्षाच्या अंगात सामर्थ्य नाही असे आताच येथे सांगण्यात आले. मी म्हणतो, एक समर्थ पक्ष अस्तित्वात आहे आणि ही वस्तुस्थिती इतर कोणत्याही पक्षाला नाकारता येणार नाही. कोणत्याही क्षणी संपूर्ण सत्ता हाती घेण्यास माझा बोल्शेव्हिक पक्ष तयार आहे.'

लेनिनचे हे उद्गार ऐकताच या बैठकीला प्रेक्षक म्हणून उपस्थित राहिलेल्या कामगारांनी आणि सैनिकांनी टाळ्या वाजवून आपला पाठिंबा व्यक्त केला.

परिस्थितीची वळणे हेरण्यात केरेन्स्की कुशल होता. लेनिननंतर तो बोलावयास उभा राहिला. केरेन्स्की म्हणाला, 'फेब्रुवारी–क्रांती चिरडण्यात आली तर या घटनेचे किती गंभीर परिणाम होतील याचा सर्वांनी शांत चित्ताने विचार करावा, **रशियात आता जर का सशस्त्र उठाव झाला तर, त्या उठावातून एक नवा हुकूमशहा जन्मास येईल. आणि तो सारी भूमी रक्तमय करून टाकील.'**

सोव्हिएट सदस्यांचा हा मेळावा चालू असतानाच लेनिनने पुन्हा एकदा आपल्या सामर्थ्याचा अंदाज घेण्याचे ठरविले. हंगामी सरकारच्या मेरिन्स्को प्रासादावर चाल करून जाण्याचा बोल्शेव्हिक पक्षाने लष्कराला आणि आपल्या लाल पथकाला


*With Best Compliments From*

# ATLANTA

Baldota Bhavan, 117 Queens Road,
Churchgate, Bomday 1.

*For your requirements in machinery for*
Footwear, Leather, Leather Goods &
Garment Industries

*Please contact us*

*Call.* 242842 *Gram* : SHOEMACHIN

आदेश दिला. परंतु या उठावाचा श्वेईड्झला अगोदरच सुगावा लागल्यामुळे त्याने बोल्शेव्हिकांचा हा बेत हाणून पाडला. लेनिनच्या या चिथावणीखोर कारवाया पाहून त्सेरेटेली भडकला. तो म्हणाला, ' हा उघडउघड सरकारविरोधी कट आहे. आपल्याला या कटाचा अगोदर सुगावा लागला म्हणून तो फसला इतकेच. परंतु हा कट फसला म्हणून लेनिन स्वस्थ बसणार नाही. आज नाही तर उद्या, उद्या नाही तर परवा, लेनिन हा उठाव घडवून आणणारच. त्याच्या या कारवाया बंद करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे बोल्शेव्हिकांजवळील शस्त्रे हिसकावून घेण्याचा. '

परंतु आता तीही वेळ निघून गेली होती. बोल्शेव्हिकांचे सामर्थ्य एवढे वाढले होते की त्यांना हात लावणे सरकारला शक्य नव्हते. लोकशाही राजवटीच्या या मर्यादांमुळ कोणत्याच मार्गाचा विधिनिषेध नसलेल्या क्रांतिकारकांना फावते हे माहीत असूनही हंगामी सरकारला त्यांच्याविरुद्ध कणखर उपाययोजना करता येत नव्हती. सरकारच्या या दुबळ्या धोरणामुळेच पेट्रोग्राडमधील निम्म्याहून अधिक कामगारांचा आणि सैनिकांचा या सरकारवरील विश्वासच उडाला होता आणि ते सारेजण तशीच उठावाची भाषा बोलणाऱ्या बोल्शेव्हिकांच्या कच्छपी लागले होते.

त्सेरेटलीच्या अपेक्षेप्रमाणे लेनिनने तिसऱ्या उठावाची तयारी केली. हा उठाव तरी फसता कामा नये यासाठी बोल्शेव्हिक कार्यकर्ते तीन आठवडे पूर्वतयारी करीत होते. या उठावासाठी लेनिनने क्रॉन्सटाड्ट बंदरातील नौसैनिकांना हाताशी धरण्याचे ठरविले. या नौसैनिकांबरोबर एक मशिनगन रेजिमेंट व तशाच कामगारांच्या तुकड्या मेरिन्स्को प्रासादावर हल्ला चढवून तेथील सरकारी यंत्रणा ताब्यात घेणार होत्या. या उठावाची जय्यत तयारी झाल्यानंतर क्रॉन्सटाड्टचे नौसैनिक लेनिनच्या आदेशाची वाट पाहू लागले. परंतु लेनिनकडून हुकूम येईना. शेवटी उठावासाठी अधीर झालेले हे नौसैनिक पेट्रोग्राडच्या रस्त्यावर येऊन उभे राहिले. येणाऱ्या–जाणाऱ्याची वाट अडवीत त्यांचा गोंधळ सुरू होता. कोणी त्यांना हटकले की लगेच ते त्याला ठार करीत. आपण सरकार ताब्यात घेणार आहोत असे ते उघडपणे सांगत होते.

१६ जुलैला मशिनगन रेजिमेंटने टॉरिड प्रासादावर हल्ला चढविला. त्यांच्या समवेत आलेल्या पंचवीस हजार कामगारांनी या प्रासादाला वेढा घालून सरकारविरोधी घोषणांचा गजर सुरू केला. मशिनगन रेजिमेंटचे सैनिक आत घुसले आणि त्यांनी हा प्रासाद ताब्यात घेतला. परंतु पुढे काय करावयाचे हे त्यांना माहीत नव्हते. त्यामुळे ते टॉरिड प्रासादातून बाहेर पडले व ' सर्व सत्ता सोव्हिएटच्या हाती ' आणि ' हंगामी सरकारचा नि:पात होवो ' अशा घोषणा करीत त्यांनी शहरातून

मिरवणूक काढली. परंतु नौसैनिकांना नागरिकांचा म्हणावातसा पाठिंबा मिळू शकला नाही. हंगामी सरकारबद्दल जनमानसात अप्रीती असली तरी ते सरकार नष्ट व्हावे असे कोणालाही वाटत नव्हते. त्यामुळे सशस्त्र उठावाचा लेनिनचा हा तिसरा प्रयत्नही फसला. या उठावामागे आपला मुळीच हात नव्हता असे लेनिन आणि ट्रॉटस्की यांनी संध्याकाळी एक पत्रक काढून जाहीर केले. परंतु ते दोघे चक्क खोटे बोलत आहेत हे प्रत्येकालाच ठाऊक होते.

दुसऱ्या दिवशी क्रॉन्सटाड्ट बंदरातील वीस हजार नौसैनिक नेव्हा नदीतून पेट्रोग्राडला आले. नेव्हाच्या उजव्या तीरावर उतरून ते सरळ क्शेसिन्स्काया प्रासादाकडे निघाले. लेनिनने व्हरांड्यात येऊन त्यांचे स्वागत केले. परंतु आज लेनिनचा नेहमीचा आवेश दिसत नव्हता. 'अंतिम विजय आपलाच आहे' एवढे बोलून त्याने या नौसैनिकांचा निरोप घेतला. तेथून ते नौसैनिक शहरात घुसले त्यांनी सगळीकडे धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. जो समोर येईल त्यास ते भोसकत होते. या नौसैनिकांनी काही तासांच्या आतच चारशे निरपराध नागरिकांचा बळी घेतला. एवढे करूनही सत्ता हस्तगत करण्याचा त्यांना धीर आला नाही. संध्याकाळ होताच ते पुन्हा बंदराकडे परतले. 'नेहमीच्या निदर्शनांपेक्षा अधिक कडक परंतु क्रांतीपेक्षा किंचित सौम्य' असे या उठावाचे लेनिनने वर्णन केले असले तरी ते खरे नव्हे. त्यापेक्षा पुश्किनचे वर्णन अधिक समर्पक आहे. तो म्हणाला, 'खास रशियन पद्धतीचा उठाव कमालीचा प्रक्षुब्ध पण तितकाच बेशिस्त.'

बोल्शेव्हिकांचा जुलै उठाव फसला. ज्या आकस्मिक रीतीने या उठावाने पेट घेतला होता त्याच आकस्मिक रीतीने तो विझला. ट्रॉटस्कीने लिहिले आहे– 'या उठावाच्या वेळी शत्रू विजयी ठरला कारण आम्ही लढलोच नाही.' ट्रॉटस्कीने काय घडले ते सांगितले. पण तसे का घडले याचा मात्र त्याने खुलासा केलेला नाही. १६–१७ जुलैला बोल्शेव्हिकांचे एक लाख अनुयायी पेट्रोग्राडच्या रस्त्यावर हिंडत होते. एवढ्या मोठ्या संख्येलाही यशस्वी उठाव करणे जमले नाही. या उलट आणखी तीन महिन्यांनी बोल्शेव्हिकांनी जेव्हा सत्ता हस्तगत केली तेव्हा त्यांच्या पाठीशी अवघे पंचवीस हजार अनुयायीच उभे होते.

१७ जुलैच्या रात्री निदर्शक आपापल्या घरी परतले. क्रॉन्सटाड्ट बंदरातील नौसैनिकांची एक तुकडी मात्र अद्यापही शहरात रेंगाळत होती. त्यांनी पीटर आणि पौल किल्ले ताब्यात घेऊन आपण हंगामी सरकारचे नेतृत्व मान्य करीत नाही अशी घोषणा केली. परंतु पुढे काय करावयाचे हे त्यांनाही माहीत नव्हते. ते तेथे थोडा वेळ बसून राहिले. दुसऱ्या दिवशी दुपारी सरकारी सैनिकांनी त्यांना घेरले. लागलीच हे नौसैनिक इतके नरम आले होते की त्यांनी आपण पुन्हा असले गैरवर्तन करणार नाही असे किंचितही खळखळ न करता लिहून दिले.

जुलै चा अयशस्वी उठाव हा लेनिनच्या आयुष्यातील एक भीषण पराभव होता. १८ जुलै रोजी सकाळच्या वेळी ट्रॉटस्की त्याला भेटायला आला तेव्हा लेनिन म्हणाला, 'आता सरकार आपल्यापैकी प्रत्येकास गोळया घालून ठार करील. आज काळ त्यांच्या बाजूचा आहे.'

पेट्रोग्राडमध्ये हा उठाव झाला असताना युद्धमंत्री केरेन्स्की लष्करी आघाडीला भेट देण्यासाठी गेला होता. दोन दिवसांनी पेट्रोग्राडला परतल्यानंतर त्याने १६ व १७ जुलै रोजी घडलेल्या घटनांचा अहवाल मागून घेतला. तो अहवाल वाचल्यानंतर केरेन्स्कीने लेनिनला अटक करण्याचा हुकूम काढला. केरेन्स्की पेट्रोग्राडला परतताच तो आपल्याला पकडणार हे लेनिनने ओळखले होते. त्यामुळे त्याने अंगावर रेनकोट चढविला, टोपी भुवयांपर्यंत खाली ओढली आणि रेनकोटच्या कॉलरने हनुवटीपर्यंतचा चेहरा झाकून घेतला. आता तो पोलिसांना ओळखू येणे सर्वस्वी अशक्य होते. या नव्या पोशाखातला लेनिन क्शेझिंस्काया प्रासादाबाहेर पडला या वेळी जर त्याला कोणी नाव विचारले असते तर तो सांगणार होता— 'साहेब, मी एक कामगार आहे कोन्स्टॅन्टिन इव्हॅनोव्ह म्हणतात मला.'

दहा वर्षांच्या विजनवासानंतर तीन महिन्यांपूर्वी लेनिन मायदेशी परतला होता या तीन महिन्यांत तो एकच वाक्य स्वतःशी अनेक वेळा पुटपुटत होता— 'माझं भवितव्य आता ठरलं आहे. एक सिंहासन किंवा ते हुकले तर थेट फाशीचा खांब.' आता फाशीचा खांब टळला होता, पण सिंहासन अद्यापही दृष्टिपथात आलेले नव्हते.

अनपेक्षित रीतीने त्याचा अज्ञातवास सुरू झाला होता.

(क्रमशः)

टेलिफोन ऑफीस : ५७७०८ घरचा : ५७१२५

**दि जवाहिर ट्रेडिंग कंपनी**


४९५ शनवार पेठ, पुणे २.

*सब डिस्ट्रिब्यूटर्स*

दि शिरपूर पेपर मिल्स लि. शिरपूर—कागझनगर

तसेच आमच्याकडे ओरिएंट पेपर मिल्स, आमलाईचा सर्व प्रकारचा कागद व तुंगभद्रा पल्प अँन्ड बोर्ड मिल्स लि. चा सर्व वजनांतील स्ट्रॉबोर्ड, शिवाय इतर नामांकित गिरण्यांचा नामांकित कागद मिळेल.

# निश्चिंत प्रवासासाठीं ...



## पी एन् बी प्रवासी चेक्स

तुमच्या जवळ पी एन् बी प्रवासी चेक्स असल्यावर प्रवास निर्धोक होईल. कसलीही काळजी वाटण्याचं कारण नाहीं, व प्रवास अगदी निश्चित मनाने करता येईल. प्रवासी चेक हरवलेच, तर दुसरे मिळूं शकतील. चेक निरनिराळ्या रकमेचे मिळूं शकतील.

*पी एन् बी प्रवासी चेक्स करतां कमिशन द्यावं लागणार नाहीं.*

**पंजाब नॅशनल बँक**

## वाघाशी झुंज . .

[पृष्ठ ३९ वरून]

मला जवळ बोलावले, हा सर्व प्रकार पाहून माझ्या मनातील भीती नाहीशी झाली. आणि बोलवताक्षणी मी जवळ गेलो. जवळ जाताच वाघाच्या अंगचा एक प्रकारे उग्र दर्प आला. त्याच्याकडे दुर्लक्ष करून आता आपणांस या वाघाबरोबर फाईट करावयाचीच आहे, म्हणून मी त्याच्या अंगावरून हात फिरविला. त्या क्षणी माझ्या हाताला जो स्पर्श झाला तो, आपण मखमलीवरून हात फिरवत आहोत की काय असे वाटले. तेवढ्यात वसंतरावांनी पण जाळीतून हात घालून त्या वाघाच्या अंगावरून फिरवून घेतला आणि जिवंत वाघाच्या अंगावरून हात फिरविल्याचे समाधान मानले. पहिल्या दिवशी अशा रीतीने माझी व वाघाची ( भारतची ) ओळख झाली. आम्ही परत आलो.

दुसऱ्या दिवशीची सकाळ केव्हा उजाडते याची मी वाट पाहत होतो. कारण सलामी झाली होती, मी ती स्वीकारली होती. आता प्रत्यक्ष कुस्तीस सुरुवात होणार होती. आणि दुसऱ्या दिवशी मी व वसंतराव मिळून सर्कसमध्ये हजर झालो. माझा आत्मविश्वास चांगलाच वाढला होता. पिंजऱ्याचे दार उघडताच प्रत्यक्ष मी आत गेलो. आज माझ्याबरोबर पिंजऱ्यात श्री. देवलांचे चिरंजीव संरक्षक म्हणून होते. मी रिंगमास्टरच्या ऐटीत मध्ये उभा राहिलो होतो. वाघाला पिंजऱ्यात सोडण्यात आले. माझे पाऊल जागचे हलले नाही. मी हिंमतीने उभा राहिलेला पाहून वसंतरावांचा चेहरा आनंदला. देवलांनादेखील आश्चर्य वाटले. त्यांनी माझ्याकडे पाहून विचारले, 'सूर्यकांत, वाघाला करू काय इशारा ?' मी होकार दिला. आणि देवलांनी 'भारत' '... भारत'... 'जंप'... 'जंप'... म्हणून इशारा केला आणि भारतने स्टुलावरून जी झेप घेतली ती माझ्या अंगावर. 'वाघाची झेप' वाचायला व लिहायला बरी वाटते. पण ती काय असते याचा अनुभव आज मी प्रत्यक्ष घेत होतो. प्रथम मला वाटले होते की याचे वजन ते काय असणार ? असा फेकून देईन

*आमच्या आगामी यात्रा*
२७ नोव्हेंबर १९६७ ला
बादशाही थाटात
**द्वारका सोमनाथ यात्रा**
शिवाय अहमदाबाद, डाकोर, ओंकार, मौंट अबू, वेरावळ वगैरे
महाशिवरात्रीनिमित्त फेब्रु. ६८ मध्ये
**रामेश्वर कन्याकुमारी यात्रा**
मार्च १९६८ मध्ये बादशाही थाटात
**काशी पशुपति हरद्वार**
*राजकमल यात्रा कंपनी*
चौकशी– ६०५ शनिवार, पुणे २
मालक–कर्वे बंधु. फोन ५४४५७

त्याला, असे करीन आणि तसे करीन, हे माझ्या मनातले विचार माझ्या मनातच राहिले आणि—आणि झाले उलटेच ... त्याचे दोन्ही पंजे माझ्या खांद्यां-वर पडले आणि माझ्या शरीराची कमान झाली. माझी सर्व ताकद लावूनही त्याचा बोजा मला बाजूला करता येईना. एकतर त्याचे पंजे इतके मोठे होते की ते माझ्या हातात बसत नव्हते त्यामुळे ताकदीचा काही उपयोग होईना—ही माझी धडपड पाहून आजूबाजूचे लोक क्षणभर चित्रासारखे स्तब्ध राहिले. आता काय होणार या काळजीने वसंतराव खुर्चीतून उठून उभे राहिले. इतक्यात ताकद लावून मी वाघाला बगल दिली आणि बाजूला झालो. वसंतरावांच्या चेहऱ्यावर हास्याची रेषा दिसली. आणि माझा अंदाज चुकल्याचे माझ्या लक्षात आले. माझ्या ताकदीची घमेंड थोडी जिरलीच. पण हेही तितकेच खरे की मी केलेला व्यायाम, आखाड्यात खेळलेली कुस्ती, आणि डावपेच हेच या वेळी मला उपयोगी पडले. आणि हे जर माझ्याजवळ नसते तर...तर कल्पनाच करायला नको ! या वेळी मला वडिलांची आठवण झाली. त्यांनी व्यायामाविषयी केलेला उपदेश आठवला. या माझ्या विचा-रांत असताना श्री. देवल माझ्या जवळ आले आणि म्हणाले, ' सूर्यकांत, वास्तविक तुम्हांला सुरुवातीस काही गोष्टी सांगावयास पाहिजे होत्या, पण राहून गेल्या.' आणि त्यांनी मला काही सूचना दिल्या.

प्रथम उभे राहताना पवित्र्यात उभे राहिले पाहिजे. पायातील अंतर जास्त ठेवायचं नाही. तसेच छाती पुढे हवी—आणि कसल्याही परिस्थितीत खाली पडायचे नाही. जमिनीला पाठ लागली की तो पंजा मारेल. मग आमच्या हातांत काही राहणार नाही. या सर्व सूचना पूर्ण लक्षात ठेवून परत मी त्याच्यासमोर जाऊन उभा राहिलो आणि ऑर्डरदेखील मीच दिली. आता मनातून मीही थोडा चिडलो होतो. " भारत...जंप...' ...' भारत...जंप ' ही माझ्या चढत्या सुरातली ऑर्डर ऐकून त्या वाघानेही आपले नाक फेंदा-रले व गुरगुरत माझ्यावर झेप घेतली—आता मी पूर्ण तयारीने व त्याचा अंदाज आल्याने त्याची झेप मी थोपवली आणि परत त्याला दूर केले. असे


# माधवाश्रम

गिरगाव, मुंबई ४

अत्यंत स्वस्त दरांत राहण्याची उत्तम सोय

*सुग्रास व चवदार भोजनासाठी*

**महाजन भोजन गृह**

( मर्यादित भोजनपद्धती )

*दूरध्वनी : ३५८६९१.*

दोन–तीन वेळा झाल्यानंतर आजची प्रॅक्टिस संपली... दुसऱ्या दिवशी आम्हांला आलेले पाहून देवलांना आश्चर्य वाटले आणि ते म्हणाले, 'अरे, तुम्ही आलात. मला वाटलं आपण येणार नाहीत.' त्यावर मी म्हणालो, "का? कालच्या प्रकारावरून मी घाबरलो असं वाटलं की काय तुम्हांला?" देवल 'होय' म्हणणार! पण मीच म्हणालो, "छे–छे–मी रोज येणार. आणखी ८–१० दिवस. पिक्चरला सीन खरा वाटला पाहिजे, तेव्हा ही झटापट चांगली झाली पाहिजे..." या माझ्या बोलण्याचे, श्री. देवलांनी कौतुक केले. त्यांच्या कौतुकाने मला समाधान वाटले. आणि अशा रीतीने माझी प्रॅक्टिस रोज नियमित सुरू झाली. या आठ दिवसांत खूपच प्रगती झाली. आणि देवलांनी वाघाला इतके ट्रेंड केले की थोडी झटापट होताच त्यांच्या इशाऱ्याबरहुकूम वाघ मरून पडण्याचे अॅक्टिंग करू लागला. अशा रीतीने माझी प्रॅक्टिस पूर्ण झाली.

आठ दिवसांत वाघाबरोबर कुस्ती करून माझे अंग अक्षरश: दुखत होते. रात्री स्वप्नंदेखील याचीच पाहत होतो. वाघाबरोबर कुस्ती करून माझं काळीजही वाघाचं झालं होतं. माझ्या ताकदीचा कस लागला होता... या गोष्टीची कल्पना मी घरी दिली नव्हती. कारण घरी उगाच काळजी लागून राहायची.

इकडे सुधीरजींनी बोटॅनिकल गार्डनमध्ये जंगलाचा सीन उभारला होता. बांबूचा १८ फूट उंचीचा पिंजरा उभा केला होता व त्याला वेल, झाडाच्या फांद्या वगैरे लावून जंगलाचे वातावरण निर्माण केले होते. झाले, शूटिंगचा दिवस नक्की करण्यात आला. ज्या दिवसाची मी वाट पाहत होतो तो दिवस उगवला.


**दुर्मिळ नाटकांचे पुनर्मुद्रण**

*किंमतीशिवाय ट. ख. वेगळा*

| | | | |
|---|---|---|---|
| • संगीत वेणुनाद – | गुप्ते | १।। | रु. |
| • ,, लयाचा लय – | वरेरकर | २ | रु. |
| • ,, उग्रमंगल – | खरे शास्त्री | २ | रु. |
| • ,, महाराष्ट्राचा राजा – | दातार | २ | रु. |
| • ,, रणदुंदुभि – | जोशी | २।। | रु. |
| • गद्य – रक्त रंगण – | भोसले | २ | रु. |
| • गद्य – सिंहासन – | चौगुले | १।। | रु. |

**बलवंत पुस्तक भांडार,** मुंबई ४.

मला शुटिंगचा निरोप आला, 'उद्या सकाळी लौकर शुटिंग आहे. पहाटे गाडी तुमच्याकडे येईल. शुटिंग दुपारी १०॥ ते ११ च्या आत संपवायचे आहे. कारण जास्त ऊन झाले तर जनावर तापण्याचा संभव आहे. बाकी सर्व बंदोबस्त केला आहे.'—रात्री विचार करीत मी बिछान्यावर पडलो होतो. उद्याचा दिवस! माझ्या आयुष्यात एक वेगळा दिवस ठरणार आहे. आणि या आनंदात मला झोप लागली.

पण हा माझा आनंद क्षणिक ठरला. मी जागा झालो, समोर पाहतो तो कंपनीचे मॅनेजर. मला प्रथम वाटले, अरे, मला उठायला वेळ झाला की काय? पण नाही. घड्याळात नुकतेच ११॥ चे टोले पडले आणि मी आश्चर्याने मॅनेजरांचेकडे पाहिले. माझ्या पाहण्याचा अर्थ त्यांच्या लक्षात आला आणि त्यांनी सांगितले, 'सूर्यकांत, उद्याचे शुटिंग रहित झाले आहे. तुम्हांला कोल्हापूरला जायचे असल्यास जाऊ शकता.' मॅनेजरनी आपले काम केले. पण त्यांचे हे शब्द ऐकताना मला काय यातना झाल्या असतील, याची कल्पना खऱ्या कलावंतालाच आली असती. मी ऐकतच राहिलो. थोड्या वेळाने मी विचारले, 'पण का? का शुटिंग रहित केले? इतकी तयारी करून?' मॅनेजर म्हणाले, 'श्री. देवल यांनी एक हजार रुपयांची मागणी केली आणि...आणि म्हणून शुटिंग कॅन्सल झाले.'—माझा सर्व आनंद ओसरून गेला. केलेली धडपड वाया गेली. आणि मनातून मी दुःखी झालो. सकाळीच मी वसंतराव यांच्या घरी गेलो. झालेला सर्व प्रकार मी वसंतराव यांना सांगितला. त्यांनाही वाईट वाटले. त्यांनी विचारले, 'मग काय करणार सूर्यकांत?' मी एक दिवस पुण्यात राहून दुसऱ्या दिवशी कोल्हापूरला जाण्याचे ठरवले. मग रात्री मी व वसंतराव सर्कस पाहण्यास गेलो. देवल यांचे आम्हांला आमंत्रण होते. आम्ही सर्कस पाहत होतो. जेव्हा वाघाचे काम आले, त्या वेळी मी मनाने त्या पिंजऱ्यात होतो. आणि त्या रिंगमास्टरऐवजी मीच असल्याचा मला भास होत होता. इतक्यात एका विदूषकाने असा काही आवाज काढला, की त्यानें परत मी ठिकाणावर आलो. त्या दिवशी श्री. देवलांनी मला व वसंतराव यांना विचारले, "पुण्यात एक खेळ आम्हांला द्या. मी पेपरला जाहिरात देतो की, श्री. सूर्यकांत यांची वाघाबरोबर कुस्ती व श्री. वसंतराव शिंदे (विनोदमूर्ती) हे विदूषक. पाहा विचार करा."—मलाही एक वेळ वाटले, काय हरकत आहे असं करायला—पण माझे विचार तिथेच विरघळले. सर्कस पाहून आम्ही परतलो व नंतर कोल्हापुरास निघून आलो. या माझ्या धाडसाचं चीज मात्र झालं नाही, याचंच मला अजूनही दुःख होतं.

○



मनुष्य सवयीनंच सुखी वा दुःखी होत असावा. एकदा मन मेलं की, सुखाचं वा दुःखाचं त्याला काही वाटत नसेल !

## जयवंत दळवी

इथं या पेटीवर बसल्या बसल्या मला बरं वाटतं ! मी बसून राहतो. मला माहीत आहे, मी असा बसून राहतो म्हणून चाळीतल्या काही लोकांच्या मस्तकाची शीर ठणकते ! म्हणतात, आई खाणावळीत राबते, कमावते; आणि हा वीस-बावीस वर्षांचा घोडा नुसता बसून खातो ! खाईन ! तुमच्या बापाचं काय जातं ? मी माझ्या दारातल्या कोळशाच्या पेटीवर बसतो. तुमच्या दारात नाही ना कधी बसलो? खालीपिली बकवास नहीं मंगताय ! नाही तर मला नोकरी द्या. काम कसं करतो ते पाहा आणि मग बोला ! पण कोण कुठं ठेवून घ्यायला तयार नाही. ज्याला त्याला अक्कडबाजपणा पाहिजे ! पाहिजे खरा ! पण आमच्यात तो नाही तर कुठून आणायचा ? बाप आपला कुरूप चेहरा आणि बुटकेपणा देऊन गेला. त्याला मी

काय करणार ! लोक माझ्या तोंडाकडे बघून हसतात. रस्त्यातसुद्धा लोक माझ्याकडे बोट दाखवीत, तो किती बुटका आहे पाहा असे म्हणतात. आणि वर हसतात. आपण तरी काय करणार ? परवा रायाजीनं एक नोकरी आणली होती. डिलिव्हरी प्यूनची. कचेरीत गेलो, तर हा बुटका पोर सायकल कशी मारणार आणि कसली पत्राची डिलिव्हरी करणार असं म्हणून सगळेजण खोखो हसले. झक् मारली आणि नोकरी-साठी आलो असं वाटलं.

तर सगळ्यांकडून हसून घेण्यापेक्षा इथं या पेटीवर बसून राहणं बरं ! बसल्या बसल्या बरं वाटतं ! स्वस्थ बसावं. गॅलरीच्या कठड्यावर हनुवटी ठेवावी. बिट बिट नजरेनं पाहावं. आपणच आपल्याला प्रश्न विचारावेत. आपणच उत्तरं द्यावीत. त्यात सालं मन रमतं. शेवटी सगळा सवयीचा प्रश्न आहे ! एखादी सवय जडली की वेळ जातो.

एका गोष्टीतला शिंपी स्वत:शीच बोलायचा, स्वत:शीच हसायचा.

त्याला कोणी तरी विचारलं, शिंपीबोवा, आपण असं का करता ?

शिंपी म्हणाला, " मी शहाण्याशीच बोलतो, शहाण्याशीच हसतो. म्हणून मी स्वत:शीच बोलतो, स्वत:शीच हसतो,

# सगळा सवयीचा प्रश्न आहे!

स्वत:ला शहाणा समजणारा शिंपी सुखी असला पाहिजे. सवयीनं असं सुखी होता येत असावं.

मला अजून शहाणपण आलेलं नाही. सवयीने येईलसुद्धा !

पण पेटीवर बसण्याच्या सवयीनं मात्र बरं वाटतं.

कारण, चारचौघांत मिसळावं लागत नाही. कुठं तोंड उघडून मोकळेपणानं खळखळ बोलावं लागत नाही. तसं बोलता येत नाहीच ! दुसऱ्याशी आपण बोलायचं म्हणजे दुसरे आपल्या तोंडाकडे टक लावून बघणार. डोळ्यांकडे बघणार. नाकाकडे बघणार. आपल्याला ते मुळीच आवडत नाही. मी बावचळून जातो. माझ्या तोंडाकडे कुणी क्षणभर पाहिलं तरी मी ओशाळून जातो. गोगलगायीसारखा जीव आतल्या आत ओढला जातो. कुठं तरी गुहेत जाऊन बसावंसं वाटतं.

खरंच, गुहेत कसं काय वाटत असेल ? छान असेल ! आपलं ठीक आसन ठोकून बसावं. कुणाची कटकट नाही. असा दिसतो आणि तसा दिसतो म्हणायला कुणी नाही.

पण आहे हेही काही वाईट नाही. ठीक पेटीवर बसावं. पिंजऱ्यातल्या पोपटा-सारखं चहूकडे पाहावं. नजरेत येईल ते बघावं. मनात विचार येतात. प्रश्न येतात. आपणच उत्तरं द्यावीत. आपल्याशीच आपण बोलावं. काही वाईट नाही.

समोर पेट्रोलचा पंप आहे. ते एक बरं आहे !

तिथं सारखी मोटरींची ये-जा असते. तेवढीच जाग. नव्या नव्या मोटरी येतात. नवे नवे चेहरे दिसतात. ही सारी माणसं कुठून येतात ? कुठं जातात ? काही कळत नाही. पण त्यांना बघायला मात्र बरं वाटतं.

त्या पंपावर तरी काम बघ, असं आईनं खूप सांगितलं. तिथं आपल्याला कसलं काम मिळणार ? पण आईला वाटायचं, मिळेल !

म्हणून एकदा तिथं जाऊन आलो.

पण साला तो बोहरी मालक काही बोललाच नाही !

त्यानं बराच वेळ काडीनं आपले किडके दात कोरले. मग ढेंगा फाकून आपला चोळणा खाजवला. आणि हिरडचांतून सुटलेले सुपारीचे कण माझ्याच अंगावर थुंकत संथपणे म्हणाला, हमणा नही. पछी पछी !

मी पछी गेलोच नाही. पण एक बरं, त्यानं माझ्या तोंडाकडे टक लावून मात्र पाहिलं नाही.

पण लेकाचा माझ्या अंगावर थू थू करतो म्हणजे काय ? मी काय त्याच्या बापाचा नोकर आहे ? असा राग आला, वाटलं, त्या पंपाला एकदम आग लावून द्यावी. चांगला कचकडयाच्या बांगडीसारखा भुरुभुरू जळेल.

पण नको ! नाही म्हटलं तरी त्या पंपाचा आधार आहे. तिथं चोवीस तास पाणी असतं. अडीनडीला कळशीभर पाणी मिळतं. कंबरभर उंचीची भिंत ओलांडून उडी टाकली की झालं.

तिथंच भिंतीच्या कडेनं गटार आणि आमच्या समोरच संडास. सगळी घाण. पण आता आम्हांला नाही. नवखे येतात त्यांना घाणीचा त्रास होतो. आम्हांला आता सवय झाली आहे. आमच्या नाकाला फक्त वासच येतो. घाण येत नाही. सवयीचा परिणाम. एकदा सवय झाली की सर्व जमतं.

एका कोपऱ्यात गराज आहे. तिथं सारखी मोडतोड चालू असते. सारखा आवाज येत असतो. त्याचीसुद्धा आता इतकी सवय झाली आहे की रात्री गराज बंद असतं तेव्हासुद्धा कानावर आवाज येत असतात.

तिथं येणाऱ्या मोटरी मी आस्थेनं बघतो. आज ना उद्या आपल्यालाही मोटर घ्यायची आहे अशा तत्परतेनं बघतो. एखादी मोटर मनात भरते. घ्यावीशी वाटते. मग मी त्या मोटरीत बसतो. शेजारी एक जाडजूड बांध्याची गोरी पंजाबीण बसते. जाडजूड अंगाचीच का ? का कोण जाणे ! पण मांसाची आवड आहे हे खरं ! स्टेरिंग धरतो आणि फिरून येतो.

स्थूल गुबगुबीत बाया. एकदम लाल गोऱ्या अशा. पसरट कंबरेच्या. त्यांना बघायला बरं वाटतं, एखादीनं डोळा घालून आपल्याला बोलवावं. अशा एखाद्या बाईला आवळून धरण्यात—मनातल्या मनातसुद्धा का होईना—केवढं सुख आहे !

सालं हे सुख म्हणजे सुद्धा जरा जमत्कारिकच आहे !

कुणाला कशात सुख तर कुणाला कशात !

तळमजल्यावरची गोपूजीची चौकड पंपाकडे बघत बसलेली असते. त्या चौघांत एक साम्य म्हणजे त्यांना घरात कुणी विचारीत नाही. त्यांतल्या एकाला तर त्याची नातवंडंसुद्धा मारतात.

संध्याकाळी चार-पाच तास ते मोटरी बघत असतात. पंपावर येणाऱ्या प्रत्येक मोटरीच्या नंबरावर पैशाची किरकोळ आवक जावक होते. वास्तविक तिथं पैसा हा महत्त्वाचा नाही. पण कशात तरी त्यांचा जीव गुंतून राहतो. कुणी तरी हरला म्हणजे ते एकदम टाळ्या पिटतात. मोठमोठ्यानं हसतात. हसण्यापेक्षा साले खोकतातच अधिक.

त्या चौघांना तसे तासन् तास बसलेले पाहिले म्हणजे मोठी गंमत वाटते. चाळीत कोणी फटकन् मेला तर खांद्याची तूट पडणार नाही.

पोराच्या खिशातनं पावली काढली, म्हणून पोरानं गोपूजीला काल फडाफड मारलं. पण तोसुद्धा एकदा असा बसला की अपमान, दुःख विसरून हसतो. टाळ्या पिटतो. खोकतो.

त्यांना ही सवय जडली नसती, आयुष्यात एवढा हा विरंगुळा नसता तर बिचारे


दीपावली शुभ चिंतन

महाराष्ट्राचे आनंदवनभुवन करण्यासाठी अविरत प्रयत्न करू या।

नयनरम्य
आंतरराष्ट्रीय पर्यटन प्रदर्शनाला
सहकुटुंब सहपरिवार भेट द्या !

क्रॉस मैदान, मुंबई

संचालक
प्रसिद्धी संचालनालय
महाराष्ट्र शासन, मुंबई

तडफडत राहिले असते. त्या पंपाला एखाद्या वेळी आग लागली तर मालकाआधीच हे चौघे म्हातारे फटकन् मरतील.

कदाचित नाहीही ! त्यांना काय? दुसरी एखादी सवय जडवून घेतील आणि नव्या सवयीनं जगतील.


संध्याकाळी कमावती पोरं घरी येण्याआधी हे चौघे फिरायला बाहेर पडतील. गोपूजी, सावंत, रंगो आणि इताफे. रोज संध्याकाळी पाचाला बाहेर पडणार. त्यात कधी चुकूनसुद्धा खळ नाही. "केम रंगो, सूं थयूं ? चालो चालो जल्दी ! —" असं गोपूजी न चुकता म्हणणार. त्याची हयात एका गुजराती व्यापाऱ्याकडे गेली होती. सायकलवरून हिंडून तो गुजरात्यांची बिलं वाटायचा आणि पैसे वसूल करायचा. त्यामुळे कधी बोलायचं झालं की किमान पहिलं वाक्य तरी तो गुजरातीतच बोलणार. पुढं गोपूजीला संधिवात झाला. सायकल मारता येईना. म्हणताच नोकरी गेली.

फिरायला बाहेर पडताना रंगोला उशीर होणार हे ठरलेलंच ! बाहेर पडायचं म्हणजे त्याला हार्नियाचा पट्टा आवळावा लागतो. पण तेवढा उशीर झालेलासुद्धा तयार झालेल्या म्हाताऱ्यांना खपणार नाही. तेवढ्यात सावंत म्हणणार, " कवटा

---

## ☐ सुवर्णसुंदरी

मुसळवाडी स्टेशनवर विमलाबाई उतरल्या आणि टांग्यात बसल्या. दिवाळीला ये, दिवाळीला ये, अशी मैत्रिणीची गेली चार–पाच वर्षे पत्रे येत होती. एकदम जाऊन मैत्रिणीला चकित करावे म्हणून आधी पत्र न घालताच त्या मुसळवाडीला आलेल्या होत्या.



टांगा सुरू झाला. हाडे सैल होऊ लागली. ओसाड रस्ता संपून टांगा गावात शिरला. तेव्हा सकाळचे चांगले ९ वाजले होते. सर्व रस्ते गजबजून गेले.

गावात टांगा जाऊ लागताच रस्त्यावरचा प्रत्येक माणूस टांगा अंगावरून जाऊ लागला की कमरेत वाकून विमलाबाईंकडे पाही व गालातल्या गालात हसे. पाच-सात वेळा असे तीन-चार मिनिटांत होताच विमलाबाई अस्वस्थ झाल्या. त्यांनी पदर सारखा केला. नऊवाराचा पायातला घोळ झटकून नीट पांघरता केला. हातातल्या कापडी पिशवीतील पर्स काढून त्यातल्या आरशात चेहरा पाहिला. टांगा इतका खडखडत होता की सगळा चेहरा एकावेळी

उववतंस रे ?– हे सगळं ठरलेलं ! कोणी तरी लिहून दिलेली वाक्यं पाठ केल्या-सारखी पटापट बोलतात. कुणीही बोलला की काही हसण्यासारखं असो नसो, सगळे कोंबडीसारखे पुंड्या हालवीत खो खो हसणारच. आणि मग खोकणार, थुंकणार. यात फरक नाही.

रंगो पूर्वी सिनेमा थेटरात होता. शेवटच्या आठवड्यात तिकिटाशिवाय आत नेऊन बसवायचा. पण पुढं थेटर एअरकंडिशन केलं. तर थंडीनं त्याचं नाक गळायला लागलं. म्हणून तिथली नोकरी गेली. येऊन जाऊन प्लानवर फुली मारून तिकिट फाडून द्यायचं ! त्यांत थोडं नाक गळलं म्हणून झालं काय ?– असं तो म्हणायचा. पण मालकानं ऐकलं ना ी. त्याला काढून टाकलं. तो घरीच पडला.

सावंत पोलिस खात्यात प्यून होता. एक काळ मोठा तेजीत होता. साल्यानं एका मागून एक तीन बायका केल्या. आता पहिल्या बायकोचा पोरगा मोठा झालाय तर म्हातारा सावंत गुपचूप गॅलरीत झोपतो. करणार काय ? हा साठीतला. तिसरी बाईल पस्तिशीतली. तिच्याकडे डोळा वर करून बघण्याची याला हिंमत नाही. पहिल्या बायकोचा पोरगा तिच्याशी चाळे करतो. पण नजर उचलण्याचं याला

---

हुकमी पाहणे शक्यच नव्हते. परंतु कुठे काही हसण्यासारखे नव्हते. लोक वाकून वाकून पाहत होतेच.

पोलिसाने हात केला आणि टांगा चौकात गर्दीत थांबला. इथे तर अगदी कहर झाला. टांग्याच्या दोन्ही अंगाकडून ७–८ मंडळी आत डोकावली व डोळे मिचकावीत हसू लागली. सायकलवाले मागे वाकून टांग्यात डोकावून गेले. विमलाबाईंना अगदी चोरट्यासारखे झाले. त्या पुटपुटल्या–

" काय मेलं हे गाव आहे ! बाई कधी पाहिली होती की नाही असं करतायत मेले ! ! "

मैत्रिणीचे घर आले. टांगा थांबला. विमलाबाई खाली उतरल्या. मैत्रिणीचा ६–७ वर्षांचा मुलगा ओटीवर खेळत होता. दाराशी टांगा थांबताच तो उंबरठ्यातूनच ओरडला, " आई ' सुवर्णसुंदरी ' आलीय आपल्याकडे ! "

विमलाबाई चपापल्या. दचकून त्यांनी टांग्याकडे निरखून पाहिले. तो टांग्याच्या दोन्ही बाजूंना पाट्या होत्या.

" येत आहे ! येत आहे ! "

" सुवर्णसुंदरी "

दर : तीन, दोन, एक.

क्षणभर विमलाबाईंना सगळा उलगडा झाल्याचे समाधान लाभले आणि आत डोकावून निराशेने हसणारा प्रत्येक चेहरा त्यांना ओरबाडू लागला.

–ग्यानबा

धाडस नाही. चाळभर चेष्टा होते. तर हा सावंत चिडतसुद्धा नाही. फक्त ओशाळून हसतो. त्याचा चेहराच आता ओशाळा झाला आहे. पुढला एकच दात बाकी आहे. कित्येक दिवस तो हालतो आहे. पण काढून टाकायचा नाही. कुणी चेष्टेनं बोलला की तोंड उघडून फक्त जिभेनं तो पुढला दात हालवतो. माकडाच्या गोट्या बसवून तारुण्य प्राप्त झालं अशी कुठं तरी बातमी छापून आली होती. त्याचं कात्रण काढून बेटचानं जपून ठेवलंय. त्याची माहिती कुठं मिळेल म्हणून एकदा मला विचारायला आला. आता असलं हे आम्हांला काय माहीत !

चौथा खांदा इताफेचा ! पूर्वी काय करायचा कोण जाणे ! त्यालाही माहीत नसेल. बायको तरुणपणीच मेली. याला दम्याचा विकार. दिवस–रात्र खोकतो, श्वास टाकतो. त्याची पोर नवऱ्याला टाकून आली आहे. एकुलती एक. आता तिनं नवऱ्याला टाकलंय, की नवऱ्यानं तिला टाकलंय देव जाणे ! आता बापाच्या डोळ्यादेखत परके पुरुष घरी येतात. इताफे श्वास फेकत, मुंडी हालवीत बसून असतो. आलेल्या पुरुषांकडे श्वास घेताना एकदा डोळा वर करून बघतो आणि मग आपल्या पायाचा आंगठा बघतो. चाळ हसते. पण, जाव ! दोन वेळेला पोटाला घालते एवढं म्हणून इताफे गप्प बसतो.

एकमेकांना चिकटून गजाली करीत संध्याकाळी चौपाटीवर जाऊन बसणार. रात्र झाली की कोंडवाड्याकडे जाणाऱ्या गुरांसारखे घरी परतणार. घरी आले की मेल्यासारखे ! आखूड जागेत प्रत्येकाची जागा ठरलेली आहे. साखळीला कुत्रा बांधावा तसे प्रत्येकजण ठरल्या जागी बांधला जाणार. कुणी कोळशाच्या पेटीवर. कुणी गॅलरीतल्या बळकटीवर. चौघे एकीकडे जमले की जणू पूर्वजन्मीचे भाऊच. हसतील काय, टाळ्या मारतील काय ! मग आपापल्या खोलीकडे गेले की हसणं संपलं. क्षणानंतर कुणीतरी कापायला नेणार असे बसून असतात. चाळीतला कुणी शेजारीसुद्धा त्यांच्या वाटेला जात नाही. मी तर त्यांच्याकडे बघत पण नाही. पाहिलं की एकेकानं धरलंच ! सोडणार नाहीत ! पण एकेकाचं रडगाणं सुरू ! गेल्या आठवड्यात सुसरीचं तेल लावलं तर गुडघे सांध्यातनं दुखायचे कमी आहेत असं गोपुजी सांगणार. पूर्वी कुठली कुठली तेलं लावली आणि पैसे कसे पाण्यात गेले तेही आठवून आठवून सांगणार. रंगो सांगणार हवा कशी बदलली आणि सर्दी कशी वाढली ते ! शेवटी पूर्वीसारखा हर्नियाचा पट्टा मिळत नाय अशीही तक्रार करणार. इताफे रात्री किती वाजता श्वास कमी झाला आणि किती वाजता डोळा लागला ते खोकत सांगणार. तर सावंत पूर्वी किती बाया लोळवल्या त्याची एका दातानं ओठ चावत वर्णनं करणार. आणि पुन: वर पेलवानासारखा मांडीवर शड्डू ठोकून म्हणणार, अजूनसुद्धा ताकद कमी नाय झाली हांऽऽ !

अशी एकेकाची रीत ! ही माणसं का जगतात ? सवय असते. आपापल्या सवयीनं जगतात ! त्या सवयीनंच आपापलं दु:ख विसरत असावेत ! कसंबसं जगण्याची

एकदा सवय व्हायला हवी.

तळमजल्यावरचा मूळजी चापसी कसा जगतो !

त्याच्या डोळ्यांवर जाड भिंगांचा चष्मा आहे. ती भिंगं पाहिली कीं त्यातनं त्याला काहीच दिसत नसावं असं वाटतं. पण त्याला चांगलं दिसतं. कारण त्याला तराजूचा काटा बरोबर दिसतो. तो खतावण्या बरोबर लिहितो. त्याला दिसत नसावं असं आपल्याला वाटतं एवढंच ! तो काय बोलतो ते त्याच्या बायकोलासुद्धा कळत नसावं असं वाटतं. पण तिला ते कळतं. तो काही तरी तोंडांतल्या तोंडात बोलत असतो. समोरच्या दाण्याच्या अर्ध्या पोत्यावर त्याची बायको बसलेली असते. तीही काही तरी बोलते. फक्त त्यांनाच ते कळतं. पण त्या बोलण्यात कधी थट्टा, विनोद, चावटपणा नसावा.

समोरच्या पंपावर येणारी सुखवस्तू जोडपी हसत खिदळत असतात. हसणं-खिदळणं हे सुखी लोकांचंच काम असेल का ? प्रेमात हसणं-खिदळणं हवंच ! पण मूळजी कधी हसताना दिसत नाही. त्याची सफेत टोपी आणि चष्मा या गोष्टी त्याला इतक्या चिकटलेल्या असतात की त्यासकटच तो झोपत असला पाहिजे असं वाटतं.

त्याच्या खमीसाला कधी बटणं लावलेली नसतात. तो बटणं विकतो पण त्यातलं एक तो आपल्या खमीसाला लावीत नाही. लेंगा कमरेखाली उतरला की, तो एक हिसका देऊन लेंगा पुनः छातीवर आणतो. पण नाडीच घट्ट बांधण्याचं त्याच्या लक्षात येत नाही. अधून मधून तो नाकसुद्धा असंच वर ओढतो. त्यावरोबर घसर-णारा चष्मा आणि शेंबूड दोन्ही वर जातात. मध्येच काही तरी किचकिचत तो गुळाच्या ढेपीवरची सुरी उचलतो आणि पाठ खाजवतो.

बायको हे सारं पाहत बसलेली असते. तीसुद्धा कधी आंघोळ करीत असेल असं वाटत नाही. लाल आलवणाशिवाय ती दुसरं काही नेसत नाही. ती कधी रडताना दिसत नाही. कधी हसतानाही दिसत नाही. पण तिच्या डोळ्यांतून मात्र पाणी वाहत असतं. आणि नाकातूनसुद्धा ! ते ती पुसत असते. अनेकदा पुसायचं विसरते. तिला आठ पोरं आहेत. आठ बाळंतपणं. आठ पोरं. सगळी जगली. तोंडं वाढली म्हणून अनाज कमी पडत नाही. पोती भरलेली आहेत. मोठी पोरं मूळजीला मदत करतात. मधली पोरं दोनशे ग्राम, शंभर ग्राम घेऊन खेळतात. त्या खेळामुळे वजनं झिजत असतील. झिजतील तेवढी बरी असं त्याला वाटत असेल. किमान इथं तरी तुमचा खेळ होतो, पण आमचा जीव जातो असं म्हणायला नको. अगदी धाकटी रांगत असतात. धान्य खाण्यासाठी जमलेले उंदीर त्यांच्या अंगावर धावतात. पण पोरं भीत नाहीत. सवयीचा परिणाम !

रात्री दुकानाच्या दोन फळ्या लावून मूळजी शांत बसतो. एकटक बायकोला बघत राहतो. तीही त्याला बघत राहते. तो दात कोरत काही तरी बोलतो, तीही बोलते.

अधून मधून डोळे वटारत खोकते. खोकू लागली म्हणजे तिच्या छातीच्या लोंबत्या पिशव्या लिबलिबतात. बेंबीपर्यंत लोंबतात. किलोच्या पिशवीत दोनशे ग्राम अनाज असल्यासारख्या दिसतात. रांगणारं पोर सहज लुचू शकेल !

खरं म्हणजे दोघांनाही एकमेकांबद्दल काय वाटत असेल ?- असल्या बायकोचा मूळजीला वीट येत असेल का ? की बायकोलाच मूळजीचा वीट येत असेल ? की त्यांना एकमेकांबद्दल आकर्षणच असेल ? काय ते कसं कळणार ?

किराणा न्यायला चांगल्या चांगल्या बायका येतात. पण मूळजी त्यांच्याकडे नीटसा बघतसुद्धा नाही. पैसे मात्र बघून घेतो. हे सालं कसं जमतं ? चांगल्या बाईकडे बघायचं नाही म्हणजे काय ? ह्याला संन्यास सहज घेता येईल.

एकेकाची जगण्याची तऱ्हा असली पाहिजे. आपण फक्त पाहावं. पण आपल्याला त्यातलं काही कळणार नाही.

त्याच्याच बाजूचा परशराम सोनार. आता सोन्याचे दिवस राहिले नाहीत. बावनकशी सोनं दिसणं कठीण ! सोनंच का ? बावनकस गेलाच. पण परशरामच्या चेहऱ्यावर फरक नाही. तो पूर्वीसारखाच नितळ आहे. पूर्वीच त्याचा चेहरा सुवर्णबंदी झाल्यासारखा होता. आता सुवर्णबंदी आली तरी तो तसाच आहे. फिकट गोरा. कपाळावर लाल गंधाची टिकली. गळ्यात राखाडी रंगाचं जानवं. कानांत बिगबाळी. नाकावर सोनेरी काडीचा चष्मा. तोही अर्ध्या भिंगाचा. गिऱ्हाइकांना वरून पाहायचं, सोन्याला खालून पाहायचं–अर्ध्या भिंगातून !

आता कुंडीत विस्तू नसतो. ऐरणीवर ठोका नसतो.

पण समई जळते. त्या समईसमोर परशराम व्यंकटेशस्तोत्र वाचतो.

बाकी त्याच्या आयुष्यात फरक दिसत नाही. त्याचं पूर्वीसारखंच चाललं असावं असं दिसतं. सुवर्णकारांच्या मोर्च्यात तो कधी गेला नाही. सुवर्णबंदीच्या हुकमाबद्दल सरकारवर तो कधी रागावला नाही. तो पूर्वी कधी सुखानं उन्मत्त झाला नाही. आता दुःखानं विव्हळत नाही. खरं म्हणजे त्याच्या मनात काय असेल ते एकटा देव जाणे !

तो उभा राहतो तेव्हा निर्विकारपणे जानव्यानं पाठ खाजवतो. अगदी पाठ खाजवण्यासाठीच जानव्याचा उपयोग असावा अशा भाबड्या समजुतीनं !

पोटी दोन मोठ्या पोरी. दोन्ही सासरी असतात.

दुपारी जेवून परशराम बाकावर आडवा पडतो. दोन कलाक झोपतो. तेव्हा त्याचाच चष्मा लावून बायको तांदूळ निवडते. संसारात नजर इतकी सारखी असणं म्हणजे केवढं भाग्य !

बाकी दोघांचंही आयुष्य इतकं संथ आहे की त्यांना पाहताना मोठी गंमत वाटते. कधी कुणाचा आवाज चढला आहे, भांडण झालं आहे, काही नाही ! सारं चालणं, बोलणं शान्त, अळंग ! परशरामानं आयुष्यात ‘ चक् ’ असा आवाज करून आपल्या

वायकोचं कधी चुंबन घेतलं असेल की नाही कोण जाणे ! कधी कधी वाटतं त्याला चौऱ्यांशी आसनांचं चित्रमय पुस्तक दाखवावं. कारण त्यांची हालचालसुद्धा थेट हवा हालल्यासारखी !

पण लेकाचा सुखी असावा !

काही माणसांना ते जमतं. ती जन्मापासूनच सुखी असतात. असोत बिचारी !

एका चाकोरीनं जगतात. म्हणून सुखी होतात.

पण सुख म्हणजे काय ? आणि खरे सुखी कोण ?– हाही एक प्रश्नच आहे !

सुख-दु:खाचा विचार न करता सवयीनं जगणं हे खरं जगणं ! सवय लागली, की जगता येतं. मग जगणं ही मोठी कटकट वाटत नाही. आशा, इच्छा, आकांक्षा यांचा जगण्याशी संबंध ठेवला नाही म्हणजे जगणं सोपं असतं ! फक्त मन मारून जगण्याची सवय केली पाहिजे.

मनुष्य सवयीनंच सुखी किंवा दु:खी होत असावा.

मानलं तर सुख ! मानलं तर दु:ख !

मूळजी चापसी आणि त्याची बायको सुखी आहेत की दु:खी ?

परशराम सोनार सुखी की दु:खी ?

गोपूजीची चौकड सुखी की दु:खी ?

सांगणं कठिण आहे !

कदाचित असंही असेल–ते दु:खीही नसतील, सुखीही नसतील !

मन मेलं की सुखाचं आणि दु:खाचं काही वाटत नसेल !

जगण्याचा हाही प्रकार चांगला असेल !

तो जमतो का पाहायला पाहिजे ! ○


दीपावली शुभचिंतन

५० वर्षे ब्लॉक मेकिंग कलर प्रिंटिंग मध्ये प्रसिद्ध असलेले

बालोद्यान ब्लॉक मेकर्स

फोन नं. ५७९४६

१३७२ नातूबाग, बाजीराव रोड, पुणे २

कारखान्यातून घरी येता येता अर्ध्या वाटेत कुसूमला देवरात भेटला. हातात सायकल धरून ताटकळत उभा होता. सायकलच्या हँडलला मोठी पिशवी अडकवली होती. " श–शेंगा आणल्या होत्या–" कुसूमजवळ येताच देवरात म्हणाला. एकमेकांची दृष्टादृष्ट होईल इतक्या अंतरावर ती आली, की देवरातला नेहमीच जरा चाचरायला व्हायचं.

" अग बाई, मग घरी का नाही ठेवल्यात ? इथं उभं राहिलात ते ?–" कुसुम म्हणाली.

" घ–घरी मी गेलोच नाही. मला व–वाटलंच, तुम्ही अद्याप आला नसाल–"

" सुंदर आहेत हं शेंगा. किती आणता ?"

देवरात लाजला–

" त्यात काय झालं ? तुम्ही परवा म्हणालात, कोवळ्या शेंगा बऱ्याच दिवसांत पाहिल्याही नाहीत. म्हणून आणल्या–"

" लहानपणी आम्ही शेंगांबरोबर लसणीचं तिखट आणि चिंचेचा ठेचा खात असू–"

" त–तिखट मी आणलंय्. ठ–ठेच्याचं माहीत नव्हतं. म–म–म–मात्र वाटलं, आपण इथं कुठं तरी ब–ब–ब–बसून खाऊ या–"

देवरातच्या मानेवर घामाचे थेंब उमटले, शर्टची कॉलर ओलसर झाली, पण अखेरीस जिवाचा धडा करून काय म्हणायचं होतं, ते त्यानं म्हणून तर टाकलं.

" इथंच खायच्या ? माझे हातदेखील धुतलेले नाहीत–" उजव्या पंजावरचे शाईचे दोन डाग न्याहाळीत कुसुम म्हणाली.

# माझ्यात फसूं नको...

सौ. इंद्रायणी सावकार

देवरातनं तिला लग्नाचं विचारलं होतं, घटकाभर मौज करायला नव्हे, तिला एकशे पंचाहत्तर मिळत होते म्हणूनही नव्हे, ती 'ती' होती म्हणून.

देवरात काही बोलला नाही. पारध्याच्या तावडीत सापडलेल्या सशाच्या केविलवाण्या डोळ्यांनी तो दूर कुठेतरी तिच्यामागच्या क्षितिजाकडे पाहत राहिला. त्याचं हे नेहमीचंच होतं, थोडसं काहीतरी बोलायचं, मनाचा हिय्या करून बोलायचं आणि तिच्या उत्तरात नकाराचा पुसटता जरी संशय आला की, दीनवाणेपणानं उभं राहायचं, जणू काही तिनं त्याला फैलावर घेतला होता !

पण लाखो शब्दांपेक्षा देवरातची ही घाबरी नजर, त्याचा मूकपणा बोलका ठरत होता. तो चेहरा अधिक केविलवाणा करण्याचं धैर्य कुसूमच्यात नव्हतं.

"वरं चला–" ती म्हणाली आणि रस्ता ओलांडून लगतच्या माळरानातल्या सावरीच्या झाडाखाली जाऊन बसली.

देवरात एकदम खुलला. माळरानातल्या खाचखळग्यातनं सायकल त्यानं जोरजोरात रेटीत नेली अन् झाडाला लावली, पिशवीतनं कागद काढून कुसूमच्या पुढ्यात पसरून, त्यावर शेंगा ठेवल्या, लसणीच्या तिखटाची पुडी उघडून शेजारी ठेवली.

गुडघ्यांभोवती दोन्ही हातांचं कडं घालून कुसुम निर्विकारपणे त्याची एकेक हालचाल न्याहाळीत होती. बराच काटकुळा होता तो, गाल आत गेले होते, मानेची



हाडं वर आली होती, मनगटं चिंचोळी होती. ' याला घरी कोणी जेवायला खायला घालत नाही की काय ?' कुसूमच्या एकाएकी मनात आलं.

" घरी कोणी नाही तुमच्या ?–" तिनं अनपेक्षितपणं विचारलं.

देवरात जरासा दचकला, पण तिनं एवढी आस्था दाखवावी म्हणून खूपही झाला.

" नाही. काकू वारली दहा वर्षांमागेच. आता काकाही नाहीत–"

" मग घरात कोण करतं ?–"

" क–क–काय करतं ? मला समजलं नाही–"

" अहो, स्वयंपाकपाणी कोण करतं ?–" त्याचा गोंधळ पाहून कुसूमला मोठं हसू आलं.

" मीच करतो, त्यात काय करायचंय् ? भात तर मी पाच-सहा वर्षांचा असल्यापासून करतो–"

देवरात आता गप्पांच्या रंगात आला. त्याचं चाचरणं पार नाहीसं झालं. आई-वडील त्याला आठवतही नव्हते. काका सारखे मळ्यात, काकू बऱ्याचदा आजारी, आपण हातानंच भात, पिठलं कसं करीत होतो, तेवढंही नाही जमलं तर झाडाचे पेरू, नाही तर मळ्यातली कणगरं खाऊनही पोट कसं झकास भरत होतं याची अस्खलित वर्णनं तो तिला ऐकवू लागला.

तसं त्याच्या हकीकतीत रोमांचकारी, खळबळजनक असं काही नव्हतं. सगळं अतिसामान्य. ऊसगावपासून दोन मैलांवर त्याच्या वडिलांचा अन् काकांचा लहानसा मळा होता. दोन वर्षांपूर्वी त्याच्या काकांनी अर्धा एकर उसाची जमीन घेतली होती. त्या उसासाठी कारखान्यात त्याच्या खेपा होत. उसाचे पैसे घेण्यासाठी कारखान्याच्या कचेरीत जावं लागे. तिथंच कुसूमची आणि त्याची ओळख झाली होती.

पण देवरातच्या त्या साध्या गोष्टी ऐकता ऐकताच कुसुम एकाएकी हेलावली. तिच्या बारीक वाटकुळचा डोळ्यांत अचानक अश्रू उभे राहिले. कितीतरी वर्षांत संध्याकाळच्या गार वाऱ्यात, मोकळ्या माळरानावर ती बसली नव्हती. कितीतरी वर्षांत तिच्याशी असं साधेपणानं कोणी बोललं नव्हतं. कोणी काही बोललंच नव्हतं की काय ? ओल्या जमिनीचा वास ल्यालेल्या मऊ शेंगांची तर तिची आठवणच बुजल्यासारखी झाली होती. त्यांची ती जिभेवर रेंगाळणारी गोड चव, गार स्पर्श, तो संध्याकाळचा झुळझुळता वारा, तांबड्या आकाशात तरळणारे ढगांचे पांढरे झुबके अन् पुढ्यात उलगडलेलं तांबूस माळरान–सर्वांनी तिचं मन खेचून दहा वर्षांमागे नेलं...

ते वडूजचे राहणारे. वडील मास्तर होते, म्हणूनच दोनही मुलं–पद्माकर आणि कुसुम–शिकत राहिली. पद्माकर एस्. एस्. सी. झाला अन् कोणाच्या तरी वशिल्यानं ऊसगावच्या साखरेच्या कारखान्यात चिकटला. मिळायचे महिना जेमतेम नव्वद रुपये, पण तेवढ्यानंही त्या घरावरची सततची दारिद्र्याची छाया कितीतरी पुसट होत होती !

किती मनसुबे रचले जात होते त्या पैशावर ! आईला दोन नागपुरी लुगडी घ्यायची, आबांना गरम कोट शिवायचा, कुसूमच्या लग्नासाठी पैसे साठवायचे, स्वतःचं लहानसं घर बांधायचं...

मनसुबे फारसे मोठे नव्हते. माणसं दरिद्री, त्यांचे मनसुबेही दरिद्री. पण महिना पंचेचाळीस रुपयांच्या मनीऑर्डरमध्ये ते पुरं होणं अशक्य होतं. जन्माचं अठराविश्वे दारिद्र्य बोकांडी बसलं होतं. तेव्हा निदान अप्राप्य इच्छांच्या यातना तरी नव्हत्या, नुसती ओढगस्तच होती. आता मनस्ताप वाढला, जास्त पैसे कसे मिळवता येतील आणि त्यातून आपले मनोरथ पूर्ण कधी करता येतील, हा एकच घ्यास त्या सगळ्या कुटुंबाला लागला...

कुसूमनं ऊसगावच्या साखर कारखान्यात नोकरी पत्करण्याची कल्पना यातूनच उद्भवली. पद्माकरची ओळख होती, त्याच्या दोन खोल्या होत्या.

'पॅकर्स'च्या कामासाठी मुलींची भरती चालू होती. कुसूमचं वयही होतं अठरा. अद्याप लग्नाची घाई नव्हती. पैशापरी पैसा मिळाला असता, आणि पद्माकराला 'मेस'चं जेवावं लागलं नसतं. सगळं कसं परमेश्वरी योगासारखं जमून आलं होतं.......

महिना साठ रुपये कुसूमच्या हातात येत होते. ते सगळे पद्माकरकडे जात असले

दीपावली शुभ चिंतन

*

विजेच्या कोणत्याही
उपकरणासाठी भेटा.

*

*मुख्य कचेरी*
४८४ बुधवार पेठ
पो. बॉ. नं. ६२३, पुणे २

**रामचंद्र**
**भगवानदास आणि कं.**
इलेक्ट्रिकल इंजीनियर्स
ॲण्ड डीलर्स
**औद्योगिक प्रकल्प व सरकारी**
**पुरवठा खात्यांतील अग्रेसर संस्था**
*शाखा*
२८ देवकरण मॅन्शन,
विठ्ठलदास रोड, लोहार चाळ, मुंबई २

तरी एखाद्या साडीला, पावडरच्या डब्याला नकार येत नव्हताच. सहा महिन्यांत कुसूमची सारी कळाच पालटली. तिचा गव्हाळी रंग सतेज झाला, अंगांनं ती भरली, चेहरा प्रसन्न दिसू लागला.......

वडूजचं ते बारकसं खोपटं आता कुसूमच्या जगात नव्हतं. साखर कारखान्यातलं 'पॅकिंग 'चं, खातं, तिथल्या मुली, तिथले अधिकारी, हे तिचं जग झालं होतं. वडूजला खोपटयात 'डाळीची आमटी करू का पिठलं करू ?' एवढाच व्याप डोक्याला होता. इथली क्षितिजं भलतीच मोठी होती. इथं चार मुलींत चमकायचं होतं. पुढं यायचं होतं, सगळ्यांची वाहवा मिळवायची होती....

"उद्या मोठे मालक बोडसांना घेऊन यायचेत, माहीत आहे ना ?–" पॅकिंग खात्याच्या सुपरिटेंडेंटनं कामावर आल्या आल्या सर्व मुलींना बजावलं होतं. मोठे मालक म्हणजे स्वतः तर्खडकर. कारखाना त्यांच्याच मालकीचा होता. शिवाय मुंबईला दुसरे अनेक उद्योगधंदे होते.



## ☐ आळ

विनू, दिनू आणि बंडू हे तिघे एकाच खोलीत राहत होते. भांडणतंटयाविना तिघांचे बरे चालले होते. तिघांची मोलकरीण एक होती. खानावळ एकच होती. दुःखही एकच होते. तिघांचे अजून लग्न व्हायचे होते.

एके दिवशी सकाळी दिनूच्या लक्षात आले की त्याचे पाच रुपये चोरीस गेले आहेत. आदल्या दिवशी संध्याकाळी त्याने खिडकीत पाकिट ठेवले तेव्हा पाच रुपये होते. पुनः येऊन पाहतो तो पैसे गेलेले.

विनू व बंडू विचारात पडले की पैसे कसे गेले, मोलकरणीशिवाय चौथे कुणी घरात आलेले नव्हते. दिनूला बरे वाटावे म्हणून त्यांनी मोलकरीण बदलली.

काही दिवस बरे गेले–आणि एकाएकी विनूचे दहा रुपये गेले! आंघोळीला

"पण बोडस कोण ?–" कुसूमनं विचारलं होतं.

"वाऽवा, पेपर बिपर वाचता की नाही ? मंत्री आहेत ते–" सुपरिटेंडेंटनं कुसूमला खिजवलं होतं.

"अय्याऽ–मंत्री येताहेत ?–बाई गऽ त्यांच्याशी कसं बोलायचं ?–भीती वाटते–" मुलींचा एकच चिवचिवाट सुरू झाला होता.

खादीचं धोतर, पैरण आणि टोपी अशा पोषाखातल्या प्रशस्त बोडसांना पाहून मुली प्रथम बऱ्याच गांगरल्याही होत्या. पण बोडस भलतेच खेळकर होते. सर्वांत जास्त वेळ त्यांनी 'पॅकिंग'मध्येच घालवला होता आणि–

"साखर तुम्ही खात नाही ना ? नाहीतर वजन वाढेल, माझ्यासारख्या जाड व्हाल—"

"इथं मुली कशाला ? साखरेची गोडी वाढावी म्हणून की काय ?–" असं काहीतरी चतुर बोल बोलून मुलींना खदखदून हसवून सोडलं होतं, त्यांची भीड

---

जाताना टेबलाच्या ड्रावरमध्ये त्याने पैसे ठेवले होते. आंघोळ करून पुन: येतो तो पैसे नाहीत !

त्या दिवसापासून दिनू व विनू यांच्यांत समदु:खाचा नवा धागा निर्माण झाला. गेलेल्या पैशांचे दु:ख दोघे बंडूच्यादेखत व्यक्त करीत. बंडू मात्र ओशाळून विचार करी– 'पैसे आपण चोरले असे या दोघांना वाटते का काय ? नाहीतर मग हे दोघे आपल्या देखत पुन: पुन: पैसे गेल्याबद्दल का बोलतात ?

बंडू अस्वस्थ झाला. काही कारण नसताना खोलीत वितुष्ट निर्माण होऊ लागणार असे त्याला वाटू लागले.

बंडूने खूप विचार केला, काय करावे ! अखेर त्याने एक दिवशी सकाळीच बोंब मारली–

"माझे पंधरा रुपये गेले ! "

दिनू–विनूंनी आश्चर्याने विचारले तेव्हा तो म्हणाला–

"काल सकाळी बाथरूममध्ये गेलो तेव्हा पैसे तिथेच काढून ठेवले. पहिली आंघोळ काल मीच केली. पैसे कसे गेले काही कळत नाही ! "

बंडूचेही पैसे गेल्याचे कळताच तिघे पुन: समदु:खी झाले आणि तिघे सुखाने राहू लागले.

–ग्यानबा

---

घालवली होती.

"अय्या ऽ, एवढा मोठ्ठा माणूस, पण कित्ती छान, निगर्वी आहे नाहीऽऽऽ?" सर्व मुलींनी एकदिलानं मत दिलं होतं अन् संध्याकाळी 'गेस्ट हाऊस'वर आपल्या-बरोबर जेवायचं आमंत्रण बोडसांनी दिलं तेव्हा तर त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता.

जेवताना बोडस अधिकच रंगात आले होते. मुली त्यांच्या विनोदाला सारख्या खुसखुसत होत्या.

"–तरुण माणसांत मिसळलं की आपलंही मन तरुण राहतं. नाना चिंता असतात मला. आपले व्याप, जगाचे व्याप, सुटत नाहीत. या पोरींच्या चिवचिवाटानं क्षणभर सगळं विसरायला झालं होतं–" बोडस पुनः पुनः म्हणत होते आणि मुली अधिकाधिक खूष होत होत्या....

पुन्हा एकदा कुसूमच्या जगाच्या कक्षा पालटल्या होत्या– तिच्या नकळत. बोड-सांना खूष ठेवण्यावर तर्खडकरांचा धंदा अवलंबून होता. वरचेवर ते बोडसांना ऊसगावला आणीत. इथं ऊसगावात रंगीत-संगीत पार्टी वाटेल तशा झोडता येत होत्या. पुण्या-मुंबईकडे पोळीवर मुरंबा वाढला तरी वर्तमानपत्रांत बोंब होत होती, ते भय इथं नव्हतं. बोडसांना इथं निवांत जागी आणायचं, त्यांच्याभोवती मुलींचा घोळ घालायचा, आणि आपल्याला हवे ते परवाने मिळवायचे, अशी तर्खडकरांची क्लृप्ती होती. या चक्रात कुसुम सापडली. बोडस हे तर्खडकरांना देवस्थानी म्हणून उद्या साखर कारखान्याचंही तेच दैवत! कुसूमचंही आता तेच दैवत झालं. आज काय बोडसांनी साडी आणली, उद्या त्यांच्याबरोबर सहलीला जायची संधी मिळाली, परवा त्यांनी कुसूमला 'पॅकिंग'मधून काढलं आणि कचेरीत बैठं काम दिलं, पगारवाढ मिळाली, असं चक्र सुरू झालं.

पद्माकरलाही पगारवाढ मिळाली, चांगलं घर मिळालं, तो कुसूमला बोलतोय कशाला? आईवडील लांब वडूजला, दोघं मुलं हुशार निघाली, मिळवती झाली या आनंदात. त्यांच्या तोंडी मुलांची फक्त स्तुतीच असायची. ऊसगावात लोकं कमी होते ते बहुतेक चरितार्थासाठी साखर कारखान्यावर अवलंबून. एरवी सगळ्या गावच्या कुटाळक्या करतील पण 'तर्खडकर', 'बोडस' अशा 'बड्या' मंडळीं-बद्दल 'ब्र'काढायचा नाही, हे त्यांचं ब्रीद. त्यामुळं जननिंदेचं बीजही कुसूमच्या वाट्याला कधी आलं नाही.

एक नाही दोन नाही. तब्बल तीन–साडेतीन वर्षं तिचं जीवन हे असं चाललं होतं. बोडस आले की हक्कानं तिला बोलावून घेत, लहानसहान दौऱ्यांत तिला बरोबर नेतही. प्रत्येक वेळी मिळणारी एक साडी आणि मोटारीचा प्रवास एवढ्या-वर कुसूम बेहद्द खूष होती. महिन्यातून बोडसांच्या दोन-तीन खेपा व्हायच्या. ते आले, की त्यांच्याबरोबर आणि एरवी त्यांची वाट पाहण्यात, त्यांनी आणलेली

*With Best Compliments from*

# SANDOW TRADERS

117 Medows Street, Bombay 1.

Phone – 252398

*Sole Distributors*
*and a Leading House for*

## SANDOW

BRAND ERASERS

*Manufactured by*

**SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.**

KIRKEE : POONA 3

साडी निरखण्यात दिवस निघून जायचे.

—आता प्रथमच त्या कोवळ्या शेंगांच्या राशीसमोर बसून कुसूमला काहीतरी हरपल्याची, आपल्या जीवनाचा काहीतरी अगूढ—सुंदर भाग छाटला गेल्याची जाणीव झाली.

"—चटणी तिखट झालीय् का हो जरा ?" देवरातनं विचारलं तशी कुसुम भानावर आली.

"अं ? चटणी ?—"

"तुमच्या डोळ्यांत पाणी तरळतंय्. मिरची जास्त झाली वाटतं—"

"छे:, कचरा गेला डोळ्यांत—" मोठ्या प्रयासानं कुसूमनं वेळ मारून नेली. पण मन गलबलून गेलं होतं, आवंढ्यांनी घसा तटतटत होता, मनातल्या मनात एकाच वेळी ओक्साबोक्शी रडू येत होतं अन् खदाखदा हसू येत होतं.

तिचे अश्रू ! आजवर कोणी कदर केली होती तिच्या अश्रूंची ? तिची ? पद्माकरनं नाही, बोडसांनी तर नाहीच नाही. कैकदा बोडस तिला बोलावून घेत अन् तासन् तास व्हरांड्यात तिष्ठत बसायला लावीत, तर कधी लाडिकपणाचं बोलणं मध्येच खुंटवून तिरसटपणानं फर्मावत—

"कुसुम, माझ्याकडे कोणी आलेत, तू मागल्या व्हरांड्यात जा पाहू—"

कुसुम निमूटपणे निघून जाई. बोडसांचं सगळं ऐकायचं एवढं एकच तिला माहीत होतं ना ? तिच्या डोळ्यांतला शितोडा पाहू शकणारा, तिचे डोळे पाणावू नयेत म्हणून तडफडणारा माणूस तिला आज प्रथमच भेटला होता.

"—मी—मला—मला—मला काही तरी विचारायचं होतं—" देवरातनं पुन्हा एकदा आपलं धैर्य एकवटलं होतं. पाहताक्षणीच कुसुम त्याला आवडली होती. कैक दिवसांपासून लग्नाबद्दल तिला विचारायचं त्याच्या मनात होतं, पण जमत नव्हतं. कधी तिच्यासाठी फुलं आण, कधी भाजी ने, असंच त्याचं चाललं होतं.

"ल—ल—ल— लग्नाचं कसं काय ?—"

"अं? लग्न? कुणाचं लग्न? कुठे—?" कुसुम.

"म—म— माझ्याशी कराल का ?—"

"ओ:—"

कुसुम एकदम स्तंभित झाली. त्याच्यापेक्षाही तिला जास्त चाचरायला होऊ लागलं.

"—म—म विचार करते—" ती कशीबशी म्हणाली. आणि पळून गेली.

देवरातनं तिला लग्नाचं विचारलं होतं. देवरातला ती आवडली होती— घटकाभर मौज करायला नव्हे, तिला महिना एकशे पंचाहत्तर मिळत होते म्हणूनही नव्हे. ती 'ती' होती म्हणून, तिच्या स्वत:साठी.

★ ★ ★

सबंध रात्रभर कुसुम स्वत:शी हसत राहिली. उभ्या जन्मात तिचं मन असं कधी

बहरलं नव्हतं. जादू मारल्यासारखं एका क्षणात नाना कोमल स्वप्नांनी ते डवरलं होतं. हिरवा चुडा भरून ती गौरीहाराशी बसली होती... मासोळ्यामरल्या पावलानं धान्याचं माप लवंडीत होती... चुलीशी भाकरी भाजीत होती आणि देवरातच्या पानात वाढीत होती... तिच्या मनाला असा मोहोर येऊ शकेल असं तिला कधी चुकूनदेखील वाटलं नव्हतं...

—एकाएकी कुसूमचा संतापानं तिळपापड झाला बोडसांबद्दल. देवरात साधा होता, गरीब होता, भित्रा होता, चाचरा होता, पण माणूस होता. बोडस नुसतेच मोठे होते. त्यांनी कुसूमला फक्त साड्याच दिल्या होत्या, स्वप्नं तर दिलीच नव्हती, पण तिच्या मनात काही स्वप्नं दडून बसली आहेत की काय, याची साधी चौकशीही केली नव्हती. मनातल्या मनात कुसुम बोडसांना शिव्या घालू लागली; रागानं ओरडू लागली—

"मी देवरातशी लग्न करणार आहे साहेब. यापुढे तुम्हांला माझं नखही दिसणार नाही— त्यानं मला लग्नाचं विचारलंय—लग्नाचं विचारलंय—लग्नाचं—लग्नाचं—लग्नाचं—"

प्रत्यक्षात बोडसांशी एवढ्या इरेस पडून बोलणं कुसूमला शक्यच झालं नाही.

"— मी लग्न करणारे—" गुळमुळीतपणे ती म्हणाली.

"हो का? उत्तम, उत्तम. मलाही तसंच वाटत होतं. बरं, आता थोडा वेळ बाहेर


*With*
*Best*
*Compliments*
*from*

**B. C. MEHTA**
**AND Co.**

19 Bhandari Street,
BOMBAY — 3.

Dial : 324095 – 325315

STOCKISTS :

Toluene ✻ Toluene Pure ✻ Benzene 'N' Grade ✻ Polyglycols Mono– di– tri ethanolamines ✻ Ethylene Di– amine ✻ Diethylene tri– amine ✻ Alkyl Benzene etc.

IMPORTERS :

Solvents ✻ Chemicals
Pigments ✻ Plasticizers.

## दीपावली शुभचिंतन

काळेभोर, रेशमी, विपुल केस सर्वांनाच हवेसे वाटतात. केसांची नीट सतत वाढ होण्यासाठी व त्यांची नीट काळजी घेण्यासाठी दररोज अप्सरा हेअर ऑईल वापरा—सकाळी केस विंचरताना व रात्री झोपण्या आधी.

अप्सरा हेअर ऑईलचा सुंगध तुम्हाला दिवसभर प्रसन्न ठेवील व त्यातील आयुर्वेदिक औषधी तुमच्या केसांची काळजी घेतील. केसांतील कोंडा हमखास जाईल व केसांची वाढ अबाधित राहील. रात्री शांत झोप येईल व केस रेशमासारखे मऊ होतील.



डोंगरे

**अप्सरा**

हेअर ऑईल

उत्पादक:
के. टी. डोंगरे ॲन्ड कं. प्रा. लि.,
मुंबई, कानपूर, नैरोबी (आफ्रिका)

**डोंगरे बालामृताचे निर्माते.**

काळेभोर
रेशमी विपुल
केस



आजच
**अप्सरा**
हेअर ऑईल
वापरावयास
सुरुवात करा..

बैस पाहू. लोकं यायची आहेत. ती गेल्यावर तुला बोलावतो–" बोडसांनी कुसूमच्या गालांवर टिचकी मारली. साडीचं पुडकं तिच्या हातात ठेवलं आणि तिला बाहेर पाठवून दिलं.

बोडसांनी तिच्या तोंडात मारली असती तरी तिला धक्का बसला नसता एवढा कुसूमला धक्का बसला. तिची अपेक्षा होती, बोडस संतापतील, कदाचित् त्यांना धक्का बसेल, वाईट वाटेल. पण छे:, त्यांना काहीच झालं नव्हतं! 'मी चहा घेणारे' असं म्हणाल्यानं ते जितके निर्विकार राहिले असते तितकेच, "मी लग्न करणारे' म्हणाल्यानं राहिले होते. त्यांच्या लेखी कुसुम ही एक सोय होती. तिच्यात त्यांच्या भावनांचा अणुरेणूही गुंतला नव्हता.

आपल्या जीवनातली खरी भीषणता कुसूमला आता जाणवली. लग्नाचा तिनं पक्केपणानं विचार केला नव्हता, देवरातला बोडसांसंबंधी सांगायचं किंवा काय, तो काय म्हणेल, हे आनुषंगिक विचारही तिनं अद्याप केले नव्हते. त्याच्या मागणीनं अवीट सुखाची जी लाट तिच्या मनात उसळवली होती तेवढ्यावरच ती तृप्त होती. आता ती हादरली.

" ...मलाही तसंच वाटत होतं ", बोडस म्हणाले होते. कुसुम लग्न करील, मग आपले आणि तिचे संबंध संपुष्टात येतील, आणावे लागतील अशी पुसटशी भावनाही त्यांच्या मनाला चाटून गेली नव्हती. उलट कुसूमचं लग्न ही त्यांच्या दृष्टीनं सोयीत सोय होणार होती. कुसुम समजत होती त्याप्रमाणे या लग्नामुळे तिच्या जीवनातलं अधःपाताचं पर्व संपणार नव्हतं, तर आणि एका दांभिक मुखवट्याआड जसंच्या तसं चालू राहणार होतं. बोडस तिला बोलवीत राहणार होते, ती जात राहणार होती, त्यांनी आत बोलावीस्तवर मागल्या दारी बसत राहणार होती... या भीषण खेळात देवरातसारख्या निर्मळ, साध्या मनाच्या माणसाला ओढणं शुद्ध पाप होतं, कुसूमच्यानं ते कधी होणार नव्हतं.

" ...त–तुम्ही सांगणार होता..." बोडस ऊसगावातून निघून गेले तेव्हा कुठे देवरातला कुसुम सापडली.

" मला नाही जमणार–" कुसुम.

काही तरी बोलण्यासाठी म्हणून देवरातने ओठ विलगले अन् मग तसेच उघडे राहिले. शब्द मात्र फुटले नाहीत. डोळ्यांत पुन्हा ती दीनवाणी लकेर चमकू लागली. कुसूमच्यानं तिकडे पाहवेना. ओठ गच्च आवळून ती घाईघाईनं घराकडे चालू लागली. ती निघून गेल्यास आज ना उद्या ती केविलवाणी छाया नाहीशी होण्याचा संभव होता. ती जवळ राहिल्यास मात्र कायमची...आणि कुसुम ते कधीच होऊ देणार नव्हती, कधीच होऊ देणार नव्हती.

O

 [ पृष्ठ ४३ वरून ]

एक बार देखा था, तभी तुम्हारे छोटे पैर देखकर अचरज हुआ था। अब अकेले भेंट हुई है, तब कह डाला। माफी मांगती हूं भाई !"

विरघळून म्हटलं,

" मैंने ये थोडेही कहा है, कि माफी मांगो ! लेकिन पहले देखा था ? कहाँ पर ?"

" हरे राम ! लिखकर थोडेही रख्खा है मैंने– कि कहाँपर देखा था ? "

आग्रहान म्हणालो–

" बात यौं टालो नहीं–"

पुन: हसून ती म्हणाली,

" केवळ छोट्या पावलांमुळंच तुम्हाकडे लक्ष गेलं असं नव्हे–"

" मग ? "

" तुमचे संस्कृत उच्चार ! महराजजी म्हणाले होते की, पाण्यानं भरलेल्या पितळी पातेल्यावर ठोका मारावा, तसा तुमचा स्वर आहे. एकेक वेगवेगळा वेचून घ्यावा, असे स्वच्छ तुमचे उच्चार आहेत."

" पण ते उच्चार ऐकले होते कुठं ?"

" पुन: तेच ! कधीं अन् कुठं गाठ पडत्ये, ते ध्यानात राहिलंच पाहिजे, असं कुणी सांगून ठेवलं आहे ? पण एका देवळाच्या ओटचावर बसला होतात. पाय हलवीत व डोळे मिटून तुमचं चाललं होतं स्तोत्रपठण. माझा हात दाबून महराज-जींनी तुमचा स्वर अन् म्हणण्याची पद्धत– दोन्हीकडे लक्ष वेधवलं होतं माझं ! पण ते असू दे– आलात कुठून ?"

" गुलजारी घाट–"

अचंब्यानं पुन: तोंड झाकीत म्हणाली,

" बाप रे ! ते तर पंधरा–वीस मैलांवर राहिलं–"

नेटका हिशेब सांगितला–

" साडेचौदा मैल–"

" जेवणखाण ?"

या वेळी हसायची पाळी माझी होती. पण माझं हसणं तिला टोचलं असावं. आग्रहानं पाऊलभर पुढं सरत तिनं म्हटलं,

" चला पाहू ! उठा. बसू नका पावलांवर अभिषेक करीत. स्वैंपाक तयार आहे. पंगत बसलीसुद्धा असेल. चला चला !"

" पण कुठं ?"

" संगमावरल्या देवळात. कुणा कुडमी परिक्रमावासीयाची परिक्रमा संपली आज.

त्यानं कडाही समारंभ केला आहे–"

भूक तर अनिवार लागली होती. पोटात मली थोरली पोकळी जाणवत होती. अशी पोकळी, की जी कधी भरतच नाही. सकाळी मैयाचं दूध पिऊन निघालो होतो. दिवसभर पीतच होतो–तहान लागेल तेव्हा. भूक जाणवेल तेव्हा. तरी ते खालिस दूध बहुधा पुरं पडत नसावं. आतडी जणू सुकून गेली होती.

कधी कधी वाटे, की, ती बाहेर काढून घ्यावीत, एकतारीची तार काढून तिच्या-ऐवजी ती लावावीत खुंटी नीट पिरगळावी. मग त्या स्वरात गावं भुकेचं गाणं !

" चलो न ! क्या देख रहे हैं ?"

परिक्रमेच्या वाटेवर हे फार बरं असतं. परिचय अगदी सहज होऊन जातो. प्रारंभीच्या ताणाताणीची इथं गरज नसते. औपचारिकतेची कृत्रिम बंधनंही नसतात.

तिनं 'चलो' म्हटल्यावर मग फारसा संकोच केला नाही. मुकाटचानं उठलो, अन् दरड चढू लागलो.

* * *

कुडमी म्हणजे काही शास्त्रपुनीत, विश्ववंद्य भूदेव नव्हे, ती बिचारी एक दडपली-चेपलेली जात. एरवी कुडम्याच्या हातचं कुणी जेवत नाही. आमच्या क्रान्तदर्शी पूर्वजांनी या हिंदुधर्माच्या नगरीत चहूकडे मजबूत भिंती घालून जातीजमातींची जी अभेद्य कुंपणं करून ठेवली त्यातले उच्चवर्णीय तर बहुधा कुडम्याच्या हातचं जेवायचा विचारसुद्धा करणार नाहीत.

पण त्यातही त्यांनी एक सोय करून ठेवली आहे. जेवण चालत नाही, म्हणजे कच्ची रसोई चालत नाही–आंबटीभातासारखी. शिरापुरी, भजी, अशी पक्की रसोई असली, तर मग तिला काही हरकत नाही ! केवळ त्या रसोईवर एकदा मंत्रजलाचा अभिषेक केला की झालं !

पाहिलं तर देवळाबाहेरच्या सारवलेल्या अंगणात नाना पंथांचे अन् नाना जमातींचे परिक्रमावासी पंगती पाडून बसले होते. स्वयंपाक कुडम्यानं केला असला, तरी वेगळी पंगत करून बसलं, की ब्राह्मणांचा सन्मान राखला जात होता.

ब्राह्मणांच्या पंगतीतही चांगलेच अतिरथी महारथी मांडे ठोकून बसले होते. भरघोस दाढ्यामिश्या, जटा. त्यांचं श्रेष्ठपण त्यांनी अंगभर काढलेल्या चित्रावळी-वरून स्वच्छ जाणवत होतं. वस्त्रं जरी मळकी होती, तरी त्यांनी त्रिपुण्ड्र, नाम, टिळा, चक्रांकनं, भस्मलेपन या कलाकुसरीत कुठं उणं ठेवलं नव्हतं.

एकदम दचकलो. असा क्रोध अपेक्षिला नव्हता.

"चुडैल ! पूछता हूँ, कि थी कहाँ अबतक ! एं ? शाम हो गई, तबसे कहीं गायब हो गई ? क्या कोई मायकेवाला मिला था क्या ? या कोई घडियाल निकल आया मैयासे ? निगल लिया था उसने ?"

तिनं जीभ चावली अन् केवळ माझ्याकडे इशारा केला. तेव्हा कुठं महराजजींचा स्वर थोडका उतरला.

"अच्छा! फक्कड मिले थे?"

म्हणजे मी अगदी निरुपद्रवी. माझ्यापासून कसलंच भय नाही. एरवी भीती आहे माहेरच्या माणसापासून. ती आहे नर्मदामैयामध्ये राहणाऱ्या मगरीपासून.

चला! हेही काही कमी नाही.

नोट निरखून पाहिलं. महराजजीच्या अन् तिच्या रंगरूपात अन् वयात कुठंही कसलंही साम्य नव्हतं. ती अशी मूठभर कुडीची होती, तर महराजजी चांगला उंच, धडंग, काळाकुट्ट, दात पुढले पडले होते. अंगानं सडसडीतच होता. पाहताक्षणी ध्यानी आलं, की गांजाच्या धुरामुळं ओठ अगदी विवर्ण झाले आहेत.

मी महराजजीच्या दृष्टीनं पंक्त होतो—माझे शुद्ध स्वच्छ संस्कृत उच्चार त्यांनी ऐकले होते. तेव्हा त्यानं मला भूदेवांच्याच पंक्तीत एका कोपऱ्यात जागा दिली, हे अगदी स्वाभाविकच झालं. तीही जेवायला बसलीच, कुठं ते मात्र दिसलं नाही.

ज्या कुडम्याचा तो कडाहीसमारंभ होता, तो बिचारा मोठ्या नम्रपणे बाजूला हात जोडून उभा होता. तिथून लांबूनच तो आग्रह करीत होता. त्यानं शिजविलेल्या पक्क्या रसोईत दोष कसलाच नव्हता, मात्र त्यानं पंक्तीत हिंडून आग्रह करणं निषिद्ध होतं.


सगळेच यथेष्ट जेवले. खोटं सांगायची गरज नाही, मीही भरपूर खाल्लं. बहुता दिसांनी स्वादिष्ट अन्न लाभलं होतं, तेव्हा मग तडस लागेस्तवर खाल्लं. कुडम्याला आशीर्वाद देत, त्याची शुभकामना करीत सगळ्या श्रेष्ठांनी अन् कनिष्ठांनीही जेवताना हयगय कसलीच केली नाही. माझ्या समोर एक श्रेष्ठ परिक्रमावासी जेवत होता. त्यानं पोटाची खाच तर भरलीच, पण दुसरे दिवशीही अन्नदात्याला आशीर्वाद देता यावा, या उदात्त हेतूनं आपल्या आलमीनच्या बोगणीत शिरा भरून घेतला.

असं सुग्रास भोजन झालं. सगळ्या मंडळींनी मिळून मैयाची आरती उरकली,


दीपावली शुभचिंतन

बिजली

लॅम्पस




बिजली प्रॉडक्टस् (इंडिया) प्रा. लि.

७०, हडपसर इंडस्ट्रियल एस्टेट, पुणे-१३

फोन: ८७४७

तीतही लांब उभे राहून यथाशक्ती भाग घेतला. महराजजीनं जाहीर केलं–
" हे फक्कड संस्कृत श्लोक मोठे सुरेख म्हणतात !"

इच्छा नसता, निरुपायाने दोन चार स्तोत्रं म्हटली. स्तोत्रपाठ सुरू असतादेखील जांभया येतच होत्या. पण मोठ्या कष्टानं त्या दाबल्या. उदरप्रांती अशी सुबत्ता निर्माण झाल्यावर त्या येणे स्वाभाविकच होते. मात्र स्तोत्रपाठ संपल्यावर मंदिरासमोर सुरू असलेल्या सत्संगात सामील न होता उठून गेलो. " बडा घमंडी मालूम होता हैं !" असे चार-दोन शरे कानांवर पडलेच, पण तिकडे दुर्लक्ष केलं.

कुसुमेली एखाद्या सासुरवासिनीप्रमाणे अंग चोरीत रेवामाईच्या गळा पडत होती. तिच्या पात्रात थोडकी जागा साफसूफ करून तिथे रात्रभर विसावावं, असा एक विचार येऊन गेला. पण तिथे घोंडे फार. तेव्हा मग या देवळाशेजारीच उघड्यावर थोडकं झाडझूड करून पटकूर अंथरले, अन् त्यावर शिणलेलं शरीर टाकून दिले.

सत्संगात सुरू असलेली भजने ऐकू येत होती. स्वराविषयी बोलायची गरजच नाही. शब्दांच्या मोडतोडीकडे पाहून मात्र दुःख होत होते. तरीदेखील अंग टाकताक्षणी झोप लागली हे मान्य केले पाहिजे.

ऐं ! हे काय ? मीरॉं स्वतः येऊन गात्येय् की काय ? तोच दर्द, तीच व्यथा–


' माणूस ' दिवाळी अंकाला शुभेच्छा !

# आशा प्रिंटिंग प्रेस,

## कमर्शिअल प्रिंटर्स

१९१ कसबा पेठ,

मुजुमदार गल्ली, पुणे ११.

( फोन – ५४७७४ )

प्रभुजी थें कहाँ गया नेहड़ा लगाय ।।
छोड्याँ म्हाँ बिस्वास सँगती
प्रेमकी बाती जलाय ।।
बिरह समँदमां छांड गया ह्यो
नेहकी नाव चलाय ।।
मीराँ रे प्रभु कभु रे मिलोगे
थें बिण रह्याँ ण जाय ।।

ताडदिशी उठून बसलो, अन् पटकुराकडे दुर्लक्ष करीत धावत देवळासमोर जाऊन उभा राहिलो. एका भगभगत्या कंदिलाच्या काळोखभरल्या काचेतून येणाऱ्या प्रकाशात ती मधोमध गात बसली होती. हाती एकतारी अन् चिपळ्या. चिपळ्यांच्या मासोळ्यांची रुणझुण, एकतारीचा स्वर अन् तिचा कण्ठ–त्रिवेणी संगम. कसं मिळून गेलं होतं म्हणून सांगू ! जणू गाईच्या दुधात उद्याचं दही, अन् परवाचं लोणी एकरस होऊन असावं तसं. वेगळेपण जाणवत होतं, असं म्हणण्याऐवजी ते जाणवत नव्हतं हे अधिक खरं. कशासाठी काय तेही सांगणं कठीण होतं. वाणीत बरवं कवित्व, त्यामध्ये रसिकत्व, अन् त्या रसिकत्वाला परतत्त्वाचा स्पर्श झालेला असावा, ती गत झाली होती. अहाहा ! आपण तर बुवा भिजून गेलो !

ध्यानी आलं, की महराजजीनं ढोलकीवर अगदी हलका ठेका धरला होता. इतका हलका, इतका सरळ, की गाणाराला पायतळी राजमार्ग अंथरल्यागत वाटावं. गालिच्यावरून चालल्यागत सुख व्हावं. दुमपुड असं घुमे ! बिरह समँदाची–विरह समुद्राची–खोली त्या खोल घुमण्यामुळे जाणवू लागे.

लांबवर ऐसपैस बसलेल्या साधुसन्तांवरही कडाही प्रसादाचा परिणाम झालाच होता. त्यांपैकी कितीएकांनी बसल्या जागीच घोंगडी पसरून दुसऱ्या अवस्थेप्रत गमनसुद्धा केलं होतं. त्या साधुसज्जनांची पवित्र शरीरं अक्षरशः तुडवीत अन् त्यामुळं त्यांच्या मुखांवाटे उमटलेल्या आशीर्वादाचा स्वीकार करीत त्या साधुसभेत घुसलो,

*With Best Compliments From*
**KAMALASHANKAR**
**P. JOSHI & CO**
Opp. Shivaji statue Poona, 5. Phone : 57851
LEADING DEALERS OF
**NORMA : SKF : NBC TIMKEN**
*Ball and Roller Bearings*
**COCKILL'S V. BELTS**

अन् अगदी समोर जाऊन बसलो.

तिनं एकदा मजकडे पाहिलन्. हसल्यासारखी वाटली. अन् मग ही विराणी संपताच तिने दुसरी सुरू केली–महराजजीच्या नाखुशीकडे दुर्लक्ष करून !

**म्हार घर आवौ सुंदर स्याम ।।**
**तुम आया बिण सुष कहीं मेरे**
**पीरी परी जैसे पान**

शेवटच्या शब्दावरून पुन: ध्रुपदांतल्या "स्याम" वर ती अशी काही उतरली, जसं एखादं पाखरूं आल्लाद पंख मिटीत उतरावं. अहाहा म्हणतां मला भान उरलं नाहीं. महराजजी माझ्या अगदी जवळ बसला होता. त्यानं ठेका सांभाळीत माझ्या कानाशी लागून म्हटलं,

"इतनी बेर कहाँ छिपे थे फक्कड ? "

मुकाटचानं दोन्ही कान धरले, अन् पुन: भावसमुद्रांत बुचकुळी मारली –

अहो रूपसुंदर श्यामं ! माझ्या घरी या ना !

किनई तुम्ही आल्याविना काही मला सुख लागणार नाही· पाहा ना ! कशी पिवळी पडल्ये आहे !

**मेरे आसा और न स्वामी**
**एक तिहारो ध्यान ।।**

तुम्हाविना इतरत्र माझी आस गुंतेल तरी कशी ? एका तुमच्या रूपाच्या ठिकाणी चित्त खिळून राहिलं आहे !

**मीरां के प्रभु बेग मिलो अब**
**राषो जी मेरो मान ।।**

अहो, या ना ! लवकर या. केव्हांची तिष्ठत्ये आहे. लेकी सुना मला हसतील ना ! माझा मान सांभाळणं आता तुमच्या हाती !

डोळे मिटून गात होती. त्या अंधुक प्रकाशात धड मुद्रा तर काही दिसत नव्हती.


दीपावली शुभचिंतन

**देसाई पटेल पेपर कंपनी**

**जनरल पेपर मर्चंटस्**

६२ रविवार पेठ, पुणे २.

# SIDDHO MAL & SONS

*Chawri Bazar, Delhi*

♣ ♣ ♣

*Telephones :*
*262442, 262771*
*During Office Hours*

♣ ♣ ♣

*618747*
*After Office Hours*

♣ ♣ ♣

*Telegraphic Address :*
*'TISSU'*

♣ ♣ ♣

*Enquiries Solicited :*

Biggest Stockist of
All Varieties of
Indigenous
and Foreign Papers

♣ ♣ ♣

*Distributors :*

The Titaghur Paper
Mills Co. Ltd., Calcutta
The India Paper Pulp
Co. Ltd., Calcutta

♣ ♣ ♣

*Sole Distributors :*

**TRAVANCORE RAYONS LTD. MADRAS**

for Cellophane Paper
and Rayon Yarn.

♣ ♣ ♣

*Indenting Agents :*

For All Varieties of
Foreign Papers, Boards
& NEWSPRINT

जाणवत होता स्वर. तो तर काही इथला आमच्यांतला नव्हता. त्याला दैविकी स्पर्श झाला होता. एका हाडकुळ्या मुलीच्या कण्ठातून जे काही अमानवीय उमटत होतं, त्याला काही तुलना नव्हती.

आसवं वाहवता वाहवता डोळे थकून गेले.

ती थांबली. उठलो. तिच्या पायांना स्पर्श करू गेलो. ती अडवू लागली. मानलं नाही. म्हणालो;

" तुम्हें नमस्कार थोडेही कर रहा हूँ ? नमस्कृति तो है उस चिरवियोगिनीके चरणकमलोंमें ! "

उसास सोडून ती म्हणाली,

" ये तो सब ह महराजजीकी क्रिपा ! उन्हींकी सिखाई हुइँ दो एक चीजें गा लेती हूँ ! "

आता मात्र महराजजी उठला. त्याला बहुधा गांजाची आठवण झाली असावी. तो अस्वस्थपणं म्हणाला,

" चलती हो कि–"

तिनं उदासीनपणं म्हटलं,

" ये अभी आई ! आप चलिये ! "

* * *

*बगलवाड़ा घाट – संगमेश्वर मंदिर। वरुणा नदी। मंदिरमें मूर्ति नहीं है।*

माझं चालणं भूत भरल्यागत. पायात काटा मोडून तो पिकला, हेही बरंच झालं. एरवी बगलवाड्याला मूर्ती नसलेल्या या संगमेश्वर मंदिरात चार-दोन दिवस राहणं झालं नसतं. असा विसावलो नसतो, तर काही पुन: गाठ पडली नसती.

संगमेश्वरातला बाबाजी भला माणूस. जन्मभर तीर्थयात्रा करीत राहिला. म्हातारा झाला, तरी ती हौस उणावली नव्हती. मजजवळ कैलासयात्रेची चौकशी करीत होता. म्हणाला,

" उतनी वो जात्रा करनेकी वडी इच्छा रही है। भगवानके अधीन है–फिर भी उमंग तो वार वार उठती है, कि कैलाशके रास्ते चल पडूं ! "

माझा पिकलेला पाय पाहून त्यानं चार–पाच दिवस राहवून घेतलं. माझ्या अल्प-स्वल्प पांडित्यातलं त्याला काही कळत नव्हतं. त्याचा पंडिताईवर विश्वासही नव्हता. तो होता कट्टर कर्मवादी. त्याचं म्हणणं, की शास्त्रपठण सगळं फुकट आहे. हरीनं शरीर दिलं, ते त्याच्या सेवेत झिजवण्यासाठी. त्याच्या तीर्थयात्रा कराव्यात. तो विश्वाकार झाला आहे. तेव्हा रंजल्यागांजल्यांची होईल तितकी सेवा करावी, अन् त्याचं नामस्मरण करीत कोणे एके क्षणी, पुकार येईल तेव्हा शरीर सोडून द्यावं !

त्यानं पायावर पोटीस, लेप–काय काय बांधलं. दुसरेच दिवशी पिकला पाय वाहू लागला. त्यानं घाण काढून त्यावर गाईच्या तुपात हळद कालवून बांधून टाकली. कदाचित् त्याच्या शुश्रूषेमुळंही असेल, पाचव्या दिवशी वाटचाल करू शकेनसा

भरंवसा आला.

तिथं काम कसलंच नव्हतं. बाबाजी घालील ते जेवायचं अन् पाय चोंबाळीत दिवसभर टिवल्याबावल्या करायच्या. तिसऱ्या प्रहरी उठलो, अन् मैयाच्या पात्रात जाऊन भल्या मोठ्या धोंड्यावर जाऊन बसून राहिलो.

आपण बहुधा तीरावरून—उंचावरूनच—नदी पाहत असतो. नदीच्या पात्रातून गाव कसं दिसतं ते पाहायची कधी आपल्याला सवय नसते. खरोखरी बहुत भलं दिसतं. अवघं उंचावरून पात्राकडे धावत असलेलं. ओहोळ, ओढे, नाले, प्रवाह—सगळं काही या एका दिशेनं. याला घाई झालेली असते प्रवाहाला मिठी घालायची. प्रवाहाला उतावळी असते पुन: समुद्राकडे धावण्याची.

बाया, माणसं अशी एकटी दुकटी मैयावर स्नानासाठी येत होती. कपडे धुवीत होती. वाळू घालीत होती. दगडानं अंग घाशीत होती. हलकी होत होती. सगळं स्वस्थ होतं. मी दगडावर बसलो होतो ना ? एरवी खेड्यातल्या लोकांना किती कुतूहल असतं. कुठला ? काय ? कशासाठी ? पण मैयाच्या तीरावरील या देहात्यांच्या मनातल्या सगळ्या शंकाकुशंका बहुधा निरस्त झाल्या असाव्यात. कुणी मजकडे ढुंकूनही बघितलं नाही. बसला असशील तर बसेनास का !

आपापली कापडं वाळवून, नेसून, नेटकी होऊन माणसं गावाकडे निघाली. मग मीही उठलो. एक पाय घाशीत घाशीत देवळाकडे चाललो. अगदी खात्री पटली, की उद्या चालू लागल्यावर फारसा त्रास काही व्हायचा नाही.

देवळाजवळ जाऊन पाहिलं, तर दगडी खांबाला टेकून बसलेला महराजजी दिसला. पडश्या शेजारी मांडलेल्या. हाती धरायच्या काठ्याही पडश्यांवर टेकून ठेवलेल्या. गढूळ नजरेचा महराजजी अस्वस्थ दिसला. एकटाच होता. मीरॉं कुठं आढळली नाही.

पुढं झालो. हर नर्मदे केलं. तोंडातल्या तोंडात पुटपुटून, शिष्टाचार म्हणूनच केवळ तो नर्मदेहर म्हणाला, पण माझं कुतूहल अनावर होतं. तसंच धिटाई करीत विचारलं,

"अकेले ? गई कहाँ ?"

उत्तर मिळालं, ते अनपेक्षित होतं. कोरड्या स्वरात म्हणाला,

"भाडमें !"

एकदम थिजलोच. मात्र पुढं काही बोलायचं साहस केलं नाही. बाबाजी देवळामागं गाईपाशी होता. त्याच्यापाशी जाऊन म्हटलं,

"ये महात्मा—क्या अकेले आये ?"

"नहीं तो ! माई थी—"

"गई कहाँ ?" आता मला काय करायचं होतं ? पण कुतूहल अनावर !

"आतेही गाँवमें गई है। सायत इन्होंने भेजा है।"

फार वेळ वाट पाहावी लागली नाही. थकून गेलेली अशी ती गावातून परतली.

येताक्षणी एकतारी पडशीशी ठेवीत महराजजीच्या पुढं बसली—दोन्ही पावलं चेपीत म्हणाली,

" कितना ढूंढना पडा—कोई मकई जवार थोडेही है, जो कहीभी मिल जायगी ?"

मग तिनं कडोसरीची पुडी काढली, अन् ती महराजजीच्या हाती दिली. हावरटासारखी तिच्या हातावर झडप घालीत त्यानं ती हस्तगत केली. तेव्हा मग कुठं त्याच्या मुद्रेवरचं सावट मावळलं.

" थक गई क्या ?"

उसास सोडला, अन् त्याच्या नजरेत नजर भिडवीत ती गप्प बसून राहिली. चारदोन क्षणांनंतर म्हणाली,

" अब जाऊ नहाने ?"

पुडी मळण्याची तयारी करीत महराजजी म्हणाला,

" हाँ हाँ ! मजेमें ! खूब नहाओ !"

पडशीतून तिनं पातळ अन् चोळी काढली. लोटा घेऊन देवळाबाहेर पडत नर्मदेवर निघाली.

बराच वेळ अस्वस्थपणं देवळामागं बसून राहिलो. मग उसळीसरशी जरा चपळाई


स्वादिष्ट मिठाईसाठी

आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी

मंडई रस्ता, पुणे २.

करीत नर्मदेवर चाललो. पाहिलं तर स्नान उरकून तिनं पातळ पिळून वाळत घातलं होतं. हडकण्याची वाट पाहत केश मोकळे सोडून उगीच नर्मदेकडे पाहत बसली होती.

दोन्ही हात कंबरेवर ठेवून तिच्यामागं उभं राहत म्हटलं,

" हर नर्मदे कहनेकी अनुज्ञा है क्या ?"

चमकून तिनं मजकडे वळून पाहिलं. एकदम तिची मुद्रा प्रसन्न झाली. म्हणाली,

"कैसे है ? कब आये ? कहाँ रुके है ? आप तो बहुत चलते हैं–"

पाय दाखवीत म्हटलं,

" ते आमचं चालणं–त्याला दृष्ट लागली कुणाची तरी ! काटा मोडला–"

खोडीलपणं म्हणाली,

" माझी नाही हां दृष्ट लागली ! बघू ?"

नाकारीत म्हटलं,

" ते काय हरीचे कमलसदृश तळवे थोडेच आहेत–की ज्याच्या त्याच्यापुढं प्रदर्शन करीत बसू !"

" बरं बुवा ! नका दाखवू ? पण मी इथं बसल्ये आहे, हे कसं कळलं ?"

" कळलं कसं तरी !"

" खोटं–"

" भूतभविष्य जाणण्याच्या कुणाच्या शक्तीविषयी असा अविश्वास व्यक्त करणं बरं नव्हे !"

एखाद्या मुलासारखी कुतूहलानं दाटून येऊन ती म्हणाली,

" खरंच तुम्हांला भविष्य कळतं ?"

" पाहा की एखादा प्रश्न विचारून !"

एकदम ती गंभीर झाली. म्हणाली,

" सांगा तर मग–मी मरेन केव्हा ?"

चमकलो. अळंबळं हसून म्हटलं,

" भविष्य खरं ठरलं तर काय कराल ? शिरापुरी जेवू घालाल ?"

" घालीन की !"

"तुमची ती शिरापुरी वसूल करायला तुम्हामागोमाग मला परलोकात यावं लागेल –"

तिक्तपणं ती म्हणाली,

" म्हणजे नर्कात !"

विषय बदलीत म्हणालो,

" मला नर्कात जायची तूर्त घाई नाही. ते असो, एखादं गीत ऐकवा की !"

गप्प बसून राहिली. थोडा वेळ वाट पाहून म्हटलं,

" इथं एकतारी–चिपळया नाहीत, पण त्यांच्या वाचूनही तुमच्या स्वरांतलं गीत

मला इतकं आवडेल –"

नर्मदेकडे पाहत होती तशीच मौन राहिली. डिवचून म्हटलं,

"बरोबर आहे. गांजा मिळण्यासाठी बाजारात जाल ज्याच्या त्याच्यापुढं ! आमच्या समोर कशाला गाल ?"


एकदम माझ्याकडे पाहिलंन्. तिच्या दृष्टीत तर बाण लागलेल्या पाखराची पीडा होती !

मावळायला आलं होतं. नर्मदातीरावर पलीकडे एक–दोन वाया हंडे घाशीत होत्या. त्या वगळता एवढा थोरला तो रेवाकाठ अगदी लख्ख मोकळा होता.

एकदम तिनं गीत सुरू केलं–

**लागी सोही जाणै**
**कठण लगणदी पीर ।।**

घायाळाची व्यथा अति कठिण ! ती केवळ घायाळालाच कळे !



"लोक म्हणतात काहीच प्रगती नाही, पण साहेब, मला वाटतं सगळं पाहण्याच्या दिशेवर अवलंबून असतं."

**विपत पड्याँ कोई निकटि न आवैं**
**सुख में सबको सीर ।।**

विपत्तीत कुणीही जवळ येत नाही. सगळे सुखाचे सांगाती !

**बाहरि घाव कछू नही दीसै**
**रोम रोम दी पीर ।।**

ही रोमरोमांतली पीडा बाहेर कशी दिसणार ! प्रगट घाव तर काही झालेलाच नसतो.

**जनि मीराँ गिरधरके ऊपर**
**सदकै करूं सरीर ।।**

दासी मीरा तर गिरिधरावरून या तुच्छ शरीराची ओवाळणी करून टाकायला अगदी उतावीळ झाली आहे !

ती झावळी झावळी वेळा. हे असं आर्त गीत. तिचा तो सोनेरी बाणासारखा, मधानं माखला स्वर अगदी हृदयाच्या तळापर्यंत पोचला. गीत संपल्यावर तीही थमून राहिली, मीही.

मग अंधारायला लागलं, तेव्हा उठलो. म्हणालो,

"उगीच कुतूहल होतं, की कोण कुठल्या ते विचारावं, शेजाऱ्याच्या घरात

डोकावून पाहायची अनिवार इच्छा असते ना ? म्हणून पण आता ते वायफळ प्रश्न विचारून या देवदत्त स्वराचा अपमान करणार नाही. स्वर कुणाचा ? त्याच्या मुरलीचा. शब्द कुणाचे ? मीरेचे. एवढंच अगदी पुरेसं आहे. तुकाराम नावाचा महाराष्ट्रातला एक वाणी, त्यानं म्हटलं—

**आपणालागे काज वाण्या घरी गुळ ।**
**त्याचे यातिकुळ काय कीजे ।।**

" गरज असते वाण्याघरच्या गुळाची. त्याच्या यातीकुळाची चौकशी करायचं काही कारण नाही. "

" उद्या सकाळी वाटेनं निघाल. मीही. मी झपाटल्यासारखा चालतो-हे भूत जन्मापासूनच मागं लागलं आहे. पुन: कधी तुमची भेट होईल की नाही मला माहीत नाही. मात्र हा तुमचा करुणेनं भिजलेला स्वर ऐकून मन भरलं आहे—ती तृप्ती जन्मभर चाखीत राहीन ! "

तिला एकटीलाच तिथं सोडून देवळाकडे निघालो.

* * *

*सतरावन घाट – पांडवोंने कार्तिक महातम किया था। तेदुनी नदी। आकाशदीप तीर्थ।*

तेदुनी संगम इतका सुंदर, पण त्याच्याकडे लक्ष द्यायला सवड झालीच नाही.

प्राप्त कर्तव्य—ते करायला हवं होतं. तिथं संगमावरल्या एका ओसाडवाण्या देवळातल्या एका परिक्रमावासीयानं अडवलं.

गाठ पडली, तेव्हा ती ज्योत विझायलाच आली होती. बहुधा त्याची पानथरी वाढली असावी. तापानं तापतापून कुडी अगदी शुष्क झाली होती. स्वच्छ होती त्याची दृष्टी. त्याहून अधिक स्पष्ट होती वाणी. अगदी मंद पण स्वच्छ, श्वास थांबत थांबत चालायचा.

मी धावून एका गावठी वैद्याला आणलं—मोठ्या मिनतवारीनं. पण त्यानं औषध घ्यायचं नाकारलं. मंद स्वरांत म्हणाला,

" मैयाकी गोदमें जीवन समाप्त हो रहा है—होने दो ! अब दवाके कष्ट न दो ! "

बसून राहिलो त्याच्याजवळ ! तिसरे दिवशी सकाळी तो खुणा करून म्हणू लागला, की मला मैयाच्या तीरावर न्या. मग एका परिक्रमावासी फक्कडाला पकडलं. तो अन् मी मिळून ती हाडांची मोळी मैय्याच्या तीरावर नेऊन ठेवली. तिथं मोठ्या कष्टानं तो कुशीवर वळला. हात उशाशी घेऊन मैयाच्या निळ्या पाण्याकडे पाहत राहिला.

ऊन्ह डोक्यावर आलं, अन् त्याची मान कलली. कळस ढळला. फक्कड श्वास सोडून म्हणाला,

" देख क्या रहे हो गुसांई ! कुछ व्यवस्था करो ! या तो गढ्ढा करके गाड दो, या फिर मैयाके पानीमें बहा दो ! "




# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

67/16-1

त्याला तिथंच प्रताजवळ बसवलं. गावातल्या वाण्याकडे गेलो. त्याच्याच दुकानात परिक्रमावासीयांना आटा-डाळ मिळत असे. भला माणूस होता. उठला. चारचौघांना हाकारलंन्. दोन–चार जण माझ्याबरोबर प्रेतापाशी आले. बहुधा त्यांतला एक मुखिया असावा. प्रेत पाहिलं, अन् म्हणाला,

" फूंक दो–और क्या ! "

मरियल बैल जोडलेली गाडी ओंडके घेऊन आली. रचतां करता संध्याकाळ झाली. शेवटी तिन्ही सांजांस प्रेत चितेवर ठेवलं. प्रश्न निघाला आग कुणी द्यायची ? माझ्याविना कोण देणार ? डाग दिला, अन् मनगटांना ओठांचा स्पर्श केला.

प्रेत अर्धवट जळलं, तसे कामकाजवाले उठून गेले. मोकळे होतो आम्ही दोघे. आम्हांला कुठंच जायचं नव्हतं. मग सुरू केला कठोपनिषदाचा पाठ. लख्ख मोकळ्या स्वरात—

अग्निर्यथैको भुवनं प्रविष्टो
रूपं रूपं प्रतिरूपो बभूव
एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा
रूपं रूपं प्रतिरूपो बहिश्च ।।
नित्यो नित्यानां चेतनश्चेतनानाम्
एको बहूनां यो विदधाति कामान्
तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरा:
तेषां शान्ति: शाश्वती नेतरेषाम् ।।

मैयाच्या तीरावरून येणारी पगडंडी जवळच होती. षष्ठी सप्तमीचं चांदीणं असावं. लक्ष गेलं, तर वाटलं, कुणी दोघं उभी आहेत. थोड्या वेळानं ती जवळ आली. मी थांबलो. महराजजीचा स्वर ऐकू आला —

" रुको नहीं भाई, चलने दो ! पाठ सुनने आये हैं ! "

उपनिषद संपलं, अन् श्वास सोडून ती म्हणाली,

" कैसी बिमल बाणी है –"

महराजजी म्हणाला,

" बहुत सुंदर ! देखो, पाठमेंभी एक लय है । यह आदमी जरूर संगीत जानता होगा । "

मग मजकडे वळून म्हणाला,

" अभी आ पहुंचे हैं । ठहरनेका प्रबंध कहांसे देखना ह । कलका रोज यहींपर ठहरनेका बिचार है । चांगलं ठिकाण आहे. पांडवांनी इथं दीप नर्मदेत सोडले होते. तुम्ही काय करणार ? राहणार की पुढं धावणार ? तुमच्या मागं तर भैया, वाघ लागला आहे. अरे हो, अग्नी कुणाला दिला ?"

सगळं सांगितलं तेव्हा श्वास रोधीत ती म्हणाली,

" न जाने कौन था। ब्रह्मचारीजीके भागमें था बिचारेको अगिन देना।"
मग माझ्याकडे वळून म्हणाली,
" भोजनका प्रबन्ध कहीं हुआ था ?"
क्षीणपणे हसून जळत्या प्रेताकडे बोट दाखवलं अन् म्हणालो,
" आज तो कोई इच्छा नहीं है।"
जोर देऊन ती म्हणाली,
" क्यों, कोई मर जाय, तो क्या भोजन नहीं करना चाहिये ?"
मान हलवीत म्हणालो,
" नहीं-जो कुछ देखा है सुबहसे-"
" अच्छा, कल ?"
" कलकी कल सोची जायगी।"

* * *

राख सावडायची होती, दुसरेही दिवशी निघणं झालं नाही. ती दोघं कुठं उतरली होती कोण जाणे ! सगळं उरकलं, तोवर चांगलं ऊन तापलं होतं. परिक्रमावासी फक्कड कुठून अन्न घेऊन आला. दोन घास खाल्ले अन् एका झाडाखाली पडून राहिलो. दिवसभर वाटत होतं, की एकदा तपास करावा. पण थकून गेलो होतो, तेवढा उद्यम करवला नाही.

संध्याकाळी नर्मदेवर जाऊन बसलो. वाटत होतं, की बहुधा ती येईल.

आली, पण खूप उशीर करून. सगळा नर्मदाकाठ मोकळा झाला. नित्यनेमाचे सायंस्नान करणारे स्नानं उरकून जप करीत तीरावर बसले, अन् ती आली.

उठून सामोरा गेलो. पाहून माझ्याकडे येत, मुद्रेवरचं उदासपण लपवून म्हणाली,
" कहाँ छिपे रहे दिनभर ?"
" खूब ! यह सवाल तो आपहीको पूछा जा सकता है !"
" वाहजी ! मैं तो दिनभर भोजन बनाकर आपकी बाट देखती रही। सोचिये तो ! आपको ढूंढते हुअे गांवभर घूमना क्या मुझे शोभा देता ?"

Estd. 1913 Tele. 22624

**KADARBHAI ABDUJEE**

**373 Ravivar Peth, POONA 2.**

*One of the biggest stockist in Poona*

**for**

G. I. Pipe and fittings, Allen Cap Screws, Bolts & Nuts, Tools, J. B. Files, Cotton Waste, Perforated Sheets in brass and steel and Mill Gin Stores.

Stockists : **LEADER VALVES**




" प्रादेशिक भाषेचं माध्यम
येणार आहे असं ऐकलं. . . "

हे तर खरं होतं. वाटलं, की ती रात्रीच्या जेवणाविषयी विचारील. पण ती मुकीच राहिली. जणू कशात तरी हरपली असावी. मग एकदम म्हणाली,

"जरा भर सकेंगे ? मैं नहा लूं !"

"हां हां ! जरूर !"

तिनं स्नान उरकलं. मग पिळा खांद्यावर घेऊन मजपाशी आली. म्हणाली,

"अगर सावनकी पूनम होती तो–"

थांबलेली पाहून मी विचारलं,

"क्या करती ?"

"कुछ नहीं, आपको राखी बांधती !"

मनावरचं एक दडपण दूर झालं. दोन-तीनदा मोकळा श्वास घेऊन म्हणालो,

"महराजजी क्या–"

वेदना लपवीत तिनं म्हटलं,

"संध्याकाळची चिलीम झाली, की तास दोन तास ते बेहोष पडून असतात !"

आता यावर काय विचारायचं ! गप्प राहिलो. थोडया वेळानं एकदम म्हणाली,

"काय हो, तुम्ही किती चालता एका दिवसात ?"

"ठरलेलं थोडंच असतं ? बारा मैल, पंधरा मैल, वीस मैल–"

कुतूहलानं म्हणाली,

"थकायला नाही होत ?"

हसलो अन् गप्प बसलो. मोठ्या उत्साहानं बोलली,

"शाळेतली धावण्याच्या शर्यतीची सगळी बक्षीसं तर मीच लुंगावीत असे ! तुम्ही कसे चालता ते पाहायचंय् एकदा. चलाल मला घेऊन बरोबर ?"

चमकून म्हटलं,

"काय ?"

"का ? एवढं चमकायला काय झालं ? तुम्हांबरोबर तर कसलंच भय नाही–"

"ते झालं–" आवंढा गिळत मी म्हटलं, "पण महराजजी–"

उदासीनपणं म्हणाली,

"त्यांना यायचं असलं तर येतील, नसलं तर बसतील गांजा फुंकीत !"

आता यावर काय बोलावं ! चार-दोन क्षणांनंतर जोर देऊन बोलली,

"मग चलाल उद्या ?"

"उद्याच ?"

"का ?"

"नाही नाही–तसं काहीच नाही–"

"मग उद्या पहाटेस मी पायवाटीवर येईन. तुम्ही माझी वाट पाहत थांबा. मी येताक्षणी दोघं बहीणभाऊ चालू लागू ! काय ?"

कसंबसं म्हटलं,

" तर मग–"

तिच्या स्वरातला आग्रह मोठा बलवत्तर होता. म्हणाली,

" होय–उद्याच चलायचं. चांगलं वीस मैल चालायचं. पहाटेसच निघू–सगळी झोपली असतील त्या वेळीच–पक्की गोष्ट ! येते हां ! उद्या पहाटे ! "

भराभरा चालू लागली. एकदा वाटलं, की धावत तिला सांगावं, हे जमायचं नाही. व्हायचं नाही. महराजजीला कळलं हे, तर तो माझा खून करील !

पण मग नाही गेलो. तिथं तसाच उभा राहिलो.

* * *

रात्रभर झोप आली नाही. विचारांची तारांगणं सुरू झाली.

अशी समस्या कुणासमोर कधी निर्माण झाली असेल का ?

छे छे ! हे तर कठीण होतं. यापेक्षा विष खाणंही सोपं !

पण पहाटेस उठलो, अन् पावटीवर जाऊन उभा राहिलो. तिथं कुणीच नव्हतं. अगदी दृष्टी पोहोचे तिथवर देखील कुणीच नव्हतं. एकदा लांबवर जाऊन पाहिलं अन् पुन्हा परतलो. हळूहळू दिसू लागलं. एकटे दुकटे परिक्रमावासी उठून चालू लागले. पण ते सगळेच फक्कड होते. माई कुणीच नव्हती त्यांच्यांत.

काय करावं ? कसं चमत्कारिक पाहा ! पाऊल निघतही नाही. उगीच क्रमळाच्या कोशात अडकलेल्या भुंग्यागत झालं आहे !

दिवस उगवून चांगला हातभर वर आला, तरी मी आपला उभाच ! खरं बोलायचं तर मी निघायला हवं होतं.

पण– निघालो नाही. परतलो.

सगळी देवळं शोधायला सुरुवात केली. एकदा नर्मदेवर जाऊन आलो. पुन्हा माघारा वळलो. दरड चढून गावात शिरलो. गावाच्या मध्यावर. दोन-तीन देवळं.



*Gram : Tushar* *Phone : 22957*

D. Subodh & Co.

DISTRIBUTORS & AUTHORISED STOCKIST FOR

- Carborundum Universal Ltd., Madras
- Hindustan Dowidat Tools Ltd., Delhi
- Warrior India Ltd., Bombay
- Hindustan Ferodo Ltd., Bombay

371 *Raviwar Peth, Poona* 2.




# शेतकऱ्यांची पसंती म्हणजेच जवाहर स्टँडर्ड डिझेल इंजिन

* ५ अश्व शक्ति * १५०० फेरे * ४ स्ट्रोक * पाण्यानें थंड राहणारें * चालविण्यास अत्यंत सोपे * तकावी कर्जाकरितां राज्य सरकारांनीं सर्वत्र मान्य केलेले डायरेक्ट कपल्ड, किंवा — पट्ट्याच्या सहाय्यानें चालणारें.

जवाहर इंजिनिअर्स (प्रा.) लि. जवाहर इस्टेट, नॉर्दन ब्रँच, श्रीरामपूर. ( जि.- अहमदनगर)




" किमती खाली आणण्याची एक योजना आखली आहे, त्याच्याच पाहणीसाठी चंद्रावरचा दौरा काढला आहे. "

पैकी एक भलं प्रशस्त. भोवताली ओवऱ्या. त्यांत शिरलो—

मागल्या ओवरीत महराजजी चिलीम फुंकीत बसला होता, अन् शेजारी ती झोपली होती—पांघरूण घेऊन. एवढ्या उकाड्यातही !

लक्षण काही बरं दिसलं नाही. तिथंच थबकलो. त्याच्या आगनिखार दृष्टीकडे पाहता विचारायचं साहसही झालं नाही. परतलो.

एकदा वाटलं, उशीर होईना का ! चालू लागावं.

पण मग राहिलो. संध्याकाळी नर्मदेवर गाठ पडेल या आशेनं.

* * *

काळोखलं, तरी टुकत बसून राहिलो, अन् शेवटी ती आली.

मला पाहताच तिनं अस्फुट स्वरात साद घातली,

" ब्रह्मचारीजी ! "

वाटलं, की जावं, अन् तडातडा खूप बोलून घ्यावं. पण जवळ पोचलो, तेव्हा तिचं जे रूप तेवढ्या त्या अंधारातही दृष्टीला दिसलं, ते पाहून काही बोलायचा धीर झाला नाही.

विशादाची आवृत पुतळी होती—मान खाली घालून उभी.

अन् मग अगोदर बोलली तीच. म्हणाली,

" मला माहीत होतं, की तुम्ही आज जाणार नाही. "


*With Best Compliments*

# Malhotra Finance *and* Agency (P.) Ltd.

GRAM : MALAGENCY

*Phone : office* : 263916

*Resi.* 243368

Behrang Mansion, 3rd floor,
Sir P. M. Rd. Bombay-1.

*Distributors for*

Diamond Taxi and Auto Rickshaw Meters

स्वर संयत ठेवीत मी म्हटलं,

" गेलो असतो तर ? "

श्वासासरशी ती म्हणाली,

" हो ! तेही खरंच आहे. क्षमा करा, यापरतं आता काय म्हणू ? "

मोठ्या प्रयत्नानं बोलली,

" त्या दिवशी म्हणालात, की कोण कुठली, ते विचारायचं कुतूहल होतं--"

तिला थांबवीत मी म्हटलं,

" पण ते आता माझ्या मनी उरलं नाही–अजिबात ! "

" पण मला सांगितलं पाहिजे. एरवी माता नर्मदा मला क्षमा करायची नाही ! "

वाटलं, की म्हणावं, नर्मदेच्या प्रवाहाला जाऊन सांग ! पण कुतूहल–!

" तर कुठली कोण ते काही सांगत नाही, त्याची काही गरज नाही. खात्यापित्या घरची मुलगी. महराजजी मला गाणं शिकवायला येत. त्यांचं गाणं तुम्ही ऐकलं नाही. गांजा पिऊन पिऊन घशाचं मातेरं करून घेतलं. पण आजही जर कधी गातील मन लावून, तर रानातली गुरं धावत येऊन उभी राहतील आइकत !

" फिदा झाल्ये. एके दिवशी हात धरून पळाले. ते केवढे, मी केवढी ! माझ्या वडिलांसारखे ते. पण मोहाच्या क्षणी हे ध्यानी येत नाही. कबूल केलं पाहिजे, की त्यांच्या स्वरावर मी मनापासून प्रेम करते. आज केवळ त्या स्वराची छाया राहिली आहे, तरीदेखील !

" माझं गाणं ऐकूनच तुम्ही मुग्ध झालात. त्यांच्या गाण्यातला शंभरावा हिस्सा काही माझ्या कंठी उतरला नाही. यावरून काय ती कल्पना करा ! "

क्षणभर थांबून ती म्हणाली,

" ब्रह्मचारीजी, त्यांची पत्नी–बिचारी देवी होती ! त्या भरल्या घरातून मी उठवलं त्यांना. पहिले काही दिवस तेही मोहाला बळी पडले.

" पण शेवटी हे शरीर आहे–तेच हात, तेच पाय, तीच छाती, तीच सगळी इंद्रियें–एकीचं असतं तेच दुसरीचं. कवी म्हणतात, की स्त्रीचं वदनकमल–ओठातलं अमृत–! छी ! चिकट थुंकीपलीकडे काहीही नसतं ! तीही नाना रोगजंतूंनी भरलेली !

" लवकरच त्यांच्या ध्यानी हे आलं. पण आता दुसरी गती नव्हती. त्यांना अन् मलाही. शल्य विसरण्यासाठी त्यांनी गांजाचं व्यसन लावून घेतलं. ते भूत डोक्यावर बसलं. ब्रह्मचारीजी, खोटं वाटेल, मीही गांजा ओढायचा प्रयत्न करून पाहिला ! जमलं नाही, ते सोडा !

" परिक्रमा सुरू केली. कुणी विचारीत नाही. विचारलं तर हवं ते सांगतो. कधी म्हणतो, ते माझे काका आहेत. कधी मावसे.

" गांजाच्या नशेत चार-दोन तास तरी ते सगळं विसरून जाऊ शकतात. पण मी ?

मी काय करू ? ”

त्या अंधारातही जाणवलं, की तिचा स्वर कापतो आहे. यत्नपूर्वक म्हणाली,

“ गांजा मिळाला नाही, तर छळतात. मारतातही. तो मिळवण्यासाठी नाही तिथं जावं लागतं, तोंड वेगाडावं लागतं. कधी कधी मन कटुतेनं भरून येतं.”

“ काल संध्याकाळी–” एकदम थांबलो. निग्रहानं म्हणाली,

“ नाही. ते सांगण्याजोगं नाही. म्हणून मी तुम्हांला म्हणाले की मला बरोबर न्या ! पण मग माझ्या ध्यानी आलं, की आता माझी सुटका होऊ शकत नाही ! मी यातून बाहेर पळू शकत नाही !

“ वडील तपास करताहेत. कधी काळी आम्ही त्यांना सापडू. मग कोर्टात उभं राहून मला सांगितलं पाहिजे–

“की हे निरपराध आहेत ! मीच यांच्याबरोबर पळून आले !

“ एरवी एवढा तो दिव्य स्वर–ते अद्‌भुत स्वरयंत्र–त्यांना गिट्टी फोडावी लागेल ब्रह्मचारीजी ! ”

थोडा वेळ तिनं हुंदका जिरू दिला. मग म्हणाली,

“ मला क्षमा करा ! यापरतं काय म्हणू ? कदाचित तुम्ही ती करू शकाल. ”

मग ती हळूहळू आली तशीच अंधारात दरड चढून निघून गेली. * * *

या घटनेवर निराळं भाष्य करायची गरज आहे, असं मला वाटत नाही–

*बासखेडा घाट, जंगली मार्ग । केलकच घाट, जंगली मार्ग ।*

*अनघोरा घाट, जंगली मार्ग–शुक्ल घाट, जंगली मार्ग–रिछावर घाट, जंगली मार्ग–टिमरावन घाट, घना जंगल–घना जंगल–घना जंगल––* ○




## सरकारवाडा

[पृष्ठ ११ वरून]

पुण्याला सरदार दादासाहेब पुरंदऱ्यांच्या घरी लग्न होतं. आमचे दाजीसाहेब त्या लग्नाला गेले होते. वय त्या वेळी असंच पंचविशीतलं. लग्नात मंगळसूत्र गुंफायला शालूकराच्या बोळातली एक बाई आली होती. तिच्याबरोबर तिची मुलगीही आली होती. नाव होतं सारजा. ती गातहि असे. पुरंदऱ्यांच्या वाड्यात रात्री सारजाचं गाणं झालं. चांगलंच रंगलं. ठुंबरी म्हणताना तर सारजानं चार पाचदा दाजीसाहेबांकडे पाहून आदा केला. लोकांनीही दाजीसाहेबांची थट्टा–गम्मत केली. गाणं संपलं. लग्न संपले. अन् दाजीसाहेब सरळ शालूकराच्या बोळात सारजाच्या घरी गेले. तिची म्हातारी घरात होतीच.. दाजीसाहेब सरळ हसत हसत घरांत गेले आणि तिचा हातच त्यांनी धरला ! म्हणाले,

" चल, माझ्याबरोबर चल !"

" अहो कुठं ? "

" बोलू नकोस ! "

म्हातारी ओरडत बाहेर आली. दाजीसाहेब फक्त हसत होते. दाजींनी तिला सरळ तशीच उचलली, गाडीत घातली आणि गावी आणली. तिच्या आईलाही आणलं आणि आमच्या डाळिंबाच्या बागेतच्या बंगल्यांत सारजाला 'ठेवलं'. म्हातारीही तिथंच. पण मग सरकारवाड्यात काही वादळ? गडबड ? दाजीसाहेबांच्या बायकोची रडारड ? गोंधळ ? छे ? काऽऽही नाही !

सारजा सरकारवाड्यात नेहमी यायची. वाड्यातल्या प्रत्येक कार्यात मिसळून एकरूपाने भाग घ्यायची. तिचा अवमान कधीही होत नसे. होती अशीच थट्टेखोर. बोलणारी मोठी फटाकडी. एकदा हळदी कुंकवाच्या वेळी तिला बायकांनी आग्रह केला की, 'नाव घे !' तिने नाव घेतलं, उखाण्यात घेतलं,

" सोन्याचा कंबरपट्टा पठणीच्या घोळांत
दाजीसाहेबांनी धरलं मला शालूकराच्या बोळात !"

अशा बायका हसल्या.

दाजीसाहेब दुपारी जेवणानंतर विडा खायला डाळिंबाच्या बागेत सारजाकडे जायचे. दुपारी मुक्काम तिकडेच. उन्हं उतरल्यावर वाड्यात परत यायचे आणि हातपाय धुवून ज्ञानेश्वरी वाचायला बसायचे.

सरकारवाड्याच्या तिसऱ्या मजल्यावर दफ्तरखाना होता. जुनी मोडी कागदांची दफ्तरं ढिगाऱ्यांनी पडलेली असत. बापूकाकांचं इतिहास संशोधन ह्या दफ्तरखान्यात चालायचं. बापूकाकांनी एके दिवशी एका जीर्ण पिवळट कागदाची सुरनळी ह्या दफ्तरखान्यातून काढली आणि खाली वहिनीसाहेबापाशी आणली. म्हणाले,



चल माझ्याबरोबर, चल......

"सूनबाई हा कागद सांभाळा! जपून ठेवा. –आणि हे बघा, आपल्या देवघरा-तली गजांत लक्ष्मीची मूर्ति आहे ना, ती जर कधी सरकारवाड्याबाहेर न्यायची वेळ आली तर मला विचारल्याशिवाय नेऊ नका! शपथ घालून सांगतो!"

बापूकाकांच्या ह्या शपथेचं त्या वेळी काही विशेष जाणवलं नाही. वहिनीसाहे-बांनी कागद ठेवला, पण विचारलं,

"काय आहे या कागदात?"

"मुली, अग थोरल्या बाजीरावसाहेब पेशव्यांच्या आईने तुझ्या पणजे सासूच्या पणजेसासूची एकदा शनवारवाड्यात ओटी भरली होती. ती हकीकत आहे त्या पत्रात."

पुढं सरकारवाड्याला पार उतरती कळा लागली. काही म्हणजे काही उरलं नाही. आमच्या वडिलांच्या दुखण्यात ऑपरेशनसाठी फारच मोठा खर्च येणार होता. घरात रोख दोन रुपयेसुद्धा नव्हते. अखेर ठरलं की, देव्हाऱ्यातील गजांत लक्ष्मीचा चांदीचा हत्ती मोडायचा. हत्ती सुमारे शंभर तोळे चांदीचा होता. मोठा डौलदार. वर अंबारी होती. अंबारीत पाच तोळे सोन्याची लक्ष्मीची मूर्ती होती. पेशव्यांच्या आईने आमच्या एका पणजीच्या पणजीच्या– तिची– ओटी भरली होती. ओटीत नारळाबरोबर ही हत्तीसकट लक्ष्मी घातली होती.

• दीपावली शुभचिंतन •

(PRATISHA 670



एक विमा पॉलिसी — सर्वांना जे हवं ते मिळवून देते


वधूला अभिवचन


मुलांना प्रेरणा


वृद्धांना सुखाचा ठेवा


कुटुंबाला संरक्षण


देशाच्या अर्थव्यवस्थेला आधार

आयुर्विम्याला पर्याय नाही

गजांत लक्ष्मीचा हत्ती विक्रीसाठी बाहेर काढला. मीच तो पुण्याला नेणार होतो. हत्ती रुमालात बांधलाही. वहिनीसाहेबांच्या डोळ्यातून पाणी वाहत होतं. मी निघालो अन् तेवढ्यात वहिनीसाहेबांना आठवण झाली. त्या म्हणाल्या,

" थांबा भाऊजी ! बापूकाकांना बोलवा ! "

मी बापूकाकांना बोलावून आणलं. ते म्हणाले, " सूनबाई तो– तो कागद, मी दिलेला आहे ना ? आणा बरं ! "

बापूसाहेबांनी कागद घेतला. उलगडून वाचला. पुन्हा वाचला आणि माझ्या हातातला तो चांदीचा हत्ती घेऊन त्याचे सोंडेसकट मस्तक उलट सुलट दिशने पिळलं, आटे सुटे झाले. मस्तक वेगळं झालं. हत्तीच्या पोटात थोडीशी पोकळी होती. आत एक पुरचुंडी होती. ती केळीच्या सोपटाची होती. बापूंनी ती उलगडली. पुडीत अत्यंत तेजःपुंज असे नऊ खडे होते. ती नवग्रहाची नऊ रत्नं होती.

आम्ही विस्मित झालो. आनंदितहि झालो. रत्नं पुण्याला मी घेऊन आलो, भिकारदास मारुतीपाशी किकाभाई म्हणून प्रख्यात सराफ होते. त्यांच्याकडे मी ती मोडली.

गजांत लक्ष्मी पुन्हा देव्हाऱ्यात बसली. सरकारवाड्याचं औक्ष चार दिवसांनी वाढलं.

सरकारवाड्यातलं देवघर फार फार प्रेक्षणीय होतं. तेलातुपाचे नंदादीप तेवत असत. कुळधर्म कुळाचार फार थाटात होत.

देवघराच्या समोरच नऊखणी सोपा होता. चौफेखणात झोपाळा बांधलेला होता. सासुरवासणी माहेरवासणींनी हा झोपाळा गजबजलेला असायचा. ह्या झोपाळ्यावर किती डोहाळजेवणं झाली आहेत ते त्या झोपाळ्यालाच माहीत.

अन् त्या पलीकडच्या दुसऱ्या चौफेखणाला म्हणत मखराचा खण. नव्या न्हाणवलीला तिथं मखर घालून मखरांत बसवीत.

त्या मागच्या चौकातल्या ओटयांवर धान्याची पोती आणि कणग्या ठिच्च असत. माणूस कधी उपाशी इथून जायचा नाही.

पण हे सारं संपलं. आम्ही पुण्याला येऊन राहिलो. वाडा रिकामा झाला. कुलपं लागली. वहिनी साहेबांनी सरकारवाड्यातून बाहेर पडण्यासाठी अंगणात पाऊल टाकलं. देवडीवरचा पोपट ओरडला.

" खानबाबा, वहिनीसाहेब–"

खानबाबा नेहमीच्या लगबगीने दरवाजा उघडायला धावले. वहिनीसाहेब मोठ्याने म्हणाल्या,

" नका उघडू दरवाजा खानबाबा ! राहू द्या ! "

खानबाबा थबकले. त्यांनी मुजरा केला. वहिनीसाहेब त्यांना दाटलेल्या गळ्याने म्हणाल्या,

" खानबाबा तुम्ही–?"

" वहिनीसाहेब फिकीर नका करू ! वाडा मी सांभाळीन. जान आहे तोवर सांभाळीन ! "

डोळ्याला पदर लावीत दिंडीतून वाकून वहिनीसाहेब बाहेर पडल्या. पिंजऱ्यातला पोपट फडफड करीत होता.

एक वर्ष उलटलं. असाच नोकरीवर जाण्याच्या गडबडीत होतो. तेवढ्यात दाराशी जीप थांबलेली दिसली. बाजीराव पाटील घाबऱ्या घाबऱ्या उतरून धावत आले. मी पुसलं,

" काय झालं पाटील ? "

घाईघाईने मुजरा करीत पाटील म्हणाले,

" सरकारवाड्यावर वीज पडली ! वाडा धडाकून पेटला आहे ! "

वहिनीसाहेब तर मटकन खालीच बसल्या. हातापायांतलं बळ गेलं. त्याच जीप-मधून आम्ही गावी आलो. सारा आसमंत धुराने आणि चंदनाच्या सुवासाने कोंदला होता. शेकडो माणसं आग विझविण्यासाठी पाणी आणीत होती. अग्निनारायण संतापला होता. मोठ्या मुश्किलीने आम्ही सरकारवाड्याच्या आतल्या चौकात शिरलो. धग लागत होती. भवानी महाल धुमसत होता. लाकडं उभी आडवी कोसळली होती. तेवढ्यात धुराचा लोट विरळ झाला आणि वहिनीसाहेबांनी किंकाळीच फोडली,

" खानबाबाऽऽ—"


खानबाबांचा देह भवानीमहालात ढिगाखाली पडला होता !

आसमंत चंदनाच्या वासाने कोंदला होता.

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच, असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

साप्ताहिक 'माणूस'

४१९ नारायण पेठ, पुणे २



# दीपावली अभीष्टचिंतन

ही दिवाळी आणि नूतन वर्ष
आमच्या ग्राहकांना, विक्रेत्यांना आणि हितचिंतकांना
सुखसमृद्धीचें जावो!

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.** किर्लोस्करवाडी, जि. सांगली

Manoos ( Weekly ) : Rupees Two : Regd. No. M H–649


# Swastik



**FOOTWEAR**

*another name of*

## Foot Comfort

Designed to Suit the Tastes of
all the Young and the old
Modern and the Extra Modern

# Swastik

# Rubber Products Ltd.

*POONA* – 3

AUTHORISED DEALER FOR BOMBAY AND GREATER BOMBAY

## Messrs Raja Traders

9, Wallace Street, Bombay 1, ( BR )


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस-प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून ४१९